लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख

# अमृत महोत्सव

कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४



# लोकनेता

**जीवन साधना पुरस्कार २०२३**

लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख

# अमृत महोत्सव

कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४




लोकनेता

लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख

# अमृत महोत्सव

कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

## शुभारंभ समारोह



लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख

# अमृत महोत्सव

कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४



# लोकनेता

**माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख गौरवांक**

**मुख्य संपादक**

प्राचार्य डॉ. विलास देशमुख

**संपादक मंडळ**

प्रा. नवनीत देशमुख

प्राचार्य डॉ. विजय बोबडे

डॉ. प्रमोद नारायणे

डॉ. प्रियराज महेशकर

**प्रकाशक**

लोकनेते प्रा. सुरेशभाऊ देशमुख अमृत महोत्सव समिती

**लोकनेता**

**मुख्य संपादक**
प्राचार्य डॉ. विलास देशमुख

**प्रकाशन**
दि. १७ ऑगस्ट २०२४
अमृत महोत्सव सांगता समारोह

**मुद्रण, ग्राफिक्स डिझायनिंग व अक्षरजुळवणी**
सृष्टी ग्राफिक्स, नागपूर

**मुखपृष्ठ**
रवी अंधारे, नागपूर

**छायाचित्रे**
सचिन सावरकर

**प्रकाशक**
लोकनेते प्रा. सुरेशभाऊ देशमुख अमृत महोत्सव समिती
कार्यालय : यशवंत महाविद्यालय, वर्धा-४४२ ००१
भ्रमणध्वनी : ९५२२१४१७००, ९८५०३०९६६५



# माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचा कर्तृत्व आलेख

| | | |
|---|---|---|
| **जन्म तारीख** | : | २० मे १९४९ |
| **प्राथमिक शिक्षण** | : | नगरपरिषद टिळक प्राथमिक शाळा, वर्धा. |
| **मॅट्रिक** | : | महात्मा गांधी विद्यालय (क्रॉडक) १९६५ |
| **महाविद्यालयीन शिक्षण** | : | यशवंत महाविद्यालय, वर्धा |
| | | एम. ए. राज्यशास्त्र, नागपूर विद्यापीठ, नागपूर |
| **विद्यार्थी चळवळीशी संबंध** | : | सन १९६९ मध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थी चळवळीशी संबंध. |
| | : | सन १९७१-७२ मध्ये विद्यार्थी चळवळीमध्ये सक्रीय सहभाग. |
| **राजकारण व समाजकारण कारकीर्द** | : | सन १९७५ मध्ये युवक कॉंग्रेसमध्ये प्रवेश. |
| | : | पुढे वर्धा जिल्हा युवक कॉंग्रेस जनरल सेक्रेटरी म्हणून युवक चळवळीशी घनिष्ठता. |
| **अध्यापन कार्य** | : | १९७३-१९८९ राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून यशवंत महाविद्यालय वर्धा येथे अध्यापन. |
| | | कॉंग्रेसमधील वाटचालीस सुरुवात. |
| **सहकार क्षेत्रात पदार्पण** | : | १९८५ मध्ये वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून निवड. |
| | | १९८८ मध्ये वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपदावर आरुढ. |
| | | जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदी सतत १० वर्ष कार्यरत. |

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक क्षेत्रात पदार्पण | : | सन १९९० साली यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष. |
| सहकारी साखर कारखाना अध्यक्ष | : | सन १९९० साली सहकार महर्षी बापुरावजी देशमुख साखर कारखाना, वेळा, ता. हिंगणघाट, येथे उभारणी. |
| सुतगिरणीचे अध्यक्ष | : | सन १९९८-९९ पासून स्व. देशमुख शेतकरी सहकारी सुतगिरणीचे अध्यक्ष. |
| सेवाभावी वृत्तीची वाटचाल | : | बापुरावजी देशमुख फाऊंडेशन, वर्धा ह्या सेवाभावी संस्थेचे संचालक म्हणून निवड, या फाऊंडेशन ला नवा आयाम प्राप्त करुन देण्याचे कार्य अव्याहत सुरु. |
| विविध संस्थांचा आधारवड | : | सहकारी व शैक्षणिक क्षेत्राच्या सोबतच सामाजिक बांधिलकी स्वीकारुन |
| | | जिल्ह्यातील विविध संस्थांशी जिव्हाळ्याचा संबंध. व त्यांना आधार देण्याचे अव्याहत कार्य. |
| राज्य सहकारी शिखर बँकेचे अध्यक्ष | : | २६ सप्टे. २०००-०२ या काळात महाराष्ट्र राज्य सहकारी (शिखर) बँक, मुंबईचे |
| | : | सलग दोन वर्ष अध्यक्षपद भूषविले. |
| साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष | : | फेब्रुवारी २००४ मध्ये वर्धा येथे झालेल्या ८ व्या अ. भा. आंबेडकरी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष. |
| पुन्हा सुतगिरणीचे अध्यक्ष | : | सन २००५ मध्ये स्व. बापुरावजी देशमुख सुतगिरणीच्या अध्यक्षपदी पुन्हा निवड. |
| पुरस्काराची सुरुवात | : | सन २००९ पासून सहकार महर्षी बापुरावजी देशमुख स्मृती पुरस्कार, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंतांचा गौरव |
| वर्ध्याचे आमदार | : | सन २००९ ते २०१४ पर्यंत. |
| उपाध्यक्ष | : | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ |
| जीवनसाधना पुरस्काराने सन्मानित | : | सन २०२३ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, राज्यपालांच्या हस्ते गौरव |
| संचालक | : | सन २०१८-२०२३ महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघ, मुंबई |
| | : | सन २०२३ पासुन पुढे |
| साहित्य व सांस्कृतिक कार्य | : | सन २००२ डॉ. आंबेडकर अकॅडमी, सातारा, आयोजित विचारवेध संमेलनाचे स्वागताध्यक्ष |
| | : | सन २००४ ८ व्या अखिल भारतीय आंबेडकरवादी मराठी साहित्यसमंलनाचे स्वागताध्यक्ष |
| | : | सन २०११ हिरक महोत्सवी विदर्भ साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष. |
| | : | सन २०१६ शिक्षणमहर्षी बापुरावजी देशमुख स्मृती व्याख्यानमालेची सुरुवात. |
| | : | ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांच्या प्रबोधनात्मक किर्तनाचे सलग पाच वर्षे आयोजन. |
| | : | पंडीत प्रभाकर कारेकर व पंडित अजित कडकडे यांच्या संगीत मैफलीचे आयोजन. |
| | : | सन १९९७ वर्धा जिल्हा जेष्ठ नागरीक सत्कार समारोहाचे आयोजन. |



# संपादकीय

माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांनी २० मे २०२३ ला वयाची चौऱ्याहत्तर वर्षे पूर्ण करून पंचाहत्तराव्या वर्षात प्रवेश केला. त्यांच्या राजकीय व सामाजिक लोकाभिमुख कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या चाहत्यांनी २०२३ ते २०२४ हे अमृत महोत्सवी वर्ष 'कृतज्ञता वर्ष' म्हणून साजरे करण्याचे ठरवले. त्याकरिता अमृत महोत्सव समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या मार्गदर्शनात वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात आले. या कृतज्ञता वर्षाचा शुभारंभ समारोह २० मे २०२३ रोजी झाला. या समारंभाला उद्‌घाटक म्हणून विधानसभेचे माजी सभापती मा. श्री. अरुण गुजराथी, तर समारोहाचे अध्यक्ष म्हणून माजी आमदार मा. श्री. उल्हास पवार, पुणे, तसेच प्रमुख पाहुणे मा. श्री. अनिल देशमुख, खासदार श्री. रामदास तडस हजर होते. प्रा. सुरेशभाऊंच्या गेल्या पंचेचाळीस ते पन्नास वर्षाच्या राजकीय आणि सार्वजनिक जीवनात केलेल्या कार्याचे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले जावे, त्यांच्या राजकीय व सार्वजनिक जीवनात सुरेशभाऊंच्या संपर्कात आलेल्या विविध क्षेत्रातील लोकांना सुरेशभाऊ कसे वाटतात? हे लेख स्वरूपात मागवून, त्याचे संकलन करुन 'लोकनेता' हा गौरवांक प्रकाशित करावा असे अमृत महोत्सव समितीने ठरविले, त्यानुसार संपादक मंडळ स्थापन करून या कार्यास सुरुवात झाली.

संपादक मंडळाच्या सदस्यांनी ज्या ज्या मान्यवरांना प्रा. सुरेशभाऊंवरील लेखासाठी संपर्क साधला, त्या सर्वांनी त्यांच्या व्यस्त कार्यातून वेळ काढून प्रा. सुरेशभाऊं च्या व्यक्तिमत्त्वावर लेख लिहिले. त्या सर्वांच्या ऋणातच मी राहू इच्छितो. या सर्व मान्यवरांच्या लेखांमुळे प्रा. सुरेशभाऊंच्या अनेक क्षमतांचा, गुणवैशिष्ट्यांचा आपल्याला परिचय होणार आहे. प्रा. सुरेशभाऊंचे अनेक स्वभाववैशिष्ट्ये आपल्याला कळणार आहेत, त्याच्या जोडीला त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेणारे फोटोसुद्धा या गौरवांकामध्ये दिले आहेत. त्या वरून प्रा. सुरेशभाऊंचे राजकीय जीवन कसे सर्वसमावेशक आहे हे निदर्शनास येईल.

शैक्षणिक संस्थेतील विविध सहकाऱ्यांच्या देणगीतून 'अमृत महोत्सव' साकार होत आहे. अमृत महोत्सवाच्या सांगता समारोहाप्रसंगी प्रा. सुरेशभाऊंना पाच लक्ष रुपयाचा धनादेश देणगीद्वारे संकलित निधीतून द्यावा असे समितीने ठरविले. सुरेशभाऊंचे आजपर्यंतचे जीवन व कार्य पाहिल्यास या निधीचा उपयोग सार्वजनिक कार्यासाठीच होईल यात तिळमात्रही शंका नाही. एखाद्या नवीन सार्वजनिक कार्याची सुरुवात करण्यास हा निधी तसा त्रोटकच; पण भाऊंनी एखादे कार्य हाती घेतल्यावर त्यांना पैशाची कमतरता पडत नाही हाही विश्वास आहे.

हा सांगता समारोह देदिप्यमान व्हावा हा समितीचा प्रयत्न आहे. या समारोहाकरिता मा. श्री शरद पवार अध्यक्ष म्हणून तर प्रमुख पाहूणे म्हणून मा. ना. श्री. नितीनजी गडकरी व विशेष अतिथी म्हणून मा. श्री. बाळासाहेब

थोरात (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य), मा. श्री. जयंत पाटील (प्रदेशाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार), मा. श्री. अनिल देशमुख, मा. श्री. जयंत पाटील (शे. का. प.), मा. खा. श्री. अमर काळे उपस्थित राहणार आहेत.

हा गौरवांक जाहिरातीचा अंक ठरू नये म्हणून फक्त मोजक्याच जाहिराती घेण्याचा संपादक मंडळाने निर्णय घेतला. या मोजक्याच जाहिरातदारांच्या आर्थिक योगदानातून हा ग्रंथ साकार होत आहे. त्या सर्व जाहिरातदारांचे मनापासून आभार.

प्रा. नवनीत देशमुख यांचा शिक्षण क्षेत्रातील व प्रकाशन क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव या गौरवांकाच्या मांडणीत भर टाकणारा ठरला. माजी प्राचार्य डॉ. विजय बोबडे यांची दोन महिन्यापूर्वी बायपास सर्जरी झाली, तरी सुद्धा त्यांनी ह्या कार्यात रोज वेळ देऊन खूप मोलाची मदत केली. या गौरवांकाच्या महत्त्वपूर्ण बाबी डॉ. प्रमोद नारायणे यांनी समर्थपणे सांभाळल्या त्यांच्या कार्यतत्परतेने हा गौरवग्रंथ पूर्णत्वास आणण्यात फार मोलाची मदत झाली. डॉ. प्रियराज महेशकर ह्यांच्या सौंदर्यदृष्टीचा व कल्पकतेचा फायदा गौरवग्रंथाच्या सजावटीसाठी झाला. गौरवांकाचे मुखपृष्ठ तयार करून देण्याचे, हा गौरवांक वेळेत छापून, पूर्ण करून देण्याचे मोठे आव्हान सृष्टी ग्राफिक्सचे श्री रवी अंधारे यांनी स्वीकारले.

हा गौरवांक लेखनदृष्ट्या निर्दोष, परिपूर्ण व सर्वसमावेशक व्हावा, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तरीसुद्धा अनवधानाने किंवा नजरचुकीने काही त्रुटी राहून गेल्या असतील, तर पुढील आवृत्तीत आम्ही त्यांचे नक्कीच निरसन करू.

सुरेशभाऊंचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व उलगडून दाखविणारा हा गौरवांक आपण सहृदय भावनेने स्वीकाराल हीच अपेक्षा!

**डॉ. विलास देशमुख**
मुख्य संपादक

# अमृत महोत्सव आयोजन समिती

**मा. दत्ताजी मेघे**
माजी मंत्री तथा माजी खासदार, नागपूर

**मा.  रामदास तडस**
माजी खासदार, वर्धा

**मा. हर्षवर्धन देशमुख**
अध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

**मा. डॉ. गिरीश गांधी**
माजी आमदार, नागपूर

**मा. डॉ. राजेंद्र शिंगणे**
आमदार तथा माजी मंत्री, बुलढाणा

**मा.  सुभाष धोटे**
आमदार, राजुरा

**मा. डॉ. संतोषराव कोरपे**
अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला

**मा.अरविंद पोरेड्डीवार**
माजी अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली

**मा. राजेन्द्र जैन**
माजी आमदार, गोंदिया

**मा. प्रवीण देशमुख**
सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, राळेगाव

# ऋणनिर्देश

लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांना हार्दिक सदिच्छा! २०२३-२०२४ हे अमृत महोत्सवी वर्ष कृतज्ञता वर्ष म्हणून साजरे करण्याची त्यांनी आम्हाला अनुमती दिली, त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

माजी आमदार लोकनेते प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दि. २० मे २०२३ राजी आयोजित अमृत महोत्सवी शुभारंभ समारोहासाठी मा. अरुण गुजराथी, मा. उल्हासदादा पवार, त्याचप्रमाणे इतर मान्यवर मंडळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित झाले. त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार!

सांगता समारोहाचे अध्यक्षस्थान भारताचे माजी केंद्रीय मंत्री तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. शरदचंद्र पवार यांनी भुषविण्याचे मान्य केले, त्यांचे शतश: आभार!

मा. ना. नितीन गडकरी ( केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री ) यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी सहमती दर्शविली. त्यांचे हृदयस्थपणे ऋणी आहोत.

मा. बाळासाहेब थोरात ( माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य ), मा. जयंत पाटील (प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), मा. जयंत पाटील (नेते, शेतकरी कामगार पक्ष ) मा. अमर काळे, खासदार, वर्धा यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविण्यास मान्यता दिली, त्यांचे हार्दिक ऋणनिर्देश!

प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचे अमृत महोत्सवी वर्ष 'कृतज्ञता वर्ष' म्हणून साजरे करण्यासाठी आयोजन समिती गठीत करण्यात आली होती. या समितीचे सदस्य मा. दत्ताजी मेघे, मा. रामदासजी तडस, मा. हर्षवर्धन देशमुख, मा. गिरीशजी गांधी, मा. डॉ. राजेंद्रजी शिंगणे, मा. सुभाषजी धोटे, मा. संतोषराव कोरपे, मा. अरविंद पोरेड्डीवार, मा. राजेंद्र जैन, मा. प्रवीण देशमुख यांच्या पुढाकाराने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आम्ही त्यांच्या ऋणानुबंधातच राहू इच्छितो.

गौरव अंकाचे निर्मितीत अनेक लेखकांचे आणि कलावंतांचे सहकार्य लाभले. तसेच मान्यवर नेत्यांनी शुभेच्छा संदेश पाठवून आमच्या आनंदात भर घातली. त्यांचे आभार मानणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचा मित्रपरिवार, स्नेही, सहकारी आणि मार्गदर्शकांनी या गौरव अंकासाठी लेखनसहाय्य केले: तसेच सुरेशभाऊंच्या कार्यात नेहमीच सहकार्य करणाऱ्या सहकारी संस्थानी जाहिराती देऊन मदतीचा हात पुढे  केला. त्यांचेही धन्यवाद मानणे अगत्याचे आहे.

गौरव अंकाचे आकर्षक व मनोवेधक मुखपृष्ठ तयार करणारे रवी अंधारे यांनी अथक परिश्रम करून हा गौरव ग्रंथ सिद्ध केला. आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

कृतज्ञता वर्षानिमित्त विविध उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या आयोजनांसाठी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेशी संबंधित आजी-माजी प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्वतोपरी सहकार्य केले. त्यांच्या ऋणातच आम्ही राहू इच्छितो.

या गौरव अंकाच्या पूर्णत्वासाठी संपादनाची जबाबदारी समर्थपणे स्वीकारून हा अंक परिपूर्ण केला यासाठी प्राचार्य डॉ. विलासराव देशमुख आणि संपादक मंडळातील सहकारी प्रा. नवनीत देशमुख, प्राचार्य डॉ. विजय बोबडे, डॉ. प्रमोद नारायणे, डॉ. प्रियराज महेशकर यांचा आभारात आवर्जून उल्लेख केलाच पाहिजे.



# शुभसंदेश

## शरद पवार
संसद सदस्य
(राज्य सभा)

दिनांक : १ ऑगस्ट २०२४

**शुभ संदेश**

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष लोकनेते प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्ताने विविध समाजोपयोगी उपक्रम आणि कृती कार्यक्रमांच्या द्वारे "कृतज्ञता वर्ष" म्हणून साजरे केले गेले ही विशेष बाब आहे. कृतज्ञता वर्षात आयोजित केलेले कार्यक्रम हे त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव करणारे होते.

शिक्षण, साहित्य, संस्कृती, सहकार आणि राजकारण यामध्ये प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचे कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. दांडगा लोकसंपर्क आणि उत्तम संघटक म्हणून त्यांची ओळख आहे. त्याच बरोबर वर्धा जिल्ह्यातील एक भूषण आणि विदर्भरत्न म्हणून प्रा. सुरेशभाऊ देशमुख सुपरिचित आहे.

प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांना आनंददायी,निरामय आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा .

(शरद पवार)

# शुभसंदेश



**नितीन गडकरी**
**NITIN GADKARI**

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

**मंत्री**
**सड़क परिवहन एवं राजमार्ग**
**भारत सरकार**
Minister
Road Transport and Highways
Government of India

जा.क्र. 02/व्हीआयपी/परि/२०२४
दिनांक :- 29 JUL 2024

## शुभेच्छा संदेश

माझे स्नेही, लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सवानिमित्त गौरव ग्रंथ प्रकाशित केला जात असल्याचे कळल्यावरून अतिशय आनंद झाला.

प्रा. सुरेशभाऊंचा आणि माझा दीर्घ काळापासून स्नेह आहे. आमचे संबंध कौटुंबिक पातळीचे आहेत. राजकीय विचारांच्या पल्याडचा स्नेहबंध त्यांनी अनेकांशी जपला. त्यात माझाही समावेश आहे, हे माझे भाग्य. ते खऱ्या अर्थाने लोकनेते आहेत आणि त्यामुळे संपूर्ण वर्धा जिल्ह्यात आणि जिल्ह्याबाहेरही त्यांचा चाहता वर्ग पसरलेला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या पर्वावर जन्मलेले सुरेशभाऊ स्वकर्तृत्वाने मोठे झाले. त्यांनी अतिशय कष्टाने शिक्षण घेतले आणि राजकारण–समाजकारणासह शैक्षणिक व सहकार क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केली. त्यांच्या नेतृत्वातील सहकारी व शैक्षणिक संस्था हे त्यांचे विस्तारित कुटुंबच आहे. साहित्य, कला, संस्कृती अशा विविध क्षेत्रांशी त्यांचे ऋणानुबंध आहेत आणि वर्ध्यासह विदर्भाच्या लोकजीवनात त्यांचा सक्रिय सहभाग आहे. अशा या नेत्याच्या अमृत महोत्सवी वर्षाला कृतज्ञता वर्षाचे स्वरूप देण्यात आले, त्या अंतर्गत विविध कार्यक्रम–उपक्रम आयोजिले गेले आणि आता 'लोकनेता' हा गौरव ग्रंथ प्रकाशित होत आहे, ही अत्यंत समाधानाची बाब होय.

मी या गौरव ग्रंथासाठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांना ईश्वराने लोकसेवेसाठी दीर्घायुरारोग्य द्यावे, अशी प्रार्थना करतो.

आपला,

( नितीन गडकरी )



# शुभसंदेश

## जयंत राजाराम पाटील
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र

जावक क्रमांक : JP/ MO/ २९८ / 2024

दिनांक : २९.०७.२०२४

### ॥ शुभसंदेश ॥

नमस्कार,

मा.आ. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वर्षांनिमित्त '**लोकनेता**' हा गौरवग्रंथ प्रकाशित होत असल्याचे ऐकून आनंद झाला.

मा. आ. सुरेशभाऊ देशमुख यांच्या व्यक्तीमत्वाला शोभेल असे या गौरवग्रंथाचे नाव आहे. शिक्षण, सहकार, राजकारण अशा विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे सुरेशभाऊ खऱ्या अर्थाने लोकनेता ठरतात. महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमित जन्माला आलेल्या सुरेशभाऊ यांनी नेहमीच सत्य, अहिंसा या विचारांची कास धरली. वर्धा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असताना त्यांनी नेहमीच आपल्या मतदारसंघाचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले.

आज सुरेशभाऊ यांनी आपल्या वयाची पंचाहत्तरी गाठली आहे तरी ते आजही अनेक किलोमीटरचा प्रवास करत लोकांशी संपर्क वाढवतात. याच कारणामुळे जिल्ह्यातील लोकांमध्ये कायम जनसंपर्क राहिला. लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची तळमळ असणाऱ्या या नेतृत्वाला अमृतमहोत्सव वर्षानिमित्त खुप शुभेच्छा. तसेच यानिमित्ताने प्रकाशित होणाऱ्या '**लोकनेता**' गौरव ग्रंथास माझ्या अनंत शुभकामना !

(जयंत पाटील)



# शुभसंदेश

महाराष्ट्र विधानसभा

**अनिल देशमुख**
माजी गृहमंत्री
महाराष्ट्र

## शुभेच्छा संदेश

आमचे मार्गदशक मित्र प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरव करणारा अंक काढला जातो आहे हे वाचून अत्यानंद झाला. प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचे नाव विदर्भातील एक महत्त्वाचे नेते म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात अग्रेसर राहिले आहे. त्यांनी वर्ध्याच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात स्वत:ची स्वतंत्र अशी छाप पाडलेली आहे. राजकीय जीवनामध्ये ते आमचे आणि आमच्या पक्षाचे नेहमीच मार्गदर्शक आहेत. वर्ध्याचे कोणतेही क्षेत्र त्यांच्या कार्याचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होत नाही. त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख उंचावणारा गौरव अंक नक्कीच मूल्यवान ठरणार आहे.

प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वर्षासाठी त्यांना माझ्यातर्फे हार्दिक शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

आपला

अनिल देशमुख



# शुभसंदेश

**सुप्रिया सुळे,** खासदार
(लोकसभा)

मुंबई/ खास / ७६३४/ २४
दिनांक : २६ जुलै २०२४

प्रती
मा. प्राचार्य विलासराव देशमुख
मुख्य संपादक,लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख
अमृत महोत्सव कृतज्ञता गौरव ग्रंथ समिती,
यशवंत महाविद्यालय, वर्धा

स.न.वि.वि.

आदरणीय लोकनेते मा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त गेले वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, याबद्दल सर्व संयोजकांचे मन:पूर्वक अभिनंदन .

महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांच्या कर्मभूमीत मा. बापूरावजी देशमुख यांनी सहकार शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रांतील कार्याची पायाभरणी केली. मा. सुरेशभाऊ गेली चार दशके हा वारसा समर्थपणे पुढे नेण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. वर्धा मतदार संघाचे महाराष्ट्राच्या विधानसभेत त्यांनी प्रतिनिधित्वही केले आहे.

नवमहाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचार व कार्याने प्रेरित होवून देशमुख परिवाराच्या तीन पिढ्या समाजाला योगदान देत आहेत. आदरणीय पवार साहेबांसोबत देशमुख कुटुंबाचा स्नेह अतिशय जिव्हाळ्याचा आहे. सार्वजनिक जीवनात काम करित असताना आम्हां दोन्ही कुटुंबियांचे ऋणानुबंध अतूट स्वरूपाचे राहिले आहेत. आजतागायत ते कायम आहेत व यापुढेही राहतील.

आदरणीय माजी आमदार सुरेशभाऊ देशमुख यांनी वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केली. या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीच्या निमित्ताने त्यांना उत्तम आयुआरोग्य लाभो व समाजाची सेवा अखंडपणे त्यांच्या हातून घडो, हीच अंत:करण पूर्वक सदिच्छा.

आपली,

सुप्रिया सुळे

# अंतरंग


| अ. क्र. | लेख आणि लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | **एक सच्चा आणि प्रामाणिक राजकारणी**<br>दत्ताजी मेघे | १ |
| २. | **सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व**<br>डॉ. गिरीश गांधी | ४ |
| ३. | **निगर्वी, शांत आणि संयमी नेता**<br>डॉ. राजेंद्र शिंगणे | ६ |
| ४. | **मिलनसार व्यक्तिमत्त्व**<br>डॉ. संतोषराव कोरपे | ८ |
| ५. | **मित्रत्वाचा धर्मभाव निभावणारा परममित्र**<br>अरविंद पोरेड्डीवार | १० |
| ६. | **राजकारणातील सहकारी मित्र**<br>सुभाष धोटे | १२ |
| ७. | **निस्वार्थ भावनेने काम करणारा नेता**<br>रामदास तडस | १३ |
| ८. | **सामाजिक जाण असलेला मदतगार नेता**<br>जयंत साळवे | १४ |
| ९. | **राजकारणापेक्षा निष्ठेला महत्त्व देणारा नेता**<br>सुनिल राऊत | १७ |
| १०. | **दीर्घायुरारोग्यमस्तु, सुयश: भवतु, विजय:भवतु**<br>ॲड. सुधीर कोठारी | २१ |
| ११. | **मदतगार मित्र**<br>श्रीधर ठाकरे | २२ |
| १२. | **PROF. SURESH DESHMUKH AN ULTIMATE FRIEND BY ALL YARDSTICKS**<br>Dr. Vedprakash Mishra | २५ |
| १३. | **Shri Sureshbhau Deshmukh: A Journey of Leadership in Cooperative Ba nking and Education**<br>Dr. Prashant Bokare | २७ |
| १४. | **Hon’ble Sureshbahu Deshmukh - Simplicity Personified**<br>Dr. Rajiv M. Borle | २९ |
| १५. | **आदराचे अत्युच्च स्थान**<br>डॉ. राजू हिवसे | ३१ |

| अ. क्र. | लेख आणि लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १६. | **एक सौजन्यशील व्यक्तिमत्त्व**<br>डॉ. एम एल कासारे | ३४ |
| १७. | **A Decade of Joyful Experiences**<br>Prof. Zafar Khan | ३७ |
| १८. | **नाती जपणारा माणूस**<br>डॉ. अशोक पावडे | ३८ |
| १९. | **सामाजिक बांधिलकी जोपासणारा लोकाभिमुख नेता**<br>प्रदीप दाते | ४२ |
| २०. | **युवाओं में हुनर पैदा करनेवाला इंसान**<br>प्राचार्य डॉ. देवेंद्र पुनसे | ४६ |
| २१. | **माझे सर!**<br>डॉ. प्रदीप आगलावे | ५२ |
| २२. | **श्रीमंत मनाचा साधा माणूस !**<br>प्रा. नवनीत देशमुख | ५५ |
| २३. | **राजकारणातील आदरणीय मित्र**<br>विजय मुळे | ५७ |
| २४. | **सहृदय व  समाजनिष्ठ शिक्षणकारणी**<br>डॉ. शैलेंद्र धर्मदास लेंडे | ६० |
| २५. | **आज दाआजी हवे होते!**<br>ॲड. अनंत खेळकर | ७४ |
| २६. | **मनमिळावू भाऊ**<br>प्रा. शेषकुमार येरलेकर | ७७ |
| २७. | **मी अनुभवलेले प्रा. सुरेशभाऊ देशमुख**<br>प्राचार्य डॉ. विजय बोबडे | ७९ |
| २८. | **सुपुत्राचे सुपुत्र**<br>प्राचार्य डॉ. वीरेंद्र गोपालसिंह बैस | ८४ |
| २९. | **कुटुंबवत्सल प्रा. सुरेशभाऊ देशमुख**<br>डॉ. अनिता विलास देशमुख | ८७ |
| ३०. | **प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्यासोबत मुक्तसंवाद**<br>संवादक – डॉ. प्रमोद नारायणे | ९१ |
| ३१. | **तुम्ही आयुष्यभर अमृत वाढलं**<br>अरुण गुजराथी | ९८ |
| ३२. | **विचाराला विवेकाची जोड असावी**<br>उल्हासदादा पवार | १०१ |




# एक सच्चा आणि प्रामाणिक राजकारणी

**दत्ताजी मेघे**
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
तथा माजी खासदार, वर्धा लोकसभा



विदर्भाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, सहकार आणि शैक्षणिक अशा विविधांगी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे विदर्भातील जे महनीय व्यक्ती आहेत, त्यात यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थचे माजी अध्यक्ष आणि माजी आमदार प्रा. सुरेशराव देशमुख यांचा नामोल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. राजकारणाला उत्तम अशा प्रामाणिकपणाची आणि सच्च्या अशा जीवनमूल्यांची जोड देता येते, याचे एक चांगले आणि मूर्तिमंत उदाहरण म्हणून मी सुरेशराव देशमुख यांच्याकडे पाहतो. ते माझे अगदी जिव्हाळ्याचे मित्र आहेत. माझ्या राजकीय उमेदीच्या काळात मी त्यांना माझ्या राजकीय मित्राच्या रूपातही पाहिले आहे. खूप वर्षापर्यंत आम्ही वर्धा जिल्ह्याचे राजकारण सोबत केल्यामुळे त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्यात असलेल्या आदर्शवत अशा स्वभावगुणांची मला जवळून ओळख झाली आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या रूपाने वर्ध्याच्या राजकारणाला एक आदर्श मिळाला. या महान अशा राजकीय आदर्शाला पुढे ठेवून गेल्या ७५ वर्षापासून वर्ध्याचे राजकारण सुरू आहे. महात्मा गांधीनंतर या जिल्ह्यात अनेक राजकारणी पुढाऱ्यांची मोठी परंपरा लाभली. त्या सर्वांनीच राजकारणाला आदर्शरुप देण्याचा प्रयत्न केला. या जिल्ह्यात विविध राजकीय पक्षांमध्ये काम करणारे लोक नाहीत असे नाही; परंतु राजकीय पक्षांच्या पलीकडे जाऊन वर्धा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकांनी धडपड सुरू ठेवली आहे. त्यामुळेच

वर्धा जिल्हा हा सामाजिक राजकारणाचा एक आदर्श जिल्हा म्हणून मान्यता प्राप्त झाला आहे. हा राजकीय आदर्श निर्माण करण्यात सुरेशरावांचा वाटाही मोठा आहे.

वर्धा जिल्ह्याचे राजकारण मी जवळून पाहिले आहे, म्हणजे मी प्रत्यक्षपणे या जिल्ह्याच्या राजकारणात सहभागी झालो आहे. लोकप्रतिनिधी म्हणून या जिल्ह्याने मला संसदेत पाठवले आहे. या जिल्ह्याच्या राजकारणाला, समाजकारणाला आणि अर्थकारणाला मी जवळून पाहिलेले आहे. माझ्या आयुष्याच्या सार्वजनिक जीवनातील जास्तीत जास्त वर्षे मी वर्धा जिल्ह्याच्या सतत संपर्कात राहिलो आहे. एक आदर्श जिल्हा म्हणून मी या जिल्ह्याकडे नेहमीच पाहत आलो आहे.

महात्मा गांधींनंतर या जिल्ह्याच्या राजकारणाकडे पाहिले, तर सहकारमहर्षी बापुरावजी देशमुख यांचे नाव मुख्यत्वेकरून घ्यावे लागेल. वर्ध्याच्या राजकारणाला आणि समाजकारणाला नवी दिशा देणारे नेते म्हणून त्यांची ओळख सर्वज्ञात आहे. या जिल्ह्यातील राजकारणच नव्हे, तर समाजकारण, शिक्षण, संस्कृती आणि अर्थ या सर्वच दृष्टीने त्यांचे मोठे योगदान जिल्ह्याच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरले. आचार्य विनोबा भावे यांच्या कार्यक्षेत्राने पुनित झालेल्या पवनार येथे माझा जन्म झाला. मी लहानाचा मोठा नागपूर जिल्ह्यात झालो असलो, तरी वर्ध्याच्या राजकारणाला पाहूनच माझी राजकीय जडणघडण झाली. सहकारमहर्षी बापूरावजी देशमुख हे आम्हा तरुणांसाठी त्यावेळी एक मार्गदर्शक होते. त्यांची काम करण्याची शैली वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यांचा जनसंपर्क दांडगा होता. त्यांच्या मनात लोककल्याणाच्या नव्या नव्या कल्पना येत असत आणि ते त्या कल्पनांना प्रत्यक्षात कसे उतरविता येईल याच्या ध्यासात असत. एखादे काम हाती घेतले तर ते पूर्णत्वास कसे जाईल यासाठी ते सतत कर्तव्यतत्पर असत. त्यामुळे आमच्यापुढे त्यांचा आदर्श असणे साहजिकच होते.

माझी राजकीय जडणघडण नागपूरला झाली असली, तरी वर्ध्याच्या राजकारणावर माझे सातत्याने लक्ष होतेच. तेव्हापासूनच मी सुरेशरावांना ओळखत होतो. सुरेशरावांचे आमच्या नागपूरच्या घरी कोणत्या ना कोणत्या निमित्ताने येणेजाणे सुरू होते. आमची चांगली मैत्री होती. मी युवक काँग्रेसमध्ये कार्य करीत असताना सुरेशरावांशी संपर्क येत होता. जेव्हा पवार साहेबांनी पुलोदचा प्रयोग यशस्वी केला, तेव्हा मला राज्यमंत्रीपद देण्यात आले. मी मुंबईवरूनच सुरेशरावांना फोन करून याबाबतची माहिती दिली. माझ्या मंत्रीपदामुळे त्यांनाही खूप आनंद झाला. वर्ध्याला त्यांना भेटायला येण्याची मी इच्छा व्यक्त केली. वर्ध्याला सर्वांच्या भेटीगाठी घेऊन आम्ही सोबतच नागपूरला गेलो. प्रवासात आमच्या खूप गप्पा झाल्या. त्यावेळी खऱ्या अर्थाने मला सुरेशरावांच्या खास अशा व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली. त्यांना दाआजींचा एवढा मोठा वारसा लाभलेला असतानासुद्धा त्यांनी कधीही मोठेपणा मिरवला नाही. त्यामुळे एक चांगला मित्र म्हणून मला त्यांचा नेहमीच आदर वाटत आला आहे.

१९९९ ची निवडणूक आठवते. मला पवार साहेबांनी वर्ध्यावरून खासदारकीसाठी उभे राहण्यासाठी आग्रह केला होता. तेव्हा मी साहेबांना सुरेशरावांना विधानसभेसाठी उभे राहायला सांगण्याची विनंती केली. आम्ही नागपूरवरून वर्ध्याला सुरेशरावांना भेटायला आलो. साहेबांनी सुरेशरावांना सुद्धा निवडणूक लढविण्यासाठी तयार केले. त्या वेळी आम्ही दोघेही राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उभे होतो राष्ट्रवादी काँग्रेस त्यावेळी नवीन पक्ष म्हणून राजकारणात उतरला होता. आम्ही दोघेही ती निवडणूक जिंकूशकलो नाही; पण या निमित्ताने सुरेशरावांसोबत माझे संबंध दृढ झाले.

श्रद्धेय बापुरावजी देशमुख यांच्या निधनानंतर राजकारणाचा वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी प्रा. सुरेशराव देशमुख यांच्याकडे आली. राजकारणाच्या निमित्ताने बापुरावजींचा आणि माझा अनेकदा संपर्क आला होता. त्यानिमित्ताने माझी आणि सुरेशरावांची भेट होत होती; पण मैत्री होण्याएवढी आणि राजकीय गाठीभेटी घेण्याएवढी त्यांची भेट केव्हा झाली, हे आता मला नेमके आठवत नाही. मी वर्ध्याच्या राजकारणात रूळलो. वर्ध्याचे राजकारण मी समजून घेऊ लागलो.

तेव्हा मला सुरेशरावांचे व्यक्तिमत्त्व अधिक चांगल्या प्रमाणात कळत गेले. त्यांच्यामध्ये असलेल्या राजकीय प्रामाणिकपणामुळे आणि त्यांच्यात दडलेल्या सच्चा राजकारण्यामुळे मला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे विशेष मैत्रीपूर्ण भावनेने पाहता आले. त्यांच्या समाजकारणाला आणि राजकारणाला समजून घेता आले.

सुरेशराव आणि मी, आम्ही एकमेकांच्या कार्यात कधीही ढवळाढवळ केली नाही. मी राजकीय क्षेत्रात सक्रिय झालो. त्यांनी आपले सहकार क्षेत्र सांभाळले. मी त्यांच्या सहकार क्षेत्रात त्यांना साथ देत राहिलो. त्यांनी माझी राजकीय कारकीर्द पुढे नेण्यात नेहमीच मदत केली. बापुरावजी देशमुख यांनी स्थापन केलेल्या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेची धुरा सुरेशरावांनी समर्थपणे सांभाळली. त्यांनी शिक्षण कार्यासाठी ग्रामीण भागाकडे विशेष लक्ष पुरविले. मी शहरांना केंद्र करून शहरी भागातील शिक्षणाकडे लक्ष दिले. दाआजींनी त्या काळात सेवाग्राम येथे अभियात्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. एक मोठे कार्य त्यांच्या हातून झाले. दाआजींच्या नंतर सुरेशरावांच्या नेतृत्वात अनेक कुशल अभियंते तयार झाले. आमच्या मैत्रीमुळे सुरेशरावांच्या या क्षेत्रात आपण हस्तक्षेप करायचा नाही असे मी ठरविले आणि मी सावंगी येथे वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचे काम हाती घेतले. सुरेशरावांनी माझ्या कार्याला आणि माझ्या राजकारणाला कधीही आडकाठी आणली नाही. उलट आम्ही सोबत राहून अनेक राजकीय आणि सामाजिक प्रकल्प पुढे नेले.

आपणाला कल्पना आहे की, सुरेशरावांचे आणि माझे राजकीय नेतृत्व एकच होते. अनेक वर्षे आम्ही एका नेतृत्वाच्या छत्रछायेत कार्य केले. पवार साहेबांनाही आमच्या घनिष्ठ मैत्रीविषयी कल्पना आहे. साहेब जेव्हा जेव्हा वर्ध्याला येत, तेव्हा तेव्हा आम्ही दोघेही त्यांच्या कार्यक्रमासाठी संयुक्तपणे पुढे येत होतो. एकमेकांना सहकार्य करीत होतो. त्यांचा दौरा यशस्वी कसा होईल यासाठी आम्ही प्रयत्न करीत होतो. आम्ही दोघांनीही पवार साहेबांच्या नेतृत्वात मोठे संघटन उभे केले. आम्ही कार्यकर्त्यांची मोठी फळी उभी केली. वर्धा जिल्ह्याचे नेतृत्व आम्ही दोघांनीही संयुक्तपणे केले.

सुरेशराव अजूनही राजकारणात टिकून आहेत. अजूनही ते लोकांच्या सतत संपर्कात आहेत हे मी ऐकत असतो. वाढत्या वयानुसार मला प्रत्यक्ष राजकारणात सहभागी होता येत नाही; पण सुरेशरावांचा उत्साह टिकून आहे. ते लोकांच्या भेटीगाठी घेत असतात हे ऐकले की, वर्ध्याच्या राजकारणाची मला नेहमीच आठवण येत असते.

सुरेशरावांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वातील अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे त्यांनी कधीही कुरघोडीचे राजकारण केले नाही. कोणाविषयी आकस बाळगला नाही; किंवा कुणाविषयी आपल्या मनात द्वेष ठेवला नाही. सरळ हाताने त्यांनी प्रत्येकाला मदतीचा हात दिला. त्यांच्या प्रामाणिकपणामुळे राजकीय दृष्टीने ते अनेकदा अपयशी ठरले. त्यांच्या प्रामाणिकपणामुळे आणि सच्चा राजकीय निष्ठेमुळे ते राजकारणात आवश्यक असलेली मुसद्देगिरी दाखविण्यात कमी ठरले; पण त्यांनी आपला प्रामाणिकपणा सोडला नाही. राजकीय कारकीर्दीपेक्षा प्रामाणिकपणा जपण्यावर त्यांनी जास्त लक्ष दिले.

राजकीय जीवनात यशापयश येतच असतात; परंतु यापलीकडे जाऊन यशस्वी राजकारण करण्याची भूमिका त्यांनी सातत्याने घेतली. ते गेल्या अनेक वर्षांपासून वर्धा जिल्ह्याचे सक्रियपणे सामाजिक राजकारण करीत आहेत. वर्धा जिल्ह्याच्या सर्वांगीण वाढीसाठी प्रयत्न करीत आहे. त्यांचे हे कार्य विदर्भातील राजकारणाचा ऐतिहासिक ठेवा आहे असे मला वाटते.

सुरेशरावांनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेली आहे. त्यांच्या पुढील राजकीय कारकीर्दीला मनापासून शुभेच्छा देतो. त्यांचे पुढील आयुष्य निरामय, निरोगी जावो तसेच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना करतो.

# सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व

**डॉ. गिरीश गांधी**
माजी आमदार, नागपूर



देशाच्या राजकारणात एक काळ असा होता की, ज्यावेळी काँग्रेस पक्षाचे निर्विवाद बहुमत असायचे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात या पक्षाचे मोठे योगदान आहे. काँग्रेस पक्षाचे नेतृत्व करणारे अनेक दिग्गज काँग्रेस पक्षात होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, मौलाना आझाद, आचार्य विनोबा भावे अशी कित्येक नावे या संदर्भात घेता येतील. स्वातंत्र्योत्तर काळात जन्माला आलेली माझ्यासारखी पिढी आपसूकच काँग्रेस पक्षाकडे आकर्षित झाली. काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून विविध राज्यांमध्ये अनेक मान्यवर नेते विविध क्षेत्रात अतिशय उत्तम प्रकारे त्या काळात कार्य करीत होते. प्रत्येक जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे काही प्रमुख नेते व त्यांच्या माध्यमातून अनेक स्थानिक नेते व अनेक कार्यकर्ते यांची उत्तम गुंफण असायची. विदर्भातील वर्धा जिल्हा हा तर सर्व देशाचे आकर्षण ठरलेला जिल्हा होता. पोरबंदरवरून महात्मा गांधी सेवाग्रामला आले आणि केवळ देशाचेच नव्हे, तर जगाच्या राजकारणाचे केंद्र सेवाग्राम झाले. सत्याग्रह करण्यासाठी महात्मा गांधींनी आपला पहिला शिष्य म्हणून आचार्य विनोबा भावेंची निवड केली. ते वर्ध्याच्या जवळील पवनार येथे स्थायिक झाले. जगामध्ये अद्भूत ठरलेल्या भूदान चळवळीचे ते अर्ध्वयू होते. त्यामुळे वर्धा जिल्हा हा या दोन्ही महामानवांच्या पावन पदस्पर्शाने उजळून निघालेला जिल्हा आहे. यासोबत जमनालाल बजाज ज्यांना महात्मा गांधी आपले पुत्र म्हणून समजत असत, तेही याच जिल्ह्यातील दानशूर स्वातंत्र्यसंग्राम सैनिक होते. या जिल्ह्यात अनेक नेते उदयाला आले. मी १९६८ साली नागपूर येथे एम.ए. करण्यासाठी आल्यानंतर विदर्भातील ज्या नेत्यांचे नाव अग्रक्रमाने

घेतले जात होते, त्यात नानाजी कदम, कमलनयन बजाज, रामचंद्र घंगारे, संतोषराव गोडे, शंकरराव धांदे इत्यादी मान्यवर नेत्यांची नावे वारंवार ऐकायला मिळत होती. विदर्भातील वऱ्हाडात अमरावती येथे भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची दारे खेड्यापाड्यातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी खुली केली. शिक्षणाचा प्रसार करण्यामध्ये भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांची प्रेरणा घेऊन अनेक मान्यवर लोकांनी शैक्षणिक क्षेत्राचे जाळे अतिशय उत्तम पद्धतीने पसरविले. युवक काँग्रेसमध्ये मी कार्यरत असताना आम्ही जेव्हा नागपूरहून हावडा मेलने मुंबईसाठी जात असू, त्यावेळी वर्धेला आम्हा ५-१० तरूण कार्यकर्त्यांसाठी वर्धा येथे हमखास भोजन यायचे आणि रेल्वेत प्रवेश करणारे बापुरावजी देशमुख ज्यांना त्या काळात 'दाआजी' म्हणायचे ते यायचे. शरीराने उंच, शुद्ध खादीचे धोतर, बंगाली सदरा व तेवढीच स्वच्छ पांढरी टोपी हे आम्हा सर्व तरुणांना आकर्षित करणारे होते. पुढे आमची सवय इतकी बिघडली की, घरून डबा घेण्याऐवजी वर्धेला दाआजी डबा घेऊन येतील, म्हणून आम्ही बिनधास्त असायचो. कधी-कधी आमची निराशा होत होती, जेव्हा वर्धा स्टेशनवर दाआजी बसायचे नाही. बापुरावजी देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रातील व सहकार क्षेत्रातील कार्य अतिशय महत्त्वाचे होते. महाराष्ट्राचे नेते यशवंतराव चव्हाण, आबासाहेब खेडकर, वसंतराव नाईक इत्यादी सर्व मान्यवरांच्या ते अतिशय जवळचे होते. याच दरम्यान श्री. वसंतराव कार्लेकर हे काँग्रेस पक्षाचे तरुण नेते म्हणून समोर आले. वसंतराव कार्लेकर आणि मा. शरदचंद्रजी पवार यांचे अतिशय निकटचे संबंध होते. वसंतराव कार्लेकरांना सर्व लोक 'बाबू' या टोपण नावाने संबोधित करायचे. श्री. वसंतराव कार्लेकर वर्धा युवक काँग्रेसचे अध्यक्ष असताना त्या कार्यकारिणीत प्रा. सुरेश देशमुख यांचा सहभाग झाला. बापुरावजी देशमुखांचा मुलगा म्हणून सुरुवातीच्या काळात त्यांची ओळख निर्माण होणे स्वाभाविक होते. ते राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. अतिशय साधा, सरळ, विद्याविभूषित तरुण म्हणून त्यांच्याकडे त्या काळातील सर्व नेत्यांचे लक्ष गेले. सुरेश देशमुखांचे वागणे त्या काळातदेखील अतिशय साधेपणाचे होते. सर्वांशी ते प्रेमाने वागत असत, सर्वांना सहकार्य करण्याची त्यांची वृत्ती होती. राजकारणातील चांगल्या-वाईट गोष्टींबद्दलच्या त्यांच्या धारणा निश्चित होत्या. जेव्हापासून सुरेश देशमुख यांच्याशी माझा संपर्क आला तेव्हापासून निर्माण झालेली मैत्री आजही कायम आहे, याचं माझ्यापेक्षा अधिक श्रेय सुरेश देशमुख यांचंच आहे. पुढे वर्धा जिल्ह्यातील काँग्रेस कमिटीचे संपूर्ण नेतृत्व त्यांच्याकडे आले व शिक्षण क्षेत्रात व सहकार क्षेत्रात त्यांना जो वडिलांचा वारसा मिळाला होता, तो अधिक व्यापक करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आज त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक शिक्षण संस्था उत्तम प्रकारे कार्य करीत आहेत. सहकार क्षेत्रातील त्यांचा अनुभव व त्यांचे ज्ञान हे त्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना मोहित करणारे आहे. वर्धा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये व प्रत्येक तालुक्यांतील जवळपास सर्व गावांमध्ये त्यांचा व्यक्तिगत संबंध असल्याचा मी अनुभव घेतला आहे. लहान कार्यकर्त्यांपासून ते ज्येष्ठ नेत्यांपर्यंत संबंध ठेवण्याचे गमक त्यांना ठाऊक आहे.

१९९९ मध्ये मा. श्री. शरद पवार साहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. १९९९ मध्ये झालेल्या विधान सभा निवडणुकीत श्री. सुरेशने आमदारकीचा उमेदवारी अर्ज दाखल केला. विदर्भातील जनतेला पवार साहेबांचे आकर्षण असून देखील या पक्षाला विदर्भात फारसे स्थान त्यावेळी नव्हते व त्यावेळी सुरेश देशमुख यांचा पराभव झाला. राजकारणाशिवाय देखील सुरेश देशमुख व माझा संबंध वेगवेगळ्या ठिकाणी निर्माण झाला. नागपूर शहरात त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. सुदैवाने या सर्वांशी माझे देखील उत्तम संबंध आहेत. म्हणून या सर्व क्षेत्रात सुरेश हा कायमस्वरुपी केंद्रबिंदू राहिला आहे. काही वेळा मी पक्षाचा निरीक्षक म्हणून वर्धेला गेलो असताना, त्यांनी स्वत:ची मते स्पष्टपणे मला वेळोवेळी सांगितल्याचे आठवते. आज एकंदरीत राजकारणात जो काही धुडगूस सुरू आहे, आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण सुरू आहे. या पार्श्वभूमीवर ज्या व्यक्तींकडे सभ्य राजकारणी म्हणून पाहता येईल. त्यात सुरेश देशमुख यांचा क्रम वरचा आहे. दुर्दैवाने आजच्या राजकारणामध्ये मतभेदाचे स्थान मनभेदापर्यंत पोहचले आहे. विचार भिन्नतेपेक्षा विचारशून्यतेकडे दिवसेंदिवस राजकारणाची वाटचाल सुरू आहे. त्यामुळे दत्ताभाऊ मेघे असो किंवा सुरेश देशमुख यांच्यासारख्या व्यक्ती, ज्या सर्वसमावेशक राहू शकतील, त्यांची येणाऱ्या काळात समाजाला फार गरज आहे. श्री. सुरेश देशमुखांसमोर अनेक समस्या त्यांच्या जीवनात आल्या असतानादेखील त्यांनी अतिशय धीरोदात्तपणे या संस्था सांभाळण्याचा प्रयत्न केला. यात त्यांचा संयम दिसून येतो. तसेच त्यांच्याठिकाणी असलेल्या दृढ निश्चयाची प्रचिती येते. वर्धा जिल्ह्याला जो समंजसपणाचा वारसा गांधी-विनोबांमुळे मिळाला. तो वारसा संयमशीलपणा असणारे प्रा. सुरेश देशमुख पुढे नेतील यावर माझा पूर्ण विश्वास आहे. त्यासाठी मी त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतितो.




# निगर्वी, शांत आणि संयमी नेता

**डॉ. राजेंद्र शिंगणे**
आमदार तथा माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

स्वातंत्र्योतर कालखंडात विदर्भातील सहकार क्षेत्रात जे महनीय व्यक्ती कार्य करीत होते. त्यात नागपूरचे बाबासाहेब केदार, आप्पासाहेब कोरपे, वसंतराव धोत्रे, मधुकरराव भूईभार, नानासाहेब सपकाळ, भाऊसाहेब लहाने, माझे वडील भास्करराव शिंगणे, सुरेशभाऊंचे वडील बापुरावजी देशमुख यांचा उल्लेख आवर्जून करावा लागतो. त्यांनी विदर्भातील विविध जिल्ह्यात सहकार क्षेत्र वाढविण्यासाठी लक्षणीय कार्य केले. सहकाराच्या माध्यमातून अनेक संस्था पुढे नेल्या. शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या अनेक योजना या माध्यमातून राबवल्या. त्यांच्या हिताचे कार्य केले. बापुरावजी देशमुख यांनी वर्ध्यात या कार्याला सुरूवात केली. त्यांनी सहकार क्षेत्रातच नव्हे, तर शिक्षणक्षेत्र, राजकारण, समाजकारण आणि सांस्कृतिक क्षेत्रातही आपल्या कार्याची छाप पाडली.



सुरेशभाऊंची आणि माझी ओळख १९९० च्या दशकात झाली. त्यांच्या वडिलांचा आणि माझ्या वडिलांचा चांगला स्नेह असल्यामुळे मी सुरेशभाऊंचे नाव ऐकून होतो. एक सुस्वभावी आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व म्हणून मी त्यांच्याबद्दल अनेकांकडून ऐकत आलो होतो. माझे वडील भास्करराव शिंगणे आणि सुरेशभाऊंचे वडील बापुरावजी देशमुख हे अनेक वर्षांपासून सहकार क्षेत्रात एकत्रित काम करीत होते. दाआजींनी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सुरू केलेली आणि सांभाळलेली कामे सुरेशभाऊंनी समर्थपणे सांभाळली. सहकार क्षेत्रात काम करताना त्यांना अनेक अडचणी आल्या. या अडचणींमधून मार्ग काढत त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली. शरद पवार साहेबांच्या नेतृत्वात आम्ही दोघेही नेहमीच काम करीत राहिलो. शरद पवार साहेबांना अपेक्षित असलेला शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार घेऊन ते विदर्भाच्या राजकारणात आणि समाजकारणात कार्य करीत आहेत हे महत्त्वाचे आहे.

वर्धा जिल्हा म्हणजे महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचाराने पावन झालेला जिल्हा आहे. या दोन्ही महापुरूषांच्या विचारांची छाप या जिल्ह्यावर पडलेली आहे. हाच समतेचा विचार घेऊन सुरेशभाऊंनी आपल्या राजकीय जीवनात मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे.

निगर्वी, शांतपणे व्यक्त होणारे, कधीही कुणावर चिडचिड न करणारे, कधीही अतिआक्रमक न होणारे सुरेशभाऊ लोकांचे प्रश्न सोडविण्यात मग्न राहिले. समाजात कार्य करीत असताना कार्यकर्ते, पदाधिकारी, कर्मचारी यांच्या मनामध्ये त्यांच्या प्रति वेगळ्याच प्रकारची आदराची भावना राहिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून जरी त्यांची ओळख असली तरी त्यांचे सर्वच पक्षांच्या नेत्यांसोबत आणि कार्यकर्त्यांसोबत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्याबद्दल आपुलकी असलेले आणि त्यांच्याबद्दल स्नेहभाव असलेले अनेक लोक मी पाहतो आहे.

१९९३ साली मी राज्य सहकारी बँकेचा संचालक झालो. सुरेशभाऊसुद्धा या बँकेचे संचालक म्हणून आधीच कार्यरत होते. या काळात आमच्या सातत्याने भेटीगाठी सुरू होत्या. एकंदरीत त्यांचे काम, त्यांचा स्वभाव, शांतपणे निर्णय घेणे, शांतपणे बोलणे, कधीही कोणाविषयी आकस किंवा राग न ठेवणे. हे सर्व मी त्या काळात त्यांच्या स्वभावातील गुण अनुभवत होतो. आजही एक चांगले मार्गदर्शक म्हणून आणि एक चांगले माणूस म्हणून सुरेशभाऊ मला नेहमीच आदर्शवत वाटतात. सद्‌गुणी माणसांसाठी ज्या चांगल्या गुणांची आवश्यकता आहे. ते सर्वच गुण सुरेशभाऊंमध्ये आहेत असे मला वाटते. आम्ही दोघेही विविध क्षेत्रात एकत्र काम करीत असताना आमच्यामध्ये कौटुंबिक आणि पारिवारिक नाते तयार झाले आहे. आमच्यामध्ये एक चांगली मित्रता तयार झाली आहे.

सुरेशभाऊ दोन वर्षे राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. त्या दोन वर्षाच्या कार्यकाळामध्ये त्यांनी या कामात उत्तम अशी छाप पाडली. २००९ ते २०१४ या काळात ते आमदार म्हणून विधानसभेवर होते. मी त्यावेळी मंत्री होतो. मंत्री असतानाच माझ्याकडे वर्धा जिल्ह्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा संपर्कमंत्री म्हणूनही जबाबदारी देण्यात आली होती. अनेक वर्षे मी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना ते माझ्या सोबत असत.

मी शिक्षणमंत्री असताना सुरेशभाऊ किंवा दिलीपराव काळे किंवा शोभाताई काळे आणि जिल्ह्यातील अनेक कर्मचाऱ्यांचे प्रश्न आम्ही मिळून सोडविले आहेत. अनुदानाच्या संदर्भातील कुठल्याही समस्या असोत, आम्ही त्या चर्चेतून सोडविल्या आहेत. मी राज्यमंत्री होतो, मंत्री होती, पणन राज्यमंत्री होतो. त्या त्या वेळी शेतकऱ्यांच्या हिताचे काम करण्यासाठी आम्ही चर्चा करीत होतो. सुरेशभाऊंचे मार्गदर्शन मला सतत लाभदायक ठरत आले आहे. विदर्भ मार्केटिंग फेडरेशनवर सुरेशभाऊंनी अनेक वर्षे कार्य केले. ते या फेडरेशनचे संचालक आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा फायदा सहकार क्षेत्रात कार्य करताना माझ्यासारख्या अनेक लोकांना मिळत आहे. एक प्रगतिशील नेतृत्व म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहतो. सर्वसामान्य लोकांचे प्रश्न समजून घेणारा नेता म्हणून त्यांची आपल्या विदर्भाला ओळख आहे. वर्धा जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने तळमळ असलेले हे नेतृत्व म्हणून सुरेशभाऊ सर्वांना ज्ञात आहेत. सुरेशभाऊ जेव्हा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे म्हणजेच शिखर बँकेचे अध्यक्ष होते, तेव्हा त्यांनी अनेकांना सढळ हाताने मदत केली. पीक कर्जासाठी त्यांनी बँकांना मोठ्या प्रमाणात मदत केली. आजही आम्ही अनेक ठिकाणी एकत्र काम करीत आहोत.

आम्ही दोघेही सहकार क्षेत्रात कार्यरत असल्याने आम्हाला जेव्हा जेव्हा अडचणी आल्या, तेव्हा तेव्हा आम्ही सोबत आमच्या समस्या घेऊन शरद पवार साहेब असतील किंवा अजितदादा असतील त्यांना भेटलो आहे. बँक जगली पाहिजे असे सुरेशभाऊंना नेहमीच वाटते. बँका अडचणीत आल्या त्या काळात सुरेशभाऊ प्रचंड अस्वस्थ होते. बँकेला सावरण्यासाठी सुरेशभाऊ, मी, सुनिलजी केदार यांनी प्रचंड मेहनत घेतली. या सर्व कामात सुरेशभाऊंचा नेहमी पुढाकार असे. बँकांना पूर्ववत आणण्यासाठी आम्ही नितीन गडकरी, अरुण जेटली, देवेंद्र फडणवीस यांच्यांकडे सतत पाठपुरावा करीत राहिलो. या सर्व धडपडीमागे शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य करता येईल असा त्यांचा हेतू होता. कमी बोलून कामांची गती वाढविता येऊ शकते हे सुद्धा त्यांच्याकडून शिकले पाहिजे. माझ्या आयुष्याचा बराच काळ त्यांच्या संगतीत गेला. माझे राजकीय आणि सामाजिक जीवन सुरू झाले त्याच्या आधीच ते राजकारणात बऱ्यापैकी रूळले होते. त्यामुळे मला त्यांच्याकडून खूप गोष्टी शिकायला मिळाल्या.

आपण जो 'लोकनेता' हा शब्द त्यांना लावलेला आहे. तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला बरोबर शोभून दिसतो. त्यांनी तळागाळातील कार्यकर्ते तयार केले. विविध संस्था उभ्या करून कार्यकर्त्यांना उचित ठिकाणी संधी दिली. आज सुरेशभाऊ देशमुख या एका उत्तुंग अशा नेतृत्वाचा अमृत महोत्सव साजरा होतो आहे आणि हे अमृत महोत्सवी वर्ष कृतज्ञता वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. माझे एक सहकारी मार्गदर्शक म्हणून मला या गोष्टीचा खूप आनंद होत आहे. त्यांचे जीवन सुखमय जावो, त्यांना निरामय आरोग्य लाभो अशा माझ्याकडून मी यांना शुभेच्छा देतो.




# मिलनसार व्यक्तिमत्त्व

**डॉ. संतोषराव कोरपे**
अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,
अकोला

सुरेशभाऊंविषयी मी कोणत्या शब्दांत लिहावे आणि कशापद्धतीने त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचा उलगडा करावा हे मलाही सुचत नाही. याचे कारण असे आहे की, सुरेशभाऊंचे आणि माझे स्नेहसंबंध दोन पिढ्यांपासूनचे आहेत आणि हे ऋणानुबंध आजही तेवढ्याच जिव्हाळ्याने आणि आत्मियतेने कायम आहेत. त्यांचं व्यक्तिमत्त्व हे सर्वसमावेशक स्वरूपाचं आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक अशी चार–पाच मुख्य वैशिष्ट्ये सांगता येऊ शकतील, एवढी ती वैशिष्ट्ये त्यांच्या व्यक्तित्वाला ठसठशीतपणे दर्शविणारी आहेत. या वैशिष्ट्यामध्ये त्यांच्यात असलेला निगर्वीपणाचा गुण मला जास्तच भावलेला आहे. दुसरे वैशिष्ट्य म्हणून त्यांचा संयम वाखाणण्यासारखा आहे. ते इतरांप्रमाणे तात्काळ प्रतिक्रियावादी नाहीत. एखाद्या गोष्टीला पूर्णपणे समजून घेतल्याशिवाय ते पुढे जात नाहीत. या त्यांच्या स्वभावामुळे कुणाविषयी त्यांचे गैरसमज निर्माण होत नाहीत. त्यांच्या स्वभावातील तिसरा स्वभावविशेष म्हणजे ते मितभाषी आहेत. मोजके पण नेमके बोलणे, कामाचे बोलणे हे त्यांच्या स्वभावात आम्ही नेहमीच पाहत आलो आहोत. चौथा त्यांच्या स्वभावातील ठळकपणे जाणवणारा विशेष म्हणजे त्यांच्यात असलेला निस्वार्थीपणाने आणि प्रामाणिकपणाने सर्वांसोबत वागण्याचा स्वभाव. त्यांच्यामध्ये असलेली ही सगळी वैशिष्ट्ये कदाचित प्रत्येकांना जाणवू शकतील एवढी ती



त्यांच्या व्यक्तिमत्त्वात भिनलेली आहेत. मी तर त्यांचे एका शब्दात वर्णन करतो ते म्हणजे सुरेशभाऊ हे 'मिलनसार व्यक्तिमत्त्व' आहे.

आमचे मित्रत्व जुळण्यामध्ये आमच्या पूर्वपिढीची पार्श्वभूमी सहाय्यकारी ठरली आहे. माझे वडील अण्णासाहेब कोरपे आणि सुरेशभाऊंचे वडील बापुरावजी देशमुख यांचा सहकारी चळवळीच्या माध्यमातून घनिष्ठ संबंध आला. अकोला जिल्हयात सहकाराच्या क्षेत्रात जसे माझ्या वडिलांनी भरघोस असे काम केले, तसेच वर्धा जिल्ह्यात दाआजींचे योगदान महत्त्वाचे ठरले. विदर्भात सहकाराचे जाळे विणण्यामध्ये आणि या क्षेत्राला समृद्ध करण्यामध्ये ज्या ज्या व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. त्यात या दोन सहकार महर्षींचे नाव घेणे क्रमप्राप्त ठरते. विदर्भातील सहकार चळवळीच्या सुरूवातीच्या कालखंडात पहिल्या पिढीने प्रत्येक जिल्हयात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर आमच्या पिढीकडे वारसा सोपविण्यात आला. या वारश्याला नंतरच्या काळात समर्थपणे सांभाळण्याची जबाबदारी आम्हा तरुणांवर आली. मी अकोला जिल्हयांचे नेतृत्व केले आणि सुरेशभाऊंनी वर्धा जिल्हयाच्या सहकार चळवळीला पुढे नेले.

सुरेशभाऊ दोन टर्म शिखर बँकेचे अध्यक्ष होते, त्या वेळी मी त्यांचा खंदा समर्थक होतो. आजही मी त्यांना आमचा नेता मानतो. खरं सांगायचं म्हणजे सुरेशभाऊचे काम हे निस्वार्थी भावनेने सुरू आहे. राजकारणातील डावपेचांपासून भाऊ अलिप्त आहेत, त्यामुळे स्वतःचा स्वार्थ साधून त्यांनी कधीही कुठल्या कार्यात सहभाग घेतला नाही.

सुरेशभाऊंना लोकमानसाची जाण आहे; पण लोकांनी भाऊंना प्रत्यक्ष निवडून आणायला खूप दिवस लावले. साधारणतः १९८५ पासून भाऊ प्रत्यक्ष निवडणुकीच्या राजकारणात सहभागी झाले; पण त्यांना २००९ साली लोकांची सेवा करण्याची संधी मिळाली. विधानभवनात जायला त्यांना जरी उशीर झाला, तरी ते वेगवेगळ्या प्राधिकरणांच्या माध्यमातून लोकसेवा करीतच होते. मग ते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपद सांभाळून असो की, महाराष्ट्र शिखर बँकेवर दोन टर्म अध्यक्ष राहून असो. त्यांनी या माध्यमातून अनेक लोकाभिमुख कामे केली. सुरेशभाऊ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष राहिले, अनेक दिवसांपासून कापूस पणन महासंघावर आहेत, विदर्भ मार्केटिंग फेडरेशनवर काम करीत आहेत. अशी कितीतरी प्राधिकरणे आहेत, जिथे भाऊ आपले योगदान देत आहेत. त्यामुळे ते आजही लोकांसाठी काम करीत आहेत. त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानंतरही ते अनेक समाजाभिमुख कामे करीत राहतील याची मला खात्री आहे. यासाठी त्यांना मी खूप खूप सदिच्छा देतो.



लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख
अमृत महोत्सव
कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

# मित्रत्वाचा धर्मभाव निभावणारा परममित्र


**अरविंद पोरेड्डीवार**
माजी अध्यक्ष
गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, गडचिरोली


सुरेशभाऊ हे माझे कौटुंबिक सदस्य आहेत. माझ्यासाठी ते भावासारखे आहेत. अशा एका कौटुंबिक सदस्याविषयी लिहिणं हे माझ्यासाठी अवघड गोष्ट आहे. काही गोष्टी मी या निमित्ताने लिहिल्या पाहिजे. सुरेशभाऊ देशमुख यांचे राजकारण मी बऱ्याच वर्षांपासून पाहत आलो आहे. राजकारणामध्ये एवढा संयमी आणि निगर्वी नेता मी तरी आजपर्यंत पाहिला नाही. त्यांच्यामध्ये कधीही आक्रस्ताळेपणा नाही, कोणाविषयी कधीही रागलोभ नाही किंवा कोणाविषयीही हा आपला किंवा हा परका अशा प्रकारचा मतभेद नाही. सर्वांप्रति समान भाव बाळगणारे व्यक्तिमत्त्व म्हणून मी भाऊंना ओळखतो.

आमचे संबंध बापुरावजी देशमुख यांच्यापासूनचेच आहेत. सहकार क्षेत्रात काम करत असताना जे ऋणानुबंध आमचे निर्माण झाले, ते कधीही दुराव्यामध्ये परावर्तित झाले नाही. शिक्षणमहर्षी बापुरावजी देशमुख यांनी वर्धा जिल्ह्यात शिक्षणाचे आणि सहकाराचे मोठे जाळे निर्माण केले. या दोन्ही क्षेत्रात ते जिल्ह्यात आघाडीवर होते. त्यांनी या क्षेत्राच्या माध्यमातून जिल्ह्याचे यशस्वी राजकारणही सांभाळले.

बापुरावजी देशमुख यांनी वर्धा जिल्ह्याच्या राजकारणावर आपली पकड मजबूत केली. ते अनेक वर्षे आमदार आणि खासदार राहिले. माझे वडील नामदेवराव पोरेड्डीवार आणि बापुरावजी देशमुख यांचे फारच जिव्हाळ्याचे संबंध होते. माझ्या वडिलांच्या आणि बापुरावजींच्या सतत भेटीगाठी होत असत. गडचिरोली जिल्ह्याचे सहकार क्षेत्र माझ्या वडिलांकडे असल्यामुळे कामाच्या निमित्ताने मुंबई किंवा इतर ठिकाणी त्यांचा नेहमीच संपर्क येत असे.

बापुरावजी देशमुख उपाख्य दाआजी महाराष्ट्र राज्य शिखर बँकेचे अध्यक्ष होते. ते अध्यक्ष असताना १९८६ साली माझी शिखर बँकेच्या संचालकपदावर नियुक्ती झाली. माझ्या वडिलांनी दाआजींच्या नावाने एक चिठ्ठी दिली आणि चिठ्ठीत लिहिले, ''माझ्या मुलाला मी आपल्याकडे पाठवित आहे, आपण त्याला सांभाळून घ्यावे.'' बापुरावजी देशमुख यांनी मला आपल्या मुलाप्रमाणे सांभाळले. बँकेच्या बाबतीत कामाची पद्धती समजून सांगितली. सभेच्या निमित्ताने आम्ही

मुंबईला जेव्हा जेव्हा भेटत होतो, तेव्हा तेव्हा ते वडिलधाऱ्या व्यक्तींप्रमाणे मला मार्गदर्शन करीत असत. दाआजी गेल्यानंतर १९९२ ला सुरेशभाऊ शिखर बँकेचे संचालक झाले. तेव्हापासून आम्ही सतत भेटत होतो. आमच्या कौटुंबिक भेटीगाठी होत होत्या. माझी त्यांच्यासोबत घट्ट मैत्री झाली. ती आजतागायत सुरू आहे. ३०-३५ वर्षांपासून आमची मैत्री टिकून आहे. सुरेशभाऊ हे आमच्यासाठी आदरणीय व्यक्तिमत्त्व आहेत. आम्ही जरी वेगवेगळ्या पक्षात असलो, तरी आमचे कौटुंबिक स्नेहसंबंध एकमेकांशी जुळल्या गेलेले आहेत. ते आम्ही आजपर्यंत जपलेले आहेत.

आम्ही आमच्या आयुष्यात सुखदु:खाचे अनेक प्रसंग पाहिले. आमच्या आयुष्यात अनेक चढउतार आले. या आयुष्याच्या वळणावर अनेक खाचखळगे निर्माण झाले; पण आम्ही खचलो नाही. सुरेशभाऊंच्या जीवनात अनेक राजकीय हेलकावे आले. अनेकदा त्यांना पराभवांना सामोरे जावे लागले; पण ते कधीही खचून गेले नाहीत. प्रत्येक पराभवानंतर नव्या उमेदीने ते कामाला लागले. कठीण परिस्थितीतही त्यांनी आपले राजकीय अस्तित्व टिकवून ठेवले. ही उमेद कायम ठेवून त्यांनी २००९ साली विधानसभेच्या निवडणुकीत उभे राहून विजय मिळवला. .

वयाच्या या प्रदीर्घ प्रवासानंतर आजही आमची मैत्री अशी आहे की, आम्ही दोन दिवसांनंतर फोनवरून एकमेकांशी बोललो नाही असे होत नाही. आम्ही एकमेकांशी बोललो नाही, तर चुकल्यासारखे वाटते. संकटाच्या काळात मित्रत्वाचा धर्मभाव निभावणारा असा आमचा परममित्र म्हणून सुरेशभाऊंकडे मी पाहतो. आयुष्यभर समाजकारण आणि राजकारण सांभाळून त्यांनी कौटुंबिक जबाबदारीही काटेकोरपणे पाळली. जरी आज सुरेशभाऊ ७५ वर्षाचे झाले, तरी त्यांची राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील धडपड सुरू आहे. त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच मी आमच्या संपूर्ण परिवाराच्या वतीने शुभकामना व्यक्त करतो.









# राजकारणातील सहकारी मित्र


**सुभाष धोटे**
आमदार,
राजुरा विधानसभा


एनएसयूआय या काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनेत आम्ही दोघेही तरुण कार्यकर्ते म्हणून काम करीत होतो तेव्हापासून सुरेशभाऊंचे आणि माझे मैत्रीपूर्ण संबंध तयार झाले. तेव्हापासूनच आर्वीचे दिलीप काळे, मी आणि सुरेशभाऊ चांगले मित्र झालो. त्या काळात विदर्भाच्या राजकारणात कार्य करणारे दिग्गज नेते होते. त्यात बाबासाहेब केदार, नारायणराव काळे, अण्णासाहेब कोरपे, बापुरावजी देशमुख यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. मी १९८६ साली राज्य सहकारी बँकेच्या संचालकपदी निवडून आलो. त्यावेळी सुरेशभाऊंचे वडील बापुरावजी देशमुख राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. बँकेच्या निमित्ताने त्यांचा आणि माझा संपर्क आला. त्यांच्याकडे वर्ध्याला मी बऱ्याचदा येत होतो. सुरेशभाऊंच्या अनेक कार्यक्रमांना मी त्याकाळी उपस्थित राहत असे. मी त्यांच्या घरातील एक कौटुंबिक सदस्य म्हणून त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात माझा सहभाग राहत असे. आमचा हा ऋणानुबंध आजही त्याच पद्धतीने टिकून आहे.

बापुरावजी देशमुख याचे १९९० ला निधन झाले आणि सुरेशभाऊ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या संचालकपदावर आले. मुंबईच्या बाजार समितीवर दिलीपराव काळे होते. त्या दरम्यान आमच्या तिघांच्या सातत्याने भेटीगाठी होत होत्या. दाआजी गेल्यानंतर त्यांच्या सर्वच कामाची धुरा सुरेशभाऊंवर आली. दाआजींनी विविध क्षेत्रात कार्य केले होते. ती सर्वच कामे भाऊंना सांभाळावी लागली. या सर्वच कामांचा व्याप सांभाळत असताना त्यांची आणि माझी सतत भेट होत राहिली.

सुरेशभाऊंना १९८५ ला विधानसभेची तिकीट मिळाली. त्यानंतर त्यांना १९९० ला तिकीट मिळाली. ते दोन्ही वेळा पराभूत झाले. योगायोग असा की, मला २००९ साली राजुऱ्यातून काँग्रेसची तिकीट मिळाली. सुरेशभाऊंनीही त्यावेळी अपक्ष म्हणून वर्ध्यातून निवडणूक लढविली. आम्ही दोघेही त्यावेळी निवडून आलो आणि आमदार झालो. विधानसभेवर दोघेही असल्याने आमचे संबंध वृद्धींगत झाले.

सुरेशभाऊंनी आमचे मित्रत्वाचे संबंध टिकवून ठेवले. सुरेशभाऊंचा स्वभाव अगदी शांत आणि मृदू आहे. कुठलेही काम करताना ते घाई करीत नाहीत. अगदी विचारपूर्वक वृत्तीने आणि संयमाने ते हाती घेतलेले काम करतात. सर्वांशी मिळवून घेणे हा त्यांचा स्वभाव आहे. ते कार्यकर्त्यांवर प्रेम करतात आणि त्यांचा विश्वास संपादन करतात.

शिखर बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी केलेले कार्य वाखाणण्यासारखे आहे. त्या काळात त्यांनी अनेक बँकांना मदत केली आणि अनेक कारखान्यांनाही मदत केली. त्या काळात त्यांनी विदर्भातील सूतगिरण्यांना बळ देऊन पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला. त्यांना जेवढे वित्तीय सहकार्य करता येईल तेवढे सहकार्य केले. त्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले. राजकारणात आणि समाजकारणात मोठ्या मनाने सहकार्य करणारा सहकारी म्हणून सुरेशभाऊंकडे मी पाहतो. ते शतायुषी होवोत अशी त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने प्रार्थना करतो.

# निस्वार्थ भावनेने काम करणारा नेता



लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख
अमृत महोत्सव
कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

**रामदास तडस**
माजी खासदार
वर्धा लोकसभा

सुरेशभाऊ आणि माझा संबंध अनेक वर्षांपासून आहे. आमचे ऋणानुबंध घट्ट असे जुळलेले आहेत. सुरेशभाऊ जरी वेगळ्या पक्षात काम करीत असले आणि मी वेगळ्या पक्षात असलो, तरी आमचे प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे असलेले संबंध राजकीय कार्यामुळे कधीही दुरावले नाही. १९८४ ला मला पहिल्यांदा दाआजींनी कृषी उत्पन्न बाजार समितीची उमेदवारी दिली आणि मी त्यावेळी निवडून आलो. दाआजींनी तेव्हा माझ्यावर जो विश्वास टाकला. तो मी सार्थ ठरवला आणि त्यानंतर मी मागे परतून कधीही पाहिले नाही. त्या काळामध्ये मी कुस्ती खेळत होतो, अनेक ठिकाणी मैदान गाजवत होतो. मला त्या वेळी दाआजींनी सांगितलं ''आता तू कुस्ती सोड, मी त्यांच्या शब्दामुळे लंगोट लटकवून ठेवून दिली आणि राजकारणाच्या आखाड्यात प्रवेश केला. दाआजी गेल्यानंतर दत्ताभाऊंच्या सहवासात राहिलो आणि देवळीपासून दिल्लीपर्यंत जाण्याची संधी आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने आणि मुख्यत्वेकरून सुरेशबाबूंच्या आशीर्वादामुळे मला मिळाली. सत्कार हा काही माणसाचा होत नाही. त्याच्या कर्तृत्वांचा सत्कार होतो. सुरेशबाबूंनी त्यांच्या जीवनात अनेक चढउतार पाहिले, चांगलेही दिवस पाहिले आणि वाईटही दिवस पाहिले. त्यांनी ज्यांना मदत केली तेही त्यांच्यापासून निघून गेले. ज्यांना मदत केली नाही, ते त्यांना जुळले. अशीही परिस्थिती सुरेशबाबूंनी पाहिली; पण सुरेशबाबूंनी हा कोणत्या पक्षाचा? तो कोणत्या पक्षाचा? याचा कधी विचार केला नाही. आपला मित्र म्हणून त्याला मदतीचा हात देण्याचे काम सुरेशबाबूंनी केले. म्हणून सुरेशबाबूंना आपण 'लोकनेता' म्हणतो. ज्यांनी आपल्या आयुष्याची सुरूवात करीत असताना महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या कर्मभूमीत केली. ही सुरूवात त्यांनी दाआजींच्या पावलावर पाऊल ठेवून केली. या जिल्ह्याची सेवा करण्याची संधी सुद्धा त्यांना मिळाली. सुरेशबाबूंमध्ये काही चांगले गुण आहेत, तर काही वाईटही गुण आहेत. कोणावर विश्वास ठेवायचा आणि कोणावर विश्वास ठेवायचा नाही? हेही ते कधी कधी विसरून जातात. मी सुरेशबाबूंना नेहमी म्हणत असे की, भाऊ तुम्ही या लोकांपासून सावध रहा; पण सुरेशभाऊ काही मानायला तयार नव्हते. सुरेशबाबूंनी वर्धा जिल्ह्याच्या सर्वच क्षेत्रात सातत्याने कार्य केले. अनेक लोकांना मदतीचा हात दिला. अनेक लोकांना त्यांनी नोकऱ्या दिल्या. अनेक लोकांचे त्यांनी कुटुंब बसवले ही गोष्ट विसरण्यासारखी नाही. वर्धा जिल्ह्याची लोकसभेची तिकीट कुणाला द्यायची असा प्रश्न गडकरी साहेबांनी जेव्हा सुरेशबाबूंना विचारला तेव्हा, त्यांनी माझंच नाव पहिल्यांदा घेतलं हे मलाही माहिती आहे. लोकसभेची ऑफर आली असताना ती दुसऱ्याला देणारा असा निस्वार्थी नेता म्हणजे सुरेशबाबूच आहेत. ज्यांनी आपल्या जीवनात कमावण्यापेक्षा जास्त गमावलंच. अनेक लोकांना मदत केली, ते आज फार मोठे झाले. सुरेशबाबू तुमचे कर्तृत्व, तुमची कामं करण्याची हातोटी हे सदैव आमच्या मनात राहील. सुरेशबाबूंच्या जीवनातून अनेकांना प्रेरणा मिळेल असे त्यांचे जीवन आहे. त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य लाभो अशी प्रार्थना करतो.



लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख
अमृत महोत्सव
कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

# सामाजिक जाण असलेला मदतगार नेता


**जयंत साळवे**
माजी विभागीय अधिकारी,
भू-विकास बँक


सुरेशभाऊंचे आणि माझे संबंध गेल्या अनेक वर्षांपासून स्नेहाचे आणि जिव्हाळ्याचे राहिले आहेत आणि आजतागायत ते टिकून आहेत. आमच्यात कधीही कोणत्याही बाबतीत मतभेद निर्माण झाले नाहीत. त्याचे कारण मला असे वाटते की, मी स्पष्टवक्ता आहे. जे बोलायचे आहे ते मी बेधडक बोलतो आणि भाऊंच्या स्वभावात सरळपणा आहे. त्यांच्या वागणुकीत आणि स्वभावात कधीही आतबाहेरपणा नाही. त्याच्या मनात जे आहे, तेच त्यांच्या ओठावरही आहे. सुरेशभाऊंशी माझी जवळीक निर्माण झाल्यानंतर मला सुरेशभाऊंमध्ये एक चांगला व सालस माणूस दिसला. मी त्यांना एक चांगला माणूस म्हणून पाहत आलो आहे. सुरेशभाऊंना पाहिल्यानंतर राजकारण्यांकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन बदलला. सुरेशभाऊंकडे मी वेगळ्या पद्धतीने पाहू लागलो. सुरेशभाऊंच्या स्वभावात एक भिडस्तपणा आहे. हा त्यांचा भिडस्त स्वभाव बऱ्याच वेळी त्यांना इतरांचा विरोध करण्याला कारणीभूत झाला. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांना राजकारणामध्ये किंमतही मोजावी लागली आहे; पण सुरेशभाऊंच्या स्वभावात असलेल्या विविध वैशिष्ट्यांमुळे ते अनेकांच्या आदराचे विषय आहेत. माझ्यासारख्या अनेकांना त्यांचा स्वभाव विशेष भावला आहे.

सुरेशभाऊ माझ्यापेक्षा जवळपास तेरा वर्षाने लहान आहेत. त्यामुळे त्यांच्यासोबत माझी मैत्री ही बऱ्याच वर्षाने झाली. ती ओळख झाल्यानंतर त्यांचे आणि माझे संबंध अत्यंत जवळचे राहिले आहेत. माझा आणि सुरेशभाऊंचा संबंध खऱ्या अर्थाने दाआजींच्या निधनानंतर आला. दाआजींचा आणि माझा संबंध ७० वर्षांपर्यंत राहिला. मी भू-विकास बँकेत विभागीय प्रबंधक म्हणून काम करीत होतो. माझ्या अखत्यारित तेव्हाचे आठ जिल्हे होते. मी नागपूरला असताना वर्धेला दाआजींना भेटायला येत होतो. दाआजींच्या मनात माझ्याविषयी अत्यंत जिव्हाळा आणि प्रेम होते. मी त्यांच्या संपर्कात राहतो याविषयी त्यांना फार बरे वाटायचे. दाआजी बरोबरीच्या लोकांमध्ये मला बसवायचे. मला त्यांच्यामध्ये चर्चेत सहभागी करून घ्यायचे. खूप वेळा मला ते म्हणायचे ''सुरेश तिकडे बसला आहे. त्याच्यासोबत बोलून घ्या.'' त्या वेळी आमची जी भेट व्हायची ती औपचारिक स्वरूपाची असे. मला आठवते. दाआजी असतानाच सुरेशभाऊ इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये बसत असत. एकदा मी एका गरीब मुलीच्या प्रवेशासाठी दाआजींकडे गेलो. दाआजींनी मला सुरेशभाऊंकडे पाठवले. त्यांनी लगेच मुलीचा प्रवेश पक्का केला. त्या वेळी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळवणे साधे नव्हते. खूप खस्ता खाव्या लागत; पण सुरेशभाऊंनी माझे लगेच काम केले.

मी नागपूरला नोकरी करीत होतो. दाआजींच्या निधनाची बातमी मला मिळाली. मी त्या वेळी वर्धेला आलो. त्यापूर्वी मी आजाराच्या काळात दाआजींना भेटायला येत होतो. त्यांच्याशी चर्चा करीत होतो. सुरेशभाऊंनाही भेटत होतो.

दाआजींच्या निधनानंतर १९९० ला माझा व भाऊंचा खऱ्या अर्थाने संबंध आला. तेव्हापासून मी सुरेशभाऊंना चांगल्या पद्धतीने ओळखतो. माझ्या स्वभावाप्रमाणे किंवा माझ्या गुणांमुळे म्हणा माझे राजकारणी लोकांशी फारसे जमत नसे. माझा राजकारणी लोकांकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळ्या प्रकारचा होता; पण सुरेशभाऊंकडे मी त्या राजकारण्यांप्रमाणे पाहत नाही. त्यांचे राजकारण नेहमीच समाजाभिमुख राहिल्यामुळे मला ते जास्त जवळचे वाटतात.

मला आठवते, १९९७ ची घटना असेल, मी तेव्हा निवृत्त झालो होतो. त्या काळात जयपूरवरून वर्ध्याला आल्यानंतर मी सुरेशभाऊंची भेट घेत होतो. जयपूरला जाताना त्यांची भेट आवर्जून घेत होतो. १९९७ साली भू विकास बँकेच्या निवडणुका लागल्या होत्या. त्या वेळी मोबाईलची व्यवस्था नव्हती. मी गावाला होतो. माझ्याकडे सुरेशभाऊंनी एक माणूस पाठवला. 'भू-विकास बँकेचे इलेक्शन लागले आहे. तुम्ही मला भेटायला या' असा त्यांनी निरोप पाठवला. मी त्यांना भेटायला गेलो. ते मला म्हणाले, ''तुम्ही या इलेक्शनला उभे राहिले पाहिजे. तुमच्यासारख्या जाणकाराची बँकेला फार गरज आहे. या निवडणुकीसाठी आपण आपले पॅनल टाकू'' जे काही आहे ते स्पष्ट बोलण्याचा माझा स्वभाव आहे. मी भाऊंना म्हणालो, ''मी तुमच्या पॅनलकडून उभा राहतो; पण मी फक्त संचालक म्हणून उभा राहणार नाही. त्यासाठी तुम्हाला पुढची भूमिका स्पष्ट करावी लागेल. म्हणजे मी फक्त संचालक होणार नाही. निवडून आल्यावर मला अध्यक्षपद देत असाल, तर मी तुमच्या पॅनलकडून उभा राहतो. नाहीतर मी तुमच्या सोबत आहे. मी निवडणूक लढणार नाही, पण तुम्हाला मदत करीन.'' त्या वेळी त्यांनी मला आश्वासन दिले. मी निवडणुकीला उभा राहिलो. निवडून आलो आणि मला भाऊंनी बँकेचा अध्यक्षही केले. माझ्या बँकेच्या ॲक्टिव्हिटी सुरू झाल्या. मी बँकेचा कारभार सांभाळू लागलो; पण या कारभारात सुरेशभाऊंनी कधीही ढवळाढवळ केली नाही, किंवा हस्तक्षेप केला नाही. ते नेहमी माझ्या कामाला पूरक असायचे. त्यामुळे त्यांच्यासोबत काम करताना कुठलाही ताण नसे. सुरेशभाऊ म्हणून सरळ स्वभावी माणूस आहे. ते आत आणि बाहेर सारखेच आहेत. मनात एक आणि बाहेर एक असे ते कधीही वागत नाहीत. हा त्यांचा स्वभाव मला विशेष आवडतो. त्यामुळे माझे संबंध सुरेशभाऊंसोबत सलोख्याचे आणि जिव्हाळ्याचे राहिले आहेत.

त्या काळात आपल्या विदर्भात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या. शेतकरी आत्महत्या का करतात? एवढ्या मोठ्या प्रमाणात ह्या आत्महत्या का घडून येत असाव्यात? यामागील कारणे काय असावी? हे जाणून घेण्याची उत्सुकता माझ्या मनामध्ये होती. जिथे जिथे आत्महत्या होत होत्या, तिथे जाऊन मी शोध घेऊ पाहत होतो. मी आत्महत्येची कारणे शोधण्याचा प्रयत्न करीत होतो. भारतामध्ये ज्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत होत्या. त्या दरम्यान भारत सरकारने स्वामीनाथन आयोगाची स्थापना केली होती. ते साल २००५ असे होते. विदर्भात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत असल्याने स्वामीनाथन आयोगाची पहिली भेटच वर्ध्यात ठरली. त्यांची मार्केटिंग कमिटीत सभा झाली. ते काय म्हणतात हे ऐकायला मी तिथे होतो. रोठ्याला ते कमिशन गेले तिथेही मी होतो. तिथे स्वामीनाथन सरांसोबत शेतकऱ्यांची मिटिंग होणार होती. त्या वेळचे कामगार नेते शिवाजी इथापे माझ्याकडे आले. ते मला म्हणाले, 'स्वामीनाथन सर इंग्रजीमध्ये बोलतील. शेतकऱ्यांना त्यांचे म्हणणे समजणार नाही. तुम्ही दुभाषी म्हणून काम केले, तर फार बरे होईल. मी कबूल झालो. स्वामीनाथन सरांचा आणि शेतकऱ्यांचा त्यावेळी दीड तास संवाद झाला. मी त्या संवादाचा दुवा होतो. माझी आणि स्वामीनाथन यांची ती पहिलीच भेट होती. नंतर स्वामीनाथन सरांसोबत माझी रमेश ठाकरे यांच्या घरी नागपूरला भेट झाली. 'मला तुमच्याशी बोलायचे आहे' असे मी त्यांना म्हणालो. मी घरून काही टिपण काढून नेले होते. आम्ही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर दोन तास बोललो. त्यावेळी आमच्या दोघांमध्येच चर्चा झाली. आमच्या चर्चेनंतर मी त्यांना म्हणालो, 'तुमचा रिपोर्ट जाईल, तुमच्या रिपोर्टचे गव्हर्नमेन्ट काय करेल माहिती नाही. पण मला एक जाणवते आत्महत्या करणारे शेतकरी फार लहान वयाचे आहेत. त्यांचे लहान लहान मुलं आहेत. त्यांच्या शिक्षणाची मला चिंता आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचे आयुष्य अंधारमय आहे. त्यांच्या शिक्षणासाठी काही करता येत असेल तर बघा.' माझे म्हणणे त्यांनी निटपणे ऐकून घेतले. ते मोठे संवेदनशील मनाचे होते. काही वेळाने ते मला म्हणाले, 'तुम्ही म्हणता ते बरोबर आहे.' ते पुढे म्हणाले, 'मला मोठे मानधन मिळते. मी तुम्हाला माझ्या मानधनातले काही पैसे देईन. तुम्हाला काही प्राजेक्ट राबवता येत असतील तर बघा.' ते एवढ्यावरच थांबले नाही, तर दिल्लीला गेल्यानंतर त्यांनी त्यांच्या कमिशनच्या सेक्रेटरीला वर्ध्याला परत पाठवले. त्यांना घेऊन मी वर्ध्याच्या बऱ्याच भागात फिरलो. त्यांनतर


आम्ही प्रोजेक्टचा ढाचा तयार केला. बारावीपर्यंत शिकणाऱ्या मुलांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याचे ठरविण्यात आले. मी हा प्रस्ताव स्वामीनाथन सरांकडे पाठवला. माझी कुठलीही सरकारमान्य संस्था नसल्याने किंवा त्याचे खाते नसल्यामुळे आर्थिक मदत कुठे पाठवायची हा प्रश्नच होता. स्वामीनाथन सरांनी माझ्या वैयक्तिक खात्यावर पैसे पाठवले आणि माझ्यावर विश्वास दाखवला. मी वर्धा जिल्ह्यात आत्महत्याग्रस्त ८३ कुटुंब शोधले होते. ज्या मुलांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करावयाची होती. त्या सर्वांचे अकांऊंट उघडून त्यांना आर्थिक मदत केली. त्यांचे घरगुती भांडण सोडवणे, त्यांच्या कुटुंबांकडे लक्ष देणे हे काम मी करीत राहिलो. दरवर्षी चेन्नईला स्वामीनाथन सरांकडे जात होतो. त्यांना या कामाचा अहवाल सादर करीत होतो. हा शिक्षणाचा कार्यक्रम राबवित असताना आम्हाला काही वेळा पैसे अपुरे पडत असत. त्या वेळी मी सुरेशभाऊंकडे जात होतो. त्यांनी या आमच्या कामासाठी वेळोवेळी सढळ हाताने मदत केली.

आम्ही जेव्हा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचा शिक्षणविषयक प्रकल्प राबवित होतो, तेव्हा आमच्या असे लक्षात आले की, या मुलांना वेगळे कोचिंग दिल्याशिवाय त्यांची शैक्षणिक प्रगती होणार नाही. कोचिंगच्या संदर्भातील विचार मी सुरेशभाऊंकडे बोलून दाखवला. त्यांनी या प्रकल्पाला मान्यता दिली. सेवाग्राम येथील नई तालीमच्या बाजूला असलेल्या सभागृहात शिकवणी वर्ग घेण्याचे ठरले. पंधरा दिवस हे शिबिर चालवावे असे आम्ही ठरविले. या शिबिरासाठी आठवी ते बारावीचे विद्यार्थी येणार होते. या सर्व विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्यासाठी त्या वेळी सुरेशभाऊंनी मला सर्वतोपरी मदत केली. २००८ ते २००९ असे दोन वर्ष आम्ही हा प्रयोग केला. यासाठी आम्हाला सुरेशभाऊंनी भरभरून मदत केली. या मुलांमधून जी मुले हुशार निघाली. त्या मुलांचे सुरेशभाऊंनी त्यांच्या बापुरावजी देशमुख इंजिनियरिंग कॉलेजमध्ये शिक्षण केले. त्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च सुरेशभाऊंनी स्वत: उचलला. माझ्या प्रत्येक उपक्रमामध्ये ते सहभागी असत. माझ्या प्रत्येक कार्यक्रमांकडे आणि उपक्रमांकडे ते सकारात्मक दृष्टीने बघत. स्वामीनाथन सर जेव्हा जेव्हा वर्ध्याला येत असत, तेव्हा तेव्हा त्यांच्या सभेसाठी सुरेशभाऊ त्यांच्या सूतगिरणीचा हॉल उपलब्ध करून देत. आमच्या सभा त्या सभागृहातच पार पडत. मी सुरेशभाऊंची स्वामीनाथन सरांसोबत भेट करून दिली होती. तेव्हा त्यांच्यात जवळपास दीड तास चर्चा झाली होती.


मला आठवते, मी सुरेशभाऊंकडे १९९४ च्या निवडणुकीच्या वेळी गेलो होतो. त्यांना मी वर्धा मतदार संघातून निवडणूक लढण्याचा आग्रह केला. त्यावेळी सेलू पट्ट्यात माझ्या बऱ्याच ओळख्या होत्या. मी त्यांना म्हणालो, 'तुम्ही जर वर्ध्यातून निवडणूक लढविणार असाल, तर आम्ही तुम्हाला सर्वतोपरी मदत करू' असे मी त्यांना म्हटले होते. पण त्यांनी निवडणूक लढण्यासाठी अनुकुलता दाखवली नाही. त्यावेळी नाईलाजाने आम्हाला सुरेश जयस्वाल यांना त्या मतदार संघातून उभे करावे लागले.

२००९ ची निवडणूक भाऊ वर्ध्यातून लढले. भाऊंचा सेलू पट्ट्यातील संपर्क बऱ्याच दिवसांपासून फारसा राहिला नव्हता. मी एग्रीकल्चर क्रेडिट डिपार्टमेंटला होतो. मी साखर कारखाना काढला. महात्मा साखर कारखाना असे त्याचे नाव होते. तो साखर कारखाना सुरू करण्यासंदर्भात सर्वच कामे मी केले. साखर कारखाना काढण्यात माझा पूर्णपणे पुढाकार होता. त्यामुळे सेलू पट्ट्यात माझा संपर्क दांडगा होता. सुरेशभाऊंचा या पट्ट्यातील तुटलेला संपर्क जोडून दिला. त्या परिसरातील कार्यकर्ते आम्ही जोडले. २००९ ची निवडणूक आम्ही ताकदीने लढविली. त्यावेळी त्यांच्यासोबत आम्ही काही अनुभवी लोक होतो. तो आमचा अनुभव या निवडणुकीसाठी बराच कामी आला. सुरेशभाऊंनी ती निवडणूक मोठ्या फरकाने जिंकली. सुरेशभाऊंचा मी त्या वेळी मी एवढ्या विश्वासातील होतो की, राजकारणामध्ये भाऊ मला सोबत घेतल्याशिवाय जात नसत. आम्हालासुद्धा त्यांच्यासोबत राहताना विशेष आनंद वाटत असे. त्यांच्या स्वभावातील साधेपणा आम्हाला विशेष भावत होता. त्यांच्यामध्ये असलेला भिडस्तपणाही विशेष होता. आज अठ्ठ्याऐंशीव्या वर्षी मला त्यांना वेळ द्यायला जमत नाही याचे मलाच शल्य वाटते; पण आजही गरज असेल तिथे आम्ही त्यांच्यासोबत असतोच. .

सुरेशभाऊंच्या वयाची पंच्याहत्तरी झाली आहे. त्यांनी त्यांच्या चाळीस पंचेचाळीस वर्षाच्या राजकीय कारकीर्दीत बरेच लोकोपयोगी कार्य केले आहे. त्यांच्या या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने त्यांना निरामय, निरोगी आयुष्य लाभो हीच शुभेच्छा!



आचार्य विनोबा भावे यांच्यासमवेत बापुरावजी देशमुख.



माजी गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्यासोबत हितगुज करताना बापुरावजी देशमुख.



तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासमवेत बापुरावजी देशमुख

यशवंत महाविद्यालयाच्या वसतिगृहाच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान इंदिरा गांधी व तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्यासमवेत बापुरावजी देशमुख





तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्यासोबत चर्चा करताना बापुरावजी देशमुख

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासमवेत बापुरावजी देशमुख व शिष्टमंडळ.





महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष बाळासाहेब
भारदे यांचे स्वागत करताना
बापुरावजी देशमुख



बापुरावजी देशमुख वि. स. पागे यांचे
स्वागत करताना.



यशवंत महाविद्यालयाच्या कार्यक्रमप्रसंगी
मुख्यमंत्री वसंतराव नाईक बोलताना,
सोबत बापुरावजी देशमुख.



प्रा. सुरेशभाऊ देशमुख व स्वातीताई यांच्या विवाहाचा प्रसंग



बापुरावजी देशमुख यांचे आशीर्वाद घेताना
प्रा. सुरेशभाऊ देशमुख व स्वातीताई



प्रा. सुरेशभाऊ देशमुख कुटुंबियांसह



वर्धा जिल्हा युवक काँग्रेसच्या मेळाव्याप्रसंगी
शरद पवार यांच्यासोबत
प्रा. सुरेशभाऊ देशमुख



कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना
प्रा. सुरेशभाऊ देशमुख



पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या
निवासस्थानी कार्यकर्त्यासमवेत
प्रा. सुरेशभाऊ देशमुख



मुख्यमंत्री विलासराव देशमुख
यांचा सत्कार करताना
प्रा. सुरेशभाऊ देशमुख.



प्रा. एन. डी. पाटील
यांचा सत्कार करताना
प्रा. सुरेशभाऊ देशमुख.



प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या निवासस्थानी
ज्येष्ठ नेते जयंत पाटील
यांच्यासमवेत चर्चा करताना




महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या परिषदेत बोलताना प्रा. सुरेशभाऊ देशमुख.




वर्धा जिल्ह्याच्या विकासाकरिता कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला मार्गदर्शन करताना



सहकारमहर्षी बापुरावजी देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक, सोबत प्रा. सुरेशभाऊ देशमुख



महामहीम राज्यपाल रा. सु. गवई यांच्यासमवेत प्रा. सुरेशभाऊ देशमुख.



मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा सत्कार करताना प्रा. सुरेशभाऊ देशमुख



विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी, गृहमंत्री आर. आर. पाटील व मनोहरराव नाईक यांच्यासमवेत प्रा. सुरेशभाऊ देशमुख



भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते
भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी,
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमवेत




दहाव्या विचारवेध संमेलनप्रसंगी
विचारमंचावर उपस्थित
स्वागताध्यक्ष प्रा. सुरेशभाऊ देशमुख
व इतर मान्यवर.



सहकारमहर्षी बापुरावजी देशमुख सहकारी
साखर कारखान्याच्या भूमीपूजनप्रसंगी
शरद पवार, प्रभा राव, डॉ. शरद काळे व
दत्ताजी मेघे यांच्यासमवेत

सेवाग्राम येथे आयोजित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अ. भा. कार्यकारिणीच्या बैठकप्रसंगी शरद पवार, पी. ए. संगमा, तारिक अन्वर व दत्ताजी मेघे यांच्यासमवेत





सेवाग्राम येथे आयोजित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अ. भा. कार्यकारिणीच्या बैठकप्रसंगी अरुण गुजराथी, अनिल देशमुख, आर. आर. पाटील यांच्यासमवेत.

सेवाग्राम येथे आयोजित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अ. भा. कार्यकारिणीच्या बैठकप्रसंगी शरद पवार, पी. ए. संगमा, तारिक अन्वर, यांच्यासमवेत प्रा. सुरेशभाऊ देशमुख व कुटुंबीय





शरद पवार यांच्या समवेत प्रा. सुरेशभाऊ देशमुख, बाळासाहेब कार्लेकर व बाबासाहेब धांदे.



श्री शरद पवार यांच्या समवेत.




अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नामकरण समारंभाप्रसंगी शरद पवार, वसंत साठे, नरेंद्र तिडके, रणजित देशमुख, प्रभा राव, संतोषराव गोडे व इतर मान्यवरांसमवेत



अरुण गुजराथी, आर. आर. पाटील यांच्यासमवेत प्रा. सुरेशभाऊ व इतर.



सहकारमहर्षी बापुरावजी देशमुख यांच्या सूतगिरणीतील पुर्णाकृती पुतळयाच्या अनावरणप्रसंगी शरद पवार यांच्यासमवेत.




सहकारमहर्षी बापुरावजी देशमुख यांच्या सूतगिरणीतील पुर्णाकृती पुतळयाच्या अनावरणप्रसंगी शरद पवार यांच्यासमवेत.



हीरक महोत्सवी विदर्भ साहित्य संमेलनप्रसंगी आर. आर. पाटील, राजदत्त व डॉ. ज्योती लांजेवार यांच्यासमवेत




स्व. बापुरावजी देशमुख स्मृतिप्रीत्यर्थ प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या द्वारा आयोजित शास्त्रीय संगीत मैफलीमध्ये गाताना पं. प्रभाकर कारेकर.




शिक्षणमहर्षी बापूरावजी देशमुख स्मृति व्याख्यान या कार्यक्रमात मुख्ये वक्ते अशोक वानखेडे, ख्यातनाम पत्रकार दिल्ली यांचे व्याख्यान, मंचावर उपस्थित प्रा. सुरेशभाऊ देशमुख आणि इतर मान्यवर

महामहीम राज्यपाल रा. सु. गवई दाम्पत्याचा सत्कार करताना स्वातीताई, सुरेशभाऊ व दत्ताजी मेघे.





हीरक महोत्सवी विदर्भ साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी आर. आर. पाटील व स्वागताध्यक्ष प्रा. सुरेशभाऊ देशमुख

सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याच्या आयोजनप्रसंगी
राज्यमंत्री रमेश बंग यांच्यासमवेत.






विदेश दौऱ्यातील क्षण.




विदेश दौऱ्यातील क्षण.



विदेश दौऱ्यातील शिष्टमंडळ.




विदेश दौऱ्यातील क्षण : प्रमोद शेंडे दाम्पत्य व संतोषराव गोडे दाम्पत्यासह




विदेश दौऱ्यातील क्षण




विदेश दौऱ्यातील शिष्टमंडळ.





# राजकारणापेक्षा निष्ठेला महत्त्व देणारा नेता

**सुनिल राऊत**
जिल्हाध्यक्ष,
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)



सध्याच्या राजकारणाची स्थिती अशी झाली आहे की, राजकारण जसे वळण घेईल तसे राजकारणामध्ये कार्य करणारे नेते आणि कार्यकर्ते बदलत आहेत. व्यावसायिक पद्धतीने राजकारण करणारे अनेक नेते आज भारतात आणि महाराष्ट्रात दिसून येतात. या राजकारणामध्ये बऱ्याचदा जनहितापेक्षा नेत्यांचा राजकीय स्वार्थ मोठ्या प्रमाणात दिसून येतो. सध्याच्या काळात सोयीनुसार पक्ष, नेतृत्व आणि निष्ठा बदलविण्याचे राजकीय धोरण अवलंबले जाते. या अशा स्वार्थाधिष्ठित आणि व्यक्तिवादी राजकारणाला महाराष्ट्रातील अनेक नेते अपवादही आहेत. आपली राजकीय कारकीर्द ज्या नेतृत्वामुळे सुरू झाली. फुलली आणि वाढली. त्यांच्याशी इमान राखण्यासाठी आपले राजकीय जीवन पणाला लावणारे नेतेसुद्धा काही कमी नाहीत. राजकीय स्वार्थापेक्षा राजकीय निष्ठेला महत्त्व देण्याची परंपराही या महाराष्ट्रातील नेत्यांमध्ये कायम आहे. अशा काही मोजक्या नेत्यांमध्ये वर्धा जिल्ह्यातील सहकार आणि शिक्षण क्षेत्राचे नेतृत्व गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठापूर्वक करणारे प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचे नाव घेता येईल.

प्रा. सुरेशभाऊ देशमुख निवडणुकांच्या राजकारणामध्ये व्यक्तिशः फार यशस्वी होऊ शकले नाही. त्यांनी एकूण सहा वेळा वेगवेगळ्या मतदार संघातून विधानसभेच्या निवडणुका लढविल्या. त्यापैकी एका निवडणुकीमध्ये त्यांना यश प्राप्त झाले आणि ते आमदार

झाले; परंतु पाच वेळा त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. एखादा राजकारणी पराभवाने खचून गेला असता; किंवा राजकारणापासून दूर गेला असता: परंतु भाऊ राजकारणात जरी अयशस्वी होत राहिले, तरी त्यांनी जिल्ह्यातील समाजकारण, सांस्कृतिककारण आणि शिक्षणकारण सोडले नाही. प्रत्येक वेळी पराभवानंतर त्यांनी अधिक जोमाने या कार्याला स्वत:ला वाहून घेतले. प्रत्येक वेळी ते या क्षेत्रांमध्ये अधिक सक्रिय होत गेले. याचा परिणाम असा झाला की, २००९ साली आमदार म्हणून वर्धा विधानसभा क्षेत्रातून लोकांनी त्यांना प्रचंड जनाधार देऊन निवडून आणले.

मी स्वत: गेल्या ३५–४० वर्षापासून वर्धा जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय सहभाग घेत आलो आहे. हिंगणघाट तालुका हे माझे राजकीय क्षेत्र राहिले आहे. मला आठवते. सुरेशभाऊ १९८५ साली हिंगणघाट विधानसभा मतदार संघातून पहिली निवडणूक लढले. तेव्हा हा मतदार संघ संयुक्त काँग्रेसच्या वाट्याला आला होता. त्यावेळी आम्ही तरुण होतो. आमच्यामध्ये राजकीय कार्य करण्याची धडपड होती. त्यावेळी वर्धा जिल्ह्यातील काँग्रेसमध्ये दोन गट सक्रिय होते. एका गटाचे नेतृत्व प्रभाताई राव करीत होत्या आणि दुसऱ्या गटाचे नेतृत्व सुरेशभाऊंकडे होते. मी त्या वेळी प्रभाताईच्या गटामध्ये कार्य करीत होतो, तरीसुद्धा आमच्या मनात भाऊंच्याविषयी कटुता नव्हती, किंवा आमच्याविषयी भाऊंनी कधी वैरभाव दाखविला नाही. १९८५ च्या भाऊंच्या पहिल्या निवडणुकीमध्ये आम्ही त्यांच्यासोबत होतो. गटतट विसरून आम्ही भाऊंचा प्रचार केला; पण भाऊ मूळ वर्ध्याचे असल्याने बाहेरचा उमेदवार म्हणून हिंगणघाटमध्ये प्रचार करण्यात आला आणि त्यावेळी भाऊ विजयी होऊ शकले नाही. १९९० च्या निवडणुकीत ते पुन्हा हिंगणघाटमधूनच लढले. यावेळी नियोजन व्यवस्थित होते. प्रचार जोरात होता. भाऊंनी कार्यकर्ते जोडले होते. तरीसुद्धा या निवडणुकीत फार थोड्या मतांनी त्यांचा पराभव झाला. या दोन निवडणुकांच्या निमित्ताने त्यांचे सुरूवातीचे राजकारण मी जवळून पाहत होतो. मी जरी प्रभा राव यांच्या गटात होतो. तरी या निमित्ताने भाऊंशी संपर्क येत होता. त्यांच्या स्वभावगुणांचा परिचय मला होत होता.

१९९२ ला वर्धा जिल्हा परिषदेच्या निवडणुका पार पडल्या. दोन्ही गटांचे उमेदवार मोठ्या प्रमाणात निवडून आले. प्रभा राव यांच्या गटाकडून जिल्हा परिषदेच्या सभापतीपदासाठी माझ्या नावाची शिफारस करण्यात आली. मी विरोधी गटाचा असतानासुद्धा सुरेशभाऊंनी त्यावेळी माझ्या नावाला पाठिंबा दिला. वादविवाद, गटतट किंवा हेवेदावे विसरून एकोप्याने काम केले पाहिजे ही भाऊंची भावना यामागे होती. त्यावेळी मला त्यांच्या या स्वभावाचा प्रत्यय आला. राजकारण करताना सामोपचाराने पुढे जायला हवे ही त्यांची पद्धत मला त्या वेळी विशेष भावली. पुढे माझ्यावर अविश्वास प्रस्ताव आणला गेला. यामध्ये भाऊंचा गट सक्रिय होता; पण माझ्या मनात भाऊंविषयी कटुता निर्माण झाली नाही. त्या वेळी तशी विशिष्ट राजकीय परिस्थिती निर्माण करण्यात आली होती असे समजून मी ही गोष्ट विसरून गेलो, जरी मी त्या वेळी प्रभा राव गटात होतो, तरी मी भाऊंच्या नेतृत्वाविषयी थोड्या प्रमाणात विश्वास दाखवायला लागलो होतो.

१९९९ साली शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. सुरेशभाऊंनी त्यांच्या सर्व सहकार्यासह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला. मीसुद्धा दरम्यानच्या काळात पवार साहेबांशी जुळला गेलो होतो. पवार साहेबांचा पक्ष आणि सुरेशभाऊंचे जिल्ह्यातील नेतृत्व या समीकरणामुळे मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला. २००२ साली सुरेशभाऊंच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष म्हणून जिल्ह्याचे नेतृत्व माझ्याकडे आले. भाऊंसोबत आम्ही पक्ष बांधायला आणि पक्षाच्या वाढीसाठी खूप प्रयत्न केले. संपूर्ण जिल्हा पिंजून काढला. जनसंपर्क वाढवला. या काळात भाऊंच्या मी अगदी जवळ आलो. त्यांचा स्वभाव, त्यांचे नेतृत्वकौशल्य, त्यांची राजकीय समज, लोकांना व कार्यकर्त्यांना समजून घेण्याची त्यांच्यामध्ये असलेली राजकीय जाण आणि परस्परांमध्ये साहचर्य साधण्यासाठी अवगत असलेली हातोटी हे त्यांचे गुण मला विशेष आवडले. तेव्हापासून माझे आणि सुरेशभाऊंचे संबंध अधिक दृढ होत गेले.

१९९९ नंतरची माझी राजकीय कारकीर्द घडत गेली, त्यात सुरेशभाऊंचा वाटा महत्त्वाचा राहिला. २००७ साली पोहणा सर्कलमधून मी जिल्हा परिषदेसाठी निवडणूक लढलो आणि निवडून आलो. त्यावेळी जिल्ह्यात काँग्रेसच्या जास्त जागा निवडून आल्या होत्या, तरीसुद्धा भाऊंच्या नेतृत्वकौशल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला उपाध्यक्षपदाची ऑफर देण्यात आली. त्या वेळीही भाऊंनी माझ्या नावाची शिफारस केली. पुढील ५ वर्षे मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष राहिलो. त्यानंतर भाऊंनी मला विविध क्षेत्रात काम करण्याची संधी दिली. माझ्या कार्यकुशलतेवर विश्वास दाखविला. मीसुद्धा कधी त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. जिल्हा दूध संघ त्या काळात विशेष बहरात होता. वर्धा जिल्ह्यातील दूध संघाचे नाव यशस्वी संस्था म्हणून गाजत होते. २०१२ मध्ये दूध संघाचा अध्यक्ष म्हणून कार्य करण्याची त्यांनी मला संधी दिली. त्यांच्या सहकार क्षेत्राच्या कामात मला कार्य करता आले. गेल्या अनेक वर्षांपासून मी राष्ट्रवादी काँग्रेसचा जिल्हाध्यक्ष म्हणून भाऊंच्या कुशल मार्गदर्शनात वर्धा जिल्ह्यात पक्षाची धुरा सांभाळत असताना भाऊंच्या नेतृत्वगुणांची मला सतत ओळख होत आली आहे. जिल्ह्यात पक्ष मजबूत करण्याच्या संदर्भात जे प्रयत्न केले जात आहेत, ते भाऊंच्या नेतृत्वकौशल्यामुळे होय हे जिल्ह्यातील कुणीही निर्विवादपणे मान्य करेल.

सुरेशभाऊंशी माझेच नाही, तर माझ्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांचे अतिशय जवळचे ऋणानुबंध जुळण्याचे कारण म्हणजे ते आपल्यासोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्याला कधीही कार्यकर्त्यासारखे वागवत नाहीत. आपल्या कुटुंबाचा एक घटक म्हणून आणि कौटुंबिक सहकारी म्हणून त्यांची प्रत्येकांसोबत जिव्हाळ्याची वागणूक असते. कार्यकर्त्यांमध्ये हा जवळचा किंवा हा दूरचा असा दुजाभावही करण्याची वृत्ती त्यांच्यामध्ये दिसत नाही. सर्वांना समान वागणूक देणे, सर्वांप्रति मदतीचा भाव ठेवणे हा त्यांचा गुणधर्म मला विशेष आवडतो. या त्यांच्या स्वभावामुळे एकदा जुळलेला कार्यकर्ता त्यांच्यापासून कधीही दूर जात नाही.

सुरेशभाऊंचा स्वभाव निगर्वी आहे. बापुरावजी देशमुख यांच्यासारख्या सहकारमहर्षी आणि शिक्षणमहर्षी असलेल्या यशस्वी राजकारणी व्यक्तींचा वारसा लाभलेला असतानासुद्धा त्यांनी राजकीय गर्व बाळगला नाही. त्यांनी सर्वांशी जुळवून घेतले. त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे त्यांच्याशी अनेकांचे आत्मियतेचे नाते निर्माण झाले आहेत. इतर पक्षातील लोकांबद्दल त्यांनी कधी आकस बाळगला नाही. कुणाशीही आपले विनाकारण संबंध बिघडू नये याची ते सतत काळजी घेत असतात. अशावेळी राजकीय तडजोड करण्याची वेळ आली, तर ते तशी भूमिका घेतात. त्यामुळे त्यांचे स्वपक्षातील लोकांसोबत मतभेद निर्माण होत नाही. इतर नेत्यांना किंवा कार्यकर्त्यांना समजून घेऊन तोडगा काढण्याची त्यांची पद्धती मला विशेष महत्त्वाची वाटते.

सुरेशभाऊ गेल्या अर्ध्या दशकांपेक्षा जास्त काळ राजकारणामध्ये वावरत आहेत. वर्धा जिल्ह्यातील राजकारणाच्या केंद्रस्थानी ते सतत राहिले आहेत; पण व्यावसायिक राजकारणांसाठी आवश्यक असलेला स्वभावधर्म त्यांच्यात नाही. आपल्यामुळे कुणीही दुखावणार नाही, कुणीही नाराज होणार नाही याची दक्षता ते घेतात. त्यांच्या या स्वभावामुळे यांचे राजकीय नुकसानही झालेले आहे; पण त्यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी राजकारणाचा उपयोग करून घेतला नाही.

२००९ च्या निवडणुकीत सुरेशभाऊ निवडणूक जिंकले, ही आमच्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांसाठी आनंदाची गोष्ट होती. आम्ही केलेल्या परिश्रमाचे फलित झाले असे आम्हाला वाटले. या काळात भाऊंनी मतदारसंघात खूप कामे केली. मतदार संघातील लोकांच्या समस्या जाणून घेतल्या. या काळात प्रत्येक वेळी मी त्यांच्यासोबत होतो. भाऊंचा गेल्या अनेक वर्षातील राजकीय अनुभव त्यांना मतदार संघात काम करताना कामी आला.

सुरेशभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग असलेल्या राजकीय निष्ठेचा उल्लेख केल्याशिवाय आणि या निष्ठेच्या संदर्भातील काही प्रसंग इथे नोंदविल्याशिवाय भाऊंविषयी लिहिण्याला पूर्णत्व येणार नाही असे मला वाटते. पवार साहेब युवक काँग्रेसचे अध्यक्ष असताना सुरेशभाऊंनी त्यांचे नेतृत्व स्वीकारले. त्यांच्या नेतृत्वात राजकारणामध्ये प्रवेश केला. १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतरसुद्धा भाऊ पवार साहेबांसोबत राहिले. २००९ च्या निवडणुकीमध्ये भाऊ अपक्ष आमदार म्हणून निवडून आले. त्यावेळी अपक्ष म्हणून निवडून आलेल्या आमदारांना विविध पक्षांकडून पक्षात प्रवेश करण्यासाठी आमिषं दाखविण्यात आली; पण सुरेशभाऊंनी त्यावेळी पवार साहेबांची साथ सोडली नाही. काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रस पक्षात उभी फूट पडली. राष्ट्रवादीचे अनेक आमदार, खासदार, नेते, कार्यकर्ते पवार साहेबांना सोडून गेले, पण भाऊंनी आपली राजकीय निष्ठा सोडली नाही. ते पवार साहेबांसोबत राहिले, एवढेच नाही, तर भाऊंवर असलेल्या विश्वासामुळे वर्धा जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या एकाही कार्यकर्त्याने पक्ष सोडला नाही. पवार साहेबांसोबत राहण्याच्या आपल्या निर्णयावर सुरेशभाऊ ठाम राहिले. आम्ही त्यांच्यामुळे पवार साहेबांच्या नेतृत्वाला प्रमाण मानून त्यांच्यासोबत राहिलो. सत्तेसाठी त्यांनी आपल्या इमानाशी आणि निष्ठेशी कधीही तडजोड केली नाही. या त्यांच्या एकनिष्ठ स्वभावामुळे एक निष्ठावंत राजकारणी म्हणून त्यांची राजकीय इतिहासात नोंद होईल असे मला वाटते.

आज भाऊंनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत. आजही आम्हाला ते राजकारणामध्ये सतत मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय आम्हीही कुठले महत्त्वाचे निर्णय घेत नाही. ते आम्हाला सतत प्रेरणादायी राहणार आहेत. त्यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने त्यांना दीर्घ आयुष्य लाभो, त्यांना सुदृढ आरोग्य लाभो अशी मी आशा व्यक्त करतो. त्यांना अमृत महोत्सवाच्या निमित्ताने पक्षातर्फे आणि माझ्यातर्फे शुभेच्छा देतो.

**हार्दिक शुभेच्छा...**
**मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा...**

**भाऊ तुम्हाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..........**

क्षणांनी बनतं आयुष्य,
प्रत्येक क्षण वेचत रहा
क्षणी आनंदाच्या उमलत रहा
असतात क्षण दुःखाचेही
समर्थपणे पेलावेस तेही
हार असो वा जीत
हर्ष असू देत सदैव मनी
पण आयुष्याच्या प्रत्येक क्षणी
असेच बहरत राहा, हीच सदिच्छा...
भाऊ तुम्हाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..........
तुमची प्रगती, तुमची बुद्धी
तुमचे यश, तुमची कीर्ती वृद्धिंगत होत जावो,
सुख समृद्धीची बहार तुमच्या आयुष्यात कायम येत राहो ही सदिच्छा...
भाऊ तुम्हाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..........
उगवता सूर्य तुम्हाला आशीर्वाद देवो,
बहरलेली फुले तुम्हाला सुगंध देवो
देव आपणास सदैव सुखात ठेवो हीच सदिच्छा..
भाऊ तुम्हाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..........
हसत रहा सदैव करोडोंच्या गर्दीत,
चमकत रहा हजारांच्या गर्दीत,
जसा सूर्य चमकतो आकाशात तसेच उजळत रहा,
आयुष्यात हीच मनापासून इच्छा,
भाऊ तुम्हाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..........
समुद्राचे सर्व मोती तुमच्या नशिबी राहो,
तुमच्यावर प्रेम करणारे सर्वजण तुमच्यासोबत असो,
तुम्ही सदैव यशाच्या शिखरावर जात राहो
हीच मनीची इच्छा..
भाऊ तुम्हाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..........
जीवेत शरदः शतम् शतम्,
सुदिन सुदिन जन्मदिनम!
भवतु मंगलम विजयी भव सर्वदा
जन्मदिनस्य हार्दिक शुभेच्छाः!
जन्मदिनस्य हार्दिक शुभेच्छाः!

**– प्रा. सौ दुर्गा रवींद्र धुरत**



लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख
अमृत महोत्सव
कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

# दीर्घायुरारोग्यमस्तु, सुयशः भवतु, विजयःभवतु


**ॲड. सुधीर कोठारी**
सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगणघाट
संचालक, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबई


वर्धा जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी आजवर ज्यांनी आयुष्य खर्च केलेले आहे असे माझे सहकार क्षेत्रातील सहकारी व मार्गदर्शक प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचा २० मे हा जन्मदिवस. त्यांना अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केल्याबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा देताना आनंद होत आहे.

प्रा. सुरेशभाऊ यांच्याशी माझा संपर्क मागील ३५ वर्षांपासून आहे. या प्रदीर्घ काळात सहकारातील खाचाखोचा व त्यातील बारकावे जवळून शिकण्याचे सौभाग्य मला त्यांच्यामुळे प्राप्त झाले.

प्रा. सुरेशभाऊ यांच्या जीवनाचे आकलन करताना मला आढळते, तो त्यांच्यातील साधेपणा व विनम्रता! प्रत्येक राजकारणी हा चांगला नेता असतो; पण चांगला कार्यकर्ता नसतो हे तत्त्वज्ञान सुरेशभाऊ यांनी बदलविले आहे. तुम्ही जे बोलता तेच करता हा तुमच्यातील दुर्मिळ गुण आहे. अतिशय समर्पण भावनेने व प्रचंड मेहनतीने काम करीत असलेला नेता मी माझ्या राजकीय आयुष्यात फार क्वचित पाहिलेला आहे. शांत मन व स्पष्ट दृष्टी असलेले राजकीय नेते ही तुमची ख्याती सर्वत्र आहे. एक उत्तम दर्जाचे राजकारणी म्हणून तुमचे यश आणि वैभव साजरे करण्यासाठी तुमच्या अमृत महोत्सवाशिवाय दुसरा कोणताही प्रसंग नाही. निःस्वार्थ भावनेने राजकारण करणे सोपे नाही. तुम्ही मात्र आजवर जनतेची विविध मार्गाने चांगल्या प्रकारे सेवा केलेली आहे. उच्च मनोबल व नैतिकतेने राजकारण करण्याचा तुमचा गुण हा वाखाणण्याजोगा आहे. आजवर आपण विविध जातीधर्माच्या असंख्य लोकांना समोर आणून त्यांना विविध पदावर आरूढ केले आहे.

तुमच्या कुशल, अभ्यासू नेतृत्व गुणांमुळे या जिल्ह्याला एक नवीन दिशा दिलेली आहे. तुम्ही सर्वोत्तम राजकीय नेता व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अजातशत्रू नेते आहात यांचा मला सार्थ अभिमान आहे.

आजच्या तुमच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आभाळभर शुभेच्छा !

देखणे जे चेहरे जे प्रांजळाचे आरसे ।

अशा निरागस वृत्तीच्या सभ्य, निरागस, व निर्मळ मनाच्या व सर्व क्षेत्रात आपला ठसा उमटविणारे सुरेशभाऊ! पाहता पाहता अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केलेले आहे. या शुभदिनी त्यांना शुभेच्छा देताना म्हणावंसं वाटतं की,

''शतक पूर्तीचा आनंद तुम्ही लुटावा
या मनःपूर्वक शुभेच्छा तुम्हाला''

# मदतगार मित्र

**श्रीधर ठाकरे**
माजी अध्यक्ष
जिल्हा दूध संघ, वर्धा

आजचा विषय अशासाठी आहे की, एक व्यक्तिमत्त्व जे राजकारणात आहे; पण राजकारणात समाजकारण करण्याचं काम ज्यांनी आजपर्यंत केलं आहे. समाजकारण कसं करायचं ते सुरेशभाऊंनी दाखवलं आहे. एवढा मोठा पसारा शाळांचा, कॉलेजचा, त्यातूनही त्यांनी जे काही प्रत्येक विभागाला द्यायचं ठरवलं आहे. त्या प्रकारे काम करत गेले, या सगळ्या गोष्टींचा विचार करून सगळ्या संघटनांनी असं ठरवलं की, आपण आजपासून सुरेशभाऊंचा अमृत महोत्सवी वर्ष राबवायचं, त्यात वेगवेगळे कार्यक्रम घ्यायचे. सुरेशभाऊंच्या स्वभावातली गोष्ट अशी होती की, धार्मिक कार्यक्रम असेल, तर तो मनापासून घ्यायचा, पाच वर्षे सातारकर महाराज इथे येत गेले. सगळ्या लोकांना या गोष्टीचा लाभ मिळत गेला. एक वेळा कार्यक्रम असा केला की, कुठल्याही पक्षाचा साठ वर्षाच्या वरचा माणूस सिनिअर सिटिझन, तो कोणत्या पक्षाचा आहे हा विषय नाही. या सर्वांचा सत्कार शत्रुघ्न सिन्हा यांच्या हस्ते ठेवण्यात आला होता. आपल्याकडे आज जे कल्चर आहे, त्या कल्चरला आपण उजाळा दिला पाहिजे, नवीन पिढीपर्यंत पोहचलं पाहिजे. या दृष्टीने या कार्यक्रमाचे त्यांनी आयोजन केले होते.

सुरेशभाऊ देशमुख यांच्याबद्दल सांगायचे झाले, तर मला खूप गोष्टी सांगता येतील. आम्ही त्यांच्या बरोबर ३७–३८ वर्षांपासून आहोत. एक अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. तुम्ही कुठल्याही पक्षाच्या आमदार, खासदार, मंत्र्याजवळ जा. कुठल्याही पक्षांबद्दल त्यांच्या मनात मतभेद नाही. एखाद्या वेळेस मतभेद असेल, तत्त्वप्रणालीनुसार हे मतभेद ते पाळतही असतील; पण त्यांच्यात मनभेद कधीही नाही. त्यामुळे जिथे जिथे आम्ही त्यांच्यासोबत जायचो, तेव्हा एक लक्षात आलं की, त्यांना पाहिल्यानंतर त्यांचं काम लवकरात लवकर कसं होईल? याचे प्रयत्न केले जात होते. मला एक आठवण सांगता येईल, ही आठवण विलासरावांच्या संदर्भातील आहे. त्यावेळी आम्हाला मोठमोठी कामं असायची. काहीतरी मोठं काम होतं. राष्ट्रवादी होऊन गेली होती. अशा वेळेस सुरेशभाऊ आणि आम्ही गेल्यानंतर एक दोन मिनिटातच त्या कामावर सही होऊन गेली होती. म्हणजे सुरेशभाऊंना पाहिल्यानंतर ते विचारत नाहीत की, तुम्ही कोण? कुठले? असा काही विषयच नव्हता. ही एक जी पद्धत होती जी सुरेशभाऊंच्या कामाची पद्धत. ती अत्यंत कल्पनेच्या पलीकडची होती. एक छोटासा प्रसंग मला वाटते या ठिकाणी सांगितला पाहिजे की, नितीन गडकरींकडे आम्ही बरेच वेळा जायचो. सहज त्यांना भेटायला म्हणून किंवा त्यांच्या घरची सहज व्हिजिट म्हणून आम्ही जायचो. तर

रात्री त्यांचं एक निमंत्रण राहायचं, ''सुरेशभाऊ, आज आपण एका चायनीज हॉटेलला जाऊ, तुम्हाला मी वेगवेगळे हॉटेल दाखवतो'' नितीनभाऊंचा तो स्वभाव होता. सुरेशभाऊंच्या स्वभावातला एक विशेष सांगतो. एकदा मला आणि सुरेशभाऊंना दोघांनाही गडकरी साहेबांनी बोलावलं. रात्री साडेअकरा बारा वाजता आम्ही जेवण वगैरे केलं आणि सुरेशभाऊंना त्यांनी ऑफर दिली की, अशी अशी परिस्थिती आहे. आपण उभे राहा, आम्ही त्यावेळी तिघेच जण होतो. ''तुम्ही उभं राहावं असं मला वाटते'' असे गडकरी साहेब म्हणाले. सुरेशभाऊंनी इतक्या नम्रपणे नकार दिला. 'उभं राहायचा मुद्दा नाही; पण मला पवार साहेबांना सोडायचं नाही, ही माझी मोठी अडचण आहे. या वयात मी पवार साहेबांना सोडून काय करणार?' मग, तिथं त्यांनी चार पाच कॅन्डिडेटस्चे नाव सांगितले. सुरेशभाऊंची एक विशेषता आहे की, भाऊ कधीही कुणाला चुकीचं मार्गदर्शन करीत नाहीत. विरोधात असो की, कुणीही असो. आमच्यासमोर चारपाच नावं गडकरी साहेबांनी सांगितली. याच्यातली माझ्या पक्षातला कोणता कॅन्डिडेट चांगला चालू शकेल? आणि सुरेशभाऊंनी योग्य सजेशन दिलं. ही त्या वेळेची घटना होती. कुठेही विरोधक जरी असला, तरी आम्ही इतक्या दिवसांपासून पाहतो विरोध हा शब्द तात्पुरता मतभेदाचा झाला. त्यानंतर तो विरोधक कधीच नसतो. पंधरा पंधरा वर्षे जिल्हा परिषद, पंचायत समिती भाऊंच्या हाती राहिल्या आहेत. एक गोष्ट सांगणे या ठिकाणी महत्त्वाची आहे. जेव्हा राष्ट्रवादी झाली होती. तेव्हा आम्ही तिघंजणं, सुरेशभाऊ, दिलीपराव काळे आणि मी अशी आमची एकजूट होती. ही एकजूट राजकीय दृष्टीने होती; पण ते आमचे नेतेही आहेत. सहकारीही आहेत आणि मित्रही आहेत. राष्ट्रवादी जशीही तयार झाली, तेव्हा सुरेशभाऊंनी मला आणि दिलीपरावाला बोलावलं आणि सांगितलं की, 'तुमची काँग्रेसमध्ये बऱ्यापैकी ओळख आहे. चांगले संबंध आहे, मी साहेबांसोबत जाणार आहे. तुम्ही माझ्यासोबत या असा माझा तुम्हाला अजिबात आग्रह नाही, पण तुम्हाला योग्य वाटते ते पहा.' असे ते म्हणाले. आमचं ठरलेलं होत की, पक्ष म्हणून आपण कधी लढलोच नाही. आज मैत्रीचा गट तयार झाला आहे. तुमच चांगलं नेतृत्व आहे. समाजकारण करण्याचं साधन म्हणजे राजकारण हा मंत्र सुरेशभाऊंनी आम्हाला आज दिलेला आहे. समाजकारण करण्याचं सर्वात चांगलं साधन म्हणजे राजकारण आहे. म्हणून आपण राजकारणात राहतो. त्या अनुषंगाने आपल्याला कुणाला शिक्षण द्यायचं आहे, कुणाला नोकऱ्या द्यायच्या आहेत, कुणाला प्रकल्पावर काम द्यायचे आहेत. त्या करिता आपल्या हातात राजकारण असावे असे भाऊंना वाटत आले आहे. कर्जमाफी झाली पाहिजे. शासन आपले होते. आपले शासन असतानासुद्धा प्रचंड मोठा मोर्चा याच्यासाठी काढला होता की, शेतकऱ्यांच्या भावना आपण शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्या पाहिजे त्यावेळची गोष्ट खरी होती. भाऊंविषयी वैयक्तिक काही गोष्टी सांगायच्या झाल्यास सांगता येतील. ते आमदार होते, आम्ही मुंबईत जर असलो तर सिद्धिविनायकाला जायचं ठरायचं. ते आमदार, त्यांनी मलाही कार्ड काढून दिलं असतं तर त्यानुसार डायरेक्ट दर्शन घेता येणार होतं; पण आम्ही सकाळी पाच वाजता उठून दीड तास लाईनमध्ये उभे राहत असू. याच्यासाठी की, आपण दुसऱ्याचा हक्क डावलून दर्शन करायचं नाही. जो कुणी रांगेत असेल, त्यांच्या मागे उभे राहून रांगेत गेलं पाहिजे ही त्यांची त्या वेळची पद्धत होती. म्हणजे आज हे यासाठी सांगणं आवश्यक आहे की, आपण ज्यांच्यासोबत राहतो ते कसे व्यक्तिमत्त्व आहे हे आपल्याला कळले पाहिजे. सुरेशभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे संस्कार आज मुलांवर होत आहेत. समीर असेल, संदीप असेल यांच्यावर चांगल्या प्रकारचे संस्कार होत आहेत आणि या संस्काराचा अमूल्य पाढा आपल्याला या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने वाचायचा आहे. भाऊंनी मागच्या काळात काय काय केलं? गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार इथे केला गेला. पाठीमागे उद्देश हा आहे की, आपल्याकडच्या विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेतली पाहिजे, त्यांच्या मनात यशस्वी होण्याची भावना निर्माण झाली पाहिजे, त्या दृष्टीने तो अभ्यास करेल. इथे व्याख्यानमाला सुद्धा सुरू केलेली आहे. दाआजींच्या नावाने व्याख्यानमाला ही कल्पना अत्यंत गौरवास्पद आहे. चांगले चांगले व्याख्याते आणायचे आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या विचारवंतांचे विचार ऐकायला मिळाले पाहिजे, ही त्यांची पद्धत आहे.

या महोत्सवानंतर वर्षभर आपल्याला वेगवेगळे कार्यक्रम राबवायचे आहेत. या कार्यक्रमातून लोकांपर्यंत जनजागृती पोहचविणे हा या पाठीमागचा उद्देश आहे. सुरेशभाऊंच्या कामाची एक पद्धत म्हणून सांगतो, भाऊंसोबत आम्ही गेल्या ३७ वर्षांपासून आहोत. अत्यंत शेवटचा माणूस असेल, चपराशी असेल, ड्रायव्हर असेल, त्याची पहिले काळजी घेतली जाते. शेवटचं उदाहरण सांगून मी संपवतो की, २००८ मध्ये मला हार्टअटॅक आला होता आणि डॉक्टरांनी सांगितले की, तात्काळ तुम्हाला बायपास करण्याची गरज आहे. मी कुणाला सांगितलं नाही. सुरेशभाऊ मला मुंबईला घेऊन गेले आणि त्यांनी मला जसलोकमध्ये नेलं. जसलोकमध्ये भाच्याला सांगितलं की, श्रीधरची तपासणी करून घे, तिथल्या डॉक्टरांनी सांगितलं की, हे तात्काळ ऑपरेशन करायला पाहिजे. मला त्यांनी भरती केलं, ऑपरेशनही झालं, तोपर्यंतही मला माहिती नाही, माझ्या घरीपण माहिती नाही, अजिबात कोणालाच माहिती नव्हतं. घरी मिसेसला आणि मुलाला ५ दिवसानंतर कळविण्यात आलं. ऑपरेशन झालं आहे, यशस्वी झालं आहे, जसलोकध्ये भरती आहे. ही कामाची पद्धत, यासाठी सांगतो की, हे असते मित्राचं काम. सुरेशभाऊचं मित्र म्हणून अशाप्रकारचं काम आहे. हे मित्र म्हणून झालं. आता नेते म्हणून त्याचा विचार केला तर, असे दिसते की, भाऊ नेहमी सांगतात, लोकांना तुम्ही चुकीचं आश्वासन देऊ नका. राजकारणात असं काम करायचं नाही. आपल्याला मत देईल, नाही देईल, ही नंतरची गोष्ट आहे. जितकं आपण काम करू शकतो तेवढंच बोला. आज सुरेशभाऊंना चारपाच वेळा उभं राहावं लागलं. खरी गंमत अशी आहे की, कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर ते उभे राहिले. एकदा तर असं झालं की, दत्ताभाऊंच्या आग्रहाखातर उभं राहावं लागलं. पवार साहेब इथे आले. तडस साहेब होते, मी होतो, सुरेशभाऊही होते, आम्ही तिघेही होतो. आम्हाला आज्ञा झाली. सुरेशभाऊ नकार देत होते. मला उभं राहायच नाही. आता मी उभं राहत नाही, तर पवार साहेबांनी आज्ञाच केली. लोकांच्या आग्रहास्तव काही निर्णय घेतल्या गेले. म्हणून सुरेशभाऊ लोकनेते आहेत. अशा अनेक घटना आहेत. 'नेकी कर आणि दर्या मे डाल' याप्रकारच्या आहेत. अनेक लोकांना त्यांनी मदत केलेली आहे; पण या कानाची त्या कानाला माहिती नाही, हे आम्ही जवळून पाहिलेलं आहे. त्यामुळे त्यांच्या कामाचा हा सुगंध लोकांपर्यंत पोहचावा. लोकांना त्याची माहिती व्हावी आणि अशाच प्रकारचे विचार तुमच्याआमच्यामध्ये या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने होत राहावे, अशी आमची इच्छा आहे. सुरेशभाऊ देशमुख यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने मी त्यांना खूप खूप सदिच्छा देतो!

# PROF. SURESH DESHMUKH
# AN ULTIMATE FRIEND BY ALL YARDSTICKS

**Dr. Vedprakash Mishra**

Dr. B. C. Roy Awardee
Chief Advisor to Hon'ble Chancellor and Krishna VishwaVidyapeeth (DU) Karad
Head of the Medical and Health Professions Schools of the Indian program of the ICB-UNESCO Chair
Pro-Chancellor, DattaMeghe Institute of Higher Education & Research, Nagpur
Chairman, National Academic and Accreditation Board, IMA Headquarters, New Delhi

It is said destiny creates individuals for dispensation of destined tasks in the larger interest of men and mankind. This statement is validated specifically when one peeps into the entire growth profile of my dear friend **Prof. Suresh Deshmukh,** who in his stride over a period of time has risen to the highest level to dispense of the responsibilities accruable thereto with **'ease, elegance, consequence and relevance'** in every demonstrable way.

I feel myself to be fortunate enough to be in close association with him all these years, specially with reference to formative years of adulthood have been such, which are permanent in our memory lanes. Normally speaking, every successful man is claimed by anybody and everybody to be closely associated with. This is more so for the purposes of **'cognition and prominence'** alike. Away from this proposition, which in terms of the worldly realities is invariably true, I in all humility earnestly believe that he has been and would continue to be a worthy friend of mine, not because it is my **'deserving'** but basically due to his mature 'understanding', 'clarity' and, above all, 'benevolence', which is deeply ingrained in him.

When I analyze him dispassionately as a friend and more so as a very close friend, searching for reasons as to why he has endeared himself in such an impressive and inerasable manner, a plethora of intrinsic and innate qualities embedded in, stands unfolded in a sequential manner, bringing in the form of a credible revelation. This analysis of mine is primarily on the bedrock of the 'qualities' that one looks in one's friend, which go a long way in shaping maturity, understanding and, above all, capacity to carry through the friendship so evolved for the entire period of life.

The core qualities, which I have been able to fathom in him, that have resulted in generation of bonds of friendship, which are stronger than steel, and faith which is unshakable independent of the situations and circumstances.

The first one, which I am able to pin point with accuracy, is the **'loyalty'** that he harbours in friendship. Frankly speaking, loyalty turns out to be the most primary quality that all of us look for in a friend, basically because a genuinely loyal friend will stand with you independent of any and every

situation and you will be able to count him to your side independent of the fact whether you are in **'tranquility or turmoil'**. To my experience, Prof. Suresh Deshmukh is a reservoir of **'loyalty'** which has never dried up in any manner in my perception. Hence, it makes him look different from the rest of the crowd.

The another quality of his which has been the strong basis of our mutual friendship has been his **'intelligence'** which enables him to be into forays of **'imagination, intuition, innovation, and above all, creativity'**. But then this intelligence has never made him arrogant, which really impresses one and all. His '**humility'** has never been a melodrama but is a conscious virtue which he carries with a sense of purpose, commitment and responsibility.

His **'sensitivity'** makes him a dependable friend. His care and sense of concern make one end up in generation of an intrinsic confidence that he would be there with you and by your side whenever you need him. This intrinsic assurance that stands evolved by itself is the most significant proof of the '**sensitivity'** that he embodies deep within him and it manifests in most vivid, free flowing way, whenever it is required and needed.

His capacity to ease out tough and difficult situations is so strong that he is capable of dissolving any situation, howsoever grave and serious it be, into a matter of solubility, and that too, handily. Toughest of the tough situation he deals with a deep invocation of clarity and clear understanding. This makes him a company, which does not get '**staled'** independent of the passage of time.

He harbours **'sincerity'** to his core by which he is true to himself and truthful to all, independent of anything and everything. **Sincerity to him is not just a virtue but he has accepted it as his way of life, which is not only inspiring but is also exemplary in character**. If one thing, as a friend of him I have loved to emulate out of him, has been his '**sincerity**, which he has always upheld.

In him, I have found a **'patient listener,'** ever willing to decipher whatever has been said and put to him. Keen to find solutions and evolve ways and means for the dispensation of the same in a time bound manner by harnessing all possible resources at his command makes him not only distinct and unique but also a dependable friend in despair and despondence, in whom one would not only find a credible and meaningful solution to the problem but also a '**solace'** which would soothen the soul as well.

Being **'supportive'** has always been his brand of friendship. This quality of him, to my understanding, emanates out of another larger quality of his, which is his **'generosity'**. It is out of the pool of '**generosity'** inbuilt in him that the modality of his being '**supportive'** generates.

As such, if I am able to integrate what I have felt as a friend of his over a period of time, then I will unhesitatingly, candidly and convincingly say that Prof. Suresh Deshmukh has been, and continues to be an **'intelligent', 'sensitive' individual, full of capacity to solve problems,** blended in his impeccable **'sincerity'** and unflinching **'loyalty'**, which is tagged with his **in-fallible 'generosity', which brings out 'the supportive' dispensations with his 'patient listening' capacity in a continual manner**.

I pray Almighty God to bless my friend with a long, happy, healthy and prosperous years, on his 75th Birthday, so that he is in a position to dispense the largest in the interest of men and mankind. To me, he is a real apostle of an ideal friend whom I do not claim on my merit or deserving but credit the same to destined destiny.





# Shri Sureshbhau Deshmukh : A Journey of Leadership in Cooperative Banking and Education


**Dr. Prashant Bokare**

Vice Chancellor, Gondwana University, Gadchiroli


## Introduction

Shri Sureshbhau Deshmukh, a name synonymous with leadership and dedication, has made an indelible mark on the city of Wardha in Maharashtra. Serving as both the ex-chairman of the District Central Cooperative Bank (DCCB) Wardha and the Chairman of Bapurao Deshmukh College of Engineering (BDCE) Wardha, his memoirs tell a story of unwavering commitment to community development and education. In this article, we explore the remarkable journey of this visionary leader and his dual contributions to the fields of cooperative banking and higher education.

## The Early Years

Shri. Sureshbhau Deshmukh was born and raised in Wardha, an environment that instilled in him a deep sense for community welfare and responsibility. His early education laid the foundation for a brilliant academic career and an unwavering commitment to the betterment of society. His academic excellence and keen interest in cooperative banking soon led him down a path that would transform the landscape of Wardha.

## Leadership in Cooperative Banking

Shri. Sureshbhau. Deshmukh's journey in cooperative banking began with a humble start. He joined the District Central Cooperative Bank in Wardha as a young and enthusiastic director, quickly climbing the ranks due to his remarkable work ethic and financial acumen. His leadership qualities became evident as he championed modern banking practices, streamlined operations, and expanded the bank's reach to previously underserved communities.

During his tenure as the chairman of DCCB Wardha, Shri. Sureshbhau. Deshmukh implemented policies that promoted financial inclusion and uplifted the region's rural economy. Farmers and entrepreneurs found a trusted partner in the bank, receiving affordable credit facilities that helped them improve their livelihoods and agricultural practices.

**Chairmanship at BDCE Wardha**

In addition to his stellar contributions to cooperative banking, Shri. Sureshbhau Deshmukh took on the role of Chairman at Bapurao Deshmukh College of Engineering (BDCE), a prominent institution in Wardha. Under his visionary leadership, BDCE flourished and became a centre for excellence in technical education. Sureshbhau Deshmukh's emphasis on academic excellence, infrastructure development, and industry collaboration elevated BDCE to new heights.

**Legacy and Impact**

The memoirs of Shri. Sureshbhau Deshmukh highlight the transformative impact of his leadership in both cooperative banking and education. His unwavering dedication to the welfare of the community and his innovative thinking has left an indelible mark on the city of Wardha. Under his stewardship, Wardha's cooperative banking sector witnessed unprecedented growth, and BDCE became a beacon of knowledge and innovation.

**Conclusion**

Shri. Sureshbhau Deshmukh's memoirs exemplify the power of visionary leadership and dedication to community development and education. His journey from a young aspirant to a revered leader in cooperative banking and higher education is a source of inspiration for generations to come. Wardha owes much of its financial prosperity and educational excellence to the tireless efforts and unwavering commitment of this remarkable individual, whose legacy will continue to shine brightly for years to come.

# Hon’ble Sureshbahu Deshmukh
# Simplicity Personified





## Dr. Rajiv M. Borle

Director General (Admin)
Director Professor, OMFS
Former Vice Chancellor
DMIHER (DU) Wardha


It is great honor and privilege for me to pen down my thoughts and fond memories of my quality association with Hon'ble Shri Surshbhau Bapuraoji Deshmukh, Former MLA from Wardha constituency, President of Yashwant Education Society and most importantly a humble, polite, unassuming, selfless and kind person.

My formal association began with this great personality in the year 1984 when I was working at MGIMS Sewagram and he happened to visit my OPD for some treatment. In the very first meeting, his humble and friendly behavior attracted me towards him. He has such a magnetic personality that you will automatically get drawn towards him. I did not know much about him that time but over a period of time I developed very thick family relationship with entire Deshmukh family. I had never stayed at Wardha earlier but probably it was destiny which brought me to Wardha and bestowed upon me opportunities to meet many wonderful friends, philosophers, guides and well-wishers. Sureshbhau’s father Respected late Bapuraoji Deshmukh was a gem of a person, an exemplary human being, Sahakarmaharshi and Shikshanmaharshi, Philanthropist, Social worker, Politician and, inspite of his tall achievements in life, he was very humble and humane. Shri Sureshbhau inherited his legacy to carry it forward in a befitting manner. Not only did he carry forward the legacy of his great father but augmented it meaningfully.

A few experiences of mine I must mention here, he was so well known and had such a huge name, but whenever he came to my OPD for treatment, he never walked in directly but waited patiently for his turn. If I came to know and I requested him to come in, he would politely tell me to attend the patients who had come earlier and are waiting, and he would wait. He never went away without paying the treatment charges. When I said, 'Bhau, let it be,' he would politely reply‘ Doctor Saheb, I can pay money and shall pay it, if you want to give any concession, please give it to those who need it more’. This small gesture carries a great message about the thought process, uprightness, immense regard for discipline and most importantly his concern for marginalized population.

Many people inherit legacy of their illustrious parents, blessed by almighty with success, social status, stature and resources, but very few carry it gracefully, keeping their feet grounded and not forgetting their commitment to society and are always ready to help any needy person during his bad times. These attributes of Sureshbhau made him popular, and he climbed many ladders of success with the blessings and best wishes of people he helped.

In Sanskrit a ladder is called 'Awataranika' and those, who climb the ladder from bottom to reach the top are recognized as "Awtar' and Sureshbhau is a living example of it. Making a humble beginning as a shy youngster, he climbed the ladder of success and has inspired many and created a legacy of his own, which is exemplary, unparalleled, glorious, gracious, full of simplicity and kindness, which is worth emulating.

I remember a few befitting lines to describe Sureshbhau 'ज्ञानयोगी की तरह सोचे, कर्मयोगी की तरह पुरुषार्थ करें और भक्तियोगी की तरफसे सहृदयता उबरे'. Ever smiling and pleasant personality of Sureshbhau, his warmth, helpful nature, his grace and dignity are the rare qualities which exist in specially privileged personalities.Imparting education to the children from villages, shaping their careers and contours , making them not only learned but educated and making them stand on their own feet is a great service to the society and Nation, which Sureshbhau did and is doing through the chain of schools and colleges established under his Education society. Providing employment to many in these educational institutes and other industrial ventures started under his vigilant leadership has supported so many people and families. Everyone lives for himself, but Surshbhau being a torch bearer, showed a way to many – how to live for others. He has toiled hard throughout his life. He never boasted showed off his work because he always believed in the dictum, 'Work hard in silence and let the success be your noise'.

Today, ***'Karmayogi'*** Hon'ble Sureshbhau is completing 75 glorious, successful, iconic and inspirational years of his life. It is "Amrit Mohotsava" which needs to be celebrated in an exemplary manner. This celebration is for his achievements, his kindness and his hard toiling but, more importantly, it is an opportunity for a friend like me to express my profound sense of gratitude to this great human being on my personal behalf and on behalf of so many others whose lives have been touched by Sureshbhau.There is a famous quote, "How deeply you touch another life is how rich your life is" and Surshbhau is a living example of the same. Such celebrations are not only for glorification of an individual, but they are also for giving message to the society to follow the examples laid by such legendary personalities.

On this great occasion, I pray to the Almighty to bestow upon Respected Sureshbhau everything better than the best a long, healthy and cherishable life, full of contentment. May we all have the privilege of his noble company for years to come.

With profound regards and respects!

# आदराचे अत्युच्च स्थान




**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

आपल्या आयुष्यात काही असे आदरणीय व्यक्तिमत्त्व येतात, ज्यांच्याविषयी अपार आदरभाव वाटतो. त्यांचे ऋण कधीही विसरण्यासारखे नसतात. आपण त्यांच्या सतत संपर्कात असलो किंवा नसलो, तरी त्यांच्या विषयीचा आदर कधीही कमी होत नाही. वर्धा जिल्ह्याच्या सहकार, शिक्षण आणि राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्रा. सुरेशभाऊ देशमुख हे माझ्या ह्रदयात नेहमीसाठी आदराचे स्थान असलेले असे महनीय व्यक्ती आहेत.

१९८६ साली मी इंजिनिअरिंगचे शिक्षण घेण्यासाठी सेवाग्राम येथील बापुरावजी देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला. त्यानंतर माझा भाऊंसोबत संपर्क आला. त्यापूर्वी भाऊंना मी एक प्राध्यापक म्हणून ओळखत होतो. दाआजींचा मात्र मला लहानपणापासूनच परिचय होता. माझे वडील एकनाथराव हिवसे जरी राजकारणात सक्रियपणे सहभागी नसले, तरी दाआजींच्या कोणत्याही कार्यात ते राहत असत. त्यामुळे दाआजींचा आणि माझ्या वडिलांचा सतत संपर्क असे.

मला आठवते, मी शिकत असताना १९८८, १९८९ अशी सतत दोन वर्षे प्रोडक्शन इंजिनिअरिंग विभागाचा कॉलेज टॉपर होतो. दाआजींच्या हस्ते मी दोन्ही वर्षे बक्षीस घेतले. १९९० साली दाआजी आजारी असताना माझे वडील आणि मी त्यांना भेटायला गेलो, तेव्हा त्यांनी माझ्या बक्षिसांची आवर्जून आठवण केली व त्यांना 'याला माझ्या महाविद्यालयातच नोकरीला घ्यायचं आहे' असे वचनही देऊन टाकले, एवढेच नाही, तर याविषयीची कल्पना भाऊंनासुद्धा दिली.



दाआजींच्या निधनानंतर १९९१ साली बापुरावजी देशमुख इंजिनिअरिंग कॉलेजची जाहिरात आली. माझ्या विषयात अनेक स्पर्धक असतानाही दाआजींना दिलेला शब्द सुरेशभाऊंनी पाळला आणि मी ज्या महाविद्यालयाचा विद्यार्थी होतो, त्याच महाविद्यालयात सुरेशभाऊंच्या वचनपूर्तीमुळे मी नोकरीला लागलो. नोकरी करीत असताना भाऊंनी माझ्यावर वारंवार विश्वास दाखवला आणि मी त्यांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला नाही.

इंजिनिअर कॉलेजच्या प्रोडक्शन विभागातून काही वस्तूंची निर्मिती करून आर्थिक सोर्सेस तयार करता येतात का? याचा विचार भाऊ करीत होते. संस्थेचे २२ हायस्कूल, ३ महाविद्यालये आणि ११ कनिठ महाविद्यालये आहेत. त्यांना आपल्याच प्रोडक्शन डिपार्मेन्टमधून फर्निचर पुरविले जाऊ शकतात का? अशी कल्पना भाऊंनी मांडली. त्याप्रकारचे नियोजन भाऊंनी आम्हाला करायला सांगितले. यापूर्वी शाळा–महाविद्यालयात लागणारे फर्निचर खूप महाग बनविले जात होते. भाऊंच्या या कल्पनेमुळे कमी दरात उत्तम दर्जा असलेले फर्निचर आमच्या शाळा–महाविद्यालयाला पुरविले जाऊ लागले. या कल्पनेतून एक तर अभियांत्रिकी महाविद्यालयाचा आर्थिक फायदा झाला आणि स्वस्त दरात शाळा–महाविद्यालयात फर्निचर उपलब्ध करून देता आले. या कामांसाठी काही मजूर बोलावले गेल्यामुळे रोजगारही उपलब्ध करून देता आला. अशा प्रकारचा कल्पक विचार करणारे भाऊ आमच्या संस्थेला लाभले याचा आम्हा सर्वांना अभिमानही वाटत आला आहे.

सुरेशभाऊ निवडणुकीला उभे राहिले की, आमच्या सर्वांमध्ये धामधूम असे. मी भाऊंच्या प्रचारात प्रत्यक्षपणे सहभागी होऊ शकत नव्हतो, कारण भाऊंच्या प्रचार कार्यालयाची व्यवस्था करणे, गाड्यांची व्यवस्था करणे, गाड्यांचे फॉलोअप घेणे, कम्प्युटर सेंटर सांभाळणे, कोणते बुथ कुठे राहतील? बुथवर जेवणाची व्यवस्था कशी राहील? याची व्यवस्था करणे, भाऊंच्या निवडणुकीचा हिशोब ठेवणे इत्यादी कामे मी आणि माझ्या सहकाऱ्यांकडे असत. या काळात आम्ही पूर्णपणे कामात गुंतून गेलेलो असू. माझे वडील अकाऊंटचे काम चांगल्या पद्धतीने करीत असत. सुरेशभाऊंच्या संपूर्ण खर्चाचा हिशोब माझ्या वडिलांकडे असे. मला अभिमानाने सांगायला आवडेल की, माझे वडील हिशोबाचे काम अगदी काटेकोरपणे करीत, भाऊंवर असलेल्या निष्ठेने करीत, निवडणुकीच्या काळातील भाऊंचा हिशोब कधी चुकला असे झाले नाही. २००९ साली सुरेशभाऊ आमदार झाले याचा आनंद खूप मोठा होता. अनेक दिवसांपासून आमच्या घराजवळचा एक रोड रखडला होता. आमच्या भागातील काही कार्यकर्त्यांसोबत आम्ही भाऊंकडे गेलो. त्यांनी रोडच्या बांधकामाला लगेच सहमती दर्शवली आणि रस्त्याचे काम पूर्ण केले. मी जेव्हा जेव्हा वर्ध्यात माझ्या घरी येतो. तेव्हा तेव्हा मला भाऊंनी बांधलेला तो रस्ता भाऊंच्या कामाची आठवण करून देत असतो.

आज प्रशासनामध्ये काम करीत असताना विविध संस्था आणि संस्थापकांविषयी आम्हाला ऐकायला येते. प्रत्यक्ष त्यांच्याशी संपर्कही येतो. पण मोठ्या संस्थेचा एक अध्यक्ष म्हणून मी जेव्हा भाऊंकडे पाहतो, तेव्हा मला त्यांच्यात उदार मनाचा संस्थाध्यक्ष दिसतो. त्या काळात इतर कोणत्याही इंजिनिअरिंग कॉलेजला पूर्ण वेतन दिले जात नव्हते; पण आम्हाला नियमानुसार पूर्ण वेतन लागू करण्यात आले. आपल्या महाविद्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार सर्व लाभ मिळाले पाहिजे, असा त्यांचा यामागे हेतू होता. भाऊंनी १९९९ साली माझे सिनिअर ग्रेडचे प्रमोशन केले. त्यानंतर असोशिएटचेही प्रमोशन केले. प्रत्येक काळात कॉलेजेसचे फेज कमी जास्त होत असतात. त्या काळात कॉलेज ऐन भरात होते. सुरेशभाऊ राजकारणामध्ये सक्रिय असल्यामुळे बरेचदा त्यांना महाविद्यालयात यायला वेळ मिळत नसे; पण भाऊंनी आम्हा सर्वच कर्मचाऱ्यांवर विश्वास दाखवला. त्यांच्या विश्वासाचा वचक फार होता. सुरेशभाऊंच्या विश्वासाला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आम्ही सर्वच कर्मचारी घेत होतो. त्याप्रमाणे प्रामाणिकपणे आम्ही आपले कार्य करीत होतो.

२०१६ साली नागपूर विद्यापीठाच्या वित्त अधिकारी पदासाठी जाहिरात आली. अर्ज करण्यापूर्वी भाऊंना भेटलो. त्यांना मी विद्यापीठातून सेवा देण्याविषयी माझी इच्छा व्यक्त केली. 'आपल्या संस्थेचे कुणीही विद्यापीठात वरच्या पदावर गेले, तर चांगलीच गोष्ट आहे. तुमचा व्यक्तिगत फायदा होईलच; पण आपल्या संस्थेचे नावसुद्धा मोठे होईल,' अशी

त्यांनी प्रतिक्रिया दिली. आमच्या महाविद्यालयाचे संचालक समीरभाऊ यांच्याशी चर्चा करून त्यांनी माझी लीनही मंजूर करून दिली. २९ जून २०१६ साली वित्त अधिकारी म्हणून मी विद्यापीठात रूजू झालो, त्यावेळी मी पहिला फोन भाऊंना केला. भाऊंनी माझे भरभरून अभिनंदन केले. त्यानंतर २०२१ ला मी कुलसचिव पदावर रूजू झालो. त्यावेळीही पहिला फोन मी भाऊंनाच केला. मी कुलसचिव असताना कुठल्यातरी कामानिमित्त भाऊ विद्यापीठात आले होते. ते जेव्हा माझ्या केबिनमध्ये आले, तेव्हा मला फार अडखळल्यासारखे झाले. मी माझ्या नेहमीच्या खुर्चीवरून उठून बाजूच्या खुर्चीवर बसलो. त्यांनी मला परत माझ्या खुर्चीवर बसायला सांगितले आणि ते म्हणाले, ''मला तुला त्या खुर्चीवर बसून पाहायचे आहे.'' भाऊंच्या आग्रहाखातर मी दोन तीन मिनिटेच त्यांच्या समक्ष त्या खुर्चीवर स्थिरावू शकलो. पुन्हा मी बाजूच्या खुर्चीवर बसलो. आज मी जेव्हा मागे वळून पाहतो, तेव्हा आपल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारे जे मोजके संस्थापक असतील, त्यात सुरेशभाऊंचे स्थान वरच्या स्थानी आहे असे म्हणावे लागेल.

२०२३ साली सुरेशभाऊंना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा जीवनसाधना पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींसाठी दिला जाणारा हा सर्वोच्च आणि बहुमोल सन्मान आहे. विद्यापीठाच्या निवड समितीचा सदस्य सचिव म्हणून पुरस्कारांसाठी प्रस्ताव आलेल्या व्यक्तींबद्दल निवड समितीपुढे सादरीकरण करण्याची जबाबदारी माझ्याकडे होती. प्रत्येकांच्या कार्याचा परिचय मी निवड समितीपुढे करून देत होतो. सुरेशभाऊंविषयी समितीसमोर सांगताना माझ्या पुढे कुठल्याही प्रकारचा कागद नव्हता. भाऊंविषयी मी भरभरून सांगत होतो. ते मनातून आणि आत्मियतेने येत होते. निवड समितीच्या सदस्यांनी पुरस्कारांसाठी निवड केलेल्या व्यक्तींचा सिलबंद लिफाफा माझ्याकडे दिला. मी आमचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी जे बापुरावजी देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयातच प्राध्यापक पदावर पूर्वी कार्य करीत होते. त्यांच्या समक्ष जेव्हा आम्ही लिफाफा उघडला, तेव्हा भाऊंचे नाव पाहून आम्हाला खूप आनंद झाला. त्या वेळी आमचा आनंद वेगळाच होता. देखण्या अशा पुरस्कार सोहळ्यात महामहीम राज्यपालांच्या हस्ते आम्ही भाऊंचा यथोचित सत्कार केला. आम्ही आयोजित केलेला सोहळा आणि भाऊंचा सत्कार 'याची देही याची डोळा' पाहताना आम्हाला अपार आनंदाचे भरते आले होते. सुरेशभाऊंचे शैक्षणिक कार्य अतुलनीयच आहे; पण या पुरस्कारांने भाऊंच्या कार्याला अधिकच झळाळी आली असे आम्हा दोघांनाही वाटू लागले.

यशवंत ग्रामीण संस्था ही विदर्भात नावलौकिक प्राप्त संस्था म्हणून परिचित आहे. या संस्थेने विविध क्षेत्रात कार्य करणारे मोठमोठे व्यक्तिमत्त्व पुरविले. शिक्षणक्षेत्रातील उच्चस्थ पदावर काम करणारे अनेक कुलगुरू या संस्थेने दिले. साधारणत: चार वर्षांपूर्वी आम्ही तिघं मोठ्या पदांवर रूजू झालो. राट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून मा. डॉ. सुभाष चौधरी, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून मा. डॉ. प्रशांत बोकारे आणि नागपूर विद्यापीठाचा कुलसचिव म्हणून मी. अशा आमच्या तिघांचा यात समावेश होता. आम्ही शिक्षण क्षेत्रातील मोठ्या पदांवर गेलो, याचा भाऊंना मोठा गर्व वाटतो. ते सार्वजनिक ठिकाणी आमच्याविषयी खूप कौतुकाने बोलतात हे आम्ही ऐकत असतो. आम्ही जेव्हा आपापल्या पदांवर रूजू झालो, तेव्हा त्यांनी वर्ध्याच्या यशवंत महाविद्यालयात आम्हा तिघांचाही सत्कार आयोजित केला. कार्यक्रम ज्या दिवशी होणार होता, त्या तारखेला मला विद्यापीठाचे महत्त्वाचे काम आल्यामुळे मुंबईला जावे लागणार होते. इकडे भाऊंनी आयोजित केलेला सत्कार आणि तिकडे विद्यापीठाचे महत्त्वाचे काम. या दोनपैकी मला कोणतीही गोष्ट टाळणे अशक्य होते; पण कर्तव्य महत्त्वाचे असल्याने मला मुंबईतील कामाला जास्त महत्त्व द्यावे लागणार होते. भाऊंनी ठेवलेला सत्कार आपल्याला स्वीकारता येणार नाही, याची खंत मनात होती; पण एक दिवसापूर्वी कळले की, मंत्रालयाचे काम पुढे ढकलण्यात आले आहे. मला भाऊंच्या हस्ते सत्कार स्वीकारता येणार आहे, हा जो माझा आनंद आहे, तो अवर्णणीयच होता. भाऊंनी आमचा केलेला सत्कार कदापिही विसरता येणार नाही. या जीवनप्रवासात सुरेशभाऊंनी यशस्वीपणे आपले अमृत महोत्सवी वर्ष गाठले, सुरेशभाऊंच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मी त्यांना आदरपूर्वक सदिच्छा देतो.





# एक सौजन्यशील व्यक्तिमत्त्व

**डॉ. एम. एल. कासारे**
सदस्य
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व लेखन साधने समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई

सर्वांशी सौजन्याने आणि मैत्रीभावनेने वागण्यासाठी माणसाजवळ तसं व्यक्तिमत्त्व असावं लागतं. हे व्यक्तिमत्त्व त्यांच्या एकूणच जडणघडणीतून निर्माण होतं किंवा त्या व्यक्तीचा स्वभावगुण म्हणून त्यांच्या आचरणातून ते वारंवार प्रतित होतं. या सौजन्यात नम्रता असते. निगर्वीपणा असतो. प्रामाणिकपणा असतो आणि सर्वांशीच आपुलकीने वागण्याची एक प्रेमभाव वृत्ती असते. सतत सत्कार्य करीत राहणे हे त्यांचे कर्तव्य झालेले असते. असे व्यक्ती सर्वत्र आढळत नाहीत; पण जिथे ते असतात, तिथे त्यांचं व्यक्तिमत्त्व सभोवतालच्या जनमानसांवर सतत प्रभाव पाडत असतं. वर्धा जिल्ह्यातील सर्वच क्षेत्रात ज्यांनी स्वत:ची अमिट अशी छाप पाडलेली आहे. ते लोकनेते प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या स्वभावाचे वर्णन दोन शब्दांत करायचे झाल्यास एक 'सौजन्यशील व्यक्तिमत्त्व' अशा पद्धतीने करता येईल.

माझा आणि सुरेशभाऊ देशमुख यांचा संबंध फार जुना आहे. गेल्या साठ–पासष्ट वर्षांपासून माझी त्यांच्याशी ओळख आहे. अर्थशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर मी प्राध्यापकाच्या मुलाखतीसाठी यशवंत महाविद्यालयात आलो आणि या संस्थेशी, दाआजींशी आणि भाऊंशी कायमच जुळून गेलो. मी प्राध्यापक असताना सुरेशभाऊ विद्यार्थी म्हणून यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे शिकत होते. त्यांची विद्यार्थीदशेपासूनची राजकीय आणि सामाजिक जडणघडण मी त्यावेळी पाहत होतो. विद्यापीठांच्या निवडणुकांमध्ये ते त्यावेळी सहभागी होत होते. वर्धा जिल्ह्यातील युवक काँग्रेसचे नेतृत्व ते करीत होते. त्या काळी महाविद्यालयातील निवडणुका म्हणजे मोठ्या धामधुमीच्या आणि उत्साहाच्या असत. सुरेशभाऊंचे पॅनलही निवडणुकांच्या रिंगणामध्ये असे. संस्थापकांचा मुलगा असला तरी, आपल्या संस्थेतील विद्यापीठ प्रतिनिधी निवडताना त्यांनी कधीही कोणत्याही दबावतंत्राचा वापर केला नाही. किंवा निवडणूक प्रक्रियेत कधीही हस्तक्षेप केला नाही. लोकशाही मार्गाने ही निवडणूक झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. त्यांच्यावर तरुणपणी झालेले हे संस्कार त्यांनी नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये कधीही सोडले नाही.

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचा जिल्हाभर व्याप आहे. बापुरावजी देशमुख म्हणत, ''शिक्षण हे खेड्यातील झोपडीत राहणाऱ्या लोकांपर्यंत पोहचले पाहिजे. खेड्यातील गरिबांच्या मुलेमुलींना उच्चशिक्षण मिळाले पाहिजे.'' या उच्च ध्येयानी त्यांनी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना केली. गेल्या ६० वर्षांची वाटचाल याच उद्दात ध्येयाने प्रेरित होऊन सुरू आहे. शिक्षणाची ज्ञानगंगा खेड्यातील झोपडीपर्यंत पोहचवून त्यांचे जीवन फुलवून टाकणाऱ्या सुरेशभाऊंच्या नेतृत्वात आजतागायत सुरू आहे. मी दाआजींच्या संस्थेत कार्य केले याचा मला अभिमान आहे, दाआजी गेल्यानंतर मी

तीस वर्षे सुरेशभाऊंच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत यशवंत महाविद्यालयाला सेवा दिली आहे याचा मला गौरव वाटतो आणि आज दाआजींची तिसरी पिढी समीर देशमुख यांच्या रूपाने शिक्षणक्षेत्रात चांगलं काम करीत आहे याचंही मला कौतुक वाटतं.

मी शासनाच्या विविध कमिटींवर अनेक वर्षापासून काम करीत आलो आहे. आजही विविध समित्यांवर सदस्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव असलेल्या अलीपूर रोडवर त्यांचे १०० कोटीचे स्मारक बांधण्यात आले. या स्मारकाचा आराखडा तयार करणाऱ्या समितीवर मी काम केले. तिथे काम करताना मी माझी ओळख यशवंत महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचा प्राध्यापक अशी दिली. माझा पत्ता मी निवृत्त प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, वर्धा असाच दिला. त्यांनतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीच्या निमित्ताने एक अप्रतिम गौरवग्रंथ काढला. त्याचा संपादक म्हणून मला कार्य करण्याची संधी मिळाली. या ग्रंथावर माझे पदनाम लिहितानासुद्धा मी यशवंत महाविद्यालयाचा पत्ता दिला. याचे कारण असे की, यशवंत संस्था आणि माझे अतिशय जिव्हाळ्याचे ऋणानुबंध जुळलेले आहेत. हे ६०-७० वर्षाचे ऋणानुबंध भाऊंच्या सौजन्यशील स्वभावामुळे टिकून राहिलेले आहेत. मी माझ्या जीवनात ज्या अनेक महत्त्वाच्या कमिटींवर काम केले. त्याचे संपूर्ण श्रेय हे यशवंत महाविद्यालयाला आणि सुरेशभाऊंच्या प्रोत्साहनवृत्तीला जाते हे कबूल करायला मला वावगे वाटत नाही. त्यांनी आम्हा लोकांना कार्य करण्यासाठी दिलेले स्वातंत्र्य हे इतर क्षेत्रात कार्य करण्यासाठी कारणीभूत ठरले. आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवला पाहिजे असे त्यांना सतत वाटत आले आहे. त्यासाठी जे सहकार्य करता येईल ते सहकार्य करण्याची तयारी त्यांनी सतत दर्शविली आहे. सुरेशभाऊंच्या या प्रोत्साहनामुळे या संस्थेत कार्यरत असलेले अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठमोठ्या पदांवर गेले आहेत. या संस्थेने अनेक कुलगुरू दिलेले आहेत. त्यात नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू बी. जी. कदम आणि कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरू कमलसिंग, गडचिरोली विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो.

वर्ध्यातील यशवंत महाविद्यालय हे महाराष्ट्रातील एक नावलौकिक प्राप्त महाविद्यालय म्हणून गणमान्य झाले आहे. या महाविद्यालयाने शिक्षण क्षेत्रात चौफेर प्रगती केली, त्याचे कारण म्हणजे सुरेशभाऊंचे शिक्षणक्षेत्रातील नेतृत्व होय. काही दिवसांपूर्वी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचा सुवर्ण महोत्सव पार पडला. या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून मा. शरद पवार आले होते. भाऊंचा मोठा कार्यक्रम असला की, वर्ध्यात पवार साहेबांची हजेरी आणि त्यांनी सुरेशभाऊ यांना दिलेले प्रोत्साहन आणि आशीर्वाद हा नेहमीच त्यांच्या पाठीशी राहिला आहे. यावेळी महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थी म्हणून माझा आणि कर्नल ओम पवार यांचा सत्कार मा. शरद पवार साहेबांच्या हस्ते सुरेशभाऊंनी घडवून आणला. यामागे आपल्या लोकांचा सन्मान व्हावा हा हेतू त्यांचा होता. या बाबतीत सुरेशभाऊ खूप मोठ्या मनाचे आहेत.

सुरेशभाऊ हे असे व्यक्तिमत्त्व आहे, जे सामान्यांमध्ये रममाण होतात. त्यांना त्यांच्या पदाचा किंवा त्यांच्या राजकीय वारशांचा कधीही गर्व वाटला नाही. आपण एका शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आहोत अशा प्रकारची वागणूक त्यांची कधीही राहिली नाही. त्यांनी स्वत:चा बडेजाव केला नाही. अगदी साधी राहणी आणि लोकांमध्ये सहजपणे वावरण्याची एक हातोटी त्यांना लाभलेली आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल अनेकांचे जिव्हाळ्याचे संबंध तयार होतात. आम्ही त्यांच्या संस्थेत कार्य करीत असताना आम्हाला कधीही दडपण जाणवले नाही. एक प्रकारचा मैत्रीभाव ठेवून त्यांनी आम्हाला सामावून घेतले.

यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे स्टाफ क्लबची गेल्या अनेक वर्षापासून परंपरा राहिली आहे. या स्टाफ क्लबच्या अंतर्गत विविध प्रकारचे उपक्रम आणि कार्यक्रम या महाविद्यालयात चालवले जातात. दाआजी गेल्यानंतर तीस वर्षे भाऊंनी अध्यक्षपदाचा कार्यभार सांभाळला. स्टाफ क्लबच्या प्रत्येक कार्यक्रमात ते आवर्जून उपस्थित राहत. स्टाफ क्लब मधील भाऊंची उपस्थिती आणि सत्कारमूर्तींना त्यांनी दिलेले आशीर्वचन सर्व कर्मचाऱ्यांना नेहमीच आनंददायी वाटते.

सुरेशभाऊ तसे मितभाषी म्हणून ओळखले जातात; पण गप्पांच्या रंगात रंगले की, त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा असतो. या त्यांच्या स्वभावामुळे त्यांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. मी गेल्या अनेक वर्षांपासून सुरेशभाऊंची राजकीय कारकार्द पाहत आलो आहे. त्यांनी राजकीय जीवनात सर्वांसोबत सौहार्दपूर्ण वागणूक ठेवली आहे. सुरेशभाऊंना सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन क्षेत्रात नेहमीच रूची राहिली आहे. त्यांच्या कारकीर्दीत यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणात दोन दिवस अखिल भारतीय आंबेडकरी मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. भव्य असा पेंडाल उभारण्यात आला होता. लोकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली गेली होती. महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचे आणि प्राध्यापकांचे मोठे सहकार्य या संमेलनासाठी लाभले होते. या संमेलनाचे स्वागताध्यक्षपद आपल्याकडे घेऊन भाऊंनी या संमेलनाला सर्वतोपरी मदत केली होती. मला आठवते. गंगाधर पानतावणे या संमेलनाचे अध्यक्ष होते आणि बाबुराव बागुल उद्घाटक म्हणून उपस्थित होते. या संमेलनात भारतातील अनेक मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. परिवर्तनवादी विचारांना मानणारे अनेक लोक गावखेड्यातून आणि शहरातून मोठ्या प्रमाणात या परिसरात आले होते. पुस्तकांच्या स्टालने परिसर भरून गेला होता. दोन दिवस या परिसरात मोठी वैचारिक मेजवानी अनुभवायला मिळाली. विचारवंताची भाषणे, एकपात्री प्रयोग, नाटके आणि चर्चेने हा परिसर अगदी दुमदुमून गेला होता. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून भाऊंची आणि आयोजक म्हणून सहकार्य करण्याची भाऊंची भूमिका रसिक श्रोत्यांना आणि चळवळीमध्ये कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना खूप आवडली.

माझ्या प्राध्यापकपदाच्या काळामध्ये मी बराच काळ सांस्कृतिक समितीचा प्रमुख होतो. या समितीकडे कार्यक्रमांच्या आयोजनाची जबाबदारी दिली जात असे. दाआजींच्या काळात मी महाविद्यालयात रूजू झालो. त्यांच्या काळात धनंजय गाडगीळ, दादासाहेब रुपवते, दादासाहेब गवई, यशवंत मनोहर अन्य अनेक मोठ्या लोकांना मी महाविद्यालयात भाषणांसाठी आणले. दाआजी मला या कामांसाठी नेहमीच प्रोत्साहन देत असत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भारतात विविध क्षेत्रात प्रसिद्ध असलेले रोल मॉडेल या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या पुढे उभे करण्याचा आमचा मानसच राहत असे. ही आमच्या सांस्कृतिक समितीची भूमिका जशी दाआजींना मान्य असे, तशीच भाऊंनाही ती आवडत असे. भाऊंच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीतही मी अनेक मान्यवरांची भाषणे आणि सत्कार आयोजित करण्यासंदर्भात पुढाकार घेत असे. सुरेशभाऊंनी या संदर्भात कधीही नकार दिला नाही. मला आठवते, आंबेडकरी चळवळीचे त्या काळातील आघाडीचे नेते दादासाहेब गवई बिहारचे राज्यपाल झाले होते. माझे आणि दादासाहेबांचे खूप जिव्हाळ्याचे संबंध होते. राज्यपाल झाल्याच्या निमित्ताने भाऊंच्या पुढाकाराने वर्ध्यात गवई साहेबांचा सत्कार व्हावा अशी आमची इच्छा होती. आम्ही भाऊंच्या पुढे हा प्रस्ताव मांडला. त्यांनी कुठलेही आडेवेढे न घेता लगेच हा सत्कार सोहळा आयोजित करण्याबद्दल निर्देश दिले. मोठा भव्यदिव्य अशा स्वरूपाचा सत्कार सोहळा त्यावेळी पार पडला. आपल्या भाषणामध्ये बोलताना दादासाहेब गवई यांनी सुरेशभाऊंच्या एकूणच कार्याचा गौरव केला. सुरेशभाऊंची वाटचाल योग्य दिशेने चालू असल्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले. लिओ टॉलस्टॉय म्हणतो, ''जीवनात माणूस किती चालून गेला ते महत्त्वाचे नाही, तो कोणत्या दिशेने जात आहे हे महत्त्वाचे आहे. लोकोद्धाराच्या योग्य दिशेने प्रा. सुरेशभाऊ मार्गक्रमण करीत आहेत. हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय त्यांनी उराशी बाळगले आहे. त्यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने त्यांना दीर्घ आयुष्य लाभो ही शुभकामना मी व्यक्त करतो.




सांगता समारोहाप्रसंगी शरद पवार, दिलीप वळसे पाटील, मधुकरराव पिचड व ईतर मान्यवर




सांगता समारोहप्रसंगी स्मरणिकेचे विमोचन करताना श्री शरद पवार,
दिलीप वळसे पाटील, अनिल देशमुख व इतर मान्यवर



सेलू तातुक्यातील आपादग्रस्त भागाची पाहणी करताना



सेलू तातुक्यातील आपादग्रस्त भागातील लोकांच्या समस्या समजून घेताना



सेलू तातुक्यातील आपादग्रस्त भागाची पाहणी करताना



सेलू तातुक्यातील आपादग्रस्त भागासंबंधी अधिकाऱ्यांकडून माहिती घेताना



सेलू तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयाचे
भूमिपूजन करताना



सेलू तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयाचे
भूमिपूजनाप्रसंगी




पीक पाहणी करताना




अमृत महोत्सव शुभारंभ समारोहात सत्कार करताना दत्ताजी मेघे, अरुण गुजराथी, उल्हास पवार, रामदासजी तडस तसेच उपस्थित जनसमुदाय

अमृत महोत्सव शुभारंभ समारोहाप्रसंगी कुटुबीयांसोबत





प्रा. सुरेशभाऊ देशमुख कुटुबीयांसमवेत



अमृत महोत्सव शुभारंभ समारोहाप्रसंगी
महिला मंडळाकडून सत्कार स्वीकारताना
सौ. स्वातीताई आणि
प्रा. सुरेशभाऊ देशमुख




कृतज्ञता वर्षानिमित्त आयोजित
पर्यावरण जागृती कार्यक्रम



कृतज्ञता वर्षानिमित्त वृक्षारोपण




कृतज्ञता वर्षानिमित्त वृक्षारोपण



कृतज्ञता वर्षानिमित्त वृक्षारोपण करताना सौ. स्वातीताई देशमुख, शरयु वांदिले व ईतर.



कृतज्ञता वर्षानिमित्त वृक्षारोपण करताना व महत्त्व सांगताना श्री मुरलीधर बेलखोडे, श्री हांडे व ईतर.




कृतज्ञता वर्षानिमित्त रक्तदान शिबिरप्रसंगी श्री मकरंद पाठक, इंद्रकुमार सराफ, प्रा. सुरेशभाऊ व ईतर



कृतज्ञता वर्षानिमित्त रक्तदान शिबिरप्रसंगी श्री मकरंद पाठक, इंद्रकुमार सराफ, प्रा. सुरेशभाऊ व ईतर





गज़लनवाज भीमराव पांचाळे गज़ल सादर करताना, तसेच उपस्थित रसिक श्रोते




कृतज्ञता वर्षानिमित्त आयोजित गज़ल संध्या कार्यक्रमाप्रसंगी गज़लनवाज भीमराव पांचाळे यांचा सत्कार करताना समीर देशमुख, सतीशराव राऊत, उपजिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले व भाग्यश्री पांचाळे.




कृतज्ञता वर्षानिमित्त आयोजित व्याख्यान, व्याख्याते पद्मश्री डॉ. अभय बंग उपस्थित माजी मंत्री आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, प्रा. सुरेशभाऊ, सतीशराव राऊत व उपस्थित रसिकश्रोते.

कृतज्ञता वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानाच्या प्रसंगी पद्मश्री डॉ. अभय बंग यांच्या उपस्थितीत प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचा सत्कार करताना, डॉ. राजेन्द्र शिंगणे



कृतज्ञता वर्षानिमित्त
आयोजित
## सांस्कृतिक महोत्सव
















कृतज्ञता वर्षानिमित्त
आयोजित
**क्रीडा महोत्सव**










# A Decade of Joyful Experiences

**Prof. Zafar Khan**

Apex, North Carolina,
USA

It's a matter of great pleasure for me to recall those 10 years of my most pleasant life at Yeshwant Mahavidyalaya, Wardha (1967-1977). I thank the organizers of the celebration of the 75th year of the life of Shri Suresh Deshmukh, worthy son of an illustrious father late Shri Bapuraoji Deshmukh, popularly called Daaji.

I had no regrets leaving Nagpur, when I met the principal of the college Professor Shri G.B. Kadam, a noble academic and a very pleasant humane personality, who made me feel quite at home at Wardha, a small but fast-growing Centre of educational excellence. With the efforts of Yeshwant Rural Education Society & Bajaj Education Society – two leading educational organizations in those decades – Wardha had a culturally vibrant and peaceful environment, most suitable for academic progress and development, as there were no detractions. Under the very able leadership of Principal Kadam the atmosphere was full of enthusiasm and hope of the future. When I left the college on an assignment to teach English in Nigeria, it was an emotional feeling of leaving my home sweet home. Principal Kadam and Daaji told me that I would be welcome, should I decide to return to India. This was indeed very generous.

I recall I met Shri Suresh around 1970 when he was in college. A polite young man of good manners, son of a leading politician though, he always kept a low-profile in the college as well as in the town. After his Masters in Political Science, he joined the teaching staff of our college. Along with his teaching job in the college he willingly accepted social and political assignments that came on his way. Of course, Daaji's guidance was of immense help. He proved to be the worthy son of a worthy father. After my departure from India, I have been hearing about his achievements in social, political and educational fields. He has done justice to the legacy of his father, and good reputation of his family. May God bless his sincere efforts in the progress of the people of Wardha in particular and nation in general. My Congrats and Blessings!

# नाती जपणारा माणूस

**डॉ. अशोक पावडे**
वर्धा.



आमच्या भैय्याजींचे व दाआजींचे घनिष्ठ संबंध होते. दाआजी देशमुख हे सुरेशभाऊंचे वडील. गांधीजींच्या तालमीत वाढलेले. सेवाग्राम (तेव्हांचे शेगांव) या गावचे पहिले सरपंच. मला त्यांच्याविषयी माझ्या लहानपणापासून खूप आदर होता. आर्वीला बँकेच्या Guest- House मध्ये मी त्यांना पहिल्यांदा पाहिले, तेव्हा मी ५ व्या वर्गात होतो. ती भेट ही माझी देशमुख कुटुंबाशी पहिली ओळख होती. दाआजींच्या व्यक्तिमत्त्वाने मी आजही तितकाच भारावलेला आहे, जितका की, त्यांचे हयातीत होतो. त्यांच्या दोन्ही चिरंजीवांना सुरेशभाऊ व शरदराव या दोघांनाही मी तितकाच जवळचा वाटतो. जितके ते दोघे भाऊ एकमेकांवर प्रेम करीत असतील.

सुरेशभाऊंना मी नेमके केव्हा पहिल्यांदा बघितले आठवत नाही, पण कॉलेजमध्ये ते शिकत असताना त्यांच्या मित्रमंडळी सोबत पाहिले आहे व हे दाआजींचे थोरले चिरंजीव असल्याचे समजले. तरूणपणात ते अगदी साधे, सरळ व मितभाषी होते व त्यांचा सहजपणे स्वतःहून बोलण्याचा स्वभाव मला खूप आवडून गेला. त्या काळात राजकारणी माणसांची मुले बहुधा उर्मटपणे बोलत किंवा एक विशेष अंतर ठेवून वागत; पण यातल्या कुठल्याच गुणाने सुरेशभाऊंना स्पर्श केलेला नव्हता. दाआजींचा कणखर स्वभाव व करडी नजर त्यांच्या कारभारात कुणी हस्तक्षेप न करण्यास पुरेशी होती. हे दोघेही भाऊ तर दाआजींच्या समोर कधी उभेसुध्दा राहात नव्हते.

वर्धेच्या लॉ कॉलेजमध्ये मी प्रवेश घेतला, त्यावेळी ओमवीरसिंग म्हणून Law Faculty Head होते. ते त्यांचे चांगले मित्र होते. त्यानंतर सुरेशभाऊ अधूनमधून कॉलेजला दिसायचे व दिसल्यावर एक स्मित हास्यापलीकडे आमच्यात संवाद नव्हता. नंतर, मी वर्धेला Practice सुरू केली व नंतर त्याच कॉलेजमध्ये ओमवीरसिंगच्या अकाली निधनाने रिक्त झालेल्या पदावर माझी नियुक्ती झाली; पण तो काळ स्व. दाआजींचा होता. माझी दाआजींची ओळख होती; परंतु लक्षात ठेवावी अशी कुठलीही जवळीक किंवा ओळख सुरेशभाऊशी नव्हती जेव्हा ते हिंगणघाटवरून आमदार पदाकरिता उभे राहिले त्यावेळी त्यांच्या नामनिर्देशन अर्जाची छाननी मी स्व. ॲड. सुनिल बापटसोबत केली. तो माझ्या वकिली व्यवसायाचा त्यांच्याशी झालेला पहिला परिचय होता.

नंतर १९९० ला दाआजींचे निधन झाले. माझे दाआजींवर असलेले प्रेम सर्वश्रुत होते. मी अगदी त्यांच्या आजारात मृत्यूच्या क्षणापर्यंत बुटीच्या वाड्यात येरझारा करायचा. त्यात माझी भाऊंशी जवळीक झाली. नंतर दाआजींचे शव ज्या ट्रकवर नेण्यात आले त्यात जी मोजकी मंडळी होती, त्यात मी एक होतो. आमचं नातं खऱ्या अर्थाने त्या दुःखद प्रसंगातून रूप घ्यायला लागलं.

नंतर सुरेशभाऊ बँकेचे अध्यक्ष झाले, तसेच ते स्व. बापुरावजी देशमुख सहकारी सूतगिरणीचे अध्यक्ष झाले. त्यापूर्वी बाबासाहेब धांदे अध्यक्ष असताना मला सूतगिरणीचे मानद कायदेशीर सल्लागार म्हणून मनोनित केले व मग माझा व भाऊंचा संबंध एक कायदेशीर सल्लागार म्हणून यायला लागला. आमच्यामध्ये येणाऱ्या सततच्या संपर्कामुळे आणि नियमित घडून येणाऱ्या संवादामुळे आमच्यात एक नातं तयार झालं, हे नातं असं होत की, त्याला कोणतेच नाव देता येणार नाही.

आमदारकीच्या काळात भाऊंनी खूप लोकाभिमुख कामे केली. त्यांच्याकडे लोकांना सहज प्रवेश होता, सुरेशभाऊंचे व्यक्तिमत्त्वच असे आहे की, जेव्हा ते चांगली कामे करतात, तेव्हा त्याचे कधीच भांडवल करीत नाही. सहकार क्षेत्र, शिक्षणक्षेत्र यासारख्या रोजगार देणाऱ्या संस्थांचे ते अध्यक्ष राहिल्याने लोकांच्या फार अपेक्षा असतात; परंतु सर्वच लोकांना याबाबतीत नोकऱ्या देऊ शकत नाही. याउलट नाराज लोकांची संख्या मात्र वाढते. सुरेशभाऊ कधीच कोणाला नाराज करीत नाही; किंबहुना त्यांना नाही म्हणता येत नाही. त्यामुळे ते जेव्हा निवडणुकीमध्ये उतरतात, तेव्हा त्यांना त्याचा त्रास होतो व विरोधक त्याचा फायदा घेतात.

लोकांना असं वाटतं की, सुरेशभाऊंचे आयुष्य म्हणजे ऐश्वर्य–संपन्न माणसाचे आयुष्य आहे. हे अगदी खोटे आहे. माझी त्यांची ओळख व माझा त्यांचा गेल्या ३५ वर्षांचा अगदी निकटचा सहवास सागंतो की, ते मनाने संवेदनशील आहेत, तर तेवढेच कणखर पण आहेत. आपले दुःख, आपला त्रास ते कधीही कुणाला सागंत नाहीत, किंबहुना आपल्या शारीरिक त्रासाचेही ते भांडवल करीत नाहीत, तर स्वत: सहन करतात त्यांनी आजपर्यंत ज्यांना ज्यांना मदत केली. त्यांची

नावे त्यांनी कधीही घेतली नाही. अनुभव तर असे आहेत की, त्यांनी ज्यांना आपले म्हटले, त्या बऱ्याच लोकांनी त्यांना निराश केले आहे; पण शब्दातही त्यांनी त्यांची वाच्यता केली नाही किंवा ठरवून वाईट केले नाही. त्यांचं आपल्या कुटुंबावर फार प्रेम आहे. सर्व देशमुख कुटुंबियांचा ते एकमेव आधार आहेत. किंबहुना असेही म्हणता येईल की, हा एकखांबी तंबू आहे ज्याचा सर्व भार भाऊ वाहत आहेत.

आम्ही जेव्हा प्रवासात दोघेच असतो, तेव्हा भूतकाळातील काही अप्रिय प्रसंगाना आठवतो, तेव्हा त्यांना त्यांच्या सभोवतालच्या गर्दीतील मोजकीच माणसे आठवतात. त्यांना मी कित्येकदा म्हणतो की, ही गोतावीळ थाबंवा. जी माणसे तुमच्या वाईट काळात तुमच्यासोबत होती, तीच माणसे तुमची, बाकी सगळी नितांत स्वार्थी; पण राजकारणी माणसे बरेचदा असाहय असतात. त्यांना कळते की, हा आपला माणूस नाही; परंतु काळानुसार व वेळेनुसार अशा माणसांना जवळ करणे ही राजकारणातील डावपेच म्हणून गरज आहे. हे सर्व सुरेशभाऊंना नकोसे असते, म्हणून तर जेव्हा मोकळा वेळ भेटतो, तेव्हा आपल्या आवडीच्या ठिकाणी आपल्या माणसांत वेळ घालवावा म्हणून ते धडपडत असतात.

स्वर्गीय दाआजी देशमुख यांची वर्धा जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात जबरदस्त पकड होती. विदर्भात जे दोन तीन त्या काळी मोठी नावे सहकार नेते सहकार क्षेत्रात होते, किंवा ओळखल्या जात. त्यात दाआजी एक होते. त्यांचाच वारसा सुरेशभाऊनी पुढे चालविला व त्यांचा सुद्धा वर्धा व विदर्भ सहकार क्षेत्रात दबदबा होता; पण सत्ता त्यांच्या डोक्यात कधीच गेली नाही. त्यांचा मितभाषी स्वभाव व सहज चांगुलपणा वाखाणण्यासारखा गुण आहे. राजकारणात दत्ताभाऊंनी वर्धा जिल्ह्यात आपले पाय रोवायला सुरूवात केली, तेव्हा भाऊंनी त्यांना मदतच केली. त्यांचे बरेच कार्यकर्ते आज दत्ताजींचे कार्यकर्ते आहे. ते आपल्या प्रतिस्पर्ध्यांशी कधीच वैरभाव, दुश्मनी अथवा वाईट भावना ठेवत नाही. त्यामुळेच सर्व राजकीय पक्षांचे नेते त्यांच्याशी आदराने वागतात. कुणी दुखावेल असे शब्द ते वापरतच नाही. जर एखादे वेळेस असा प्रसंग कुणावर उद्‌भवला असेल, तर नक्कीच तो प्रकार गंभीर समजावा. सहसा ते या वृत्तीने कधीच वागत नाही. त्यांचा सर्वांचे म्हणणे ऐकून घेण्याकडे कल असतो; पण शेवटी निर्णय तेच घेतात. माझा अनुभव असा आहे की, त्यांनी कोर्टकचेरी संबंधात मला विचारल्याशिवाय कुठलेही काम केलेले नाही. त्यांचा स्वभाव भिडस्तपणाचा आहे. परिस्थिती कितीही वाईट असली, तरी त्यांनी त्याला कधीही पाठ फिरविली नाही. सुरूवातीला काही लोकांचा समज व्हायचा की, आता भाऊ कसे तोंड देतील; पण माझा अनुभव असा आहे ते पळपुटे नाहीत.

सुरेशभाऊंची सौंदर्यदृष्टी आम्हा सर्वांना परिचित आहे. कार्यक्रमाचे आयोजन जेव्हा होते, तेव्हा त्यांचा उत्साह व सहभाग बघण्यासारखा असतो. कार्यक्रमाच्या व्यासपीठापासून ते प्रेक्षकांच्या बसण्याच्या व्यवस्थेपर्यंत त्याचप्रमाणे प्रसंग लहान असो, वा मोठा त्या प्रसंगात श्रोत्यांना-प्रेक्षकांना नाश्ता/जेवण, चहापाणी/बिस्कीटे व्यवस्थेविना यशवंत परिवारात कार्यक्रम होत नाही. त्याचप्रमाणे अतिथींचा मान-सन्मान व आदरातिथ्य येणाऱ्यांच्या दीर्घ स्मरणात राहील असेच असते. ही परंपरा सुरेशभाऊंच्या कार्यकाळात सुरू झाली व आजही कायम आहे. चांगले संगीत, चांगले व्याख्यान अशा प्रसंगात हिरिरीने भाग घेताना सुरेशभाऊंचा उत्साह बघण्यासारखा असतो. अगदी बारीकसारीक गोष्टींवर त्यांचे लक्ष असते. त्यांची सौंदर्यदृष्टी व रसिकता हा अभिजात त्यांचा गुणधर्म आहे; परंतु राजकारणात त्यांना त्याकडे लक्ष देता आले नाही. यशवंत परिवारात होणारे दर्जेदार कार्यक्रम त्यांच्या स्वभावाची साक्ष देतात. या संस्थेने कितीतरी कुटुंबाना समृद्ध

केले. ज्या कुटुंबांची मुले मोठमोठी अधिकारी, वकील अथवा न्यायधीश महाराष्ट्रात किंवा देशात काम करीत असतील, त्यांनी तर यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेला धन्यवादच द्यायला पाहिजे. या संस्थेने महाराष्ट्राला कुलगुरू पुरविले आहेत. असे म्हणता येईल की, यशवंत संस्था ही 'गुरूकुल' आहे.

चढ–उतार, यश–अपयश हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सुरेशभाऊ आपल्या आयुष्याच्या शिखरावर कधी पोहचलेच नाही. जेव्हा की, ते त्यासाठी पात्र आहेत; परंतु जे काही पदे त्यांनी उपभोगली. शिखर बँकेच्या अध्यक्षपदापासून ते आमदारकीपर्यंत, सत्ता कधीच त्यांच्या डोक्यात गेली नाही. काळ कधीच स्थिर राहात नसतो. त्यांनी या काळाचा महिमा अनुभवला आहे. मी आणि सुरेशभाऊ दोघे एकत्र असतो आणि दोघेच असतो, तेव्हा या काळातील चढउताराच्या प्रसंगाना आठवत असतो. त्या वेळी आजूबाजूंच्या प्रचंड गर्दीतील माणसे नाहीशी झालेली असतात, मोजकीच माणसे डोळ्यासमोर दिसतात. जी माणसे आपल्या कठीण प्रसंगात अथवा वाईट काळात आपल्यासोबत होती ती आपली समजावी यावर आमचे दोघांचे एक मत असते. पण राजकारणात कितीतरी अप्रिय माणसांना सोबत घेऊन प्रवास करायचा असतो. राजकारणातील गरज आता सुरेशभाऊंनाही नकोशी झालेली आहे. त्यांना आपल्या माणसांसोबत ज्यांनी त्यांच्यावर नितांत प्रेम केले आहे, त्या माणसांसोबत वेळ घालवावा आवडीच्या ठिकाणी या सर्वांना सोबत घेऊन जावे, खूप गप्पा कराव्या असे वाटते; परंतु त्यांच्यामागे एवढा व्याप व सद्यःस्थितीत कटकटी लागल्या की, ते त्यात अडकून बसले आहेत; परंतु ते यात हरवून जात नाही किंवा निराशही होत नाही. ते देशमुख कुटुंबाचे व स्वर्गीय दाआजीनी उभारलेल्या वर्धा जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे आधारस्तंभ आहेत. त्यांना याची जाणीव आहे की, ही जाणीव त्यांना त्यांच्या अडचणी अथवा कठीण प्रसंगी नाउमेद करीत नाही.

आपल्या माणसाच्या मागे उभे राहणे, त्याला त्यांच्या वाईट व कठीण प्रसंगात मदत करणे व अशी मदत केल्यावर त्याचे कधीही भांडवल न करणे अथवा वाच्यता न करणे या गुणांनी मी खऱ्या अर्थाने या माणसाच्या अगदी जवळचा झालेलो आहे. अशीच कितीतरी नाती त्यांनी आपल्या स्वभावाने निर्माण केलेली आहेत आणि या नात्यांना त्यांनी जपले आहे. जगात सर्वात कठीण काम हे नाती जपणे असते. सुरेशभाऊ ते काम अगदी सहजतेने करतात आणि याच नात्यांनी मी माझ्यासारखे अनेक माणसे त्यांच्याशी जुळलेली आहेत. हीच सुरेशभाऊंची संपत्ती आहे. त्यांना त्यांच्या वयाच्या ७५ व्या वर्षी शुभेच्छा देताना दीर्घ आयुष्य लाभो याची देवाजवळ प्रार्थना. ते आम्हा सर्वांना नेहमीच हवे आहेत.





# सामाजिक बांधिलकी जोपासणारा लोकाभिमुख नेता

**प्रदीप दाते**
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर

जगामध्ये असे काही लोक असतात, ज्यांना आपण खूप मोठ्या कुटुंबातून आलो याचा गर्व नसतो. अशा व्यक्तींना खूप मोठा वारसा लाभलेला असतो; पण स्वत:चे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी त्यांची सातत्याने धडपड सुरू असते. असे लोक सज्जन असतात, निगर्वी असतात आणि सतत तळागाळातील लोकांचा विचार करणारे असतात. माणसांशी मैत्री करणे, ती टिकवून ठेवणे आणि सतत लोकसंपर्कात राहून समाजाभिमुख कार्य करणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अविभाज्य अंग असते. असेच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे सामाजिक जाण ठेवून सातत्याने जपणारे एक नेते म्हणून मला आमच्या वर्ध्याचे माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख हे वाटत आले आहे.

वर्धा म्हटले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेला जिल्हा म्हणून संपूर्ण भारतात ओळखला जातो. महात्मा गांधी यांच्या संस्कारात वाढलेले आणि त्यांच्या शिकवणुकीचा वारसा सांभाळत समाजकारणातून राजकारण करणारे एक नेते म्हणून सहकारमहर्षी बापुरावजी देशमुख यांची ओळख आहे. बापुरावजी देशमुख हे नाव घेतल्याशिवाय या जिल्ह्याचे आणि जिल्ह्याशी संबंधित कार्य पूर्ण होत नाही. बापुरावजी देशमुख उपाख्य दाआजी यांचे मोठे चिरंजीव म्हणजे सुरेशभाऊ देशमुख म्हणजे आमचे भाऊ.

माझे वडील आणि दाआजींचे जवळचे संबंध होते. आमच्या जुन्या घरी बाबासाहेब धांदे यांच्यामुळे दाआजींचा संबंध आला. माझे शिक्षण वर्ध्याच्या बाहेर झाल्यामुळे सुरुवातीला माझे संबंध



दाआजींसोबतही आले नाही आणि सुरेशभाऊंसोबतही आले नाही; पण नंतरच्या काळात मी या कुटुंबांशी जोडला गेलो आणि अनेक वर्षानंतरही आमच्या संबंधाची ही नाळ आजही अविरतपणे सुरू आहे

मी नागपूरला राहत होतो. मी विद्यार्थीदशेपासून सुरेशभाऊंविषयी ऐकत आलो होतो. नागपूर विद्यापीठाच्या राजकारणामध्ये सुरेशभाऊ सक्रिय झाले होते. विद्यार्थी चळवळीमध्ये कार्य करीत होते, तेव्हा त्यांचा आणि माझा संबंध आला. त्यांच्या कुटुंबांविषयी माझ्या मनात आदराची भावना होती. दुसरे म्हणजे त्यांचे गुरू सुप्रसिद्ध राजकीय विश्लेषण डॉ. भा. ल. भोळे हे पुढे माझेही गुरू झाले. नागपूर विद्यापीठाच्या पॉलिटिकल डिपार्टमेंन्टमध्ये सुरेशभाऊ हे माझ्या आधीच्या बॅचचे विद्यार्थी होते. त्यामुळे भोळे सरांकडे वर्ध्याचे नाव निघाले की, ते आवर्जून सुरेशभाऊंविषयी सांगायचे. भोळे सर भाऊंकडे एक चांगला विद्यार्थी म्हणून पाहत. राज्यशास्त्र विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरेशभाऊंविषयी भरभरून सांगत. वर्ध्याच्या राजकारणाच्या गोष्टी निघाल्या की, ते भाऊंच्या राजकारणाविषयी बोलत. भाऊंचे आणि भोळे सरांचे संबंध सर जाईपर्यंत टिकून होते. यशवंत महाविद्यालयात होणाऱ्या अनेक चर्चासत्रांना त्यांना बोलावण्यात आले. विविध व्याख्यानांच्या कार्यक्रमांना त्यांना बोलावले गेले. शिक्षणमहर्षी बापुरावजी देशमुख यांच्या नावाने देण्यात येणारा पहिला जीवनगौरव पुरस्कार भोळे सरांना देऊन त्यांचा मोठा सत्कार करण्यात आला होता. भोळे सरांचा आपल्या संस्थेच्या मार्फत मोठा सत्कार व्हावा असे त्यांना तेव्हा वाटत होते आणि त्यांचा सन्मान करून त्यांनी आपली इच्छा पूर्ण केली. भोळे सर गेल्यानंतरही त्यांच्या कुटुंबांशी आणि त्यांच्या सहकार्याशी भाऊ आजही जुळून आहे. भाऊंनी हे गुरूप्रेम आजही टिकवून ठेवले आहे. तीन वर्षापूर्वी नागपूरचे आमचे मित्र प्राचार्य डॉ. अशोक काळे आणि हिंगणघाटचे प्रा. शेषकुमार येरलेकर यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आलेल्या भा. ल. भोळे विचारमंचचे तिसरे चर्चासत्र वर्ध्याच्या यशवंत महाविद्यालयात घेण्याचे ठरले. त्या कार्यक्रमाला थोर अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्याचे ठरले. त्यावेळी या कार्यक्रमासाठी भाऊंनी स्वत: पुढाकार घेतला आणि हा कार्यक्रम यशस्वी केला. भोळे सर त्यांच्यासाठी आदर्श म्हणून गुरूस्थानी आजही कायम आहेत.

दाआजींनी आपल्या शिक्षण संस्था वाढविण्याच्या दृष्टीने नेहमीच प्रयत्न केले. ग्रामीण भागातील जास्तीत जास्त मुलांना या शिक्षणाचा लाभ मिळावा हा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी त्यांनी खेडोपाडी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. दाआजींनी वायगाव येथे ज्युनिअर कॉलेज उघडण्याचा मनोदय बोलून दाखवला. तिथे कनिष्ठ महाविद्यालयाची आवश्यकता होती. आजूबाजूच्या खेड्यातील विद्यार्थ्यांना वर्ध्याला पायपीट करीत येणे सोईचे नव्हते. दाआजींच्या या प्रयत्नांना यश आले. मी वायगावच्या यशवंत महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरीला लागलो आणि तिथूनच निवृत्तही झालो.

माझी बरीच वर्षे नागपूरला गेली. मला आठवते, मी वर्ध्याला येण्याचे कारण असे झाले की, यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेतील वायगाव येथील कनिष्ठ महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विषयाच्या रिक्त जागेसाठी मुलाखती होत्या. मी त्या वेळी हाऊसिंग सोसायटीचा अध्यक्ष होतो. ती गोष्ट १९८३ ची असेल. मी मुलाखतीला आलो. दाआजींनी माझी निवड केली. मी वायगावच्या यशवंत महाविद्यालयात रूजू झालो आणि माझा दाआजींसोबत जवळून संबंध आला. त्यानंतर १९९० नंतर माझे व भाऊंचे जिव्हाळ्याचे संबंध आले. खासदार आणि आमदार राहिलेले श्रद्धेय बापुरावजी देशमुख यांची वर्ध्यातील सर्वच क्षेत्रात मोठी छाप होती. वर्ध्यासाठी आदर्श असलेल्या बापुरावजी देशमुख यांचा मुलगा असून सुद्धा सुरेशभाऊंना या गोष्टींचा कधीही गर्व नव्हता. ते सामान्यांसारखे राहत. हा त्यांचा स्वभाव त्यांनी आजही कायम ठेवला आहे.

दाआजी आजारी असताना मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये भरती होते. त्यावेळी मी त्यांना भेटायला गेलो होतो. ते महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावेच्या जीवनावरचे पुस्तक वाचत होते. मला त्यांचे खूप आश्चर्य वाटले. त्यांच्या आदर्शाचे ते वाचन करीत असल्याचे पाहून मला त्यांचा अभिमानही वाटला. आम्ही त्यांना भेटायला गेलो याचा त्यांना खूप

आनंद झाला; पण एवढ्या दूर आम्ही भेटायला गेलो, म्हणून त्यांना आमची काळजीही वाटली. त्यांनी ती बोलूनही दाखवली. शेवटच्या क्षणापर्यंत दुसऱ्यांची काळजी घेणारे दाआजी मी त्यावेळी पाहिले. दाआजींचा हा स्वभावगुण भाऊंमध्ये सुद्धा उतरला आहे. ते सुद्धा इतरांची सतत काळजी घेत असतात. माणसांवर अपार प्रेम करून दाआजींनी जशी माणसे टिकवली, तशीच भाऊंनीसुद्धा माणसं टिकवली आहेत.

१९८५ साली सुरेशभाऊंनी पहिली निवडणूक हिंगणघाट मतदार संघातून लढविली. त्यावेळी डॉ. वसंतराव बोंडे हे त्यांच्या विरोधात शेतकरी संघटनेच्या तिकिटावर उभे होते. भाऊंचा जनाधार त्या मतदार संघात बऱ्यापैकी तयार झाला होता; परंतु तेथील मतदारांनी स्थानिक उमेदवाराला प्रथम पसंती देण्याचे ठरविल्यामुळे त्या वेळी भाऊंचा अवघ्या काही मताने पराभव झाला. त्या वेळी आम्ही आमच्या शाळेच्या स्थानिक समितीचे सदस्य प्रल्हाद देशमुख यांच्यासोबत हिंगणघाट मतदार संघात प्रचार केला. या निवडणुकीमुळे भाऊंचा चाहता वर्ग त्या मतदार संघात तयार झाला.

सुरेशभाऊ हे सरळ स्वभावाचे सज्जन माणूस आहेत. माझ्यासारख्या राजकारणात सक्रिय सहभाग नसलेल्या अनेकांना भाऊंच्या स्वभावाचे विशेष आकर्षण आहे. ते मनमिळावू स्वभावाचे आहेत. त्यांच्याबद्दल सर्वांच्याच मनात एक आदराची भावना आहे. कोणत्याही गोष्टीकडे हसत, खेळत पाहण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे कुणाविषयी आकस किंवा द्वेषभाव त्यांच्या मनात कधीही  दिसत नाही.

सुरेशभाऊ हे सातत्याने वर्धा जिल्ह्याच्या साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देत आहेत. १९८९ साली आमच्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने वर्ध्यातून यशवंतराव दाते स्मृती व्याख्यानमालेची सुरूवात झाली. सुरूवातीपासूनच सुरेशभाऊ या संस्थेचे मार्गदर्शक म्हणून आम्हाला मार्गदर्शन करीत आहेत. ही व्याख्यानमाला चिरकाल टिकावी. महाराष्ट्रातील जाणत्या रसिकांपर्यंत ही व्याख्यानमाला पोहचावी आणि या संस्थेने साहित्य चळवळीबरोबरच लोकचळवळीचे काम करावे असे भाऊंना वाटत आले. आमच्या संस्थेचे एक हितचिंतक म्हणून त्यांनी आमच्या या संस्थेला नेहमीच आशीर्वाद दिला. आज या संस्थेचे नाव देशपातळीवर पोहचले आहे. या संस्थेचे विविध स्वरूपाचे उपक्रम सुरू आहेत. आमच्या यशवंतराव दाते संस्थेचा वेल 'गगनावरी' जाण्यासाठी सुरेशभाऊंच्या सदिच्छा नक्कीच कारणीभूत ठरल्या आहेत. आमच्या दाते स्मृती व्याख्यानमालेतर्फे अनेक पुरस्कार दिले जातात. या पुरस्कारांची सुरूवात १९९५ पासून करण्यात आली. दाआजींचे आमच्यावर असलेल्या ऋणानुबंधांची आठवण म्हणून आम्ही २००२ सालापासून बापुरावजी देशमुख कथासंग्रह पुरस्कार सुरू केला. भाऊ दरवर्षी आमच्या या पुरस्कार सोहळ्याला आणि व्याख्यानमालेला न चुकता उपस्थित राहतात.

वर्ध्यात भाऊंच्या कुशल नेतृत्वात मोठमोठे संमेलने आयोजित करण्यात आले आणि ते यशस्वीपणे पार पडले. २०, २१ आणि २२ डिसेंबर २००२ या तीन दिवस यशवंतराव दाते स्मृती व्याख्यानमालेच्या पुढाकाराने डॉ. आंबेडकर अकादमी, सातारा यांचे दहावे विचारवेध संमेलन वर्ध्यात आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्ष थोर गांधीवादी विचारवंत वसंत पळशीकर होते. वर्ध्यात झालेल्या या भव्य अशा विचारवेध संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदाची जबाबदारी भाऊंनी स्वीकारली. त्या वेळी भाऊंनी त्या कार्यक्रमाची संपूर्ण धुरा आपल्या खांद्यावर घेतली आणि मोठ्या जबाबदारीने सांभाळली. ते तीनही दिवस पूर्ण वेळ कार्यक्रम स्थळी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वर्धेकरांनी तीन दिवस वैचारिक मेजवानी अनुभवली. या संमेलनासाठी देशपातळीवरचे अनेक विचारवंत, साहित्यिक आणि विविध चळवळीमध्ये काम करणारे कार्यकर्ते सहभागी झाले होते. स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या भाऊंच्या नेतृत्वात हे संमेलन यशस्वी झाले.  दुसरे म्हणजे वर्ध्याच्या राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या सभागृहात यशवंतराव दाते स्मृती संस्थेच्या वतीने शेकापचे नेते एन. डी. पाटील यांच्या ७५ वी निमित्त सत्कार आयोजित करण्यात आला होता. भाऊंच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तिथेही भाऊंचा मोठा सहभाग होता.

सुरेशभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू मला नेहमीच दिसत आले आहेत. सामाजिक बांधिलकी जपणारा नेता म्हणून सुरेशभाऊंची जशी ओळख आहे, तशी साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात वावर असणारा एक राजकारणी म्हणूनही त्यांनी आपला परिघ व्यापून टाकला आहे. भाऊंची विविध क्षेत्रातील कार्य करण्याची पद्धती आणि त्यांची त्या त्या क्षेत्रातील बांधिलकी दिसून आली आहे. भाऊ पर्यावरणीय विषयाशी बरेच जागरूक आहेत याचा प्रत्ययही मला आला आहे. काही वर्षांपूर्वी बापुरावजी देशमुख स्मृती समितीच्या वतीने दाआजींच्या पुतळ्यापासून ते सेवाग्रामपर्यंत वृक्षारोपण करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्यावेळी प्रकाश येंडे हे समितीचे अध्यक्ष होते. सचिव म्हणून अशोक धावडे कार्य करीत होते. निसर्ग सेवा समितीचे मुरलीधर बेलखोडे यांच्या सहकार्याने हे कार्य केले जात होते. सुरेशभाऊंचे विशेष मार्गदर्शन या कार्यामध्ये लाभत होते. ही २००३ सालची गोष्ट असेल. त्यावेळी लावलेली झाडे वाचविण्याच्या फारशा सोईसुविधा निसर्ग सेवा समितीकडे नव्हत्या. भाऊंनी सहकार्य करून त्या वेळी एक पाण्याचा मोठा ड्रम आणि ड्रमसाठी सायकलरिक्षा खरेदी करून दिला. तेव्हापासून झाडांना नियमित पाणी देऊन योग्य जोपासना करणे सोपे झाले. त्या वेळेपासून रिक्षाला लावलेला ड्रम भरून प्रत्येक झाडाजवळ नेणे आणि प्रत्येक झाडांना पाणी देण्याचे काम गेल्या २० वर्षांपासून विठ्ठल हा व्यक्ती करीत आहे. झाडे जगविण्यासाठी भाऊंनी केलेली मदत ही पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. भाऊंची पर्यावरणविषयक दृष्टी यातून दिसून येते.

मी विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष झालो, तेव्हा भाऊंना खूप आनंद झाला. आपल्या संस्थेत कार्य करणारे लोक कोणत्याही पदावर गेले की, त्यांना खूप अभिमान वाटतो. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेतून उच्च पदावर गेलेल्या व्यक्तींचा त्यांनी नेहमीच सन्मान केला आहे. विविध विद्यापीठामध्ये नियुक्त झालेले कुलगुरू असतील किंवा कुलसचिव असतील. या संस्थेतून शिकून न्यायाधीश झालेले व्यक्ती असतील किंवा मोठे उद्योजक असतील अशा मोठ्या व्यक्तींना संस्थेत बोलावून त्यांनी सत्काराचे कार्यक्रम घेतले आहेत. संस्थेशी संबंधित व्यक्तींचा सन्मान करणे, त्यांना आदर देणे, त्यांच्यासाठी विविध सोईसुविधा उपलब्ध करून देणे अशा गोष्टी अपवादात्मक ठिकाणी आढळून येतात. त्यात यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेत असे प्रकार घडतात आणि ते सुरेशभाऊंच्या पुढाकाराने घडतात, याचा मला या संस्थेत कार्य करणारा कर्मचारी म्हणून मोठा गौरव वाटत आला आहे.

माझे आणि भाऊंचे गेल्या अनेक दिवसांपासून ऋणानुबंध कायम आहेत. माझ्या घरी कुठलेही कार्यक्रम असो भाऊंच्या भेटींशिवाय ते कार्य पूर्ण होत नाही. भाऊसुद्धा आमच्या घरच्या कुठल्याही कार्यक्रमाला आल्याशिवाय राहत नाही.

सुरेशभाऊ हे आमच्या वर्धा जिल्ह्यासाठीच नव्हे, तर विदर्भासाठी एक आदर्श व्यक्ती म्हणून माझ्यासाठीही आदर्श वाटत आले आहेत. सर्वांना सोबत घेणे, सर्वांविषयी प्रेमभाव ठेवणे आणि सर्वांच्या सुखदु:खात सहभागी होणे या त्यांच्या स्वभावामुळे माझ्या मनात त्यांच्याविषयी आदराचे स्थान आहे आणि हे स्थान कायम राहणार आहे. सुरेशभाऊ आज पंचाहत्तरी पूर्ण करीत आहेत. त्यांना निरामय आरोग्य लाभो आणि दीर्घायुष्य लाभो अशा त्यांच्या या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने माझ्यातर्फे मी हार्दिक शुभेच्छा देतो.




# युवाओं में हुनर पैदा करनेवाला इंसान

**प्राचार्य डॉ. देवेंद्र पुनसे**
१० राजर्षी शाहू नगर, यवतमाळ ४४५००१

जीवन एक महान ग्रंथ आहे. या ग्रंथाचं प्रत्येक पान माणूस लिहीत असतो.. स्वतःच्या कर्म, कष्ट, विद्या, संस्कार, ज्ञान आणि इतर मानवेतर गुणकौशल्याच्या शाईने, मानवाच्या जीवन-कहाणीची तिची एक भाषा असते, जुबान असते. हर इंसान का जिना कोई बहाना नहीं होता, बल्कि होती है एक महकी महकी कशिश! सुरेशभाऊंचं जीवन जे मी पाहिलं आहे, अनुभवलं आहे, ते अशीच 'महकी महकी कशिश' होतं आणि आहे.. हे माझं मत. सुरेशभाऊ जसे व्यक्तिमत्त्वाने श्रीमंत तेवढेच अर्थशक्तीनेसुद्धा होते. माणसाची खरी शक्ती ही ज्ञान असते. दारात दिमतीला पॉवर असली, तरी त्या पॉवरचा दुरूपयोग होता कामा नये हे भाऊंनी जाणलं होतं. त्या पॉवरची आसक्ती भाऊंनी कधी बाळगलेली मी अनुभवली नाही. The desire of power in excess caused the angels to fall: but in charity there is nor excess; neither can angel or man come in danger by it.. इंग्रजी निबंधकार, लॉर्ड बेकनचा हा विचार भाऊंनी जाणला असावा. तो पाळलासुद्धा आहे. माणूस सुशोभित असला (हा शब्द केवळ भाऊंसाठी खास योजिला आहे, तो समजून घ्यावा) तरी त्याच्या व्यक्तिमत्त्वात विनम्रता असतेच असे नाही. अशी विनम्रता माणसाच्या लाघवी करूणा व प्रेमातून यावी लागते. भाऊंच्या बाबतीत मला याची अनुभूती आली आहे. एकंदरीत भाऊंचा जीवनपट उलगडताना मला माझ्या बाबतीत थोडं भूतकाळात जाणं आवश्यक आहे.

आठवतात मला ते दिवस! मी बी. एससी पार्ट वनचा विद्यार्थी होतो. जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालयात प्रा. पातुर्डे पदार्थविज्ञान विषय शिकवित असत. त्यांचा दरारा होता. विषयातील होता की, शिस्तीतील मला त्या वेळी कळत नव्हते. शिस्त ही महाविद्यालयाची शान होती. पदार्थविज्ञान हा विषय माझा वैरी! पदार्थविज्ञान हा विषय पदार्थाचा होता की, अजून कुठल्या वस्तूंचा.. भाई यह मेरे समझ केबाहर था। बस, यह समझ लिजियेगा कि मैं इस विषय में पूरा तोता था! याचे फलित सांगण्यासाठी कुण्या काशीच्या ज्योतिष्याची गरजच नव्हती. पदार्थविज्ञान विषयाने माझ्या यशाचा खून पाडला. परीक्षेतील अपयशाचा स्वाद मी पहिल्यांदा बी. एससी. पार्ट वनच्या वर्षात चाखला.

गरीब शेतकऱ्याचा मुलगा मी, त्या अपयशाने खचलो. विचारांनी मला वेढ्यात बंदिस्त केलं. माझ्या सोबतीला होते चांगले, श्रीमंत कुटुंबातील तीन वर्गमित्र, त्यांचा नामोल्लेख करण्यासाठी आज काही हरकत नसावी? पण, हरकत मला परवानगी देत नाही? इसलिए इस हरकत को खुबसूरत मोड देकर मैं आगे चलता हूँ. विज्ञान शाखेला मी तिलांजली वाहिली आणि पोहोचलो थेट कला शाखेपुढे नतमस्तक होण्यासाठी यशवंत महाविद्यालयात. का कुणास ठाऊक! यशवंत महाविद्यालयाची इमारत मला त्या वेळी ताजमहालासारखी भासली. उपमा ताजमहालाची वापरतोय, (चित्रात पाहिलेला ताजमहाल) पण त्यावेळी मी ताजमहाल तरी कुठे पाहिला होता? बाहेर पावसाची भुरभुरी तान आणि काळजात धडधडत

होती चिंतेची तोफ ! बी. ए. पार्ट वनला प्रवेश मिळविण्यासाठी मी उभा होतो रांगेत. रांगेतील विद्यार्थ्यांच्या तोंडावर नाचत होते प्राचार्य कदम साहेबांच्या जबरी शिस्तीचे, दराऱ्याचे, कठोर नियम पालनांचे कुजबुजीत शब्द! आणि माझे पाय फसत होते धाकधुकीच्या चिखलात!

मी निवडलेल्या विषयात प्रमुख विषय होते हिंदी आणि इंग्रजी साहित्य. हिंदी भाषेत मला रस होता आणि इंग्रजी साहित्य मी निवडला होता भाकरीसाठी! १९७५ हे वर्ष होतं आणि त्या काळात भाकर मिळविण्यासाठी सर्वात श्रीमंत विषय होता तो इंग्रजी साहित्य! ते सारं ठीक होतं. पण? इंग्रजी साहित्य निवडणाऱ्या विद्यार्थ्यांची एक स्वतंत्र रांग होती. आश्चर्य! त्या रांगेत उभे राहिले दोन विद्यार्थी! मी आणि सुनील पवार. सोबत मुलींच्या रांगेत होत्या फक्त दोन मुली.

त्यांची नावं घेणं तर सोडा मुलींसोबत बोलणंसुद्धा.. सोडा तो विषय? त्यांची नंतर ठाऊक झालेली नावं सांगून टाकतो. रश्मी मिरापुरकर आणि शोभा देशमुख. दोन मुलांची रांग होती; पण आमच्या दोघांत कोण पुढे? कोण मागे? यात युद्ध माजलं. शिरस्त्याप्रमाणे सैनिकाचा बळी पडला. कारण सुनील (श्रीमंत), नी मी (गरीब). तो राजा. मी सैनिक. असो. स्टाफरूममधून पुकारा झडला तो माझ्या नावाचा. माझे थरथरते पाय प्रवेशले स्टाफरूममध्ये. मी एका प्राध्यापकाच्या समोर हाजीर झालो. सडपातळ बांध्याचा, ठेंगणा–ठुसका, सावळ्या वर्णाचा; पण सुट–बुटातील तो देह समोर खुर्चीत बसलेला! त्यांनी सर्टिफिकेट्स् मागितले. मी दिले. माझ्या अर्जाला जोडलेली मार्कलिस्ट त्या देहानी वाचली आणि अस्मान गर्जावे तशी गर्जना त्या देहाच्या मुखातून बाहेर पडली. धिस इज यशवंत कॉलेज. अजून काय काय नापास झालेल्या विद्यार्थ्याला इथे प्रवेश मिळत नाही... मला त्या देहाने उच्चारलेले इंग्रजी शब्द आज पुरेसे आठवत नाहीत; पण त्या देहाने फाडकन फेकून दिलेला माझा अर्ज थेट स्टाफरूमच्या प्रवेशद्वाराच्या बांध्यावर कसा जाऊन रडला. ते मात्र पुरतं आठवतं. माझ्या त्या अर्जाच्या देहाची तडफड आजही माझ्या डोळ्यांपुढे नाचते आहे.

माझी ती दशा पाहून पाठीमागचा सुनील निघून गेला. त्या मुली मात्र उभ्या होत्या. त्या देहाने उच्चारलेले शब्द फार जिव्हारी लागणारे होते; पण अपयशाला ते झेलावेच लागतात! दरवाजात व्याकुळतेनं किंवा काकुळतीनं रडणारा माझ्या त्या अर्जाला कदाचित त्या मुलींपुढे झडलेला अपमान सोसावा लागला असावा! त्या मुलींना ताबडतोब प्रवेश मिळाला. आणि मी अर्ज उचलून माघारी परतलो. पावलं माघारीच्या मार्गावर.. दहा–बाराच पडली असतील, तोच एक चपराशी धावत माझ्याजवळ आला आणि म्हणाला, ''अय, पोरा.. थांब, चाल, सर बलवून राह्यले.''

तक़दीर कहूँ या फिर तदबीर? अपयशाला पहिल्यांदा यशाचं दर्शन घडलं. मला बी. ए. पार्ट वन मध्ये प्रवेश मिळाला; पण पुढच्यात एक अट होती. ती त्या देहानं माझ्याकडून कागदावर लिहून घेतली. मी एका प्रयत्नात संपूर्ण विषयात परीक्षा पास करेन. अन्यथा माझा पुढील वर्गातील प्रवेश नाकारण्यात येईल. ते लिहून घेणारा तो देह होता – प्रा. डॉ. जयंत परांजपे!

यशवंत महाविद्यालय म्हणजे शैक्षणिक दर्जा व शिस्तीचे मंदिर! माझं बी. ए. चं द्वितीय वर्ष होतं. रेस्ट इयर म्हणून द्वितीय वर्ष तसं मोकळं मोकळं! डिसेंबरची थंडी आणि आम्ही खेळत होतो महाविद्यालयाच्या पटांगणात हॉकी. प्रा. प्रभाकर भोगे शिस्तीच्या मैदानातील प्राचार्य, कदम साहेबांचे प्रतिरूप! आम्ही काही विद्यार्थी पायात बूट नसलेले! खुल्या पायानेच धावत होतो, खेळत होतो. आठवड्यावर येऊन ठेपलेल्या विद्यापीठाच्या हॉकी स्पर्धेचा सराव करीत होतो. मैदानात तीन तरूण आमचा सराव पाहत होते. भोगे सरांशी बोलत होते. आमचा सराव संपला. त्या तीन तरुणातील एक तरुण माझ्या गावच्या पाटलांचा मोठा मुलगा होता. अडव्होकेट हेमंत मोरूभाऊ सबाने. (आज हेमंतभाऊ हयात नाहीत.) मी गावातला असूनही ते मला ओळखत नव्हते. दोन तरूण अपरिचित होते. भोगे सर त्यातील देखण्या तरुणाशी मोठ्या अदबीने बोलत होते. आमच्यातील काही त्या तरूणाला नमस्कार करून वाकत होते. माझे परम मित्र, लक्ष्मीनारायण सोनवणे माझ्या कानात कुजबुजले. सुरेशभाऊ देशमुख अब्बे, आपल्या अध्यक्षाचा मुलगा!

संस्थेचे अध्यक्ष किंवा कोणत्या पदाधिकाऱ्यांचे चेहरे माहीत असण्याचा तो काळ नव्हता. सुरेशभाऊंना मी पहिल्यांदा पाहिलं ते त्या वेळी. त्यांच्यासोबत होते हेमंत सबाने व दिलीप काळे, हेमंतराव उंचपुरे, दिलिपराव हेमंतरावांपेक्षा काहीसे ठेंगणे. आणि सुरेशभाऊ त्याहून किंचितसे ठेंगणे. मी सुरेशभाऊंचा शांत, सरळ, निगर्वी स्वभाव आमच्यासाठी थेट आकर्षणाचा विषय ठरला. लॉ कॉलेजचे तास संध्याकाळी सहा वाजतापासून सुरू होत असत. हेमंतराव सबाने व दिलीपराव काळे लॉ कॉलेजचे विद्यार्थी होते. त्यामुळे बरेचदा त्यांची भेट पाच वाजता पटांगणातच होत असे. काही

दिवसांनी हेमंतभाऊंना कळले की, मी निमगावचाच म्हणजे त्यांच्या गावचाच आहे. त्यांनी माझी ओळख सुरेशभाऊंशी करून दिली. सुरेशभाऊ त्या काळी एन.एस.यू.आय. चे पदाधिकारी होते. राज्यशास्त्राचे अभ्यासक असल्यामुळे त्यांना राजकारणात चांगली गती होती. सोबत दिलीपराव काळे होते. सुरेशभाऊंसोबत एक आंडदांड व्यक्तिमत्त्वाचे धनी, बाबाराव झलके नेहमी सोबत असायचे. बाबाराव व्हॉलिबालचे खेळाडू. खेळण्यासाठी कॉलेजच्या मैदानावर येत असत. त्यांच्याशी परिचय झाला.

पण? कॉलेजात अन्य प्राध्यापकांपेक्षा मी डॉ. परांजपे सरांच्या फार जवळचा ठरलो. कारण माझी इंग्रजी साहित्याची आवड आणि इंग्रजीत चांगल्या हस्ताक्षरात लिहिण्याची शैली. सोबत मी प्रा. ज़ाफर खान सरांचा आवडता विद्यार्थी होतो. हिंदी शिकविणाऱ्या बैंदूर मॅडमचासुद्धा. बाकी, मैं अन्य प्राध्यापकों को दुश्मन सा लगता था. मैं बता दूँ. मेरी पहचान कोई अच्छी नहीं थी. इक किस्म केक्रांतिकारी या फिर टपोरी थे हम. और कॉलेज में यही पहचान थी हमारी, जियो जी भर के!

सुरेशभाऊ, दिलीप काळे, हेमंत सबाने आणि बाबाराव झलके हे जिवलग मित्र. अगदी त्रिमूर्तीत एक मूर्ती जास्त! हेमंत सबाने हे आमच्या निमगावचे पाटील मोरूभाऊ सबाने यांचे चिरंजीव. त्यांचा ऐश्वर्य–दरारा मोठाच! मी एक त्यांच्या गावातील साधारण शेतकऱ्याचा मुलगा. त्यामुळे त्यांच्या खिजगणतीतसुद्धा मी नव्हतो. काळाचं चलित–चक्र अखंडपणे फिरणारं! बी. ए. फायनलचं ते वर्ष होतं. १९७७–७८ हे शैक्षणिक सत्र. त्याच काळात जनता पार्टीचं सरकार सत्तेत आलं होतं. मोरारजी देसाई देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झालेले. काँग्रेससाठी ते घसरते वर्ष! विद्यापीठाच्या महाविद्यालयीन निवडणुकीत मी त्या वर्षी वर्ग प्रतिनिधीची निवडणूक लढविली. जिंकली. आणि दुपारी चार वाजता जनरल सेक्रेटरी आणि विद्यापीठ प्रतिनिधी या दोन पदांसाठी निवडणूक होती. सुरेशभाऊंच्या एन.एस.यू.आय. च्या पॅनलखाली निवडून आलेले आम्ही सर्व वर्ग प्रतिनिधी सुरेशभाऊंचे विश्वासू मित्र श्री. बाबाराव झलके यांच्या वाड्यावर एकत्र जमलो. मी वर्ग प्रतिनिधी म्हणून निवडून आलो, कसा आलो, याचा विचार करीत वाड्यात बसलो. आनंद–आश्चर्याचा डोंब माझ्या सर्वांगात उधाण उधळीत असलेला !

सुरेशभाऊ, बाबाराव झलके, दिलीप भागवतकर, विजय मुरकुटे अशी मंडळी वाड्यातील आतल्या बैठकीत बसलेली. काय सुरू होतं? कशावर चर्चा सुरू होती, याची मला पुसटशीसुद्धा कल्पना नव्हती. मी तर होतो माझ्याच आनंदात डुबलेल्या राजहंसासारखा ! सुमारे एक वाजताच्या दरम्यान मला आतल्या बैठकीत बोलावण्यात आलं. जेवणं अजून आटोपायची होती. मी बैठकीत शिरलो. सुरेशभाऊ व बाबाराव झलके दोघांनीही माझ्याकडे मोठ्या विलक्षण नजरेनं पाहिलं. काही विद्यार्थी तिथे उभे होते. त्यातल्या फक्त एलएल.बी. द्वितीय वर्षाच्या मिसाळ या विद्यार्थ्याला मी ओळखत होतो. बाबाराव म्हणाले, ''हा फॉर्म घे, बिनचूक भर.'' मी फॉर्म भरला. मला विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवडून आणण्याचा निर्णय त्यांनी केला होता. और फिर क्या.. स्साला मै तो साब बनने चला... यही हाल बन गया था भाई, मेरा! त्या खुशीत माझ्या पोटाने तर संपच पुकारला. निवडून आलेले सर्व वर्ग प्रतिनिधी यशवंत महाविद्यालयाकडे वेगवेगळ्या वाहनांनी निघाले. विजय मुरकुटेंच्या बुलेटवर मी बसलो. निघालो. चिंतामणराव काळेच्या दवाखान्याजवळ आम्हाला अडविण्यात आले. ज्यांनी अडविले त्यांची नावे इथे नमूद करणे मला सोईस्कर होणार नाही. मी ते टाळतो. त्यांनी मला किडनॅप करण्याचा प्लॅन आखला होता. तो यशस्वी झाला नाही. माझ्या विरोधात जनता पार्टीचे अनिल चरखा होते. निवडणूक झाली आणि मी विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवडून आलो. सोबतच आमच्याच पार्टीचे जे. बी. सायन्स कॉलेजमधून चिट्टी बाबू निवडून आले. जी.एस. कॉलेजमधून अनिल इंगळे निवडून आले. त्यानंतर आम्हा विद्यापीठ प्रतिनिधी व जनरल सेक्रेटरी यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. आणि ती गाजलीसुद्धा! लेखाच्या शीर्षकानुसार सुरेशभाऊंचा तो गुण 'हुनर पैदा करनेवाला' माझ्या कामी आला. अल्प काळासाठी का असेना, राजकीय हुनर माझ्या व्यक्तिमत्त्वात प्रवेशला.

सुरेशभाऊंसोबतच्या नजीकच्या संबंधाचा तो प्रारंभ होता. मग सुरेशभाऊंसोबत भेटी झडू लागल्या. सुरेशभाऊंचं व्यक्तिमत्त्व कळू लागलं. त्यांचा निगर्वी स्वभाव भुरळ पाडणारा! प्राचार्य गुलाबराव कदमांच्या शिस्तीचं जवळून अवलोकन करण्याची संधी मला त्या प्रसंगापासून लाभली आणि मला शिकविणारी प्राध्यापक मंडळी मला ओळखू लागली. मला महाविद्यालयात वेगळी ओळख मिळाली. सुरेशभाऊंच्याच निर्देश व मार्गदर्शनाखाली आम्ही नागपूर विद्यापीठ विद्यार्थी

संघाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक लढणाऱ्या स्व. श्रीकांत जिचकार यांच्या बाजूने उभे राहिलो. श्रीकांत जिचकारांच्या विरोधात निवडणूक लढवित होते, भारताचे विद्यमान सडक व परिवहन मंत्री, मा. श्री. नितीनजी गडकरी, त्या निवडणुकीसाठी मत मागण्यासाठी माझ्याकडे नितीनजी आले होते. श्रीकांत जिचकार प्रचंड मताधिक्याने विद्यापीठ विद्यार्थी संघाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. सुरेशभाऊ त्या काळात राजकारणात रमू लागले होते. राज्यशास्त्राचेच ते विद्यार्थी होते. त्यांची राजकारणाची वाटचाल पूज्य दाआजींच्या नेतृत्वाखाली सुरू होती. पूज्य दाआजी आमच्यासाठी फार मोठा आदर्श होते. त्यांचं व्यक्तिमत्त्व तर शब्दातीत! ते कर्मयोद्धा होते. सुरेशभाऊ दाआजींच्या पावलावर पावलं टाकीत घडू लागलेले मी पाहिले. यशवंत महाविद्यालयाची त्या काळात वेगळीच शान होती. विद्यापीठात नाव होतं. त्याचं श्रेय दाआजी आणि प्राचार्य गुलाबराव कदम यांना होतं. सोबतच त्यांनी घालून दिलेले नियम व शिस्त तसेच त्यांचे पालन करणारी प्राध्यापक मंडळी या सर्वांना आहे. दाआजी फार कुशल नेते होते.

सुरेशभाऊंची भेट अधून-मधून होत असे. त्याच काळात सुरेशभाऊंच्या भगिनी शालिनीताई महाविद्यालयात प्राध्यापकपदी रुजू झाल्या होत्या. त्यांचं रंगरूप अलौकिक होतं; पण त्यांचा स्वभाव शांत, संयमित, नावासमान शालिन होता. मुलायम-रेशमी वस्त्रासमान त्यांच्या स्वभावाची विण होती. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांची मुलगी एवढी साधी-सरळ असू शकते याचं नवल प्राध्यापक मंडळी, विद्यार्थी मंडळीपासून कर्मचारी मंडळीपर्यंत साऱ्यांच्याच मुखावर नांदत असायचं! त्या अजातशत्रू होत्या. दाआजींची शिस्त शालिनीताईंमध्ये उतरलेली आम्ही पाहिली. सुरेशभाऊ त्या काळी बरेचसे कडक स्वभावाचे तरी मीतभाषी होते. आजही ते तसेच आहेत. पटेल तेच बोलणं आणि त्यानुसार वागणं हा त्यांचा स्थायीभाव आहे. नज़रवाज़ कर ले ख़ुदी को मुकम्मल / बुदी के हिज़ाबा में ख़ुदा भी. (खुदी -स्वाभिमानता, मुकम्मल-संपूर्ण, पूर्ण, हिज़ाबा-पडदा) असाच सुरेशभाऊंचा स्वाभिमान आहे. मनातील देवश्रद्धा जशी कुणाला सांगून देवभोळेपणा मिरवायचा नसतो, तसं सुरेशभाऊंचं वर्तन आहे. महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक असूनसुद्धा भाऊंचं वर्तन निगर्वी व लाघवी होतं. १९७६ ला भाऊ वर्धा जिल्ह्याचे राष्ट्रीय युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. कामाला लागले. विद्यार्थ्यांची संघटनेची बांधणी करू लागले... ते दिवस आठवतात.

१९८१ साली मी यशवंत महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक या पदावर रुजू झालो. तो खरा तर माझ्यासाठी एक दैवी अपघात होता. माझ्या निवडीसाठी त्या वेळी मला कुणाला भेटण्याची संधीच मिळाली नव्हती. कारण तसाही मी बी. बी. आर्टस् कॉलेज दिग्रस येथे पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून कार्यरत होतो. निवड झाल्यावर प्राचार्य कदम साहेबांनी मला दाआजींची भेट घेण्यासाठी पाठविलं. दाआजींची भेट! अंगात माझ्या कापरंच भरलं, संध्याकाळची वेळ होती. मी दाआजींना भेटण्यासाठी वाड्यावर पोहोचलो. बाजूच्या कक्षात सुरेशभाऊ, प्रा. कोळपकर आणि बाबाराव झलके बसले होते. बाबाराव झलके बाहेर आले. मी माझं काम त्यांना सांगितलं. म्हणाले, 'दाआजींचा मूड काही बरोबर नाही. पाहा बॉ.. जा, भेट.' म्हणतात ना गरजवंताला अक्कलच नसते.. मीसुद्धा दाआजीच्या बैठकीत गेलो. हिंमतीचा हिमालय करून दाआजींसोबत बोललो. दाआजी म्हणाले, 'कदम साहेबांनी घेतलं ना तुला. मग? पण चांगलं शिकवा लागेल. पोरं नापास-बिपास झाले वर्गातले तर तुला काढून टाकीन.' आणि मी कामावर रुजू झालो. (मनात दाआजींच्या शब्दांचा धाक तेवत ठेऊन). अनेक जणांनी माझी टर उडविली. कुणी हे, कुणी ते, कुणी अलतं, तर कुणी भलतं सांगायला लागले आणि मी चिंतेच्या गर्तेत गटांगळ्या खात दिवस-रात्रींचे ताप सोसत राहिलो.

पण, कधी कधी संध्याकाळी महाविद्यालयात भाऊंची भेट होत असे. त्यांच्या सौम्य चेहऱ्याकडे पाहिलं की, मी टर उडविणाऱ्यांचे ते कसदार शब्द विसरून जात असे.

सुरेशभाऊंच्या जीवनपटावरील सर्वात महत्वाचं आणि जीवनाला एक वेगळी कलाटणी देणारं वर्ष असावं ते १९८५. या वर्षी भाऊंच्या राजकीय कर्तृत्वाला उभारी लाभली ती वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदावर भाऊ आरूढ झाले त्याची. ते बँकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. उन्हाळा आला. भाऊंना हिंगणघाट विधानसभेची उमेदवारी मिळाली. निवडणूक प्रचार सुरू झाला. उन्हाळा वर झळाळत होता आणि प्रचाराच्या फैरी झडत होत्या. श्रीमान बाबाराव झलकेप्रचार यंत्रणेचे मुख्य सूत्रधार होते. प्रचारयंत्रणा सजली. काही प्रचार-चमू तयार करण्यात आल्या. दिलीप भागवतकर यांच्या चमूत माझा समावेश झाला. आमची चमू नऊ जणांची होती. धनुरवार, मिसाळ, अशी काही नावं आठवतात. आमच्या चमूला एक स्वतंत्र जीप देण्यात आली. आम्ही प्रचारात मग्न झालो. क्षेत्र क्षेत्र पिंजून काढू लागलो;

पण आज स्पष्ट लिहायला काही हरकत नाही. भाऊंना मिळणारा प्रतिसाद अल्प होता. काही गावात तर नगण्यच! झुंज फार अटीतटीची होती.

प्रचारयंत्रणा दिवस–रात्र एक करीत होती, झटत होती. प्रचाराच्या शेवटल्या दिवशी प्रचार सांगता मोटरसायकल रॅली निघाली. एका मोटरसायकलवर दोन–तीन, स्कुटरवर तीन–तीन अशा स्वारांची मिरवणूक निघाली. आम्ही पैदल फिरू लागलो; पण हिंगणघाट शहरात प्रतिसाद विरोधी उमेदवाराला जास्त प्रमाणात होता. मला निक्षून आठवतात एका म्हातारीचे शब्द, प्रसंग असा झळाळ उन्हाने आमच्या घशाला कोरड पाडलेली. त्या काळात प्लास्टीकच्या बॉटल्स होत्या कुठे? आम्ही झोपडीवजा एका घरापुढे थांबलो. दारात उभी होती एक म्हातारी. 'दादी, पाणी पाजा बा. तहान लागली.' मी म्हातारीला पाणी मागितलं. म्हातारी म्हणाली, ''मा वाल्याच दारात काऊन आले पानी मांगाले? हाईत ना गब्बर, लोकायचे दार हाईत ना पानी पाजाले.'' आणि ती म्हातारी आत गेली; पण तिने पाणी मात्र पाजलं. दिलीप भागवतकर म्हणाला, भाऊचं काही खरं दिसत नाही रे, भौ? प्रतिस्पर्ध्यापुढे भाऊचा निभाव लागला नाही तेव्हा हे आम्हाला माहिती झाले; पण भाऊ २००९ साली विधानसभेची निवडणूक जिंकले, त्या वेळी मी अमोलकचंद महाविद्यालयात इंग्रजीचा प्राध्यापक म्हणून कार्यरत होतो. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना मी भाऊच्या विजयोत्सवाचे पेढे वाटले होते. रात्री आमचे निवृत्त प्राचार्य शंकरराव सांगळे सरांकडे पेढ्याचा बॉक्स घेऊन गेलो. सरांनी विचारलं, ''कशाचे पेढे?'' मी म्हणालो, ''सर, आमचे सुरेशभाऊ देशमुख विधानसभेची निवडणूक जिंकले आहेत. मला झालेला तोच आनंद मी वाटत आहे.'' त्यावर सांगळे सरांचे शब्द होते, ''डॉक्टर, तुमचं शरीर अमोलकचंदमध्ये आहे, पण मन मात्र अजूनही यशवंतमध्येच आहे.''

जो प्रसंग या ठिकाणी मी रेखाटतो आहे तो माझ्या जीवनतील अत्यंत करूणामय प्रसंग आहे. दाआजींचा या जगाला निरोप देण्याचा प्रसंग. दाआजी गेले आणि वर्धा शहरात, आजूबाजूच्या खेड्यांपाड्यांत, जनमानसात दुःखाचा एकच डोंब उसळला. १९९० सालच्या जुलै महिन्याची ती २६ तारीख होती आणि दिवस होता गुरुवार. त्या दिवशी रात्री आभाळ दाटून आलेलं, केव्हाही पावसाच्या सरी कोसळू पहात असलेल्या. प्रा. राजाभाऊ कोळपकर, प्रा. दिलीप ठोंबरे आणि मी (देवेंद्र पुनसे) आमच्यावर दुसऱ्या दिवशी पवनारला प्रयाण करणाऱ्या शवयात्रेसाठी ट्रक फुलांनी सजविण्याची जबाबदारी होती. आमच्या सोबतीला कासम आणि महादेवराव हे दोन कर्मचारी सहकारी होते. रात्रीचे आठ वाजले. आम्ही महाविद्यालयात पोहोचलो. ट्रक आला तो दहा वाजता. हैद्राबादवरून फुलांचा ट्रक आला तो रात्री साडे अकराच्या सुमारास. प्रा. दिलीप ठोंबरे आणि मी भिडलो ट्रक फुलांनी सुशोभित करण्याच्या कामात. फार निकडीचं काम होतं ते! राजाभाऊ कोळपकर सरांची तीक्ष्ण इस्थेटिक नजर सोबतीला होती आणि महादेवरावचं सहकार्य, अधून–मधून विजेचा लपंडाव सुरू होता आणि आमचं काम सुरू राहिलं. पहाटे सहा वाजता ट्रक सजवून तयार झाला. सारी रात्र आम्ही कष्टलो. दुसऱ्या दिवशी शवयात्रा पवनारला निघाली. त्या शवयात्रेचं वर्णन करण्यास माझी लेखणी समर्थ नाही. दाआजींचा देह अनंतात विलीन झाला. कर्मयोगाचं एक महापर्व संपलं होतं.

अगदी तोच दिवस २७ जुलै, १९९०, माझी पत्नी पद्मजा हिच्या यवतमाळ येथील श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षिका म्हणू रुजू होण्याचा दिवस होता. माझी मोठी मुलगी, सायली केवळ २५ दिवसांची होती. आणि तिची प्रकृती नाजूक होती. २७ चा दिवस संपला, पवनारवरून परतलो. २८ तारखेचा शनिवार होता. मी सुटीची अप्लिकेशन टाकली आणि पत्नी–मुलीच्या भेटीसाठी अमरावतीला पोहोचलो. ३० तारखेला सोमवारी मी कामावर रुजू झालो. पुढील शब्द लिहिताना माझ्या डोळ्यात आसवं दाटतात ... प्राचार्य गोमकाळे सरांनी माझा सुटीचा अर्ज नाकारला होता. का? कशासाठी? ते प्रश्न आजही अनुत्तरीत आहेत. ती परिस्थिती आज हा लेख लिहिताना जाणवली, बोचली. एकीकडे संस्थेच्या अध्यक्षांच्या महानिर्वाणाचा दिवस आणि दुसरीकडे माझ्या गरिबीला साथ देण्यासाठी पुढे आलेल्या पत्नीच्या नोकरी जॉईन करण्याचा दिवस... फार कठीण तो दिवस... फार कठीण ते क्षण!

भाऊंच्या मी जेवढ्या संपर्कात राहिलो तो तसा अल्पसाच संपर्क आहे. त्याला कारणीभूत माझा भिडस्त स्वभाव असू शकेल. भाऊ संस्थेचे अध्यक्ष झाले ते दाआजींच्या जाण्यानंतर; पण एक प्रसंग सांगतो. सिनियर कॉलेजच्या पदासाठी मी दोनदा प्रयत्न केले होते, १९८६ ते १९९० या काळात. दाआजी त्या काळात संस्थेचे अध्यक्ष होते. पहिले दोन प्रयत्न फसले. तिसऱ्या प्रयत्नात मला साथ लाभली ती भाऊंची आणि बाबाराव झलके यांची. भाऊंनी मला साथ

दिली आणि माझी आशा बळावली. स्पर्धा तशी नसल्यासारखीच. मी इंटरव्यू कक्षात शिरलो. इंटरव्यू संपला. दाआजी म्हणाले, 'अरे, हा पोरगा वारंवार इंटरव्यू देतो. याला घेऊन टाका. द्या याला चांस.' प्राचार्य गोमकाळे म्हणाले, नाही, दाआजी याला घेता येत नाही. ज्युनियर कॉलेजला शिकवण्यासाठी चांगल्या लोकांची गरज असते.

माझा तिसराही प्रयत्न फसला; पण आवर्जून आणि भान ठेवून लिहितो की, त्या तिसऱ्या प्रयत्नासाठी मला भक्कम साथ दिली होती. त्यांनी माझ्या चिकाटीचं मोल हेरलं असावं! आपल्याजवळचा विद्यार्थी सिनियरला जावा असं काहीतरी त्यांच्याही मनात असावं! भाऊ जास्त बोलत नव्हते. जास्त दिमाख दाखवीत नव्हते.

संध्याकाळी आम्ही प्राध्यापक मंडळी बॉलबॅडमिंटन खेळत असू. प्रा. प्रभाकर भोगे, प्रा. धनंजय भोयर, प्राचार्य विलास देशमुख, प्रा. लोहकरे, प्रा. दिलीप ठोंबरे, प्रा. शेख हाशम, प्राचार्य विजय बोबडे, प्रा. किशोर देशमुख आणि मी अशी ती खेळाडू मंडळी. अधून-मधून प्राचार्य गोमकाळे येत असत; पण सुरेशभाऊ नित्यनेमाने येत असत. भाऊ मैदानावर आले की, सर्वांच्या अंगात स्फूर्तीचा संचार होत असे. खेळात जिकिरी चढत असे. भाऊ सर्वांशी स्पोर्टिव्ह स्पिरिट बाळगून वागत, बोलत. त्यांच्या वागण्या-बोलण्यात गर्वाचा, अभिमानाचा, बडेजावाचा पुसटसा अंशसुद्धा मला कधी आढळला नाही. दिलखुलास बोलणं, लाघवी हसणं, निगर्वी वागणं. हे भाऊंच्या स्वभावाचे पैलू! फार कमी लोकांच्या व्यक्तिमत्त्वात हे पैलू सापडतात. भाऊ मात्र मी जे लिहीत आहे, तसेच आहेत.

लेख-शब्दांना मर्यादा असावी. असावीच. घनिष्ठ जरी नसेल, तरी नजिकच्या संपर्कात आलेल्या मोठ्या व्यक्तीवर लिहिताना भान जपावं लागतं. रोक्ष-अपरोक्षपणे शब्द उधळून चालत नाही. तेच भान ठेवून या लेखाची सांगता करतो. भाऊंविषयी असं म्हणावं The winning of honour is but the revealing of a man's virtue and worth without disadvantage तरी आणि He that seeketh victory over his nature, let him not set himself too great nor too small tasks - असं लिहावं तरी ते संयुक्तिकच वाटते. हे जग विविध गुणांच्या व्यक्तींची खाण आहे. त्या खाणीतून गुणी व्यक्तींचा शोध मात्र घ्यावा लागतो. भाऊंच्या रूपातून तो सापडतो.

सुरेशभाऊ आज आपण ७५ व्या वर्षांच्या वाटेवरून चालत आहात. पंचाहत्तर उन्हाळे-पावसाळे-हिवाळे आपण अंगावर सारले आहेत. जीवनवाटेवरले ७४ मैलांचे दगड आपण पार केले आहेत. कर्तृत्वाने, अनुभवाने आपण संपन्न झाला आहात. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील आपली झेप उत्तुंग आहे. मी आपल्या संपर्कात राहिलो आहे. बऱ्याच गोष्टी शिकलो आहे.

भाऊ, आपल्या सर्वच क्षेत्रांतील यापुढील यशस्वी वाटचालीसाठी आणि आपल्या शतायुषी जीवनासाठी माझ्या मनस्वी शुभेच्छा.

वैसे चमन में बहारों की कमी तो है नहीं
फिर भी आप जैसे हुनर पैदा करनेवालों की
कमी जरूर है आज केइस दौर में...
जीवेत शरदः शतम्!




# माझे सर!

**डॉ. प्रदीप आगलावे**
सदस्य सचिव,
डॉ. आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन , मुंबई.

माजी आमदार सुरेश देशमुख यांचे वर्धा जिल्ह्यातील शैक्षणिक, राजकीय, सहकार, सामाजिक, आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य सर्वांना माहीत आहे. ते विदर्भातील प्रसिद्ध लोकनेते आहेत. सुरुवातीच्या काळात ते यशवंत कॉलेज येथे राज्यशास्त्र या विषयाचे प्राध्यापक होते, हे बऱ्याच लोकांना माहीत नाही. त्यांच्या एका कर्तृत्ववान विद्यार्थ्याने आपल्या सरांविषयी अर्थातच प्रा. सुरेश देशमुख यांच्या विषयीची आपल्या मनात कोरलेली आठवण प्रस्तुत लेखातून शब्दबद्ध केली आहे.

माझं गाव वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम! सेवाग्राम येथील यशवंत विद्यालयात शिकत होतो; त्यावेळी वडिलांसोबत सायकलच्या कॅरियरवर बसून वर्धेला जाण्याची कधी संधी मिळायची, तेव्हा उजव्या बाजूला असलेली यशवंत कॉलेजची भव्य इमारत बघायचो. ती इमारत बघून असं वाटायचं की, आपणालादेखील या कॉलेजमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळाली पाहिजे. त्या वेळी माझ्या दृष्टीनं कॉलेज म्हणजे कॉलेज! आर्टस्, सायन्स किंवा कॉमर्स यातील फरक माहीत नव्हता. यशवंत कॉलेजमध्ये शिकायला मिळालं, तर किती मज्जा येईल. असा मी विचार करायचा.

दहावी पास झाल्यावर वर्धेच्याच यशवंत महाविद्यालयात प्रवेश घेतला. अकरावीमध्ये प्रवेश घेतला, त्या दिवसापासून मी कॉलेजमधील बारीकसारीक गोष्टींचं निरीक्षण करायचो. सातव्या वर्गात होतो, तेव्हापासूनच सेवाग्राम येथील गांधी सेवा संघाच्या ग्रंथालयात दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये काम करायचो. त्यामुळे मला वाचनाची सवय लागली. मी खूप वाचन करायचो. कथा, कादंबऱ्या, मासिके आणि सतत वाचायचो. त्यामुळे माझ्या व्यक्तिमत्वाचा खूप चांगला विकास झाला होता. त्याचा फायदा मला अकरावीत झाला. अकरावीपासूनच माझ्या लेखानास सुरुवात झाली होती.

अकरावीत असताना ऑगस्ट आणि जानेवारीला देखील कॉलेजला गेलो होतो. महाविद्यालयातील प्रत्येक कार्यक्रमात सहभागी व्हायचो. अकरावीमध्ये राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि भूगोल हे विषय होते. मी प्रत्येक प्राध्यापकांचे पिरेड्स करायचो. एकाही पिरेडला मी कधी चाट मारली नाही. अकरावीत तर मी एकही दिवस गैरहजर राहिलो नव्हतो. राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र हे माझे आवडते विषय होते. त्यावेळी राज्यशास्त्र हा विषय प्रा. सुरेश देशमुख हे शिकवायचे. देशमुख सर वर्गात आले नाही की, मी स्टाफ रूममध्ये जाऊन देशमुख सर कुठे आहेत? असं शिपायाला विचारायचो.

तेव्हा त्यांच्याकडून उत्तर मिळायचे की, सर सुट्टीवर आहेत.

तेव्हा मी हिरमुसला व्हायचो. कधी कधी देशमुख सर स्टाफरूममध्ये बसलेले दिसले, तर मला आनंद व्हायचा.

सरांना आपला  पिरेड असल्याचे सांगायचो. तेव्हा ते लगेच वर्गात जायला निघत, तर मी त्यांच्यापुढे चालत चालत वर्गात यायचो. मी पहिल्या बेंचवर बसायचो. देशमुख सर शिकवीत असलेला विषय आवडीचा असल्यामुळे मी त्यांचे लेक्चर मन लावून ऐकत असे. अधून  मधून मी त्यांना प्रश्न देखील विचारायचो.

देशमुख सरांचा पिरेड होता. सर वर्गात आले नव्हते. म्हणून मी त्यांना बोलवायला गेलो आणि स्टाफरूमच्या बाहेर उभा होतो. तितक्यात सर हातात पुस्तक आणि खडू घेऊन स्टाफरूमबाहेर आले. ते माझ्याकडे बघून हसत हसत म्हणाले, ''चल, तू मला बोलवायला आलास ना?''

''होय  सर!''

''आगलावे तुम्ही कुठे राहता?''

''सर, सेवाग्रामला!''

''हो का? छान!''

''माझं जन्मगाव सेवाग्राम आहे. ''

''हो सर! मला माहीत आहे.''

देशमुख सर वर्गात शिरले. मीदेखील त्यांच्या पाठोपाठ वर्गात जाऊन आपल्या बेंचवर बसलो. मी कॉलेजच्या ग्रंथालयात पेपर वाचत होतो. तेव्हा चपराशी माझ्याजवळ येऊन म्हणाला, ''बाहेर ये!'' मी त्याच्यासोबत ग्रंथालयाबाहेर आलो. तेव्हा त्याने सांगितले की,  प्रा. सुरेश देशमुख सरांनी तुला बोलाविले आहे. ''कशासाठी?'' मी विचारले. तेव्हा तो म्हणाला, ''मला काय माहीत?'' मला प्रा. देशमुख सरांनी का बोलाविले असेल? याचा विचार करीत मी स्टाफरूमकडे गेलो. ''मे आय कम इन सर?'' मी सरांना विचारले.

''आगलावे, आत ये!''

''हो सर!'' असे म्हणून मी सरांजवळ गेलो.

''अरे, मी शुक्रवारला सेवाग्रामला येत आहे.''

''या सर, मी तिथे भेटेल तुम्हाला?''

''हो, त्यासाठीच मी तुला बोलावले आहे. सेवाग्रामला गुळवाडीत एक कार्यक्रम आहे. तिथे तू ये!''

''हो सर, मी निश्चित येतो.'' असे सांगून मी सरांचा निरोप घेतला.

तो १९७७ चा जानेवारी किंवा फेब्रुवारीचा  महिना होता. त्या वेळी प्रा. सुरेश देशमुख सर हे वर्धा जिल्हा युवक कॉंग्रेसचे सरचिटणीस होते. देशमुख सर कार्यक्रमाच्या निमित्ताने बाहेर जायचे. त्यांनी मला बोलावून सेवाग्रामच्या कार्यक्रमाची माहिती दिली आणि त्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे सांगितले, याचा मला खूप आनंद झाला. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. विद्यार्थ्यांसाठी त्यांचे शिक्षक किंवा प्राध्यापक फार मोठे असतात. अकराव्या वर्गात शिकणाऱ्या विध्यार्थ्याला सरांनी बोलावून कार्यक्रमाची माहिती देणं, ही फार मोठी गोष्ट होती.

प्रा. देशमुख सरांनी सांगितलेला शुक्रवारचा तो दिवस कधी येतो याची वाट बघत होतो. एकदाचा शुक्रवारचा तो दिवस उगवला. माझे घर सेवाग्राम वस्तीत होते; परंतु १९७४ पासून मी गांधी आश्रमात राहत होतो. त्या दिवशी साडे–चार वाजता आश्रममधून गुळवाडीत गेलो. कार्यक्रम सुरू व्हायचा होता. थोड्या वेळात सर स्कुटरने कार्यक्रम स्थळी आलेत. सेवाग्रामचे वयोवृद्ध रहिवासी आणि माजी सनदी अधिकारी मा. जालमसिंग हे त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रा. देशमुख सरांचे छान भाषण झाले. मा. जालमसिंग यांनी प्रा. सुरेश देशमुख यांच्याविषयी गौरवपर काही शब्द काढले. ते म्हणाले की, सुरेश देशमुख हे सेवाग्रामचे सुपुत्र आहेत. त्यांचं जन्मगाव सेवाग्राम आहे. त्यांचे वडील बापुरावजी देशमुख हे कॉंग्रेसचे नेते आहेत. त्यांनी खेड्यापाड्यात शाळा सुरू करून शिक्षण खेड्यांपर्यंत नेले. सुरेशदेखील युवक कॉंग्रेसचा नेता आहे. असं बरच काही त्यांनी सांगितलं. कार्यक्रम संपल्यानंतर मी सरांची भेट घेतली. ते म्हणाले, ''आगलावे, तू आलास छान झालं. अशा कार्यक्रमातूनच तुमची पिढी घडेल.''

''हो सर, मला असे कार्यक्रम खूप आवडतात. भाषणं ऐकणं आणि भाषणं देणं मला खूप आवडतं!''  मी म्हणालो.

''मला  माहीत आहे. ते गुण तुझ्यात आहेत. म्हणूनच तुला बोलावलं!'' सर हसत हसत आणि माझी  पाठ थोपटत म्हणाले.

''सर मी आपला खूप आभारी आहे.''

त्यानंतर ते म्हणाले, ''तुला दुसरं काही काम आहे का?''

''नाही सर! का?'' मी म्हणालो.

''तू माझ्यासोबत चल!''

''हो सर!''

मी त्यांच्यासोबत सेवाग्राम येथील त्यांच्या घरी गेलो. ते घर म्हणजे 'देशमुखवाडा' होय. सेवाग्रामचे सर्व लोक देशमुखवाडाच म्हणत! आम्ही लहानपणापासूनच ते घर म्हणजे देशमुखवाडा म्हणून ओळखत होतो. बापुरावजी देशमुख हे वर्धेच्या महादेवपुरा येथील बुटीवाड्यात रहायला गेले, तर सेवाग्रामच्या घरी त्यांचे लहान बंधू पंजाबराव देशमुख हे राहत होते. ते सेवाग्रामच्या महात्मा गांधी हॉस्पिटल येथे नोकरी करायचे आणि शेती बघायचे. त्यावेळी घरी त्यांची काकू होती. सरांनी  काकूंना वाकून नमस्कार केला. त्यांचा आशीर्वाद घेतला आणि थोड्या वेळाने निरोप घेऊन बाहेर पडलेत. आता चांगलाच अंधार पडला होता. बाहेर आल्यावर सर म्हणाले, ''तुला कुठं जायचं आहे?''

''सर , आता मी आश्रमात जाईल.''

''माझ्यासोबत चल, मी तुला आश्रमपर्यंत सोडून देतो.''

''होय सर!'' मी उत्तर दिलं.

सरांनी मला आश्रमपर्यंत सोडून दिले. सर स्कूटरने वर्ध्याच्या रोडने निघून गेले. मी आश्रमात माझ्या रूमवर गेलो. प्रा. देशमुख सरांचे भाषण माझ्या डोक्यात घुमत होते. आपण असं लोकांसमोर भाषण कधी देणार? आपणसुद्धा असंच भाषण दिलं पाहिजे. सरांचा आदर्श आपण घेतला पाहिजे. खूप वेळपर्यंत असा विचार करीत होतो.

सरांच्या सेवाग्राम भेटीचा प्रसंग  आणि त्यांच्यासोबत झालेला संवाद हा माझ्या अंत:करणात कायमचा कोरल्या गेला. त्यानंतर देशमुख सर युवक कॉंग्रेसच्या कार्यात व्यस्त झाले. त्यामुळे यशवंत कॉलेजमध्ये अधून-मधून भेट व्हायची.

यशवंत कॉलेजमधून पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर एम. ए. करण्यासाठी नागपुरला गेलो. त्यामुळे यशवंत कॉलेज, वर्धा आणि सेवाग्रामशी माझा संबंध खूपच कमी झाला. वर्धेला गेल्यानंतर सरांशी भेट घ्यायला वैशाली नगर येथील त्यांच्या घरी जायचो.

एकदा मुंबईच्या विमानतळावर प्रा. देशमुख सर दिसले. त्यांची भेट घेतली. खूप दिवसानंतर त्यांची भेट झाली होती. त्या वेळी मी पाकिस्तानवरून मुंबईला आलो होतो. त्यांना मी पाकिस्तानवरून आलो असल्याचे सांगितले.

तेव्हा सर म्हणाले, ''छान! ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. आमचा विद्यार्थी पाकिस्तानात जाऊन भाषण देतो.''

''सर , मी  विद्यार्थी  कुणाचा?''

''म्हणजे! मला नाही कळलं?'' सर म्हणाले.

''सर, मी तुमचा विद्यार्थी आहे ना?'' असं सांगताच सर मनमोकळे हसले.

''सर, तुम्हाला आठवतं की नाही, मला माहीत नाही. फार वर्षापूर्वी तुम्ही सेवाग्रामला भाषण देण्यासाठी आले होते. तुम्ही मला त्या कार्यक्रमासाठी बोलाविले होते. तेव्हा तुम्ही मला म्हणाले होते की, अशा कार्यक्रमातूनच  तुमची पिढी घडेल. त्याचा हा परिणाम आहे.''

माझ्या या बोलण्याने देशमुख सर मनातून खूप सुखावलेत. त्यांनी माझ्या पाठीवर हात फिरविला. त्यांच्या चेहऱ्यांवर आनंद विलसत होता. मी सरांचा आशीर्वाद घेतला.





# श्रीमंत मनाचा साधा माणूस !

**प्रा. नवनीत देशमुख**
वर्धा

**सुरेश बापुरावजी देशमुख**
**एक वेगळाच माणूस!**

त्यांना बघत आलोय तेव्हापासून. एक सरळ साधेपणा.

मनात आणि वाणीतही भिनलेला, एक बंगाली खादीचा कूर्ता पायजामा. ही साधी राहणी. मी तर याशिवाय दुसरे कपडे त्यांच्या अंगावर बघितले नाही. काही काही लोकांचं एक असतं. ही माणसं मनानं खूप उंच झाली असतात. त्यांच्या मनाच्या उंचीचा ठाव, सर्वसामान्यांच्या आकलनापलीकडे असतो. सुरेशराव असेच!

कार्याचा खूप मोठा डोलारा उभा आहे मागे, या माणसाची कधी धावपळ बघितली नाही. कुणावर ओरडणं, चिडणं दिसलं नाही कधी. सुरेशरावांच्या बंगल्यावर आणि बुटीवाड्यात ही माणसांची रीघ असते भेटणाऱ्यांची. दिवसभर माणसांचा राबता. सुरेशराव प्रत्येकाची आस्थेने चौकशी करणार, काही काम असेल तर ते ही करीत.

दाआजींनी जोडलेली माणसं सुरेशरावांनी मोठ्या आत्मीयतेनं जपली. स्वतःच्या विनम्र स्वभावानं त्यांनी नवी नवी माणसंही जोडली. लहानपणापासून सोबत असलेले सगळे सवंगडीही तितक्याच आपुलकीने जपलेत. सुरेशराव स्वतः कमी बोलणारे. त्यामुळे त्यांच्याकडून कुणी दुखावले जात नसत. या स्वभावामुळेच त्यांचा असा एक चाहता वर्ग निर्माण झाला.

सुरेशराव म्हणजे माणसांची माणुसकीने जपणूक करणारा माणूस. पांच वर्षे ते आमदार म्हणून राहिलेत. या पाच वर्षात कुणालाही न दुखवता जमतील तेवढी कामे ते करीत राहिले. महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात भाऊंच्या ओंजळीतली फुलं आजही सुगंधीच आहेत.

म्हणूनच माणसं कधी अंतरली नाहीत. एखाद्या डेरेदार वृक्षाखाली दुसरं रोपटं वाढत असेल, तर त्याची वाढ फार मंद गतीने होत असते. किंबहुना येणाऱ्या-जाणाऱ्यांना हा डेरेदार वृक्षच दिसत असतो. त्याच्या खाली वाढत असलेल्या रोपट्यांकडे कुणाचं लक्ष नसतं. दाआजीचा संपूर्ण महाराष्ट्रात दबदबा होता. महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँकेचे ते अध्यक्ष म्हणून राहिलेत. दाआजी निर्माण करीत असलेल्या शाळा-महाविद्यालयांचा व्याप, खासदार म्हणून त्यांची राजकीय कारकीर्द, दाआजीचा शब्द प्रमाण असे. त्या शब्दाबाहेर घरातलेच काय बाहेरचे कार्यकर्तेही जाऊ शकत नव्हते.

माझा मुलगा म्हणून दाआजींनी सुरेशरावांना राजकारणात आणले नाही. यशवंत महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून त्यांची नोकरी सुरू झाली. प्राध्यापक म्हणजे वाचन-चिंतन-मनन याचं दातृत्व ठेवणं. सुरेशरावांनी ते दातृत्व स्वीकारलं; पण अंतर्मन कुठे तरी बंडाळी करीत होतं. एक अस्वस्थता अंतर्मनात कुठेतरी जाणवत होती.

तो घरातला संघर्ष होता. मनातला संघर्ष होता.

मला माझं वेगळे अस्तित्व निर्माण करायचं.

ह्या जिद्दीनं सुरेशराव झपाटून गेले होते.

दाआजींची इच्छा नसतानाही ते समाजकारणात, राजकारणात उतरले. तयार होत होते स्वतःहून, तरुण वयच तसं असतं. दादा धर्माधिकारी एका लेखात लिहितात, 'जो संकटाच्या खाईत उडी घेतो, तो तरुण.'

संकटांना आव्हान देत दंड थोपटणं मोठं अवघड काम असतं. मनातली जिद्द, घरातले संस्कार, संयमशीलता आणि विशेष म्हणजे स्थितप्रज्ञता ज्याला साधली, तो हे काम करू शकतो. सुरेशरावांकडे बघून हळूहळू दाआजींनाही पटायला लागलं होतं, कुठे तरी विद्युल्लता चमकते आहे. त्यांचा विरोध हळूहळू कमी होत गेला. काही काळानं तर विरोधाची जागा विश्वासानं घेतली होती.

दाआजी गेल्यानंतर दाआजींनी सांभाळलेलं समाजकारण, राजकारण, शैक्षणिक संस्थांचा, सहकार क्षेत्राचा व्याप सुरेशरावांवर येऊन पडला. दाआजींची जीवाभावाची माणसं, कार्यकर्ते, सुरेशरावांनी तेवढ्याच संयमशीलतेने विनम्रतेने जोडून ठेवले. नवी पिढी जुनी पिढी एक अनोखं वातावरण – तेही लिलया सांभाळत आले.

सुरेशरावांकडून कधी कुणाविषयी अपशब्द बाहेर पडला नाही. त्यामुळेच राजकारणात त्यांचे विरोधकही त्यांच्या जवळचेच राहिले. विकारांपासून एवढं अलिप्त राहणं – सुरेशरावांनाच जमू शकते. तेवढी मनाची उंची, स्थितप्रज्ञता त्यांना लाभली आहे. कुणाला त्यांनी हाक जरी दिली, तरी त्या हाकेत प्रेमाचा ओलावा जाणवतो.

दाआजींसारखी स्मरणशक्ती सुरेशरावांनाही लाभली आहे. दिवसांतून कितीतरी लोकांच्या भेटीगाठी होत राहतात, त्या प्रत्येकाचे नाव गाव कायमच लक्षात राहते त्यांच्या. म्हणून प्रत्येकाला ते आपल्या जवळचे वाटतात. आत एक बाहेर एक असं मुरलेल्या राजकारणी लोकांसारखं त्यांना वागता आलं नाही. ते जे बोलतील ते मनापासून. कुठे अतिथी म्हणून भाषण करताना उगाच शब्दांचा आव आणून ते कधी बोलले नाही. जेवढं मनापासून बोलता आलं, तेवढं अगदी सहज सोपं बोलून ते मोकळे होतात. त्यामुळेच राजकारणाच्या क्षेत्रात कार्यरत असलेले मा. शरद पवार, मा. नितीन गडकरी या दिग्गज लोकांचे प्रेम, स्नेह त्यांना मिळाला.

विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन वर्ध्यात झाले, त्या वेळी जवळची पदरमोड करून त्यांनी हे साहित्य संमेलन घेतले. सुरेशरावांचे कार्यकर्ते, त्यांचे नियोजन एवढे पक्के होते की, वर्ध्यात आलेल्या कुठल्याच साहित्यिकाला कुठलीच उणीव भासली नाही. लोकं म्हणाले, एवढं नियोजनपूर्वक कुठंलंच साहित्य संमेलन झालं नाही. एखादं कार्य सामाजिक क्षेत्रातलं असो, वा सांस्कृतिक क्षेत्रातलं असो, सुरेशराव त्यात स्वतःला संपूर्णपणे झोकून देतात. त्यामुळे सुरेशरावांनी घेतलेला कुठलाही कार्यक्रम असो, तो शंभर टक्के यशस्वी होणाराच असतो.

विविध क्षेत्रातली माणसं सुरेशरावांना सहज जोडता आली. खेड्यातले असो की, शहरातले, सुरेशराव सगळ्यांचे झालेले असतात, म्हणून प्रत्येकाच्या सुखदुःखाच्या प्रसंगात सुरेशराव आवर्जून हजर असतात. अशा वेळी त्यांच्यातल्या हळव्या माणुसकीचंही दर्शन घडतं.

सुरेशराव जसे बाहेरच्या लोकांशी वागतात, तसेच ते कुटुंबातही असतात. सर्व भावंडांना घेऊन ते चालतात. कुटुंबप्रमुख म्हणून सर्वजण त्यांना तेवढाच मान देतात. त्यांच्या प्रत्येक शब्दांचा प्रत्येकजण तेवढाच आदर करतात. आज कुटुंब व्यवस्था अव्यवस्थित झाली आहे. एका भावाचं तोंड पूर्वेकडे तर दुसऱ्याचं पाश्चिमेकडे. आजही सुरेशरावांचे सर्व भावंडं एकत्र दिसतात. यात सौ. स्वातीताईंचा वाटाही फार मोठा आहे. नुसते भावंडंच एकत्र नाही, तर सुना, मुलं, भाच्ये, पुतणे सर्व एक कुटुंब म्हणून वागतात. सुरेशरावांना आणि सौ. स्वातीताईंना तेवढाच मान देतात. त्यांचा शब्द प्रमाण मानतात.

सुरेशरावाचं पंचाहत्तरावं वर्ष साजरं होत आहे. लोकांसाठी जनतेसाठी भरभरून कार्य केलं आहे त्यांनी. त्या सर्वांचे आशीर्वचन सुरेशरावांना आहेतच. चांगलं बियाणं पेरलं, तर भरभरून चांगलं पीक येतं. त्याला निसर्गाची साथ, ईश्वराची साथ असतेच. त्यांचा आजचा पंचाहत्तरावा वाढदिवस म्हणजे त्यांच्या चांगल्या कार्याची पावती होय. या निमित्ताने सुरेशरावांना निरोगी दीर्घायुष्य लाभावं ही ईश्वराजवळ प्रार्थना!




# राजकारणातील आदरणीय मित्र

**विजय मुळे**
निवृत्त कनिष्ठ अभियंता
पाटबंधारे विभाग, वर्धा

वर्धा जिल्ह्याच्या राजकारणात एक ज्येष्ठ नेते म्हणून सुरेशभाऊंचा या जिल्ह्याने नेहमीच सन्मान केला आहे. त्याचे कारण त्यांनी कुणाशीही कधीही राजकीय वैर बाळगले नाही. त्यांनी कुणासोबतही विरोधासाठी कधीही विरोध केला नाही. विरोधकांसोबत ते नेहमीच आपलेपणाने वागत आले आहेत. सर्वांना आपलेसे करण्याचा त्यांनी नेहमीच प्रयत्न केला. त्यांचे वर्धा जिल्ह्यातील सर्वच पक्षातील नेत्यांसोबत सौहार्दपूर्ण संबंध राहिले आहेत. त्यांनी कधीही कोणाला दुखावले नाही. कुणाचा अकारण द्वेष केला नाही. सर्वांसोबत त्यांची मैत्रीपूर्ण वागणूक राहिली आहे. आपलेपणाचा हा भाव त्यांच्या स्वभावातील एक अत्यंत महत्त्वाचा गुणधर्म मानावा लागेल. त्यांच्या स्वभावातील अनेक चांगल्या गुणांमुळे ते माणूस म्हणून सर्वांनाच आपलेसे वाटले आहेत. राजकारणातील एक आदरणीय मित्र म्हणून सुरेशभाऊंचे स्थान माझ्या मनात कायमचे कोरले गेले आहे.

वर्धा जिल्ह्याच्या राजकारणात अनेकांनी स्वत:च्या नावासमोर विकासपुरुष अशी पदवी लावली; पण माझ्या दृष्टीने खरे विकासपुरूष म्हणून मी बापुरावजी देशमुख यांनाच मानतो. दाआजी जेव्हा राजकारणामध्ये मोठमोठी पदे भुषवित होते, तेव्हा त्यांनी वर्धा जिल्ह्यासाठी मोठे प्रकल्पही आणायला सुरूवात केली होती. वर्धा जिल्ह्यात मोठमोठी धरणे बनत होती. हे प्रकल्प म्हणजे बोर धरण, धाम नदीवरील धरण आणि कन्नमवार ग्राम धरण. या तीन पाटबंधारे प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर होते. बोर धरण हे तर आजही ऑफिशिअली यशवंत धरण याच नावाने ओळखले जाते. ते नाव सुद्धा दाआजींनी ठेवले होते. वर्धा जिल्ह्यातील प्रकल्पांना ज्या ज्या वेळी निधीची कमतरता भासत असे. त्या त्या वेळी दाआजींनी यशवंतराव चव्हाणांशी असलेल्या घनिष्ठ संबंधांमुळे मोठा निधी आणला. धरणात गेलेल्या शेतीचे पैसे असतील किंवा धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या असतील त्यांनी प्रत्येक वेळी याबाबतीत सर्वांचेच समाधान केले. बापुरावजी देशमुख यांचा वर्ध्याच्या राजकारणात मोठा दबदबा होता. त्यांनी वर्धा जिल्ह्यातील राजकारणावर चांगली पकड निर्माण केली होती. मी पाटबंधारे विभागात कार्यरत असल्यामुळे माझा दाआजींसोबत सतत संबंध येत गेला.

सुरेशभाऊंविषयी सांगायचे म्हणजे सुरेशभाऊ माझ्यापेक्षा एका वर्षाने लहान आहेत. पण आम्ही दोघेही एकाच वर्गात होतो. मला आठवते. मी आणि सुरेशभाऊ लोकमान्य टिळक विद्यालयात चौथीपर्यंत शिकलो. त्या वेळी दाआजींचे कुटुंब बुटीवाड्यात राहत असत. मला वाटते त्यावेळी दाआजी गिरडवरून आमदार म्हणून निवडून आले होते. एक दिवस दाआजी आमच्या शाळेत आले आणि त्यांनी शिक्षकांना सुरेशभाऊंच्या शैक्षणिक प्रगतीविषयी विचारले. त्या वेळी आमचे

शिक्षक इंगोले सर होते. दाआजी शिक्षकांना म्हणाले, ''हा सुरेश जर वर्गात चांगला वागत नसेल, तर याला चांगले रपाटे मारा.'' त्यावेळी रपाटे आणि धपाटे असे प्रकार होते आणि त्यात रपाटे म्हणजे फार मोठी शिक्षा होती. मी त्या वेळी दाआजींच्या शिस्तप्रियतेबद्दल ऐकत होतोच; पण त्यांचा शाळेत मला प्रत्यक्ष अनुभव घेता आला. सुरेशभाऊ हे अशा दाआजींच्या शिस्तीत आणि संस्कारात वाढले.

सुरेशभाऊंना दाआजींचा वारसा आपोआपच मिळाला असला, तरी त्यांनाही त्या काळात बराच संघर्ष करावा लागला. सुरेशभाऊ तरुण वयात राजकारणात चांगले सक्रिय होते. त्यांनी विद्यार्थी चळवळीवर चांगला जम बसविला होता. विद्यापीठाच्या राजकारणामध्ये ते सक्रिय होते. तरुण वयामध्ये माझे आणि सुरेशभाऊंचे फारसे पटत नव्हते, त्याचे कारण असे होते की, विद्यार्थीदशेमध्ये त्या काळात वर्धेच्या राजकारणात दोन गट होते. एक सुरेशभाऊंचा गट आणि एक सुरेशराव सबाने यांचा गट. मी त्यावेळी सुरेशराव सबाने यांच्या गटाचा कार्यकर्ता होतो. सुरेशराव सबाने वर्धा जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यावेळी युवक काँग्रेसचा सचिव ठरविण्याचा अधिकार सर्वस्वी अध्यक्षाला असे; पण दाआजींनी सचिवपद खेचून आणले आणि सुरेशभाऊ त्या वेळी युवक काँग्रेसचे सचिव झाले. विदर्भाच्या राजकारणात काँग्रेसमध्ये दोन मोठे गट सक्रिय होते. एक म्हणजे तिडके गट आणि दुसरा म्हणजे तिरपुडे गट. आम्ही तिरपुडे गटाचे कार्यकर्ते होतो आणि सुरेशभाऊ तिडके गटात सामील होते.

सुरेशभाऊंसोबत आमचा राजकीय विरोध असला, तरी व्यक्तिगत विरोध कधीही नव्हता. सुरेशराव सबाने यांचे मोठे बंधू माणिकराव सबाने हे दाआजींचे विरोधक होते. पण दाआजी सुरेशराव सबाने यांच्यासोबत बोलताना ते त्यांच्या खांद्यावर हात ठेवत आणि सुरेशराव असा उल्लेख करीत आणि इकडच्या तिकडच्या चांगल्या गप्पा करीत. सुरेशभाऊंनीही कोणाचा व्यक्तिगत विरोध केला नाही. दाआजींसारखेच विरोधकांना जवळ करण्याचे गुण सुरेशभाऊंमध्ये मला वेळोवेळी दिसून आले.

सुरेशभाऊंशी माझा खऱ्या अर्थाने संपर्क आला, तो राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर. त्यावेळी मी सरकारी नोकरीत होतो. भुजबळ साहेबांच्या समता परिषदेचे काम करीत होतो. सहकारी संस्थेचे काम सांभाळत असताना सुरेशभाऊंसोबत नेहमी संपर्क यायचा. मी जसाजसा सुरेशभाऊंच्या अधिक संपर्कात येऊ लागलो, तसेतसे मला सुरेशभाऊंचे व्यक्तिमत्त्व विशेष भावायला लागले. मी जरी त्यांचा विरोधक असलो, तरी त्यांनी आमचा कधीही द्वेष केला नाही. त्यांची बोलण्याची भाषा प्रेमाचीच होती. एवढ्या मोठ्या शिक्षण संस्थेचा अध्यक्ष असून त्यांच्यामध्ये कधीही अहम्भाव नव्हता. वर्धा जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर त्यांचा पगडा असला, तरी कधी त्यांच्यात गर्व शिरला नव्हता. राष्ट्रवादी काँग्रेसचे एवढे मोठे नेते होते, तरी ते नेहमी सर्वांशी सौहार्दपूर्णच वागत होते. या काळात त्यांचे व्यक्तिमत्त्व मला विशेष आवडू लागले. एकदा आम्ही सहज राजकीय गप्पा करीत होतो. सुरेशभाऊंनी मला म्हटलेले वाक्य आजही माझ्या मनावर कोरले आहे. ते मला म्हणाले, ''विजूभाऊ, विरोध करणे सोडा आता. पुष्कळ झाले. आपण एकत्र आलो पाहिजे. विरोध करून कोणाचेही भले होणार नाही. आपण मिळून एकत्र काम करू.'' विरोधकांनाही आपलेसे करण्याची त्यांची ही वृत्ती मला विशेष आवडली आणि मी सुरेशभाऊंसोबत कायमचा जुळलो. सुरेशभाऊ हे विदर्भातील मोठे नेते आहेत; पण कोणालाही ते कार्यकर्त्यांप्रमाणे वागवत नाहीत. ते सर्वांसोबत मित्रांसारखे वागतात. हा त्यांच्यातला एक विशेष गुण मला वाटतो. एक सुसंस्कृत नेतृत्व म्हणून मी त्यांच्याकडे पाहतो. सुरेशभाऊ मोठे नेते असले, तरी त्यांनी अनेकांना मित्रत्वाची वागणूक दिली. मित्र ही फार मोठी पदवी आहे. अनेक लोक मित्रत्व निभावण्यात कमी पडतात. राजकीय माणसं तर मित्रत्व निभवत नाही अशी माझी धारणा आहे; पण सुरेशभाऊ मला राजकारणातील आदरणीय मित्र म्हणून फार मोठे वाटतात. त्यांच्यासोबत मी जेव्हापासून जुळलो आहे, तेव्हापासून मी हा अनुभव सातत्याने घेत आलो आहे. त्यांनी अनेकांना मित्रत्वाच्या भावनेने सहकार्य केलेले आहे याची अनेक उदाहरणे माझ्याकडे आहेत. सुरेशभाऊंमध्ये मी एक उत्तम मार्गदर्शक, राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार करणारा सच्चा माणूस आणि प्रामाणिकतेचे आदर्श व्यक्तिमत्त्व पाहिले आहे.

मला आठवते. सुरेशराव सबानेच्या एकाहत्तरीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सुधाकरराव गणगणे, सतीश चतुर्वेदी हे प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते. कार्यक्रम पत्रिकेत सुरेशभाऊंचेही नाव प्रमुख पाहुणे म्हणून होते. बऱ्याच लोकांना असे वाटत होते की, सुरेशभाऊ या कार्यक्रमाला येणार नाहीत; पण सुरेशभाऊंनी विरोधासाठी विरोध कधीही केला नाही. ते कार्यक्रमासाठी उपस्थित झाले आणि कार्यक्रमात सुरेशराव सबानेच्या व्यक्तिमत्त्वावर ते भरभरून बोलले. त्यावेळी सुरेशभाऊंच्या मोठेपणाची सगळीकडे चर्चा सुरू होती.

विरोधकांनाही आपले करण्याची हातोटी सुरेशभाऊंमध्ये आहे. भाऊ जेव्हा आमदार म्हणून निवडून आले, तेव्हा त्यांनी विकासकामाच्या बाबतीत कधीही दुजाभाव केला नाही. निवडणुकीमध्ये सुरेशभाऊंच्या विरोधात ज्यांनी काम केले, ते रस्त्याचा किंवा इतर कामाचा प्रस्ताव घेऊन येत. तेव्हा त्यांनी कधीही विकासकामांना नाकारले नाही. त्यांना जर कोणी सांगितले की, ''यांनी आपल्याला विरोध केला होता.'' तर ते म्हणत, ''मी आता संपूर्ण जनतेचा आमदार आहे. मला सर्वांसाठीच कार्य करायचे आहे.'' आपला वा विरोधक असा कुठलाही दुजाभाव न मानण्याचा त्यांचा हा स्वभावधर्म त्यांना अजातशत्रू बनविणारा ठरला.

माझ्या मताप्रमाणे, राजकारण ही आजही मला मोठी गूढ गोष्ट वाटते. राजकीय लोकांच्या कार्यक्षमतेचे मला नेहमीच कुतूहल वाटत आले. त्यांच्यामध्ये असलेल्या संयमांचा मला नेहमीच हेवा वाटत आला आहे. वेळ पडल्यास राजकारणामध्ये खोटे बोलून वेळ काढून न्यावी लागते. प्रसंगानुसार स्वत:च्या प्रवृत्तीला बदलवावे लागते; पण सुरेशभाऊंनी आपल्या मूळ स्वभावात कधीही बदल होऊ दिला नाही. त्यांनी तत्त्वाशी तडजोड केली नाही. आपला प्रामाणिकपणा ते नेहमीच जपत आले आहेत. एक सुसंस्कृत नेतृत्व म्हणून मी त्यांच्याकडे पाहतो.

२०१६ ची गोष्ट आहे. मी खूप आजारी पडलो. मी अत्यवस्थच झालो होतो. सेवाग्रामला मला भरती करण्यात आले. माझी मुले वर्ध्याच्या दूर राहत होती. त्यांना यायला उशीर लागणार होता. तोपर्यंत काहीतरी ठोस निर्णय घेणे आवश्यक होते. सुरेशभाऊंनी लगेच निर्णय घेतला. नागपूरला व्होकार्टच्या डॉक्टरांशी संपर्क केला. मला नागपूरला भरती केले. आज जो मी असा चालता फिरता दिसतो. याचे संपूर्ण श्रेय सुरेशभाऊंनी त्या वेळी घेतलेल्या निर्णयाला जाते. मला २०१६ नंतर जे आयुष्य मिळाले ते सुरेशभाऊंमुळेच मिळाले असे मी म्हणेन.

आम्ही गेल्या २५ वर्षांपासून दरवर्षी माझ्या वडिलांच्या नावाने 'श्यामरावजी मुळे स्मृती संगीत सभा' आयोजित करतो. गेल्या पंधरा–सोळा वर्षांपासून सुरेशभाऊ या संगीत सभेला आवर्जून हजेरी लावतात. ते फक्त या कार्यक्रमासाठी येत नाहीत, तर हा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम ते मन लावून आणि आवडीने ऐकतात. तीन तास ते या कार्यक्रमासाठी थांबून राहतात. त्यांची कलेबाबतची आवड मला या ठिकाणी विशेषत्वाने नोंदवावीशी वाटते. सुरेशभाऊ यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असताना यशवंत महाविद्यालयातील संगीत विभागाविषयी नेहमी चर्चा होत असे. काही लोक म्हणायचे, संगीत विषयाला जर चांगला प्रतिसाद मिळत नसेल, तर हा विभाग बंद करून टाका; पण सुरेशभाऊंनी संगीत विभाग कधीही बंद होऊ दिला नाही. त्यांनी या विषयाच्या वाढीसाठी प्रोत्साहनच दिले. आज जी संगीत विभागाची चांगली भरभराट सुरू आहे. ती सुरेशभाऊंच्या संगीत कलेविषयीच्या आवडीमुळे आणि त्यांच्यात कलेविषयी जी आस्था आहे, त्यामुळेच होय असे म्हटले तर वावगे होणार नाही.

सुरेशभाऊंच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांना उत्तम आरोग्य लाभो! ते शतायुषी होवोत, ही सदिच्छा देतो!





# सहृदय व समाजनिष्ठ शिक्षणकारणी

**डॉ. शैलेंद्र धर्मदास लेंडे**
मराठी विभागप्रमुख
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

**एक**

आम्हा सर्वांचे आदरणीय प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांनी अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यांच्या आयुष्याची ही अमृत महोत्सवी वाटचाल आम्हा सर्वांसाठी मोठी आनंददायी ठरली आहे. वयाच्या ७५ वर्षांकडे होत आलेला त्यांचा जीवनप्रवास सर्वांकरिता अतिशय प्रेरक असा जीवनप्रवास आहे. सुरेशभाऊंचा हा जीवनप्रवास त्यांच्याकरिता व कुटुंबियांकरिता वैयक्तिक पातळीवर महत्त्वाचा आहेच, पण त्याबरोबरच आम्हा सर्वांकरिता सामूहिक पातळीवर देखील तितकाच महत्त्वाचा आहे. सुरेशभाऊंचा आजपर्यंत घडत आलेला जीवनप्रवास हा मोठा वेधक स्वरूपाचा राहिलेला आहे. त्यांच्या या जीवनप्रवासाला विविध प्रकारचे पैलू आहेत. त्याचबरोबर त्यांच्या जीवनप्रवासाला विविध दिशा देखील आहेत. त्यांनी विविध क्षेत्रांत बजावलेल्या कार्यकर्तृत्वाने आम्हा सर्वांना ऊर्जा प्राप्त करून दिली आहे. सुरेशभाऊंचा जीवनप्रवास हा त्यांच्याकरिता उज्ज्वल स्वरूपाचा ठरला आहेच; पण त्याचबरोबर तो आम्हा सर्वांसाठी देखील चैतन्यदायी ठरला आहे. आमची पिढी ही सुरेशभाऊंच्या कार्यकर्तृत्वाचा वाढत जाणारा आलेख पाहत मोठी झाली आहे. त्यांचे कार्यकर्तृत्व आम्हा सर्वांसाठी सतत अभिमानाचा विषय ठरले आहे. त्यामुळेच सुरेशभाऊंच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आम्हाला मोठा आनंद होत आहे. त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्याबद्दलचा आमच्या मनातील आदराचा भाव व्यक्त करण्याची संधी मिळणे, हा आमच्याकरिता तितकाच आनंदाचा भाग ठरला आहे.

सुरेशभाऊंचे कार्यकर्तृत्व हे अतिशय व्यापक असे आहे. त्यांच्या या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या कार्याकडे व त्यांनी बजावलेल्या कर्तृत्वाकडे पाहणे हे आमचे आवश्यक कर्तव्य ठरते. सुरेशभाऊ यांच्या कार्यकर्तृत्वाची व्याप्ती विस्तीर्ण स्वरूपाची राहिली आहे. त्यांनी पार पाडलेल्या कार्यकर्तृत्वाच्या कक्षा देखील महत्त्वपूर्ण राहिलेल्या आहेत. सुरेशभाऊंचे कार्यकर्तृत्व ज्या परिसरात आकारास आले व ज्या परिसरात ते बहरले, त्या परिसराचे आगळेवेगळेपण देखील तितकेच लक्षणीय आहे. ज्या काळात त्यांची बालपणी जडणघडण झाली, त्या काळाला देखील स्वतःचे एक विशिष्ट असे महत्त्व असल्याचे दिसून येते. सुरेशभाऊ यांचा जन्म २० मे १९४९ रोजी आई रमाबाई आणि वडील बापुरावजी या शेतकरी दाम्पत्यांच्या पोटी वर्धा शहराजवळील सेवाग्राम येथे झाला. सुरेशभाऊ यांचे जन्मस्थळ, जन्मकाळ आणि तत्कालीन परिस्थिती, या बाबींचा एकत्रितपणे विचार केला, तर या तीनही घटकांचे वेगळेपण आपल्या लक्षात येऊ शकते.

सेवाग्राम हे सुरेशभाऊंचे जन्मगाव केवळ एक सर्वसाधारण स्वरूपाचे गाव नव्हते. हे गाव संपूर्ण भारतीय लोकजीवनाकरिता भूषण ठरलेले असे गाव होते. सेवाग्राम हे गाव राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची कर्मभूमी असलेले गाव आहे

हे सर्वश्रुतच आहे. अशा या संपूर्ण देशाकरिता गौरवाचे स्थान ठरलेल्या सेवाग्राम येथे सुरेशभाऊंचा जन्म व्हावा, ही घटना मोठी औचित्यपूर्ण मानावी लागते. त्यांना लाभलेला हा सेवाग्रामच्या जन्मभूमीचा वारसा त्यांच्या एकूणच वाटचालीमध्ये महत्त्वपूर्ण स्वरूपाचा ठरला असल्याचे दिसून येते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची कर्मभूमी असलेल्या सेवाग्राम येथे सुरेशभाऊ यांचे बालपण व्यतीत झाले. महात्मा गांधीजी यांच्या विचारकार्याचा प्रभाव असलेल्या मारोतरावजी देशमुख या आजोबांचे संस्कार सुरेशरावांवर बालपणाच्या कालखंडात घडले. वडील बापुरावजी हे देखील महात्मा गांधी यांच्या विचारकार्याने प्रभावित असलेले असे व्यक्तित्व होते. आजोबा मारोतरावजी आणि वडील बापुरावजी यांचे गांधीवादी विचारसंस्कार सुरेशभाऊ यांच्या व्यक्तित्वाच्या जडणघडणीमध्ये अतिशय महत्त्वाचे ठरले असल्याचे दिसून येते. आई रमाबाई यांचे श्रद्धाशील संस्कार देखील त्यांच्या व्यक्तित्वावर विशेषत्वाने पडले असल्याचे पाहावयास मिळते. महात्मा गांधीजी यांच्या कार्याने उजळून निघालेली सेवाग्रामची कर्मभूमी आणि आई-वडिलांमुळे मिळालेली सेवाग्रामची जन्मभूमी, यामुळे सुरेशभाऊ यांच्या जडणघडणीला एक वेगळे रूप प्राप्त झाले. कुटुंबात पूर्वापार चालत असलेला शेतीचा परंपरागत व्यवसाय आणि या शेतीवर पोसले गेलेले अवतीभवतीचे ग्रामीण जीवन, हे सुरेशभाऊंवरील आणखी एक प्रभावकेंद्र होय. कर्मभूमीतील महात्मा गांधी यांचे संस्कार, जन्मभूमीतील आजोबा-वडील-आई यांचे संस्कार आणि परिसर भूमीतील ग्रामीण समाजजीवनाचे संस्कार, या त्रिस्तरीय संस्कारांमधून सुरेशभाऊ यांचे व्यक्तित्व घडत गेल्याचे पाहावयास मिळते.

सुरेशभाऊ यांचे बालपण वडील बापुरावजी यांच्या करारी व कणखर शिस्तीमध्ये आकारास आले; पण त्यांच्या या करारी व कणखर शिस्तीमध्ये कनवाळूपणाच्या भाव-भावना देखील संमिलित होत्या. बापुरावजी यांच्या या करारी, कणखर व कनवाळू शिस्तीमधून सुरेशभाऊ यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. वडिलांच्या संस्कारांबरोबरच आईचे संस्कार देखील सुरेशभाऊंच्या व्यक्तिमत्वासाठी अतिशय पोषक ठरले. आई रमाबाई यांच्या धर्मनिष्ठ आणि प्रेमळ संस्कारामधून सुरेशभाऊंची बालपणापासून जडणघडण होत गेली. आईचे हे धर्मपरायण व प्रेमळ जीवनसंस्कार सुरेशभाऊंच्या व्यक्तित्वाचा अविभाज्य घटक बनले. बापुरावजी आणि रमाबाई या आई-वडिलांच्या समाजशील मूल्यसंस्कारांचा वारसा त्यांना बालपणापासून मिळाला.

सुरेशभाऊ यांना व्यक्तित्वाला निर्णायक दिशा देण्यामध्ये वडील बापुरावांचा शैक्षणिक व सामाजिक वारसा अतिशय महत्त्वाचा ठरला. बापुरावजी देशमुख यांनी महात्मा गांधीजी यांच्या विचारमार्गावर चालत शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अतिशय मेहनतीने व चिकाटीने आपले स्थान निर्माण केले होते. वर्धा जिल्ह्यातील मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातून पुढे येत त्यांनी या परिसराला शैक्षणिक दृष्टीने समृद्ध करण्यासाठी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेची निर्मिती केली होती. तसेच ग्रामीण भागाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी या जिल्ह्यात सहकार क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली होती. यासोबत राजकीय क्षेत्रात देखील त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा सचोटीने उमटविला होता. बापुरावजी देशमुख यांनी शैक्षणिक, सामाजिक, सहकार व राजकीय क्षेत्रात स्वतःचे स्थान अतिशय परिश्रमपूर्वक निर्माण केले होते. यामधूनच त्यांच्या कार्याची व्याप्ती वर्धा जिल्ह्यापासून तर वैदर्भीय पातळीवर आणि पुढे महाराष्ट्रभर वाढत गेली. त्यांच्या शैक्षणिक व सहकारितेच्या क्षेत्रातील कार्यकर्तृत्वामुळे त्यांना शिक्षणमहर्षी व सहकारमहर्षी असे बिरूद प्राप्त झाले.

बापुरावांचा हा शैक्षणिक, सामाजिक व असहकारितेचा वारसा सुरेशभाऊ यांना बालपणापासून स्वाभाविकपणे प्राप्त झाला. बापुरावांच्या या वारशाचे संरक्षण करणे आणि या वारशाला समृद्ध करणे, हे देखील सुरेशभाऊ यांच्यासाठी मोठे जिकिरीचे कार्य होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी बापुरावांच्या या वारशाला निष्ठापूर्वक जपले व या वारशाला आपल्या परीने समृद्ध करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. सुरेशभाऊ यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचा आपण जेव्हा विचार करतो, तेव्हा त्यांना मिळालेला हा बापुरावांचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय वारसा सहजपणे आपल्या नजरेसमोर येतो; पण या वारशाला पुढे नेण्यासाठी त्यांनी केलेली धडपड ही देखील तितकीच महत्त्वाची मानावी लागते.

सुरेशभाऊ यांनी आपल्या उमेदीच्या काळात वडील बापुरावांच्या पावलांवर पाऊल ठेवीत शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात पदार्पण केले. सहकार आणि राजकीय क्षेत्रात देखील त्यांनी आपल्या उमेदीच्या काळापासून वाटचाल करणे सुरू केले. काळाच्या वाढत्या प्रवाहाबरोबर त्यांचे कार्यकर्तृत्व वेगवेगळ्या क्षेत्रात बहरत गेले. शिक्षण, समाजकारण,राजकारण, सहकार क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र इत्यादी विविध क्षेत्रात त्यांचे कार्यकर्तृत्व काळानुरूप विकसित होत गेले. शिक्षण क्षेत्र,

सामाजिक क्षेत्र, सहकार क्षेत्र, राजकीय क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र इत्यादि विविध क्षेत्रांमध्ये सुरेशभाऊंनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. बापुरावजी यांनी आपल्या कारकीर्दीत ज्या क्षेत्रांची पायाभरणी केली होती, त्या क्षेत्रांची अभिवृद्धी करण्याचे कार्य त्यांनी उमेदीने केले. हे कार्य करताना त्यांनी आपल्यावरील जबाबदारीला विचारपूर्वक ओळखले. आपल्या कौटुंबिक पूर्वपरंपरेचे भान राखत ते वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करीत गेले.

बापुरावजी देशमुख यांनी वर्धा जिल्ह्यातील समाजजीवनात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना जाणीवपूर्वक केली होती. या संस्थेने वर्धा जिल्ह्यातील गावागावांत शिक्षणाचा प्रसार केला, हे सर्वांना परिचित आहे. वर्धा जिल्ह्यातील लहानसहान खेडेगावापासून तर तालुक्याच्या ठिकाणापर्यंत अनेकानेक शाळा काढल्या होत्या. तसेच या जिल्ह्यातील काही तालुक्यांत व जिल्हास्थळी देखील त्यांनी वरिष्ठ महाविद्यालयांची निर्मिती केली होती. त्यांनी निर्माण केलेली यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था ही वर्धा जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकांच्या, बहुजन वर्गाच्या व तळपातळीवरील समाजाच्या जीवनात शिक्षणाला प्रवाहित  करण्यासाठी ही संस्था खूप महत्त्वाची ठरली. या संस्थेद्वारे निर्माण केलेल्या विविध शाळा–महाविद्यालयांमधून वर्धा जिल्ह्यातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या जीवनाला नवी  दिशा मिळण्याची संधी पहिल्यांदाच प्राप्त झाली होती. सुरेशभाऊ यांनी वडिलांचे हे शैक्षणिक कार्य तळामुळापासून समजून घेतले व त्यांच्या कार्याला पुढे नेले.

सुरेशभाऊ हे बालपणाच्या व तरुणपणाच्या कालखंडापासूनच बापुरावजी म्हणजेच दाआजी यांचे हे वर्धा जिल्ह्यातील शैक्षणिक पायाभरणीचे कार्य जागरूकपणे पाहत होते. या शिक्षणप्रसाराच्या आधारे ग्रामीण आणि शहरी या दोन्ही ठिकाणच्या भागामधील समाजाला शिक्षित व सुशिक्षित करण्याची त्यांची दृष्टी देखील ते डोळसपणे न्याहाळत चालले होते. पुढे दाआजी यांच्या निधनानंतर त्यांचा शैक्षणिक व सामाजिक वारसा पुढे नेण्याचे कार्य स्वाभाविकपणे सुरेशभाऊ यांचेकडे आले.  यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेला आणि या संस्थेद्वारे संचालित करण्यात येणाऱ्या विविध शाळा–महाविद्यालयांना चालविण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येऊन पडली. दाआजींच्या पश्चात सुरेशभाऊ या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बनले. या संस्थेच्या अध्यक्षपदाच्या कालखंडात त्यांनी या शाळा–महाविद्यालयांची चांगल्या प्रकारे पुनर्बांधणी केली. या संस्थेचे अध्यक्षपद त्यांनी तब्बल तीन दशकेसांभाळले. या वर्षांच्या प्रदीर्घ काळात ते या शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी राहिले. या संस्थेच्या अध्यक्षपदाच्या कालखंडात त्यांनी या संस्थेला तसेच या संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या विविध शाळांना व विविध महाविद्यालयांना विदर्भाच्या पातळीवर नावारूपास आणले.

'यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था' या संस्थेच्या अध्यक्षपदाचे कामकाज पाहण्यापूर्वी सुरेशभाऊ हे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. राज्यशास्त्र हा त्यांच्या अध्यापनाचा विषय होता. सुरेशभाऊ यांनी प्राध्यापक म्हणून आपली कारकीर्द आर्वी येथील वरिष्ठ महाविद्यालयातून सुरू केली होती. त्यानंतर त्यांनी यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे प्राध्यापक म्हणून कार्य केले. वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य करत असताना त्यांना महाविद्यालयीन शिक्षणप्रक्रियेला प्रत्यक्षपणे पाहता आले होते आणि त्याचप्रमाणे महाविद्यालयीन अध्यापन प्रक्रियेचा एक सक्रिय भाग होता आले होते. यशवंत महाविद्यालय येथे राज्यशास्त्र विषयाचे अध्यापन करताना त्यांनी विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून लौकिक प्राप्त केला होता. या अध्यापनकाळात त्यांना विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला आणि त्यांच्या जीवनजाणिवांना जवळून पाहता आले होते. खरे तर महाविद्यालयीन शिक्षणकाळापासून सुरेशभाऊ विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी चांगल्या प्रकारे जुळलेले होते. महाविद्यालयीन विद्यार्थीदशेच्या काळात ते विद्यार्थ्यांच्या चळवळींशी जोडले गेले होते. यशवंत महाविद्यालय येथे प्राध्यापक म्हणून कार्य करताना त्यांना विद्यार्थी–प्राध्यापक यांच्यातील अध्ययन–अध्यापनाचा अनुबंध चांगल्या प्रकारे समजून घेता आला. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकडून केले जाणारे अध्ययन आणि प्राध्यापकांकडून करण्यात येणारे अध्यापन या दोन्ही घटकांची अर्थपूर्णता त्यांना विद्यार्थीदशेच्या काळात आणि त्यानंतर प्राध्यापक पदाच्या काळात प्रत्यक्षपणे समजून घेता आली होती. अध्ययन आणि अध्यापनाचे नाते हे अंतिमतः नवीन विचारांचे विद्यार्थी व नवीन विचारांचा समाज निर्माण करण्यासाठी असते, ही भूमिका महाविद्यालयीन अध्यापनाच्या काळात चांगल्या प्रकारे आकारास येत गेली. सुरेशभाऊंनी या कालखंडात महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र या विषयाचे अध्यापन केले. विद्यार्थीदशेतील सुजाण अध्ययनाचा व प्राध्यापकपदावरील समंजस अध्यापनाचा त्यांना यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून कामकाज पाहताना मोठा उपयोग झाला.

सुरेशभाऊंचे कार्यकर्तृत्व हे चौफेर स्वरूपाचे राहिले आहे. त्यांचे कार्यकर्तृत्व एकाच वेळेस विविध अंगांनी फुलत गेले. महाविद्यालयीन विद्यार्थीदशेच्या काळात ते विद्यार्थी चळवळीमध्ये सक्रिय सहभागी राहिले. राज्यशास्त्र या विषयाचे पदव्युत्तर पातळीवर अध्ययन करताना त्यांची भारतीय राजकीय व्यवस्थेविषयीची समज वाढत गेली. त्याचबरोबर अवतीभवतीच्या वातावरणाकडे पाहण्याची त्यांची समाजमनस्क दृष्टीही हळूहळू आकारास येत गेली. विद्यार्थी चळवळीतील सहभागामधून त्यांचे नेतृत्वगुण साकार होत गेले. पुढे प्राध्यापक म्हणून कार्य करताना त्यांच्यातील प्राध्यापक हा डोळसपणे सिद्ध होत गेला. विद्यार्थिनिष्ठ दृष्टीतून अध्यापनकार्य व प्रशासनकार्य कशाप्रकारे केले पाहिजे, यासंबंधीची त्यांची जाणीव या प्राध्यापकपदाच्या कालखंडात व्यवस्थितपणे घडत गेली.

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेमध्ये अध्यक्ष म्हणून कार्य करताना सुरेशभाऊ यांच्या व्यक्तिमत्त्वातील शिक्षणप्रेमी व शिक्षणकारणी क्रमशः विस्तारित होत गेला. आपल्या शिक्षणसंस्थेतील विविध शाळा–महाविद्यालयांतून दिले जाणारे शिक्षण हे जास्तीत जास्त समाजोपयोगी कसे होऊ शकेल, याचा ते नेहमी विचार करीत गेले. शिक्षण शाळा–महाविद्यालयांतून तर दिले जातेच; पण त्याचे लोण खेड्यापाड्यातील गरिबांच्या झोपडीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य मी जास्त मोलाचे समजतो हा दाआजींचा ध्येयवाद त्यांनी आपल्या मनात सतत जोपासला. या ध्येयवादाची परिपूर्ती करण्यासाठी ते सातत्याने धडपडत राहिले. या संस्थेद्वारा चालविण्यात येणाऱ्या. तीन प्राथमिक शाळा, बावीस माध्यमिक शाळा, अकरा उच्च माध्यमिक शाळा, तीन वरिष्ठ महाविद्यालये, एक अभियांत्रिकी महाविद्यालय, एक छात्रालय, अशा चाळीस च्या आसपास ज्ञानकेंद्रांना त्यांनी मोठ्या निष्ठेने चालवले. त्यांच्या कुशल नेतृत्वात चालवली गेलेली ही ज्ञानकेंद्रे वर्धा जिल्ह्यातील शैक्षणिक व सामाजिक पर्यावरणाला समृद्ध करणारी ठरली.

शिक्षणप्रसाराच्या क्षेत्रात सुरेशभाऊ ज्या काळात अग्रेसर होते, त्याच काळात ते सहकाराच्या क्षेत्रात देखील कार्य करीत चालले होते. याच काळात ते राजकीय क्षेत्रात देखील क्रियाशील होते. सहकाराच्या क्षेत्रात ते ऐन तारुण्याच्या काळात उतरले होते. त्यांनी १९८५ साली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून सहकाराच्या क्षेत्रात आपली कारकीर्द सुरू केली. त्याच वर्षी ते वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष बनले. त्यांना वर्धा जिल्हा को–ऑपरेटिव्ह बँकेच्या अध्यक्षपदाचाही बहुमान मिळाला. पुढे ते महाराष्ट्र राज्य सहकारी बँक या शिखर बँकेचे अध्यक्ष बनले. सहकाराच्या क्षेत्रातील त्यांचे हे शिखरकार्यच होय. सुरेशभाऊ यांची सहकाराच्या व बँकिंगच्या क्षेत्रातील कामगिरी ही अशी सतत विकसित होत गेल्याचे पाहावयास मिळते. त्यांनी सिंचनाच्या क्षेत्रात देखील लक्षणीय कामगिरी पार पाडली. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष असताना त्यांना सिंचनव्यवस्थेचे चांगल्या प्रकारे नियोजन करता आले. सेवाग्राम येथील बापुरावजी देशमुख सूतगिरणी व वेळा येथील साखर कारखाना या महत्त्वपूर्ण संस्थाचे अध्यक्षपद त्यांनी सुबकपणे सांभाळले.

सुरेशभाऊ यांनी राजकारणाच्या क्षेत्रात देखील लक्षणीय स्वरूपाचे कार्य केले. महाविद्यालयीन विद्यार्थीदशेत त्यांना युवा नेता म्हणून कार्य करता आले होते. ऐन तारुण्याच्या काळात त्यांनी राष्ट्रीय युवक काँग्रेसमध्ये महत्त्वपूर्ण पद भूषवले. ऐन तारुण्याच्या काळातते विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात यशापयशाची विशेष फिकीर न करता उतरले. राजकीय क्षेत्रात निरलस वृत्तीने ते कार्य करीत राहिले. २००९ साली ते वर्धा विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. २००९ ते २०१४ या कालखंडात त्यांनी आमदार म्हणून लोकाभिमुख स्वरूपाचे कार्य केले. राजकारणाच्या क्षेत्रात सचोटीने कार्य करताना सुरेशभाऊ यांनी आपली लोकनिष्ठ व शालीन वृत्ती सतत कायम ठेवली. या समाजशीलतेमधूनच वर्धा जिल्ह्यात व पुढे विदर्भ प्रदेशात त्यांचे लोकनेतेपण आकारास आल्याचे दिसून येते.

सुरेशभाऊ यांनी आपल्या आतापर्यंतच्या आयुष्यकाळात या प्रकारे वैविध्यपूर्ण स्वरूपाची कामगिरी बजावली आहे. शैक्षणिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, सहकार क्षेत्र, बँकींग क्षेत्र, राजकीय क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र इत्यादी विविध क्षेत्रांत ते आयुष्यभर कार्यरत राहिले आहेत. सुरेशभाऊ यांनी या विविध क्षेत्रांमध्ये काम करताना त्या त्या क्षेत्रांवर स्वतःच्या कार्यशैलीचा वेगळा असा ठसा उमटविला आहे. लोककल्याणाच्या दृष्टीतून ते समाजामध्ये सतत काम करीत राहिले आहेत. समाजशील भूमिकेतून ते विविध क्षेत्रांमध्ये आयुष्यभर कार्यरत राहिले. त्यांच्या या अष्टपैलू कार्यकर्तृत्वामधून एक दूरदर्शी व समाजनिष्ठ लोकनेता अशा प्रकारची त्यांची प्रतिमा समाजात आकारास येत गेली. सुरेशभाऊंनी समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये वैविध्यपूर्ण स्वरूपाची कामगिरी केली आहे. या सर्वांमध्ये त्यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य हे त्यांच्या एकूणच कार्यकर्तृत्वामध्ये केंद्रवर्ती स्वरूपाचे ठरले असल्याचे दिसून येते.

## दोन

सुरेशभाऊ यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात केलेले कार्य हे अतिशय संस्मरणीय स्वरूपाचे राहिले आहे. त्यांनी केलेल्या शिक्षणप्रसाराच्या कार्याला विविध परिमाणे आहेत. त्यांनी उभारलेल्या शिक्षण संस्थांनी या संस्थांलगतच्या परिसराला व अवतीभवतीच्या पंचक्रोशीला मोठी उभारी दिली. त्या परिसराला त्यांनी नवे शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून दिले. सुरेशभाऊ यांनी ज्या ज्या भागात शैक्षणिक संस्था उभ्या केल्या, त्या त्या भागात शिक्षणाचा प्रसार चांगल्या प्रकारे होऊ शकला. त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांमध्ये विद्यार्थी घडले. त्याचबरोबर त्या संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आयुष्य देखील घडले. त्यांनी चालवलेल्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व या शिक्षण प्रक्रियेशी संबंधित असणारे विविध घटक, या सर्वांनाच वेगवेगळ्या नात्यांनी घडवले. त्यांच्या या शैक्षणिक संस्थांनी वेगवेगळ्या पद्धतीचे मनुष्यबळ निर्माण केले आणि त्याचबरोबर या संस्थांच्या रूपातून रोजगार निर्मिती देखील केली. त्यांच्या या विविध संस्थांच्या माध्यमातून वर्धा जिल्ह्यात व त्या लगतच्या परिसरात विकासाला सुयोग्यपणे चालना मिळाली. सुरेशभाऊ यांच्या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेने गुणवंत व अभ्यासू पात्रताधारक उच्चशिक्षित तरुणांना आपल्यामध्ये सामावून घेतले आणि त्यांच्या व्यक्तित्वांना आकार देण्याची संधी प्राप्त करून दिली. मला देखील या संस्थेने अशी संधी दिली आणि त्यामुळे मला थोड्याफार प्रमाणात का होईना,काही अंशी घडता आले आहे. हे मी येथे अतिशय नम्रतापूर्वक व कृतज्ञतापूर्वक नमूद करू इच्छितो.

सुरेशभाऊ यांच्या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेने चालवलेल्या यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे मी १९९५ मध्ये मराठी विषयाचा अधिव्याख्याता म्हणून नोकरीस लागलो. ते या नऊ वर्षांच्या नोकरीच्या कालखंडात सुरेशभाऊ यांच्या शैक्षणिक कार्यकर्तृत्वास मला प्रत्यक्षपणे पाहण्याची संधी प्राप्त झाली. मी या शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयांत १९९५ ते २००४ या कालखंडात नोकरीवर कार्यरत होतो. या कालखंडात मी सुरुवातीस यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे आणि त्यानंतर यशवंत महाविद्यालय, सेलू येथे मराठी विषयाचा अधिव्याख्याता म्हणून कार्य केले. या कालखंडात सुरेशभाऊ हे यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीत मला वर्धा जिल्ह्यातील व विदर्भ प्रदेशातील अत्यंत प्रतिष्ठित अशा यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्याता म्हणून नोकरी करण्याची संधी मिळाली.

यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे नोकरी मिळणे हा माझ्याकरिता एक अनोखा असा सुयोग होता. या संस्थेमध्ये मला नोकरी मिळण्याच्या घटनेचा व त्या संबंधीच्या प्रसंगाचा येथे मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. कारण या घटनाप्रसंगाचा संदर्भ आदरणीय सुरेशभाऊ यांच्या गुणग्राहक विज्ञाननिष्ठ व्यक्तिमत्त्वाशी जुळलेला आहे. वर्धा जिल्ह्याशी व या जिल्ह्याच्या परिसराशी माझा या नोकरीपूर्वी कधीच संबंध आला नव्हता. माझे मूळ गाव भंडारा जिल्ह्यातील होते. माझे बी. ए. चे शिक्षण जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा येथे झाले होते. त्यानंतर माझे एम. ए. चे शिक्षण नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागात झाले होते. एम.ए. झाल्यानंतर मी विभागात एम. फिल. करिता प्रवेश घेतला होता आणि त्यानुसार माझे एम. फिल.चे शिक्षण सुरू होते. शिवाय मला पीएच.डी. करिता विद्यापीठ अनुदान आयोगाची कनिष्ठ संशोधन छात्रवृत्तीदेखील मंजूर झाली होती. त्यानुसार मी पीएच.डी. चे संशोधनकार्यदेखील याच दरम्यान नुकतेच सुरू केले होते.

त्याच काळात १९९५ या वर्षी यशवंत महाविद्यालय, वर्धा येथील अधिव्याख्यातापदाची जाहिरात माझ्या वाचनात आली. या महाविद्यालयाच्या महत्तेच्या अनेक गोष्टी मी एम. ए. च्या माझ्या वर्गमित्रांकडून खुपदा ऐकल्या होत्या. कारण एम. ए. च्या वर्गातील माझे अनेक वर्गमित्र यशवंत महाविद्यालय, वर्धा येथून बी. ए. ची पदवी घेऊन विद्यापीठाच्या मराठी विभागात आले होते. त्यांच्या मुखातून या महाविद्यालयाच्या भव्यतेच्या अनेकानेक गप्पागोष्टी मला कळल्या होत्या. त्यामुळे आधीपासूनच या महाविद्यालयाबाबतचा आदरभाव माझ्या मनात आकारास आलेला होता. एवढाच काय तो या महाविद्यालयाबद्दलचा मला ऐकीव परिचय होता. मी या जाहिरातीनुसार या वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्यातापदासाठी सहज म्हणून पोस्टाद्वारे अर्ज सादर केला. त्यानंतर काही दिवसांत मला महाविद्यालयाकडून मुलाखतीचे पत्र आले. आता मुलाखतीचे पत्र आले आहेच तर आपणास मुलाखत द्यायला काय हरकत आहे? असा मनात विचार आला. यापूर्वी मी कधीच नोकरीसाठी मुलाखत दिली नव्हती. मुलाखतीची माझी ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे या निमित्ताने मुलाखत कशी असते, याचा अनुभव आपल्याला येऊ शकेल, असे मला वाटले आणि म्हणून मी या

मुलाखतीसाठी वर्धा येथे आलो.

या महाविद्यालयामध्ये येताच या महाविद्यालयाचा भव्य व देखणा असा परिसर पाहून मन दिपून गेले. या महाविद्यालयात प्रवेशताना येथील स्वतंत्र इमारती, या इमारतीच्या वर्गखोल्यांत विद्यार्थ्यांनी भरलेले वर्ग, महाविद्यालयांचे विस्तीर्ण प्रांगण, या प्रांगणातील विद्यार्थ्यांची वर्दळ, विद्यार्थ्यांचे ये–जा करणारे थवे या सर्वांचे ओझरते दर्शन घडले. या सर्वांमधून या महाविद्यालयातील ऊर्जावान शैक्षणिक वातावरणाची प्रत्यक्षात कल्पना आली. ही मुलाखत यशवंत महाविद्यालयातील एका प्रशस्त व बंदद्वार असलेल्या कक्षामध्ये आयोजित करण्यात आली होती. या मुलाखतीसाठी पंधरा–वीस उमेदवार आलेले होते. मुलाखतीसाठी माझ्या नावाचा पुकारा झाला आणि मी मुलाखतीसाठी कक्षामध्ये गेलो. या मुलाखतीसाठी मुलाखत घेणारे परीक्षक, महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे प्रमुख बसलेले होते. मी मुलाखतीसाठी कक्षामध्ये गेल्यानंतर मुलाखतीच्या प्रश्नांची सरबती सुरू झाली. परीक्षक मंडळी एकामागून एक प्रश्न विचारू लागली. त्या प्रश्नांच्या अनुसार मी पटकन त्या प्रश्नांची उत्तरे देऊ लागलो. त्या प्रश्नांना अभिप्रेत असलेल्या उत्तरांच्या पलीकडील सूक्ष्मतेचे कंगोरे देखील मी या मुलाखतीमध्ये स्पष्ट करीत गेलो. या कक्षात सर्व मंडळींच्या मध्यभागी पांढरेशुभ्र वस्त्र परिधान केलेले मध्यमवयाचे रूबाबदार, गौरवर्णीय व शांत चर्येचे गृहस्थ बसलेले होते. ते गृहस्थ मी सर्व प्रश्नांना देत असलेली उत्तरे अतिशय लक्षपूर्वक ऐकत असल्याचे माझ्या लक्षात आले. हे या संस्थेचे प्रमुख असले पाहिजेत, असे मला जाणवले. त्यांनी मला शेवटी मितभाषेत व सौम्य शब्दांत काही प्रश्न विचारले. त्यांना देखील मी अतिशय व्यवस्थित उत्तरे दिली. माझी मुलाखत उत्तम झाल्याचे त्या कक्षातील सर्व मंडळीच्या चर्येवरून माझ्या लक्षात आले. माझा विद्यापीठीय परीक्षेतील अकादमीक रेकार्ड उत्तम होताच. कदाचित त्यामुळे माझी मुलाखत अधिक सखोलपणे घेण्यात आली असावी, असे मला वाटून गेले. मुलाखत पूर्ण होताच मी कक्षाच्या बाहेर पडलो. बाहेर महाविद्यालयाच्या मोकळ्या मैदानात नागपूर येथून मुलाखतीसाठी आलेले मराठी विभागातील काही माजी व वरिष्ठ विद्यार्थिमित्र होते. तुझी मुलाखत तर खूप लांब चालली, असे माझ्याजवळ येत ते म्हणाले. होय, माझी मुलाखत खूप छान झाली, असे मी त्यांना सांगितले. त्यांच्याशी थोडेफार बोलणे झाल्यानंतर मी नागपूरकडे परतीच्या प्रवासाला निघालो. वर्धा येथून मी बसने नागपूर येथे आलो व तडक विद्यापीठ वसतिगृहावर परतलो. परत येताना मी या महाविद्यालयाच्या मुलाखतीचा व तेथील जागेचा विचार मनातून बाहेर काढून टाकला.

मुलाखत झाल्याच्या पाच–सहा दिवसानंतर मला विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. यशवंत मनोहर सर यांनी मला एम.फिल. च्या वर्गातून घाईघाईने त्यांच्या कक्षात बोलावून घेतले. डॉ. यशवंत मनोहर सर मला म्हणाले, ''अरे, तुझी यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे निवड झाली आहे. आताच मला यशवंत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी कार्यालयात फोन करून हे कळवले आहे. तुमच्या विभागातील विद्यार्थ्याची आमच्या महाविद्यालयात अधिव्याख्याता पदावर निवड झाल्याचे त्यांनी आताच मला सांगितले आहे.'' सरांच्या या बोलण्यावर माझा विश्वासच बसेना. महाविद्यालयामध्ये माझी निवड झाली आहे, हे माझ्याकरिता अविश्वसनीय होते. कारण या संस्थेकरिता व या महाविद्यालयाकरिता मी पूर्णपणे अपरिचित होतो. ही संस्था, हे महाविद्यालय आणि येथील परिसर माझ्याकरिता पूर्णतः अनोळखी होता. येथील मंडळींशी माझी दुरूनदुरून अगदी कोणत्याही प्रकारची ओळखपाळख नव्हती. येथील परीक्षक मंडळी माझ्यासाठी पूर्णपणे अनभिज्ञ होती. मी केवळ मुलाखतीचा अनुभव असावा याकरिता या ठिकाणी अगदी सहजपणे मुलाखत देण्यासाठी आलो होतो. या महाविद्यालयामध्ये माझी कोणत्याही प्रकारची ओळख नसताना या संस्थेचे अध्यक्ष सुरेशभाऊ देशमुख यांनी माझी या महाविद्यालयात निवड केली होती. त्यांच्यासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य वसंतराव घोरपडे यांनी माझी निवड केली होती. तोपर्यंत मी त्यांचे नाव देखील कधी ऐकले नव्हते. या महाविद्यालयाचे प्राचार्य कोण आहेत आणि या संस्थेचे अध्यक्ष कोण आहेत, याची मला तत्पूर्वी कोणत्याही प्रकारची कल्पना नव्हती. पण गुणग्राहकतेच्या बळावर माझी या परिसराशी व या संस्थेशी कोणत्याही प्रकारची ओळखपाळख नसताना संस्थेचे अध्यक्ष सुरेशभाऊ यांनी मला आपल्या संस्थेमध्ये वरिष्ठ महाविद्यालयात अधिव्याख्याता पदावर निवडले. संस्थेचे अध्यक्ष या नात्याने आपल्या महाविद्यालयात अधिव्याख्याता पदावर लागणारा उमेदवार हा गुणवत्तापूर्ण, अभ्यासू व सुयोग्य स्वरूपाचा असावा, हे लक्षात घेऊन सुरेशभाऊ यांनी माझ्यासारख्या सर्वस्वी अपरिचित व अनोळखी व्यक्तीची निवड आपल्या महाविद्यालयात केली. सुरेशभाऊ यांच्या गुणग्राहक व समतोल दृष्टीने मी भारावून गेलो. तेव्हापासून त्यांच्याबद्दल माझ्या मनात एक वेगळ्याच प्रकारची आदराची प्रतिमा निर्माण झाली. माझ्यासारख्या या परिसराशी सर्वस्वी अनोळखी असणाऱ्या एका होतकरू व्यक्तीला त्यांनी जी संधी

प्रदान केली, ती संधी माझ्याकरिता अतिशय महत्त्वाची ठरली. या मुलाखतीच्या रूपातून आणि त्यानंतर झालेल्या नियुक्तीच्या रूपातून माझ्या मनामध्ये सुरेशभाऊ यांची जी एक अतिशय उदार, गुणग्राहक, समतोल आणि अभ्यासगुणांची कदर करणारे शिक्षणकारणी, ही जी प्रतिमा तयार झाली, ती प्रतिमा पुढे आतापर्यंत अगदी जशीच्या तशी कायम राहिलेली आहे.

यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे अधिव्याख्याता म्हणून माझ्या नियुक्तीचा हा घटनाप्रसंग मला येथे सविस्तर उल्लेखित करणे आवश्यक वाटले. हा प्रसंग सुरेशभाऊ यांच्या गुणग्राहक वृत्तीला व अकादमीक गुणवत्तेची कदर करणाऱ्या व्यक्तिमत्वाला अधोरेखित करणारा आहे. आपल्या संस्थेला आणि संस्थेतील महाविद्यालयाला पुढे न्यायचे असेल तर त्याकरिता गुणवत्तेची कदर केली पाहिजे आणि ही गुणवत्ता पाहत असताना कोणत्याही प्रकारच्या आपपरभावाला आणि जवळचा अथवा दूरचा या बाबींना बाजूला ठेवले पाहिजे, हा सुरेशभाऊंच्या व्यक्तिमत्वाचा गुणधर्म मला अतिशय संस्मरणीय वाटतो. आपल्या शिक्षणसंस्थेला व आपल्या महाविद्यालयांना पुढे नेण्यासाठी व्यक्तीच्या एकंदर गुणवत्तेला सर्वाधिक महत्त्व दिले पाहिजे, ही त्यांची विचारदृष्टी मला विशेष महत्त्वाची वाटली आहे. सुरेशभाऊ यांच्या मनाची उद्दात्तता, उदारता व विशालता मला यशवंत ग्रामीण संस्थेतील महाविद्यालयांत काम करताना पुढे सतत अनुभवास आली.

यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे मराठी विषयाचा अधिव्याख्याता या पदावर माझी झालेली निवड ही नियमित स्वरुपाची जरी असली, तरी ती लीन पिरेड करता होती. पुढे लवकरच या शिक्षण संस्थेच्या यशवंत महाविद्यालय, सेलू येथे मराठी विषयाची नियमित व पूर्णकालीन जाहिरात आली. यशवंत महाविद्यालय, वर्धा येथील माझ्या नोकरीच्या काळात महाविद्यालयाचे प्राचार्य व पदाधिकारी यांना माझ्या एकंदर व्यक्तित्वाबद्दल, स्वभावाबद्दल, अध्यापनाबद्दल व अभ्यासाबद्दल पूर्णपणे कल्पना आली होती. त्यामुळे संस्थेकडून यशवंत महाविद्यालय, सेलू येथे मराठी विषयाच्या पूर्णकालीन व नियमित अशा वरिष्ठ महाविद्यालयीन अधिव्याख्याता पदाकरिता वर्षभरात पुनश्च एकदा मुलाखत घेतली गेली आणि तेथे माझी नियुक्ती केली गेली. ही नियुक्तीदेखील सुरेशभाऊ यांच्या गुणग्राहक व डोळस दृष्टीतून घडली होती. तसेच ती यशवंत महाविद्यालय, वर्धा येथील प्राचार्य वसंतराव घोरपडे आणि यशवंत महाविद्यालय सेलू येथील प्राचार्य डॉ. बी. जे. हाडकेया दोन्ही महाविद्यालयातील सुजाण प्राचार्यांच्या पारखी व नीरक्षीरविवेकी वृत्तीतून घडली होती.

या प्रकारे यशवंत महाविद्यालय, वर्धा आणि यशवंत महाविद्यालय, सेलू या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या दोन्ही महाविद्यालयांत मला वरिष्ठ महाविद्यालयीन अधिव्याख्याता होता आले. हे सर्व घडले, ते म्हणजे सुरेशभाऊ यांच्या उदार, शालीन, गुणवत्ताप्रेमी व समाजमनस्क दृष्टिकोनामुळे होय. या कालखंडात माझे वास्तव्य वर्धा येथे होते. संस्थेचे अध्यक्ष या नात्याने सुरेशभाऊंचे सतत महाविद्यालयामध्ये येणे असायचे. त्यांच्या कुशल मार्गदर्शनात महाविद्यालयांचे कामकाज चालत असे. ते महाविद्यालयात आले की आम्हाला (म्हणजे बाकीच्या अन्य सहकारी प्राध्यापकासह मलादेखील) सामूहिक पातळीवरील त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळत असे. त्यांच्या या मार्गदर्शनातून सुरेशभाऊंचे व्यक्तित्व मला अधिकाधिक उलगडत गेले आणि त्यामुळे त्यांच्याबद्दलचा माझ्या मनातील आदरभाव अधिकाधिक वृद्धिंगत होत गेला. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था या संस्थेने संचालित केलेल्या यशवंत महाविद्यालय, वर्धा आणि यशवंत महाविद्यालय, सेलू या दोन्ही महाविद्यालयांमध्ये अधिव्याख्याता म्हणून काम करताना सुरेशभाऊंचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्तृत्व तसेच त्यांचे सामाजिक कार्य मला बाकीच्या सहकारी प्राध्यापकांसह अतिशय जवळून पाहता आले. त्यामधून आमच्या मनातील त्यांची प्रतिमा अधिकाधिक विस्तारत गेली.

सुरेशभाऊ यांच्या व्यक्तिमत्त्वातील सहृदय व समाजमनस्क शिक्षणकारणी मला त्यांच्या शिक्षणसंस्थेतील नोकरीच्या काळात खूप जवळून पाहता आला आहे. माझ्या नजरेसमोर येणारे सुरेशभाऊ हे त्यांच्या संबंधीच्या काही ठळक घटना प्रसंगांतून माझ्या मनात अधिकाधिक मोठे होत गेले आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सहृदयता, संवेदनशीलता व सामाजिकता प्रगट करणारे काही लक्षणीय प्रसंग हे माझ्या मनात कायमचे वसलेले आहे. अर्थात हे प्रसंग केवळ माझ्यापुरते वैयक्तिक स्वरूपाचे आहेत असे अजिबात नाही. किंबहुना हे वैयक्तिक असे नाहीतच. हे प्रसंग यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेमध्ये, त्यातल्या त्यात या संस्थेच्या महाविद्यालयांमध्ये, त्यातही वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये अध्यापन करणाऱ्या सर्व प्राध्यापकांना व कर्मचाऱ्यांना अनेकदा अनुभवास आले आहेत.

सुरेशभाऊ हे यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेला आणि या संस्थेतील विविध महाविद्यालयांना विचारपूर्वक पुढे नेणारे असे शिक्षणकारणी राहिले आहेत, याचा अनुभव मला खुपदा घेता आला. यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे आणि पुढे यशवंत महाविद्यालय, सेलू येथे नोकरी करताना सुरेशभाऊ यांना मला (व आम्हा सर्व नवोदित सहकारी प्राध्यापकांना) अनेकदा जवळून पाहता आले. अर्थात सुरेशभाऊंना आमचे हे पाहणे जवळून जरी असले, तरी ते काहीसे दुरूनच होते. त्यांच्याबद्दल आमच्या मनात एक प्रकारची आदरयुक्त भीती असल्यामुळे आम्ही विशिष्ट अंतर ठेवूनच त्यांच्याकडे पाहत होतो. त्यांच्याशी प्रत्यक्षपणे बोलण्याचे वा प्रत्यक्ष भेटण्याचे अथवा प्रत्यक्ष संवाद करण्याचे प्रसंग अगदी कमी आले. कारण मी (व आम्ही) त्यांच्या महाविद्यालयातील अगदी नवीन प्राध्यापक होतो. त्यांना प्रत्यक्ष भेटण्याइतकेआम्ही वयाने व सेवेने जेष्ठ नव्हतो. आपण आपले महाविद्यालयातील प्राचार्यांनी, विभागप्रमुखांनी व जेष्ठ प्राध्यापकांनी नेमून दिलेले निर्धारित काम वेळेच्या आत एकनिष्ठेने करायचे आणि वर्गातील अध्यापन व तत्संबंधित कामकाज प्रामाणिकपणे पार पडायचे, याप्रकारे माझे (व आम्हा सहकारी प्राध्यापकांचे ) कार्य सुरू असे. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयविषयक कामकाजासाठी व त्यासंबंधीच्या ठळक सभांसाठी सुरेशभाऊ महाविद्यालयात काही प्रसंगी येत असत.याबरोबरच ते महाविद्यालयातील महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या निमित्ताने तर कधी उद्घाटक म्हणून, तर कधी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहत असत. त्याप्रसंगी त्यांना आम्हा नवोदित प्राध्यापकांना जवळून पाहता येत असे.

सुरेशभाऊ महाविद्यालयामध्ये सभेकरिता किंवा काही निमित्ताने येणार असल्याची कल्पना आम्हाला काही वेळापूर्वी येत असे. त्यांच्या येण्याची आम्हाला आधीच चाहूल लागत असे, असेच म्हणावे लागेल. कारण सुरेशभाऊ महाविद्यालयामध्ये येणार असले की, महाविद्यालयाच्या कार्यालयात व महाविद्यालयाच्या प्रांगणात एक वेगळेच चैतन्य वाहत असे. महाविद्यालयाच्या प्राचार्यांपासून व ज्येष्ठ प्राध्यापकांपासून तर कार्यालयातील लिपिकांपर्यंत व चपराश्यांपर्यंत, सर्वांच्या चेहऱ्यावर एक वेगळ्याच प्रकारचा उत्साह ओसंडत असे. कार्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या एका विशिष्ट प्रकारच्या शिस्तीतील लगबगीवरून आम्हाला अंदाज येत असे की, सुरेशभाऊ आज महाविद्यालयात येणार आहेत. सुरेशभाऊ महाविद्यालयात आले की, आम्ही त्यांना मोठ्या उत्सुकतेने न्याहाळत असू. त्यांच्या देहबोलीला, त्यांच्या वागण्याबोलण्याला आम्ही कुतूहलाने पाहत असू. ते काय बोलतात व काय सूचना सांगतात, ते समजून घेण्याचा आम्ही प्रयत्न करत असू. सुरेशभाऊ यांची मुख्य सभा संपली की, मग ते अनेकदा महाविद्यालयातील प्राध्यापकांशी सहज म्हणून संवाद साधत असत. महाविद्यालयातील अध्यापनाचे कार्य कशा प्रकारे सुरू आहे, हे ते समजून घेत असत महाविद्यालयात काही अडचणी तर नाहीत ना? याची ते विचारणा करीत असत. महाविद्यालयाच्या विकासासाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी काही नावीन्यपूर्ण उपक्रम राबविता येतील काय? याविषयी ते जाणत्या प्राध्यापकांशी चर्चा करीत असत. याबरोबरच ते प्राध्यापकांना आस्थेने त्यांची ख्यालीखुशाली विचारत असत.

सुरेशभाऊंचे महाविद्यालयातील प्राध्यापक व अन्य कर्मचारी यांच्याशी संवाद साधले जाणे हे मोठे आनंददायी स्वरूपाचे असायचे. भाऊ आम्हा सर्वांशी संवाद साधत आहेत, ही जाणीव सर्व कर्मचाऱ्यांसाठी व विशेषत: आम्हा नवोदित प्राध्यापकांसाठी अतिशय आल्हाददायक स्वरुपाची असायची. त्यांच्या वाणीतील मृदुपणा आम्हाला मोठा जिव्हाळ्याचा वाटायचा. त्यांचे स्मितहास्य आम्हाला मोठे आश्वासक वाटत असे. त्यांच्या मार्गदर्शनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य हे असायचे की, त्यांच्या बोलण्यात कोणत्याही प्रकारचा अधिकारवाणीचा भाग नसे. आपण काही या संस्थेचे व महाविद्यालयाचे सर्वेसर्वा आहोत, या प्रकारच्या भूमिकेतून ते कधीही बोलत नसत. आपण सर्व या महाविद्यालयाचे महत्त्वाचे घटक आहात व आपणास महाविद्यालयाला एकोप्याने व सामूहिकपणे पुढे न्यायचे आहे, या भूमिकेतून ते सर्वांसोबत संवाद साधत असत.

सुरेशभाऊ यांचे ठळक सभांच्या अथवा अन्य महत्त्वपूर्ण कार्यक्रमांच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये येणे आमच्यासाठी मोठे प्रेरक ठरत असे. या प्रसंगी त्यांचे आम्हा सर्व प्राध्यापकांना सामूहिक पातळीवर मार्गदर्शन लाभत असे. त्यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांना दिलेला हितोपदेश मोठा प्रेरणादायी असे. सुरेशभाऊ यांचे महाविद्यालयविषयक व्यवस्थापन अतिशय सचोटीचे व स्वच्छ स्वरूपाचे होते. सुरेशभाऊंनी महाविद्यालयातील प्राध्यापकांना कधीच वैयक्तिक कामाकरिता गुंतवले नाही. महाविद्यालयामध्ये अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांना जास्तीत जास्त मोकळेपणाने काम करू देण्याची मुभा त्यांनी सर्वांना उपलब्ध करून दिली. महाविद्यालयातील प्राध्यापकांची स्वतंत्रता त्यांनी सतत जपली.

महाविद्यालय हे शिक्षणाचे केंद्र असावे आणि हे केंद्र जास्तीत जास्त गुणवान प्राध्यापकांनी समृद्ध व्हावे, ही त्यांची भूमिका होती. या भूमिकेच्या अनुसार ते महाविद्यालयाचे पालकत्व निभावत होते. महाविद्यालयामध्ये होणाऱ्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमांच्या प्रसंगी सुरेशभाऊ मितभाषीपणे सर्वांना उपदेश करायचे. त्यांचा उपदेश विद्यार्थ्यांच्या व सर्वांच्याच कल्याणाच्या भावनेतून व्यक्त होत असे. सुरेशभाऊ अतिशय मृदू भाषेमध्ये आपले विचार मांडत असत. त्यांच्या बोलण्यातील सौम्यता आम्हाला खूप सुखावून जात असे. त्यांचा निगर्वीपणा मनाला खूप भावत असे. त्यांच्या वागण्या–बोलण्यातील साधेपणा व सरळपणा लक्षणीय स्वरूपाचा असे. सुरेशभाऊ यांच्या सौम्यपणाचा, साधेपणाचा व सरळपणाचा कोणी कदाचित नकळतपणे गैरफायदा तर घेणार नाही ना? अशी शंकादेखील मनाला सहज चाटून जात असे. आपल्या संस्थेला आणि आपल्या महाविद्यालयाला जास्तीत जास्त मोठे करण्यासाठी आपण सर्वांनी तनामनाने काम केले पाहिजे, ही सुरेशभाऊंची कामना असे. आपल्या संस्थेच्या व महाविद्यालयाच्या परिसरातील विद्यार्थ्यांना पुढे आणण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांना सतत उपक्रमशील राहिले पाहिजे, अशी त्यांची आम्हा सर्वांकडून अपेक्षा असे. आम्ही देखील त्यांच्या कसोटीला उतरण्याचा पुरेपूर प्रयत्न करीत असू. आपल्या महाविद्यालयाला अधिकाधिक नावलौकिक कशाप्रकारे मिळवून देता येऊ शकेल आणि येथील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करता येईल, यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील होतो.

सुरेशभाऊंना आपल्या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वेगळेपणाची जाणीव होती. दाआजींनी या संस्थेची निर्मिती सर्वसामान्य समाजाच्या व बहुजन वर्गाच्या शैक्षणिक विकासासाठी आणि त्याआधारे त्यांच्या उपेक्षित जीवनाला नवा आकार देण्यासाठी केलेली आहे, हे ते पुरेपूर जाणून होते. सुरेशभाऊ या संस्थेने चालवलेल्या सर्व शाळांकडे व महाविद्यालयांकडे मोठ्या ध्येयवादी दृष्टीतून पाहत असत. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांकडून त्यांच्या मोठ्या अपेक्षा होत्या. त्यांच्या या अपेक्षा वैयक्तिक स्वरूपाच्या नव्हत्या. त्यांच्या अपेक्षा या सामूहिक स्वरूपाच्या होत्या आणि त्या सामाजिक आशयाच्या होत्या. या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी तसेच येथील सर्व कर्मचाऱ्यांनी सामूहिक स्वरूपात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले, तर या संपूर्ण परिसरामध्ये शैक्षणिक परिवर्तन घडू शकेल, यावर त्यांचा विश्वास होता. सुरेशभाऊ यांच्या प्राध्यापकांबरोबरच विद्यार्थ्यांकडून देखील मोठ्या अपेक्षा असायच्या. ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन पुढे येणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांच्या मनात विशेष आपुलकी होती. हे ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुढे येणारे बहुजन वर्गातील, सर्वसामान्य समाजातील, तळपातळीच्या घटकांतील, अठरापगड जातींतील, अभावग्रस्त स्तरांतील विद्यार्थी आणखी गतीने समोर आले पाहिजेत आणि त्यांच्यासाठी आपण सर्व प्रकारच्या सोयी–सुविधा पुरविल्या पाहिजेत, अशी त्यांची समाजमनस्क विचारदृष्टी होती.

सुरेशभाऊ यांचा ग्रामीण भागातील सर्व स्तरांतील व सर्व थरांतील विद्यार्थ्यांवर विशेष लोभ होता आणि ते स्वाभाविकच म्हटले पाहिजे. ज्या ग्रामीण भागातून ते पुढे आले होते आणि ज्या उद्देशातून त्यांच्या शिक्षण संस्थेची स्थापना झालेली होती, त्या ग्रामीण भागातील समाजजीवनाचा सर्वांगीण विकास करण्याचा त्यांचा ध्यास होता. आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे पुढे आले पाहिजेत, असे त्यांना वाटत असे. या ग्रामीण विद्यार्थ्यांना नव्यानेच मिळालेल्या शिक्षणाच्या संधीचे त्यांनी सोने केले पाहिजे. अशा प्रकारची अपेक्षा सुरेशभाऊ यांच्या भाषणातून व त्यांच्या उपदेशातून व्यक्त होत असे. त्यांची भाषणे ही केवळ विद्यार्थ्यांकरिता महत्त्वाची नसतात, तर आम्हा नवोदित प्राध्यापकांसाठी देखील ती तितकीच प्रेरक ठरत असत.

महाविद्यालयामध्ये नव्याने लागलेल्या प्राध्यापकांकडून सुरेशभाऊ यांच्या मोठ्या अपेक्षा असायच्या. या प्राध्यापकांनी यशवंत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला पाहिजे आणि अतिशय सक्षम अशा प्रकारचे विद्यार्थी या महाविद्यालयातून घडविले पाहिजेत, ही अपेक्षा ते सतत बोलून दाखवत. आम्हीदेखील आमच्या परीने भाऊंच्या कसोटीला उतरता कसे येईल, याचा प्रयत्न करीत होतो. सुरेशभाऊंनी आपल्या महाविद्यालयांत ग्रंथालय व वाचनकक्ष यांना विशेष स्थान दिले. यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे त्यांनी अतिशय भव्य व सर्व प्रकारच्या ग्रंथालयीन साधन–सुविधांनी युक्त असे ग्रंथालय तयार केले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून त्यांनी या गुणवत्तापूर्ण ग्रंथालयाची निर्मिती करवून घेतली. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे ग्रंथ व त्या ग्रंथांच्या अध्ययनासाठी विस्तृत असे वाचनकक्ष प्राप्त व्हावे, म्हणून त्यांनी ग्रंथालयाची एक स्वतंत्र अशी सुरेख व सुबक इमारत उपलब्ध करून दिली. एखाद्या महाविद्यालयात

केवळ ग्रंथांसाठी व विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी एक स्वतंत्र अशी ग्रंथालयाची इमारत असावी, ही त्यांची आजपासून तीस वर्षांपूर्वीची दूरदृष्टी आजच्या काळात मोठी मूल्यनिष्ठ मानावी लागते. या ग्रंथालयामध्ये प्राध्यापकांनी आणि विद्यार्थ्यांनी सतत अध्ययन करावे आणि त्या अध्ययनातून आपल्या शैक्षणिक गुणवत्तेला वाढवावे ही त्यांची भूमिका होती. त्यामुळेच सुरेशभाऊ यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून उत्तमोत्तम अशा प्रकारच्या ग्रंथांचा संग्रह महाविद्यालयामध्ये निर्माण केला गेला.महाविद्यालयाच्या सर्व प्रकारच्या समृद्धीविषयीची अपेक्षा महाविद्यालयांचे प्राचार्य जाणून होते. सुरेशभाऊंनी वर्धा येथील यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य वसंतराव घोरपडे व सेलू येथील यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य बी. जे. हाडके यांना महाविद्यालयाच्या विकासासाठी मुक्तपणे स्वातंत्र्य दिले होते. पुढील कालखंडात प्राचार्य डॉ. विलासराव देशमुख यांना सुरेशभाऊ यांच्या मार्गदर्शनात स्वतंत्रपणे व मुक्तपणे महाविद्यालयाचा विकास करता आला. विद्यार्थ्यांच्या आणि प्राध्यापकांच्या वृद्धीसाठी सुरेशभाऊ यांनी आपला हात मोकळा व सढळ असा ठेवला होता. महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना सगळ्या प्रकारच्या शैक्षणिक संधी मिळाव्यात याची त्यांनी पुरेपूर काळजी घेतली होती.

सुरेशभाऊ यांच्याकडे यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा दाआजी म्हणजेच बापुरावजी यांच्याकडून चालत आलेली होती. दाआजीच्या शैक्षणिक, सामाजिक व अन्य कामकाजाचा वारसा त्यांना पुढे चालवणे क्रमप्राप्त होते आणि पुढे तो त्यांनी दाआजीनंतर मोठ्या निष्ठेने सांभाळला. सुरेशभाऊ यांचे एकंदर व्यक्तिमत्व दाआजी यांच्या विचारकार्यावर पोसले गेले होते. त्यांच्या विचारांच्या संस्कारांना जपत ते त्यांचा वारसा पुढे नेत गेले. दाआजीबद्दलचा त्यांच्या मनातील आदरभाव हा प्रचंड मोठा असा होता. दाआजी यांचा जन्मदिवस आणि त्यांचा पुण्यतिथी दिवस हे त्यामुळेच सुरेशभाऊ यांच्याकरिता मोठे संस्मरणीय दिवस होते. एकंदर यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी देखील ते स्मरणीय असे दिनविशेष होते. दाआजी यांची स्मृती सुरेशभाऊ यांनी सतत जपली आणि जोपासली. दाआजी यांच्या पुण्यस्मरणाचा कार्यक्रम सेवाग्राम येथे बापुरावजी देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विस्तीर्ण प्रांगणाजवळ आजही होतो. तेथे दाआजी यांची भव्य अशी समाधीस्थळ सुरेशभाऊ यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी तयार केले आहे. दाआजींच्या पुण्यस्मरणाच्या कार्यक्रमानिमित्ताने महाविद्यालयातील आम्ही सर्व प्राध्यापक मंडळी त्या ठिकाणी प्रत्येक वर्षी जात असू व त्यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेत असू. या कार्यक्रमामध्ये सर्वधर्मीय प्रार्थना होत असे. या निमित्ताने त्यांची स्मृती सतत जपण्याचा सामूहिकपणे प्रयत्न होत असे. त्या पुण्यतिथीच्या दिवशी सेवाग्रामच्या त्या समाधीस्थळ परिसरातील वातावरण एका वेगळ्याच प्रकारच्या गूढ मांगल्याने भारलेले असायचे. पावसाळा ऋतूची सुरुवात होण्याच्या कालखंडातील हा दाआजी यांचा स्मृतिदिवस सर्वांच्या मनाला भावविभोर करून टाकायचा. संपूर्ण वातावरणातील नानाविध फुलांच्या पाकळ्यांचा सुवास मनाला भारून टाकायचा. त्यामध्ये दाआजींच्या कार्याचा स्मृतिसुगंध मिसळलेला असायचा. आपल्या वडिलांच्या कार्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्या आणि त्यांच्या स्मृतींना आपल्या मनामध्ये अविरत जपणाऱ्या सुरेशभाऊंच्या मनाचे उदात्तपण आम्हाला या दिवशी विशेषत्वाने दिसायचे. या स्मृतिदिवशी सुरेशभाऊ यांच्या मनाचे पितृप्रेम आणि त्यांच्या मनातील पितृभक्ती आम्हा सगळ्यांना समरसून पाहता आली आहे. दाआजी यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी सुरेशभाऊ यांच्या व्यक्तिमत्त्वातील निरागस असा पितृभक्तीचा गुणधर्म आम्हा सगळ्यांना अतिशय जवळून पाहता आला आहे. सुरेशभाऊ यांच्याकरिता दाआजी यांच्या स्मृती सतत प्रेरक ठरलेल्या होत्या. त्यांच्या व्यक्तित्वामध्ये हा दाआजींच्या पुण्यस्मरणाचा भाग आणि त्यांच्या कार्याला पुढे नेण्याचा भाग अतिशय महत्त्वाचा असा ठरला आहे. आम्हा सर्वांना सुरेशभाऊ यांची ही पितृभक्ती आणि त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणारी त्यांची दृष्टी सतत प्रेरक वाटत आली आहे.

ग्रामीण भागातील अभावग्रस्त समाजाला आरोग्याच्या सुविधा देण्याचा भाग सुरेशभाऊ यांच्या सतत चिंतेचा विषय राहिला. आपल्या परिसरातील लोक हे शिक्षणसंपन्न असावे त्याचप्रमाणे ते आरोग्यसंपन्न असावे, असे त्यांना नेहमी वाटत आले आहे. वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण समाजाच्या आरोग्याची काळजी घेण्याचा भाग त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक लक्षणीय पैलू आहे. त्यामुळेच त्यांनी आपल्या महाविद्यालयात काही आरोग्य शिबिरांचे आयोजन केले. त्यांनी यशवंत महाविद्यालय, सेलू येथे आयोजित केलेले हृदयरोग निदान शिबिर अद्याप माझ्या स्मरणात आहे. श्रद्धेय बापुरावजी देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरेशभाऊ यांनी या महाविद्यालयात हृदयरोग निदान व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले होते. या

शिबिराच्या आयोजनासाठी त्यांनी स्वतः जातीने लक्ष घातले होते. या शिबिरातील आरोग्यसेवेचा निःशुल्कपणे लाभ घेणाऱ्या लोकांसाठी चांगल्या प्रकारची व्यवस्था पुरवण्यासाठी सुरेशभाऊ वैयक्तिकरीत्या झटल्याचे आम्हाला पाहता आले आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या गरजू लोकांकरिता हृदयरोगाच्या निदानासाठी त्यांनी महाविद्यालयात दूरवरून निष्णात हृदयरोगतज्ञ असे डॉक्टर्स आमंत्रित केले होते. आपल्या परिसरातील अभावग्रस्त लोकांना आरोग्यविषयक मदत करण्यासाठी तत्पर असणारे सुरेशभाऊ आम्हाला या शिबिराच्या रूपातून पाहता आले. या शिबिराच्या रूपातून समाजानिष्ठ शिक्षणतज्ञाचे आम्हाला प्रकर्षाने दर्शन घडत गेले. या आरोग्य शिबिराच्या रूपातून सुरेशभाऊ यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांना व तेथील कर्मचाऱ्यांना आरोग्य संबंधांमध्ये संवेदित करण्याचे कार्य केले. हृदयरोगासारख्या अतिशय महागड्या रोगाच्या संबंधात उपाययोजना करण्यासाठी त्यांनी दातृत्वभावनेतून पुढाकार घेतला. या आरोग्य शिबिराच्या रूपातून सभोवतालच्या परिसरातील अनेकानेक गरजू लोकांची त्यांना निरलसपणे सेवा करता आली. आपल्या परिसरातील लोकांबद्दल सुरेशभाऊ यांच्या मनातील हा आत्मीयतेचा व दातृत्वाचा भाव आम्हाला मोठा प्रेरक वाटत आला आहे. सुरेशभाऊ यांच्या अंतःकरणात तेथील परिसरातील समाजाच्या लोकांच्या संबंधात किती व्यापक स्वरूपाची दृष्टी होती, याची प्रचिती आम्हाला त्यांनी आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरातून घेता आली आहे.

सुरेशभाऊ यांनी वर्धा जिल्ह्यामध्ये आणि त्यालगतच्या परिसरामध्ये काम करताना तेथील समाजासंबंधी व लोकजीवनासंबंधी नेहमी सकारात्मक विचार केला. आपण ज्या परिसरामध्ये जन्माला आलो आहोत, त्या परिसराचे आपण देणे लागतो, ही भावना त्यांच्या मनामध्ये सातत्याने वसलेली असल्याचे आम्हाला पाहता आले आहे. आपल्या परिसरासंबंधीचे आपले हे देणे प्रमुख स्वरूपाचे आहे, याची त्यांना विशेषत्वाने जाणीव होती. या विशेष जाणिवेतून सुरेशभाऊ हे सामाजिकतेचे व लोकनिष्ठेचे उपक्रम घेत असत. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेला ज्या लोकनिष्ठ भूमिकेतून दाआजी यांनी स्थापले होते, त्या भूमिकेला कसे विस्तारित करता येईल याचा ते विचार करीत असत. या विचारानुसार ते महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवित असत. त्यांच्या या सामाजिक दृष्टीच्या उपक्रमशीलतेसंबंधीच्या एक दोन आठवणी मला येथे नमूद कराव्याशा वाटतात.

सुरेशभाऊ यांच्या मनात वर्धा जिल्ह्याला व भोवतालच्या परिसराला आकार देणाऱ्या समाजसेवकांबद्दल विशेष आदरभाव राहिला आहे. महात्मा गांधीजी यांच्या प्रभावाने वर्धा जिल्ह्याला भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये केंद्रवर्ती स्थान राहिले आहे. यामधूनच या जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांना तसेच समाजसेवकांना देशाच्या व समाजाच्या सेवेमध्ये लक्षणीय योगदान देता आले. या स्वातंत्र्यसैनिकांच्या बाबत सुरेशभाऊ यांच्या मनात अतीव आदर आहे. आपल्या समाजातील जेष्ठ समाजसेवकांबद्दल त्यांच्या मनात मोठी कृतार्थतेची भावना राहिलेली आहे. सुरेशभाऊ यांच्या मनातील जेष्ठ समाजसेवकांबद्दलचा हा आदरभाव मला एका प्रसंगात खूप चांगल्या प्रकारे पाहावयाची संधी मिळाली. वर्धा जिल्ह्यातील ज्या समाजसेवकांनी निरलसपणे समाजाची सेवा केली होती, त्या समाजसेवकांचा गुणगौरव करण्यासाठी त्यांनी सेवाग्राम येथे एका फार मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हे आयोजन सेवाग्राम येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात केले गेले. यासाठी वर्धा जिल्हा जेष्ठ समाजसेवक सत्कार समिती स्थापली गेली. सुरेशभाऊ हे या समितीचे अध्यक्ष होते. वर्धा जिल्हा जेष्ठ समाजसेवकांचे आपण देणे लागतो या भावनेतून त्यांनी या कार्यक्रमाला आयोजित केले. या कार्यक्रमात वर्धा जिल्ह्यातील जेष्ठ समाजसेवकांचा गुणगौरव करण्यात आलेला हा कार्यक्रम खूप लक्षणीय असा झाला. त्यासाठी सुरेशभाऊ यांनी तनमनधन अर्पण करून खूप मेहनत केली. त्यासाठी त्यांनी विविध प्रकारच्या कार्यक्रमांची आखणी केली. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेद्वारा संचालित विविध महाविद्यालयांच्या प्राध्यापकांना त्यांनी या कार्यक्रमासाठी क्रियाशील बनवले. या जेष्ठ समाजसेवकांच्या समाजसेवेसंबंधीच्या आठवणी सर्वांच्या संग्रही असाव्यात आणि त्यांच्या या आठवणींतून तरुण वर्गाला सदोदित प्रेरणा मिळावी, या हेतूने वर्धा जिल्ह्यातील जेष्ठ समाजसेवकांच्या आठवणी व अनुभव संकलित करण्याचा मनोदय व्यक्त केला. वर्धा जिल्ह्याला ज्या समाजसुधारकांनी समृद्ध केले, त्यांच्या अनुभवाना उजाळा देणे, त्यांच्या मुलाखती घेणे आणि त्यामधून सर्व लोकांना समाजनिष्ठेची प्रेरणा देणे, या भूमिकेतून त्यांनी एका फार मोठ्या कार्यक्रमाची आखणी केली. त्यानुसार या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू झाली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने या जेष्ठ समाजसेवक व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते यांच्या मुलाखतीचा विशेषांक काढण्याची जबाबदारी प्राचार्यांकडे आली. या विशेषांकासाठी आवर्जून समाजाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान

दिलेल्या ज्येष्ठ समाजसेवकांच्या मुलाखत घेण्याचे ठरले. त्यातील काही मुलाखतींचे काम माझ्याकडे आले होते. या कामाच्या निमित्ताने मला स्वतःला सुरेशभाऊ यांच्याशी एकदोन वेळेस संवाद साधता आला. या संवादादरम्यान सुरेशभाऊ यांच्या मनात वर्धा जिल्ह्याला आकार देणाऱ्या व या जिल्ह्याला नावलौकिक मिळवून देणाऱ्या समाजसेवकांच्याबद्दल त्यांच्या मनात किती ओतप्रोत आदरभाव भरला आहे, हे मला प्रत्यक्षपणे अनुभवता आले. सुरेशभाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली मला वर्धा जिल्यातील काही समाजसेवकांच्या मुलाखती मला घेता आल्या आणि त्यांचे या विशेषांकात संकलन करता आले. या निमित्तातून सुरेशभाऊ यांच्या समाजशील व उदात्त अंत:करणाची अधिक जवळून ओळख झाली. आपल्या संपूर्ण जिल्ह्याला आणि आपल्या परिसराला ज्या ज्येष्ठ समाजसेवकांनी घडविण्याचा प्रयत्न केला, त्या समाजसेवकांच्या आठवणी एकत्रित करून त्यांच्याबद्दलचा आदरभाव व्यक्त करण्याची ही भूमिका या क्षणी मला येथे विशेष उल्लेखनीय वाटते. आपल्या सभोवतालचे वातावरण मंगलकारक करणाऱ्या व्यक्तित्वांचे मोठेपण समाजासमोर मांडण्याचा हा सुरेशभाऊंचा गुणधर्म येथे उल्लेखनीय वाटतो. आपल्या समाजामध्ये जे जे काही महत्त्वाचे समाजसेवक आहेत, त्यांच्याबद्दलचा नम्र कृतज्ञताभाव मनात कायम ठेवणे व त्या कृतज्ञताभावाला प्रसंगविशेषी व्यक्त करणे, ही सुरेशभाऊंची दृष्टी लक्षणीय ठरते. सुरेशभाऊंच्या मनाचा हा मोठेपणा मला स्वतःला त्यांच्या एकंदर कार्यकर्तृत्वातून चांगल्या प्रकारे पाहता आला आहे.

आपल्या शिक्षण संस्थेमध्ये जे प्राध्यापक कार्य करतात, त्या प्राध्यापकांची कार्यक्षमता अधिकाधिक वाढली पाहिजे, हा सुरेशभाऊंचा ध्यास राहिला आहे. आपल्या शैक्षणिक संस्थेमध्ये काम करणारे प्राध्यापक ज्ञानाच्या दृष्टिकोनातून अद्ययावत असावेत अशी त्यांची कायमची मनीषा राहिली आहे. सुरेशभाऊ यांनी वर्धा जिल्हा जेष्ठ समाजसेवक सत्कार समितीच्या वतीने एका अतिशय महत्त्वाच्या विषयावर यासंदर्भात एका अतिशय महत्त्वाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्या कार्यक्रमाचा मला येथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. आपल्या शिक्षण संस्थेमध्ये वेगवेगळ्या महाविद्यालयांमध्ये जे काही प्राध्यापक कार्य करत आहेत, ते प्राध्यापक एका विचारपीठावर आले पाहिजेत आणि त्यामधून आपल्या शिक्षणसंस्थेच्या सर्व महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या ज्ञानामध्ये आदान–प्रदानाची प्रक्रिया घडली पाहिजे, अशी सुरेशभाऊंची कायम भूमिका होती. शिक्षणव्यवस्थेमध्ये जे काही नवे प्रवाह आहेत, हे नवे प्रवाह आपल्या सर्व प्राध्यापकांना एकत्रितपणे कळावेत आणि त्यासंबंधी व्यापक चर्चा व्हावी, या हेतूने सुरेशभाऊ यांनी सेवाग्राम येथे बापुराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आपल्या शिक्षणसंस्थेतील सर्व प्राध्यापकांचा एक परिसंवाद आयोजित केला. सुरेशभाऊ यांच्या अध्यक्षतेखाली सिद्ध झालेल्या वर्धा जिल्हा जेष्ठ समाजसेवक सत्कार समितीद्वारे हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाच्या कार्यवाहीमध्ये यशवंत ग्रामीण संस्थेची महाविद्यालये केंद्रवर्ती होती. या वेळेस मी यशवंत महाविद्यालय, सेलू येथे कार्यरत होतो आणि या परिसरासाठी सुरेशभाऊंच्या मार्गदर्शनात संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयातील एक आणि कनिष्ठ महाविद्यालयातील एक अशा दोन प्राध्यापकांना निमंत्रित वक्ता म्हणून आमंत्रित केले होते. यानुसार महाविद्यालयाने वरिष्ठ महाविद्यालयातून माझी निवड केली होती. शिवाय महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या संस्थांतील नामांकित प्राध्यापकांना या परिसंवादासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्याप्रसंगी मला सेवाग्राम येथील बापुराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये महाविद्यालयातील त्या परिसरामध्ये सहभागी होता आले. त्या ठिकाणी सुरेशभाऊंनी सर्व प्राध्यापकांना अतिशय महत्त्वाचे असे मार्गदर्शन केले. यासंबंधीचा हेतू स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या परिसंवादाच्या निमित्ताने आपल्या शिक्षणसंस्थेमध्ये काम करणारे प्राध्यापक व कर्मचारी एकत्र यावेत आणि आपल्या शैक्षणिक व्यवस्थेमध्ये ज्या काही समस्या आहेत त्यांचे निराकरण व्हावे. आपल्या शिक्षणसंस्थेतील महाविद्यालये नवीन ज्ञानग्रहणाच्या व या ज्ञानाच्या आदानप्रदानाच्या संदर्भात जगाच्या मागे राहू नयेत आणि या नवीन ज्ञानप्रवाहांच्या आधारे आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांना उद्बोधित केले जावे, यावर त्यांनी खूप भर दिला. सुरेशभाऊ यांची ही दृष्टी आम्हाला अतिशय महत्त्वाची वाटली. आपल्या शिक्षणसंस्थेमध्ये काही मंडळी ग्रामीण महाविद्यालयात काम करतात, तर काही शहरी महाविद्यालयात काम करतात. काही पारंपरिक पद्धतीच्या महाविद्यालयामध्ये अध्यापन करतात, तर काही अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अध्यापन करतात. त्या सर्वच प्रकारच्या वेगवेगळ्या पातळीवर काम करणाऱ्या प्राध्यापकांमध्ये सुरेशभाऊ यांच्याकडून शैक्षणिक अभिसरण घडविण्याची प्रक्रिया मला या परिसंवादाच्या निमित्ताने फार जवळून पाहता

आली. आपल्या शिक्षण संस्थेमध्ये काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या कामाचे वैविध्य सुरेशभाऊ हे चांगल्या प्रकारे जाणून होते. या शैक्षणिक वैविध्याला विकसित केले पाहिजे आणि या वैविध्याचे विद्यार्थी हिताच्या दृष्टीतून आदानप्रदान केले पाहिजे. ही त्यांची दूरदृष्टी आजच्या काळाच्या पार्श्वभूमीवर लक्षणीय मानावी लागते. आपली शिक्षणसंस्था आणि आपल्या शिक्षण संस्थेतल्या विविध महाविद्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांमध्ये एक प्रकारचा ज्ञानात्मक संवादाचा भाग घडावा, ही सुरेशभाऊ यांची अपेक्षा खूप मौलिक स्वरूपाची मानावी लागते.

सुरेशभाऊ यांनी शिक्षण आणि समाज यांचे नाते आंतरिकरीत्या जोडून टाकले होते. हे नाते जोडत असताना वर्धा जिल्ह्यातील शेतकरी वर्गाच्या मुलाबाळांचा विचार त्यांनी सातत्याने केला. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेने जे काही महाविद्यालय काढले होते, ते सर्व महाविद्यालय या जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला केंद्रवर्ती ठेवून काढण्यात आले होते. यशवंत महाविद्यालय, वर्धा हे वर्धा शहरातील सर्वात महत्त्वाचे असे वरिष्ठ महाविद्यालय; देवळी येथील वरिष्ठ महाविद्यालय; सेलू येथील वरिष्ठ महाविद्यालय; ही तीनही महाविद्यालये सुरेशभाऊ यांच्या समाजनिष्ठ दृष्टिकोनातून अध्ययन व अध्यापन करणारी महाविद्यालये होती. या तीनही महाविद्यालयांमधून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार त्यांनी मध्यवर्ती मानला होता. दाआजी यांनी या परिसरातील अगदी शेवटच्या स्तरातील व तळागाळातील विद्यार्थ्याला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ह्या महाविद्यालयांची उभारणी केली होती. दाआजी यांच्या या दृष्टीचा विस्तार सुरेशभाऊ यांनी निष्ठापूर्वक केला. शाळा महाविद्यालयांत दिले जाणारे शिक्षण हे अंतिमतः येथील सर्वात खालच्या घटकाला विकसित करण्यासाठी कारणीभूत ठरले पाहिजे, या धारणाचा अंगीकार त्यांनी विचारपूर्वक केला. या तीनही वरिष्ठ महाविद्यालयांना (तसेच अन्य शाळा-महाविद्यालयांना) ग्रामीण भागातील व शहरी भागातीलही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी त्यांनी महत्त्वाचे मानले. या शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातील अविकसित समाजाला विकसित करण्यामध्ये त्यांच्या सर्वच महाविद्यालयांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. याचे श्रेय सर्वस्वी सुरेशभाऊ यांच्या समाजशील दृष्टीला जाते.

सुरेशभाऊ यांच्या समाजशील व विद्यार्थिनिष्ठ विचारदृष्टीला नजरेसमोर ठेवत यशवंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी या महाविद्यालयांना पुढे नेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. यशवंत महाविद्यालय वर्धा व यशवंत महाविद्यालय सेलू येथील प्राचार्य सुरेशभाऊ यांच्या समाजनिष्ठ व विद्यार्थी-केंद्री मनोभूमिकेला पूर्णता जाणून होते. या महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेले प्राध्यापकदेखील हे ओळखून होते. आधी दाआजी आणि त्यानंतर सुरेशभाऊ यांच्या तालमीत तयार झालेल्या या महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी व तेथील जेष्ठ प्राध्यापकांनी या महाविद्यालयात व त्यालगतच्या परिसरात वेगवेगळ्या प्रकारचे शैक्षणिक उपक्रम आणि प्रकल्प राबवले. या महाविद्यालयांत शिक्षण घेणारा विद्यार्थी हा कला, साहित्य व संस्कृती या क्षेत्रात निपुण व्हावा, यासाठी या महाविद्यालयातील प्राचार्य, जेष्ठ प्राध्यापक व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत नवोदित प्राध्यापक, हे सर्व सतत प्रयत्नशील राहिले. महाविद्यालयाद्वारे घेण्यात येणारे विविध प्रकारचे उपक्रम असोत, विविध प्रकारची शिबिरे असोत, विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा असोत, विविधरंगी वार्षिक स्नेहसंमेलने असोत की, विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम असोत, या विविधांगी स्वरूपाच्या कार्यक्रमांमधून व उपक्रमांमधून महाविद्यालयांची प्रतिमा कशी उंचावता येईल, यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सतत अग्रेसर राहत असत. त्यांच्यासोबत शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग देखील आपली कुमक देऊन उभा असे. हे सर्व सुरेशभाऊ यांच्या ध्येयनिष्ठ मार्गदर्शनाखाली होत असे. या महाविद्यालयांद्वारे आयोजित करण्यात येणारी विविध प्रकारची शिबिरे देखील वैशिष्ट्यपूर्ण असत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करता येईल. या महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलने व त्यातील विविध सांस्कृतिक कार्यक्रम हे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असत. या विविध कार्यक्रमांच्या आयोजनामागे सुरेशभाऊ यांच्या समाजशीलतेची कधी प्रगट तर कधी सुप्त अशी प्रेरणा असायची. या कार्यक्रमांमध्ये अनेकदा सुरेशभाऊ हे प्रत्यक्षपणे उपस्थित राहत नसले तरी या कार्यकमांच्या आयोजनामध्ये त्यांची अदृश्य स्वरूपात उपस्थिती असायची. हे विविध प्रकारचे उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या देखरेखीखाली संपन्न होत असली, तरी त्यामागील उद्दिष्टे ही सुरेशभाऊ यांच्या शिक्षणदृष्टीतूनच झिरपलेली असायची. या महाविद्यालयांत होणारे विविध प्रकारचे कार्यक्रम व उपक्रम हे सुरेशभाऊ यांच्या समाजमनस्क शिक्षणदृष्टीच्या प्रभावातून आकारास येत असत. आपल्या महाविद्यालयातील प्रत्येक उपक्रम हा अवतीभवतीच्या समाजपरिसराशी जुळलेला असावा आणि या उपक्रमांतून

समाजशील विद्यार्थी घडत जावा, हा सुरेशभाऊंचा शिक्षणविषयक ध्येयवाद महाविद्यालयांचे प्राचार्य आपल्या सहकारी प्राध्यापकांच्या साहाय्याने जोपासत आले होते. त्यामुळेच या सर्व महाविद्यालयांना सामाजिक उत्तरदायित्व असलेल्या महाविद्यालयांमध्ये रूपांतरित होता आले.

सुरेशभाऊ यांच्या ध्येयनिष्ठ व समाजनिष्ठ शैक्षणिक दृष्टीला पुढे नेण्यासाठी या महाविद्यालयांचे प्राचार्य आणि येथील प्राध्यापक यांचा वाटा तितकाच मोलाचा राहिला आहे. या महाविद्यालयांना कुशल प्राचार्यांची व नामवंत प्राध्यापकांची परंपरा राहिली आहे. प्राचार्य वसंतराव घोरपडे, प्राचार्य बी.जे. हाडके या प्राचार्यांनी तसेच आणखीही अन्य प्राचार्यांनी सुरेशभाऊ यांची शिक्षणविषयक भूमिका या महाविद्यालयांतून कार्यान्वित केली. पुढील कालखंडात प्राचार्य डॉ. विलासराव देशमुख यांनी महाविद्यालयाची धुरा चांगल्या प्रकारे सांभाळली. या महाविद्यालयांतील नामवंत प्राध्यापकांनी सुरेशभाऊ यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविण्याचे कार्य केले. डॉ. भा. कि. खडसे, डॉ. एम. एल. कासारे, प्रा. त्रिभुवन चरडे यांच्यासारख्या नामवंत प्राध्यापकांचा या संदर्भात विशेषत्वाने उल्लेख करता येईल. डॉ. विजय बोबडे, डॉ. विलास ढोणे इत्यादि प्राध्यापक तसेच आणखीही अन्य प्राध्यापक, या सर्वांनी सुरेशभाऊंच्या शिक्षणदृष्टीला सामूहिकपणे पुढे नेण्याचा करण्याचा प्रयत्न केला. यशवंत महाविद्यालयातील प्राचार्य, जेष्ठ प्राध्यापक, सहकारी प्राध्यापक व नवोदित प्राध्यापक या सर्वांची सामूहिक कामगिरी सुरेशभाऊ यांच्या शैक्षणिक ध्येयदृष्टीतून आकारास येत गेली होती. सुरेशभाऊ यांच्या सहृद्य व समाजशील मार्गदर्शनात यशवंत महाविद्यालयांना विद्यार्थी विकासाची प्रक्रिया पुढे नेता आली.

सुरेशभाऊ हे १९९५ ते २००४ या नऊ वर्षांच्या कालखंडात मला असे विविध रूपांतून पाहावयास मिळाले. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे काही ठळक पैलू मला या काळात प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात न्याहाळता आले. या कालखंडात त्यांच्या व्यक्तित्वाबद्दलचा माझ्या मनातील आदरभाव हा उत्तरोत्तर वाढत गेला. सुरेशभाऊ हे आता पंचाहत्तर वर्षांच्या टप्प्यावर उभे आहेत. आज सुरेशभाऊ यांच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने हा लेख लिहिताना माझ्या नजरेसमोर शांतचित्त, निगर्वी, उदार, प्रसन्न, हसतमुख, कार्यमग्न असे पंचवीस–तीस वर्षापूर्वी मी पाहिलेले व अनुभवलेले सुरेशभाऊ तरळत गेले आणि त्यातून माझ्या मनाला एक वेगळीच प्रसन्नता लाभत गेली. सुरेशभाऊ हे यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे, या शिक्षण संस्थेने चालवलेल्या सर्व शाळा–महाविद्यालयांचे आणि त्यांच्या सर्व अन्य संस्थांचे आनंदकंद आहेत. त्यांनी वाढवलेली व फुलवलेली ही शिक्षण संस्था ही विशाल वटवृक्ष मानली गेली आहे. या वटवृक्षाप्रमाणे असलेल्या या संस्थेची ख्याती संपूर्ण विदर्भात व त्याही पलीकडे संपूर्ण महाराष्ट्रात पसरली आहे. आणि मुख्य म्हणजे सुरेशभाऊ हेच आज आम्हा सर्वांसाठी विशाल वटवृक्ष झाले आहेत. सुरेशभाऊ यांचे हे विशालपण आम्हा सर्वांसाठी मोठे सुखद स्वरूपाचे आहे. आम्हा सर्वांसाठी विशाल वटवृक्षाप्रमाणे ठरलेल्या सुरेशभाऊंना त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने खूप खूप सदिच्छा! त्यांचे कार्यकर्तृत्व अधिकाधिक फुलारत राहो व त्यांना उत्तम आरोग्य व सुदृढ दीर्घायुष्य लाभो, ही शुभकामना!




# आज दाआजी हवे होते!

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

रंजल्या गांजल्याच्या तसेच उपेक्षितांच्या हक्कासाठी व त्यांच्या सेवेसाठी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले होते.

गमों की आँचपर आँसुओंको उबालकर तो देखो
जो बनेंगे रंग किसीपर डालकर तो देखो
तुम्हारे दिल की चुभन भी जरूर कुछ कम होगी
किसी केपैर से काँटा निकालकर तो देखो

ही बापू आणि विनोबा भावे ह्यांची शिकवण कायम आपल्या अंतःकरणातकोरून निष्काम, निरपेक्ष वृत्तीने वाटचाल करणारे थोर शिक्षणमहर्षी लोकनेते वंदनीय बापुरावजी उपाख्य दाआजी देशमुख ह्यांचे सुपुत्र सुरेशदादा देशमुख ह्यांच्या आयुष्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने त्यांचा गौरवग्रंथ प्रकाशित होत आहे. माझे जिवलग बालमित्र प्राचार्य डॉ. विलास देशमुख ह्यांनी त्या ग्रंथात माझे सुरेशदादाबद्दलचे मत प्रदर्शित करण्याची इच्छा व्यक्त केली, म्हणून मी त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची माहिती घेत होतो. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सुरेशदादांनी केलेल्या राजकारण, समाजकारण, शैक्षणिक, सामाजिक, सहकार तसेच इतर विविध कार्याचा आपल्या सिद्धहस्त लेखणीने घेतलेला आढावा खरोखरच थक्क करून सोडणारा आहे.

मातापिता के संस्कारों की, छाया सरपर जिनकेरहती है
पानी में तो क्या रेतपर भी, कश्ती उनकी बहती है

ह्या गोष्टीची प्रचिती मला दादांची कारकीर्द बघून येत आहे. त्यांच्या ह्या गौरवशाली वाटचालीच्या कौतुकाची सर्वांनीच मुक्तकंठाने स्तुती केली होती. पुन्हा पुन्हा तोच विषय आपणही कशाला घ्यावा, म्हणून मी त्यांच्या आयुष्याच्या अधोरेखित न झालेल्या विषयाचा धांडोळा घेत होतो. त्यांच्या कुटुंबाशी माझे विलास देशमुखांमुळे जिव्हाळ्याचे संबंध आहे. दादांबद्दल लिहिताना मला त्यांच्या कुटुंबवत्सलतेच्या बाबतीत प्रकाश टाकावा असे वाटले म्हणून हा माझा अल्पसा प्रयत्न मी करीत आहे.

दादांचे त्यांच्या आईबाबांवर जिवापाड प्रेम. त्यांच्या त्या प्रेमाबद्दल सांगायचे तर,

अक्षर अक्षर गंधित झाले
जगण्याचे संगीत झाले
मायबापाचे नाव लिहिताच
पान काळजाचे रंगीत झाले

हे त्यांच्याशी संवाद साधतांना क्षणोक्षणी जाणवत होते. सुरेशदादा म्हणजे, आईबाबांना अभिमान वाटावा असा कर्तृत्ववान लेक . आदर्श पती, माया पांघरणारा हळवा बाप, मित्रांसाठी सदैव धावून जाणारा सच्चा यार हे वास्तव कुणीही नाकारू शकत नाही. आपल्या वडिलांबद्दल ते नेहमी भरभरून बोलतात. त्यांच्या मनात असलेले वंदनीय दाआजीबद्दलचे भाव टिपताना मला जे जाणवले ते शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या नजरेतून दाआजींची प्रतिमा अशी होती.

अंधारलेल्या वाटेसाठी तारा होते दाआजी
रखरखणाऱ्या वाळवंटातील हिरवळ होते दाआजी
अत्तराच्या कुप्पीतील दरवळ होते दाआजी
किलबिलणाऱ्या पाखरांचा थवा होते दाआजी
भळभळणाऱ्या जखमेसाठी दवा होते दाआजी

शबरीच्या बोरासारखे गोड होते दाआजी
सुदाम्याच्या मनाची ओढ होते दाआजी
कधी कधी फुल तर कधी कधी अंगार होते दाआजी
सहकाराच्या गाभाऱ्याचा साजश्रृंगार होते दाआजी

लढणाऱ्याच्या तलवारीची धार होते दाआजी
शहिदांच्या गळ्यातील हार होते दाआजी
एक गोष्ट ध्यानात ठेवा उगीच नसायचे दाआजी
सारे झोपी गेले तरी जागेच असायचे दाआजी

कर्णासारखं भरभरून दान द्यायचे दाआजी
बघा बरं किती मोठा मान द्यायचे दाआजी
आपल्या हाती हुकुमाचं पान द्यायचे दाआजी
स्वत:च्या काळजात स्थान द्यायचे दाआजी

शिक्षणाच्या दरबारावर पहारा द्यायचे दाआजी
सारे सोडून गेले त्याला सहारा द्यायचे दाआजी
वाऱ्यावर झुलणारं पातं होते दाआजी
जिवापाड जपावं असं नातं होते दाआजी

वासरासाठी हंबरणारी गाय होते दाआजी
ज्यांचे जन्मदाते देवाघरी गेले
त्यांच्यासाठी माय होते दाआजी

तर असे हे आभाळाची उंची गाठलेले महान व्यक्तिमत्त्व. सुरेशभाऊंवर जीव ओवाळणारा त्यांचा प्रचंड मोठा मित्रपरिवार हा दाआजींनी त्यांना दिलेल्या शिकवणुकीचा प्रभाव आहे. दाआजींचे जगण्याचे सूत्र साधेसोपे अन् सरळ होते. ते नेहमी म्हणायचे,

माझ्या लाडक्या लेकरांनो
भलेही पोटापुरतं कमवा
पण आपल्या आयुष्यात
जिवाभावाचे मित्र नेहमी जमवा

हे सर्व कसं शक्य आहे? तर दाआजींचे उत्तर असायचे,

ह्यासाठी फार काही लागत नाही.
घासातला घास दिला तरी भागते,
जिव्हाळ्याचे नाते जपायला अजून काय लागते ?

आज एका घटनेचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. मागील काही दिवसांपूर्वी मी ह्यांच्या घरी गेलो असताना गप्पांच्या ओघात मी त्यांना सहज विचारले माणसाच्या आयुष्यातील सर्वात वेदनादायक काळ कोणता ? क्षणाचाही विलंब न करता ते म्हणाले, ‘आयुष्यातील सर्वाधिक दु:खदायक काळ म्हणजे आपल्या मायबापाला म्हातारे होताना बघणे.’ हा तो काळ असतो, जेव्हा आपल्याला ह्याची जाणीव होते की, विज्ञानाने कितीही प्रगती केलेली असली, तरी आपण आपल्या आईवडिलांना म्हातारपणाच्या विळख्यातून सोडवू शकत नाही. आपण बघितलेले आपल्या आईवडिलाचे पूर्वीचे टवटवीत चेहरे म्हातारपणाच्या सुरकुत्यांच्या आड कधीचेच हरवल्या गेलेले असतात, ते पुन्हा कधीही सापडत नाहीत. ज्यांनी आपली इवली करंगळी धरून चालायला शिकवले, आज त्यांना दुसऱ्याच्या आधाराशिवाय उठता बसता येत नाही, तेव्हा काळजाला अक्षरश: तडे जातात. आपल्याला भक्कम पायावर उभे करणाऱ्या कुटुंबाच्या आधारस्तंभांना ढासळताना बघून मनाची होणारी घालमेल शब्दात व्यक्त करता येत नाही . आपल्याला आयुष्याची दिशा दाखवणाऱ्या दीपस्तंभांना स्वत:ची दिशा दिसत नाही. मार्ग सुचत नाही, तेव्हा मन कसं सुन्न होऊन जातं. ज्यांच्या चेहऱ्यावरील हास्याने त्यांचा प्रसन्न चेहरा उजळून निघायचा, त्यांच्या सानिध्यातील सर्वांनाच आनंदाची अनुभूती यायची आज त्यांना गप्प बसलेलं पाहताना होणाऱ्या यातना असतात. आपल्या लेकरांची दृष्ट काढताना जे नजर काढत असायचे आज त्यांची अधू झालेली नजर आपल्याला उघड्या डोळ्यांनी बघवत नाही. आपल्यासोबत सतत सावलीसारखे वावरणारे. माया पांघरणारे मायबाप जेव्हा आपल्या आयुष्यातून पुन्हा कधीही न परतण्यासाठी निघून जातात, तेव्हा कुडीत प्राण नसलेल्या देहासारखी आपली अवस्था असते. लेकराला दु:खी असलेलं बघून ज्या मायबापाचं काळीज होरपळून जायचे, त्यांच्या चितेला अग्नी देताना आपण दशदिशांनी भडकलेल्या वणव्याच्या झळा सोसत असल्याचा भास होतो. आईबाबांच्या बाबतीत हे सर्व मी स्वत: सहन करीत आहे; पण ह्या क्षणी आपण नियतीपुढे किती खुजे आहोत ह्याची प्रकर्षांने जाणीव होते. जर मला परमेश्वराने विचारले की सांग! तुझ्या मनातली कोणती इच्छा पूर्ण करू ?

तेव्हा मी त्याला फक्त हेच म्हणेल की, ‘देवा! कुणाच्याही जन्मदात्यांना तू आजारी, कमजोर, हतबल करू नको. त्यांना आयुष्यभर निरोगी, आनंदी, सुखी, समाधानी ठेव आणि जर शक्य असेल, तर देवाघरी अर्थात तुझ्या घरी वास्तव्यास असलेल्या मायबापांना पुन्हा त्यांच्या घरी पाठव. देवघरासमोरच्या भिंतीवरील पुष्पहारांनी सजवलेल्या आपल्या आईबाबाच्या तस्विरीकडे डबडबलेल्या डोळ्यांनी बघत दादा म्हणाले, ‘देवा! आईवडील नसलेलं घर मूर्ती नसलेल्या मंदिराच्या गाभाऱ्यासारखे असते. तुला शक्य असल्यास तू पुन्हा त्यांची जिवंत रूपात प्राणप्रतिष्ठा कर, तेव्हा मला वाटले की, आपल्या लेकराचा हा वैभवशाली सोहळा बघण्यासाठी......

आदरणीय आई, तसेच वंदनीय दाआजी!
आज तुम्ही असायला हवे होते....



# मनमिळावू भाऊ

**प्रा. शेषकुमार येरलेकर**
हिंगणघाट



भाऊंचा जन्म २० मे १९४९ रोजी सेवाग्राम येथे श्रद्धेय दाआजी उपाख्य बापुरावजी देशमुख यांचे कुटुंबात झाला. म. गांधीनी साबरमती आश्रम सोडल्यानंतर ते थेट वर्धेला आले व स्वातंत्र्याच्या चळवळीची सर्व सूत्रे व निर्णय सेवाग्राम आश्रमातून चालली. दाआजी या चळवळीचे एक अविभाज्य अंग बनले व स्वातंत्र्य लढ्यात त्यांचे मोठे योगदान राहिले. अशाच कुटुंबात भाऊची वाढ होताना स्वाभाविकच गांधी विचाराचा प्रभाव त्यांचेवर दिसून येतो.

भाऊंचे शिक्षण पदवीपर्यंत वर्धा येथे झाले. त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी ते नागपूरला गेले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर विद्यापीठातून त्यांनी एम. ए. (राज्यशास्त्र) पदवी प्राप्त केली. दाआजी अध्यक्ष असले, तरी यशवंत महाविद्यालयात प्राध्यापकाच्या नोकरीची संधी असतानाही त्यांनी आपल्याच महाविद्यालयात नोकरी न करता आर्वी येथील कला व वाणिज्य महाविद्यालय, आर्वी येथे राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले की, ज्यामुळे नोकरीची शिस्त आपल्या अंगी यावी. कालांतराने ते यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे रूजू झाले. या महाविद्यालयात काम करतानासुद्धा त्यांनी कुठल्याही सुविधा घेतल्या नाही.

त्यांना राजकीय घराण्याचा वारसा असल्यामुळे स्वाभाविकच ते राजकारणाकडे ओढल्या गेले. प्रथम ते वर्धा जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष बनले. त्यांच्या रूपाने वर्धा जिल्ह्याला एक नवं व तरूण नेतृत्व मिळाले व ते युवकांचे श्रद्धास्थान बनले.

राजकीय संघटनात्मक पदावर काम करताना त्यांना १९८५ साली हिंगणघाट विधान सभेची काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळाली. हा मतदार संघ त्यांच्यासाठी नवखा होता. शिवाय दाआजींच्या राजकीय वारशात जसे मित्र मिळाले, तसे राजकीय शत्रू त्यांच्या वाट्याला आले. स्वभावतःच त्यांना या निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला; परंतु पराभवाने खचून न जाता त्यांनी अनेक मित्र राजकारणात जोडले आणि आपले राजकीय नेतृत्व भक्कम केले.

कालांतराने त्यांना सहकार क्षेत्रात राजकीय संधी मिळाली. प्रथम ते वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष झाले व संपूर्ण जिल्ह्यात बँकेच्या माध्यमातून सहकाराचे जाळे विणले. याशिवाय विदर्भ मार्केटींग सहकारी संस्था, महाराष्ट्र कापूस पणन महासंघ इ. संस्थामध्येही त्यांनी कामे केली व सहकार क्षेत्रातील कुशल नेता म्हणून नावलौकिक मिळविला. याची दखल राज्यस्तरावरील नेत्यांना घ्यावी लागली व ते महाराष्ट्र राज्य को–ऑपरेटिव्ह बँकेचे (शिखर बँक) अध्यक्ष झाले. एकदा नाही, तर त्यांच्या कार्यशैलीने दुसऱ्यांदा त्यांना हे पद प्राप्त झाले.

दाआजींच्या निधनानंतर जिल्ह्यातील दाआजींच्या कार्यकर्त्यांनी त्यांना गटाचा नेता केले. सर्व पदाधिकाऱ्यांनी सभा घेऊन त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला व ते वर्धा जिल्ह्याचे नेते झाले. जिल्ह्याच्या राजकारणात त्यांची दखल इतर राजकारण्यांना घ्यावीच लागायची. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांच्या कार्यकर्त्यांवर पक्षांतर्गत अन्याय होऊ लागला, तेव्हा त्यांनी पक्षाच्या विरोधात ग्रामीण विकास आघाडीची स्थापना केली. या आघाडीने जि. प. व पं. स. निवडणुकीत भरघोस यश मिळविले. जि. प. चे अध्यक्षपद व अनेक पं. स. सभापती, उपसभापती ही पदे सुरेशभाऊंच्या नेतृत्वातील ग्रामीण विकास आघाडीकडे आली. अशा रीतीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकहाती सत्ता मिळाली. कार्यकर्त्यांच्या ताकदीवर वर्धा विधानसभा निवडणूक २००९ साली अपक्ष उमेदवार म्हणून बहुमताने जिंकली.

वर्धा जिल्ह्यात सूतगिरणी त्यांच्या नेतृत्वात नावारूपास आली. संपूर्ण महाराष्ट्रात बापूरावजी देशमुख सहकारी सूतगिरणीला उत्कृष्ट गिरणी म्हणून प्रथम पुरस्काराने सन्मानित केले. एक वर्ष नाही, तर सतत अनेक वर्ष महाराष्ट्र स्तरावर सूतगिरणी पुरस्काराने सन्मानित होत राहिली.

पारंपरिक पिकांऐवजी शेतकऱ्यांना त्यांनी ऊस लागवडीकडे वळवले व वेळा येथे बापुरावजी देशमुख सहकारी साखर कारखाना उभा केला. महाराष्ट्रातील अनेक साखर सम्राटांनी साखर कारखान्याला भेट देऊन कौतुक केले. त्यांना सहकार महर्षी म्हणून गौरविले गेले.

शिक्षण क्षेत्रातही त्यांनी कौतुकास्पद कार्य केले. नागपूर विद्यापीठात तर त्यांच्या महाविद्यालयाचा उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरव व्हायचा. शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने त्यांचा नुकताच जीवन साधना हा किताब बहाल करून गौरव केला, ही कौतुकाची बाब आहे. अशा सुरेशभाऊंच्या अमृत महोत्सवी वर्षात त्रिवार अभिनंदन व त्यांच्या भावी जीवनासाठी खूप खूप शुभेच्छा!



लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख
अमृत महोत्सव
कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

# मी अनुभवलेले प्रा. सुरेशभाऊ देशमुख


**प्राचार्य डॉ. विजय बोबडे**
वर्धा


यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे १९८०–१९९० या कालावधीत प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचेसोबत त्यांचा ज्युनिअर सहकारी प्राध्यापक म्हणून काम करताना आणि त्यानंतरही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मला जो अनुभव आला, त्या अनुभवाचे अवलोकन प्रस्तुत करण्याचा मी अल्पसा प्रयत्न या लेखातून करीत आहे.

एम. ए. अर्थशास्त्र विषयाचे वर्ग प्रथमच १९७८ साली यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे सुरु झाले. मी त्यावेळेस अर्थशास्त्र विषयात एम. ए. करण्याचे ठरवून प्रवेश घेतला. त्यामुळे एम. ए. अर्थशास्त्र विषयाच्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी होतो. प्रा. एम. एल. कासारे, प्रा. बी. जे. हाडके, प्रा. पी. एम. खोटेले आम्हाला शिकवत होते. जून १९८० साली मी एम. ए. ची परीक्षा उत्तीर्ण केली. महाविद्यालयातून गुणानुक्रमे प्रथम आलो. त्याच दरम्यान यशवंत कनिष्ठ महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाच्या जागेची जाहिरात आली. मी त्या जागेसाठी अर्ज केला. मुलाखतीला जेव्हा आलो. तेव्हा मुलाखत घेण्यासाठी आदरणीय श्री. बापुरावजी देशमुख, प्राचार्य जी. बी. कदम आणि प्रा. एम. एल. कासारे होते. मुलाखत छान झाली. माझी निवड झाली. १८ ऑगस्ट १९८० मध्ये यशवंत कनिष्ठ महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाचा प्राध्यापक म्हणून रुजू झालो. त्या वेळेस प्राचार्य जी. बी. कदम यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयातील वातावरण अतिशय शिस्तबद्ध होते. कनिष्ठ महाविद्यालयीन आणि वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक असा कोणताच भेदभाव नव्हता. तोपर्यंत यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय बापुरावजी देशमुख यांचे चिरंजीव प्रा. सुरेशभाऊ देशमुख आहेत हे ऐकले होते; पण प्रत्यक्ष माझा कधीही त्यांचेसोबत संपर्क आला नव्हता. जेव्हा प्राध्यापक कक्षात मी बसायला लागलो, तेव्हा प्रा. सुरेशभाऊसुद्धा प्राध्यापक कक्षात त्यांच्या सहकारी मित्रांसोबत राजकीय, सामाजिक, आर्थिक विषयावर चर्चा करीत असायचे. त्यावेळेस डॉ. वि. ग. कावळे, प्रा. डॉ. जयंत परांजपे, डॉ. एम. एल. कासारे, डॉ. बी. के खडसे, प्रा. बी. जे. हाडके, प्रा. पी. एम. खोटेले, प्रा. तु. ग. माने, प्रा. डी. एस. पाटणे, प्रा. राम इंगळे, प्रा. बी. एन. चौधरी, प्रा. वसंतराव घोरपडे, प्रा. डी. व्ही. भोयर, प्रा. सुनिती बैंदूर, प्रा. प्रभाकर भोगे, प्रा. सुरेशभाऊ देशमुख, प्रा. डॉ. व्ही. ए. देशमुख यासारखे दिग्गज व जेष्ठ प्राध्यापक मंडळी कार्यरत होती. आम्ही नव्याने रुजू झालेलो नवखे प्राध्यापक त्यांच्या चर्चा मन लावून ऐकत होतो. त्याच दरम्यान प्रा. सुरेशभाऊ माझे सोबत बोलले. माझी विचारपूस केली. तीच माझी पहिल्यांदाच प्रत्यक्ष प्रा. सुरेशभाऊसोबत झालेली ओळख. त्या वेळेस माझ्या मनात भाऊंविषयी आदरयुक्त भीती होती; पण त्यांच्या बोलण्याने विनम्र, विनयशील, संवेदनशील, निगर्वी आणि सुस्वभावी व्यक्तिमत्त्वाची अनुभूती मला प्राप्त झाली. प्रा. सुरेशभाऊंसोबत त्यांचा ज्युनिअर सहकारी प्राध्यापक म्हणून काम करण्याचे भाग्य मला लाभले. महाविद्यालयातील प्रत्येक ॲक्टिव्हीटीमध्ये सक्रिय

असताना मी अध्यक्षांचा मुलगा या अविर्भावात कधीही त्यांचे वर्तन मला जाणवले नाही. इतर सर्व प्राध्यापकांसारखेच आपण एक प्राध्यापक आहोत, या जाणिवेतूनच महाविद्यालयात ते वावरत होते. मोठेपणाचा कोणताच लवलेश त्यांच्या वागण्याबोलण्यात मला कधीच जाणवला नाही.

प्राचार्य जी. बी. कदम यांनी दर बुधवारला सायंकाळी पाच वाजता स्टाफ क्लबच्या माध्यमातून निबंध वाचनाच्या कार्यक्रमाची प्रथा सुरू केली होती. त्या निबंध वाचनाच्या कार्यक्रमात प्रत्येक विषयाच्या प्राध्यापकाने एका विषयाची निवड करून त्या विषयावर निबंध तयार करून तो त्यांना वाचावा लागत होता. वाचनानंतर विषयाच्या अनुषंगाने इतर प्राध्यापक त्यांना प्रश्न विचारित होते. त्यावर अभ्यासपूर्ण अशी चर्चा होऊन इतरांच्याही ज्ञानात भर पडत होती. त्या कार्यक्रमाला प्रा. सुरेशभाऊ आवर्जून उपस्थित राहात होते. चर्चेत सहभागी होत होते. एक चांगली आणि तार्किक अशी चर्चा त्या वेळेस आम्हा सर्वांना ऐकायला मिळत होती.

प्राचार्य जी. बी. कदम यांनी महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी दक्षिण भारतातील बॉलबॅटमिंटन हा खेळ सुरू केला होता. सायंकाळी पाच वाचता हा खेळ सुरू व्हायचा. त्यामध्ये प्राचार्य जी. बी. कदम, प्रा. डी. व्ही. भोयर. प्रा. प्रभाकर भोगे, प्रा. सुरेशभाऊ देशमुख, प्रा. डॉ. व्ही. ए. देशमुख, डॉ. देवेंद्र पुनसे, प्रा. यू. टी. फासगे, प्रा. के जी. देशमुख, प्रा. दिलीप देशमुख, प्रा. भीमराव ढोक, प्रा. शेख हाशम, डॉ. अशोक पावडे, प्रा. दिलीप ठोंबरे, मी स्वत: आम्ही असे सर्व सहभागी होऊन हा खेळ खेळत होतो. प्रा. सुरेशभाऊंना देखील हा खेळ खूप आवडत होता. त्यामुळे ते न चुकता नियमित हा खेळ खेळायला येत होते. खेळताना काही वादविवाद झाला तर प्रा. सुरेशभाऊ त्यामध्ये कधीच पडत नव्हते. स्मितहास्य करून तो प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करीत असायचे. कधीही त्यांचे अहंभावात्मकतेचे वर्तन आम्हाला पाहायला मिळत नव्हते. संताच्या शब्दात सांगायचे झाल्यास, 'वादावादी नाही बरी। नको कुणाची बरोबरी। ध्येय व कर्तव्य ठेवू उरी। वाट आपुली हीच खरी।' यावर विश्वास ठेवूनच पुढे वाटचाल करणारे साध्या व सरळ स्वभावाचे प्रा. सुरेशभाऊ मला अनुभवायला मिळाले.

प्रा. सुरेशभाऊ देशमुख प्राध्यापक म्हणून कार्यरत असतानाच अचानक बातमी येऊन धडकली की, यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय बापुरावजी देशमुख यांचे दु:खद निधन झाले. ती तारीख होती २६ जुलै १९९०. संपूर्ण जिल्ह्यामध्ये शोकाकुल वातावरण पसरले होते. वर्धा जिल्ह्याच्या शैक्षणिक, आर्थिक, सहकार, कृषी क्षेत्रातील विकासात बापुरावजी देशमुख यांचे अतुलनीय योगदान होते. त्यांना सर्व लोक 'दाआजी' म्हणून ओळखत होते. ज्या काळात शिक्षण हे विशिष्ट वर्गाची मिरासदारी होती, त्या काळात बहुजन समाज हा अज्ञानी व आर्थिकदृष्ट्या मागासलेला होता. अशा वर्गाचे अज्ञान व मागासलेपणा दूर करायचे असेल, तर त्यासाठी शिक्षणाशिवाय अन्य दुसरा कोणताच पर्याय नाही हे मुख्य सूत्र अचूक हेरून त्या काळात आदरणीय बापुरावजी देशमुख यांनी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे रोपटे १९५९ साली लावले. ''शिक्षण शाळा महाविद्यालयातून तर दिले जातेच; पण त्याचे लोण खेड्यापाड्यातील गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत पोहचविण्याचे कार्य मी अधिक मोलाचे समजतो.'' हा त्यांचा कळकळीचा व तळमळीचा विचारच गोरगरीब आणि मागासलेल्या समाजासाठी विकासाची नांदी ठरला. याच विचाराने प्रेरित होऊन बहुजन समाजातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा दाआजींनी प्रवाहीत केली. त्यामुळेच जिल्ह्यातील गावखेडयातील बहुजन समाजाची मुलं-मुली मोठ्या प्रमाणात शिक्षण घेऊ लागले. सामान्य माणूस हीच या युगाची विभूती आहे. हे महत्त्वाचे सत्य त्यांना गवसले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दाआजींच्या रुपाने बहुजन समाजातून वर आलेले हे नेतृत्व महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचाराचे कृतिशील वारसदार ठरले. त्या कारणानेच ते आजही बहुजन समाजाच्या हृदयस्थानी विराजमान आहे.

दाआजींनी १९५९ साली यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या रुपाने लावलेला रोपट्याचे पाहता पाहता १९९० पर्यंत त्यांच्या अथक परिश्रमातून विशाल वटवृक्षात रुपांतर झाले. ज्याचा सुंगध संपूर्ण महाराष्ट्रात दरवळतो आहे. या वटवृक्षाच्या छायेखाली ग्रामीण भागातील लाखो कुटुंबे आजही सुखासमाधानाने विसावा घेत आहेत. १९८० च्या दशकात

जिल्ह्यात कुठेही अभियांत्रिकी महाविद्यालय नव्हते. त्यामुळे जिल्ह्यातील गोरगरीब, शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना अभियांत्रिकी शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी दाआजींनी जिल्ह्यात सर्वप्रथम अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु केले. त्या माध्यमातून गोरगरीब, शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना अभियंता बनविण्याचे स्वन साकार झाले. अनेक शेतकऱ्यांची, शेतमजुरांची, गोरगरिबांची मुलं–मुली अभियंता बनून देश–विदेशातील मोठमोठ्या कंपन्यामध्ये गलेलठ्ठ पगारावर नोकरी करीत आहेत. त्या कारणाने ग्रामीण समाजात जे सामाजिक परिवर्तन घडून आले आहे, त्याचे श्रेय निश्चितच दाआजींना जाते. त्यामुळे त्यांच्या चिरंतन कार्याच्या स्मृती अजूनही जनमानसात कायम असून भविष्यातही कायम राहील यात काही शंकाच नाही.

बापुरावजी देशमुख उपाख्य दाआजी यांच्या निधनानंतर जिल्ह्याच्या शिक्षण, सहकार, कृषी आणि राजकारणाच्या क्षेत्रात फार मोठी पोकळी निर्माण झाली. ही पोकळी भरून काढणे अशक्यप्राय होते. अशा या कठीण परिस्थितीच्या काळात दाआजींच्या खांद्याला खांदा लावून सोबत काम करणारे त्यांचे असंख्य हितचिंतक, सहकारी जीवाभावाचे कार्यकर्ते, प्रा. सुरेशभाऊंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. दाआजींनी निर्माण केलेल्या शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या सर्व संस्थांचा कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी प्रा. सुरेशभाऊंच्या खांद्यावर टाकण्यात आली. प्रा. सुरेशभाऊंनी देखील आपल्या खांद्यावर आपल्या हिंतचितकांनी ज्या विश्वासाने ही जी जबाबदारी टाकली, त्या विश्वासाला तडा जाणार नाही. यासाठी दाआजींच्या पावलावर पाऊल टाकत कार्य करण्यास सुरुवात केली. त्यामुळे प्रा. सुरेशभाऊंच्या कार्याचा प्रचंड व्याप वाढल्यामुळे त्यांनी यशवंत महाविद्यालयातील प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला. त्याच दरम्यान राज्यशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले ज्येष्ठ प्राध्यापक डी. एस. पाटणे सेवानिवृत्त झाले. त्यामुळे राज्यशास्त्र विभागात प्राध्यापकांची दोन पदे रिक्त झाली. वर्तमानपत्रात दोन्ही पदाची जाहिरात आली. त्यामध्ये एक पद अनुसूचित जातीकरिता राखीव, तर एक पद खुल्या प्रवर्गासाठी राखीव होते. मी राज्यशास्त्र विषयात एम. ए. आणि एम. फिल. असल्यामुळे खुल्या प्रवर्गासाठी मी सुद्धा अर्ज केला. त्या वेळेस महाविद्यालयात प्राचार्य व. द. गोमकाळे कार्यरत होते. मुलाखतीला हजर राहण्याचे पत्र मला मिळाले. मुलाखतीला मी हजर झालो. तेव्हा संस्थेचे अध्यक्ष प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या उपस्थितीत माझी मुलाखत झाली. त्यांच्याच आशीर्वादाने माझी वरिष्ठ महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून निवड झाली. याही वेळेस भाऊंचा माझेविषयी असलेला उदारवादी दृष्टिकोन मला अनुभवायला मिळाला. अनुसूचित जातीकरिता राखीव असलेल्या पदासाठी अमरावती येथील प्रा. सुभाष गवई यांची निवड झाली. ३ सप्टेंबर १९९१ रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील नोकरीचा राजीनामा देऊन वरिष्ठ महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाचा प्राध्यापक म्हणून मी रूजू झालो.

शिक्षण, सहकार आणि राजकारणातील अनेक जबाबदाऱ्या प्रा. भाऊंना सांभाळाव्या लागत असल्यामुळे त्यांचा दैनंदिन कार्यक्रम अतिशय व्यस्त असायचा. महाविद्यालयात प्राध्यापक असताना प्रा. सुरेशभाऊंच्या संपर्कात रोजच राहण्याचे भाग्य आम्हाला लाभत होते; पण दाआजींच्या निधनानंतर मात्र त्यांच्या कामाचा प्रचंड व्याप वाढल्यामुळे संपर्क कमी झाला. तरीसुद्धा प्रा. सुरेशभाऊंचे महाविद्यालयात कोणत्या ना कोणत्या कार्यक्रमाच्या निमित्ताने येणे–जाणे सुरूच असायचे. भाऊंचे महाविद्यालयावर आणि त्यांच्यासोबत जे त्यांचे सहकारी प्राध्यापकमित्र होते. त्यांच्यावर जे प्रेम होते, ते मात्र कमी झालेले मला कधीही जाणवले नाही. महाविद्यालयात प्राध्यापकांचा स्टाफ क्लब आहे. त्याद्वारे वर्षातून दोनदा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्या कार्यक्रमात सेवानिवृत्त झालेल्यांचा सत्कार, नवविवाहित दाम्पत्यांचा सत्कार, पीएच. डी. प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार प्रा. सुरेशभाऊंच्या हस्ते केला जात असतो. त्या कार्यक्रमाला भाऊ आवर्जून उपस्थित राहतात. कार्यक्रमानंतर त्यांचे जे समवयस्क सहकारी प्राध्यापक मित्र आहेत. त्यांचेसोबत रात्री दोन–दोन तास थांबून चर्चा करतात. त्यांच्या बोलण्याला, वागण्याला जराही अहंकाराचा वारा लागलेला कधीही जाणवत नाही. आम्ही त्यांच्यापेक्षा कमी वयस्क प्राध्यापक म्हणून त्यांचेबरोबर सहकारी म्हणून काम केल्यामुळे आमची त्यांचेबरोबर जी ओळख आहे. त्या कारणाने एवढया मोठ्या पदावर असतानाही ते प्रत्येकाचे नाव घेऊन आमचेसोबत बोलल्याशिवाय राहत नाहीत. बोलताना त्यांच्या बोलण्यात जिव्हाळा असतो. प्रेम–आपुलकी असते. या त्यांच्या स्वभावगुणामुळेच त्यांच्यावर प्रेम करणारा त्यांचा असंख्य चाहतावर्ग असल्याचे आजही पाहायला मिळतो.

२००६ साली यशवंत महाविद्यालयात डॉ. व्ही. ए. देशमुख प्राचार्यपदी रुजू झाले. त्यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तेवर आधारित विविध उपक्रम राबवून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला. महाविद्यालयात शिस्तीचे वातावरण निर्माण केले. गुणवत्ताप्राप्त गरीब विद्यार्थ्यांकरिता प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक योगदानातून यशवंत स्कॉलरशीप सुरू केली. त्या वेळेस मी राज्यशास्त्र विषयाचा विभागप्रमुख होतो. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच आम्ही आमच्या विभागातर्फे राज्यशास्त्र विषयाची राष्ट्रीय स्तरावरील आणि राज्यस्तरावरील परिषदेचे यशस्वीपणे आयोजन केले. आयोजित परिषदेसाठी प्रा. सुरेशभाऊ आवर्जून उपस्थित राहून परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षपद भुषवित होते. मध्ये यशवंत महाविद्यालय, सेलू येथील प्राचार्यपदाची जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली. त्यासाठी मी अर्ज केला. मुलाखतीमध्ये प्राचार्यपदासाठी आदरणीय प्रा. सुरेशभाऊंनी माझी निवड केली. त्यांच्याच आशीर्वादाने मला प्राचार्य होण्याची संधी मिळाली. २८ मार्च २०१८ रोजी यशवंत महाविद्यालय, सेलू येथे मी प्राचार्यपदी रुजू झालो. या पदावर काम करताना महाविद्यालयातील जी कामे रखडली होती, ती कामे सुरळीत करण्यासाठी कामात सुरुवात केली. त्यासाठी प्राचार्य डॉ. विलासराव देशमुख यांचेदेखील वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन मिळत होते. काम करताना जर आर्थिक अडचणी आल्या, तर भाऊंना विचारून त्या दूर करीत होतो. त्या कामासाठी जो खर्च येत होता. तो खर्च करण्यासाठी भाऊंनी कधी कोणतीही अडचण निर्माण केली नाही. खर्चासाठी लागणाऱ्या चेकवर भाऊ विश्वासाने स्वाक्षरी करीत होते. महाविद्यालयातील एखाद्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे बेशिस्तीचे वर्तन असेल, तर त्याची तक्रार भाऊंकडे केली, तर भाऊ त्यांचे नोकरीचे नुकसान होणार नाही. याची खबरदारी घेऊनच त्याला समज देण्याची भाषा बोलत होते. सूड भावनेने एखाद्याचा बदला घेण्याची वृत्ती भाऊंची मला कधीच अनुभवायला मिळाली नाही. मानवतावादी दृष्टिकोनातूनच भाऊ आपल्या अधिकाराचा वापर करताना मी अनुभवले. महाविद्यालयात कोणत्याही कामानिमित्त भाऊ आल्यानंतर त्यांच्या वागण्यात बोलण्यात अहंकाराचा लवलेशही कधी जाणवत नव्हता. त्यामुळे प्राचार्यपदावर काम करताना माझे महाविद्यालय, माझे कुटुंब, माझी जबाबदारी या जाणिवेतून उत्साहवर्धक प्रेरणाशक्ती मला मिळत होती. त्यामधून भाऊ हे अहंकारशून्य व्यक्तिमत्त्वाचे खऱ्या अर्थाने धनी असल्याचे त्या वेळेस मला अनुभवायला मिळाले.

प्रा. सुरेशभाऊंचे व्यक्तिमत्त्व दातृत्व संपन्न आहे. जेव्हा अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले होते. तेव्हा सुरुवातीच्या काळात अभियांत्रिकीला प्रवेश मिळणे कठीण होते. आपल्या यशवंत परिवारातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मुलाला प्रवेश मिळत नसेल किंवा फी भरणे शक्य नसेल, तर अशा वेळेस ते शिक्षक किंवा कर्मचारी प्रा. सुरेशभाऊंकडे गेले असता भाऊंनी त्यांच्या मुलांना प्रवेश तर दिलाच; पण चारही वर्षाची फी न घेता त्यांच्या मुलांचे अभियांत्रिकीचे शिक्षण मोफत केले, असे अनेक उदाहरणे आहेत की, भाऊंनी संकटांच्या, अडचणींच्या वेळेस अनेक लोकांना नोकरी, ॲडमिशन्स व इतरही कामासाठी मोठ्या प्रमाणात मदत करून त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करून त्यांचे जीवन प्रकाशमय केले. माणुसकीची ज्योत आपल्या अंतरात्म्यात सतत तेवत ठेवून जगणारे व्यक्तिमत्त्व म्हणून आदरणीय भाऊ असल्याचा अनुभव मला पदोपदी आला, एवढेच नव्हे तर सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या समाजसेवी व्यक्तींचा सामाजिक दायित्वाच्या भावनेतून ज्येष्ठ समाजसेवक सत्कार समितीच्या माध्यमातून भव्य व दिव्य असा सन्मान सोहळा आयोजित करून जिल्ह्याच्या सामाजिक क्षेत्रात एक सामाजिक क्रांती भाऊंनी घडवून आणली. १९९० च्या दशकात प्रा. सुरेशभाऊ शिक्षण, सहकार, कृषी, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक आणि राजकारणात प्रत्यक्ष सक्रिय झाले. त्याचवेळेस १९९१ ला सरकारद्वारा भारतात नवीन आर्थिक धोरण लागू करण्यात आले होते. या नवीन आर्थिक धोरणामुळे जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचे वारे देशामध्ये जोराने वाहायला सुरुवात झाले. त्यामुळे सहकारी संस्थांना एका बिकट परिस्थितीतून प्रवास करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. तर दुसऱ्या बाजूने तत्त्व, वैचारिक भूमिकांना सोडचिठ्ठी देणाऱ्या राजकारणाला सुरुवात झाली होती. अशा कठीण परिस्थितीमध्ये शिक्षण सहकार व राजकारण याचा मेळ जुळवून भाऊंनी त्या खडतर मार्गावरून वाटचाल सुरू केली. त्यांच्या त्या खडतर वाटचालीवरून पुढील चार ओळींचा उल्लेख करता येईल.

काटेरी एक वाट आहे । तुम्ही चालत जा ।
चालताना पायाखाली काय आहे ते पाहात जा ।

वाट आहे तुम्ही चालत जा ।
चालताना या माणसातून फक्त माणूस जोडत जा ।

या ओळीतील संदेशाप्रमाणे भाऊंनी बिकट वाटेवरून चालताना माणसातील माणूसपण शोधून समाजकारण आणि राजकारण यशस्वीपणे करणे त्यांना शक्य झाले. भाऊंचे व्यक्तिमत्त्व विनम्र, विनयशील, संवेदनक्षम, तत्त्वनिष्ठ, वृत्ती, सरळता, शालीनता, प्रेमळता, राजकारणातील सभ्यता, सामाजिक भान अशा अनेक गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध असल्यामुळेच समाजकारण आणि राजकारणात त्यांनी माणसं तोडण्यापेक्षा माणसं जोडण्याचेच काम केले. भाऊंच्या विचारात प्रगल्भता आहे. ते अतिशय संतुलित व विकासाभिमुख आहे. वास्तवाचे त्यांना भान आहे. त्यांच्या विचारात संदिग्धता नाही. त्यांच्यामध्ये कमालीचा संयम आहे. पक्षनिष्ठा आणि तत्त्वनिष्ठ हे त्यांचे अंगभूत गुणधर्म आहेत. त्यामुळे भाऊ इतरांसारख्या कोलांटउड्या न मारता राजकारणात एकनिष्ठतेचे तत्त्व पाळत राहिले आहे.

राजकारण म्हटले तर वैचारिक मतभिन्नता असणे स्वाभाविक आहे; पण ते मतभेद चव्हाट्यावर मांडताना भाऊ मात्र मला कधी दिसले नाही. त्यांची अनेक कार्यक्रमातील आणि निवडणुकीच्या प्रचारातील अनेक भाषणे मी प्रत्यक्ष ऐकली; पण त्यांच्या भाषणातून त्यांनी विरोधकांच्या बाबतीत कधीही अवमानजनक बोलण्याचे किंवा तोल सोडून बोलण्याचे मला कधीच अनुभवायाला मिळाले नाही. त्यांच्या भाषणात आक्राळविक्राळपणा, आरडा–ओरड वा शिवराळपणा कधीही नसतो. रिमझिम पावसासारखे संथपणे शब्द व्यक्त होत असतात. उलट विरोधकांकडून त्यांच्यावर अनेकदा कठोर टीका झाल्यात; पण भाऊंनी मात्र आपला कधीही तोल जाऊ दिला नाही, एवढेच नव्हे तर आजपर्यंत भाऊंना मी कधीही रागवताना बघितले नाही. कुणाचे चुकले तर ती चूक त्या व्यक्तीच्या निदर्शनास शांतपणे आणून देतात. त्यामुळे भाऊंनी कधी कुणा कर्मचाऱ्यांचे किंवा कार्यकर्त्यांचे विनाकारण नुकसान केले असेल, असे कधी मला आठवत नाही. राजकारण करताना स्नेह, श्रद्धा, निष्ठा, आपुलकी, प्रेम, समर्पणाची वृत्तीच भाऊंनी जोपासलेली जाणवते. सूड भावनेने ते कधी कुणाशीही वागल्याचे मला दिसून आले नाही. कुणाशीही नको त्या मुद्द्यावर वादही घातला नाही. मुळात राजकीय अजातशत्रुत्व हा भाऊंचा स्थायीभाव असल्याचे मला दिसून आले. ते कुठल्याही क्षेत्रात कुणाशीच शत्रुत्व ठेवू शकत नाही. इतका मनाचा मोठेपणा त्यांच्या स्वभावात आहे. त्यामुळे व्यक्ती म्हणून जोपासला जाणारा हा अजातशत्रुपणा भाऊंच्या व्यक्तिमत्त्वामधील हा एक मौलिक गुण आहे. त्यामुळेच सामान्यातला सामान्य माणूस भाऊंविषयी आपुलकी, प्रेम बाळगून आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पातळीवरील कुठलाही कार्यक्रम असो, त्यामध्ये लोकांशी जुळवून घेण्याचे कौशल्य भाऊंच्या व्यक्तिमत्त्वात आहे. भाऊंच्या राजकारणाचा गाभा समाजकारण आहे. दाआजींपासूनच त्यांना पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेला आहे. विविध चळवळींना पूरक ठरेल असेच त्यांचे राजकारण असल्यामुळे जिल्ह्यातील विविध सामाजिक व सांस्कृतिक चळवळींशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. माणुसकीचे शास्त्र समजल्याशिवाय सर्व व्यर्थ आहे याची जाणीव भाऊंना आहे. त्यामुळेच कार्यकर्त्यांना भाऊंचा निर्णय योग्य वाटला नाही, तर अशा वेळेस आत्मीयतेने व ममत्वाने कार्यकर्त्यांना भाऊ समजावून सांगतात. त्यामध्ये न्याय असतो, सोय असते आणि स्नेहभावही असतो. त्यामुळे कार्यकर्त्यांचे समाधान होते. कार्यकर्तेसुद्धा भाऊंच्या प्रत्येक शब्दांचा सन्मान करतात. भाऊंच्या सर्वसमावेशक आणि माणसे व मित्र जोडण्याच्या लोकसंग्राहक स्वभाव वैशिष्ट्यामुळेच आपल्या यशस्वी नेतृत्वाचा प्रभाव आजही जिल्ह्याच्या राजकारणात दिसून येतो. प्रा. सुरेशभाऊ देशमुख वयाच्या ७५ व्या वर्षात पदार्पण करणार असल्यामुळे त्यांचा अमृत महोत्सव भव्य प्रमाणात सर्वपक्षीय साजरा करण्यात यावा यासाठी सर्वपक्षीय सभा बोलावण्यात आली होती. त्या सभेमध्ये वर्धेतील सर्वच पक्षाचे नेते सहभागी झाले होते. त्या सर्वांनीच एकमताने भाऊंचा अमृत महोत्सव कृतज्ञता वर्ष म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे भाऊंच्या व्यक्तिमत्त्वामधील अजातशत्रू या गुणाचा साक्षात्कार आल्याशिवाय राहत नाही. भाऊंच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या संयमी आणि विधायक लोकसेवकाला निरामय आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो हीच कोटी कोटी ईश्वरचरणी प्रार्थना!



लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख

अमृत महोत्सव

कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

# सुपुत्राचे सुपुत्र

**प्राचार्य डॉ. वीरेंद्र गोपालसिंह बैस**

वर्धा

१९३६ ला महात्मा गांधी कायमच्या वास्तव्यासाठी सेवाग्रामला येणार होते. त्यांनी येथे आश्रम स्थापन करून हरिजनांची सेवा करण्याचा मानस व्यक्त केला होता. त्या वेळी सेवाग्रामच्या नागरिकांनी म. गांधीना विरोध दर्शविला. अशा वेळी त्या सभेतून एक तरूण उभा राहून म. गांधीना आपण आश्रम स्थापन करावा. मी आपणास संपूर्ण सहकार्य करतो असे आश्वासन देणारा तो युवक बापुरावजी देशमुख होते. त्यांनीच म. गांधीच्या सूचनेवरून १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात आणि १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात इंग्रज सरकारच्या विरोधात सहभाग घेऊन तुरूंगवास पत्करला होता. सेवाग्राम येथे कायमच्या वास्तव्याला आलेले आणि व्यवसायाने शेतकरी असणारे श्री. मारोतराव देशमुख यांचे बापुरावजी देशमुख उपाख्य दाआजी हे जेष्ठ सुपुत्र होते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दाआजींनी राजकीय, शैक्षणिक व सहकार क्षेत्रात संस्थांचे एक जाळे निर्माण करून वर्धा जिल्ह्याचे विकासात्मक शिल्पकार म्हणून मानाचे स्थान मिळविले होते. त्याच शिक्षण व सहकार महर्षी बापुरावजींचे जेष्ठ सुपुत्र सुरेशभाऊ वर्धा जिल्हाच्या गौरवस्थानी आहेत. महाराष्ट्रातील सर्वच शैक्षणिक, सहकार आणि सर्व सामाजिक व राजकीय पक्षांचे नेतृत्व भाऊंना आदराचे व सन्मानाचे स्थान देतात, म्हणून वर्धा ही जन्मभूमी त्यांच्या आपुलकीचे आणि आस्थेचे केंद्रस्थान आहे. निगर्वी व्यक्तिमत्त्वाचे धनी, अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. सुरेशभाऊ देशमुख. शिक्षणक्षेत्रात उत्तुंग भरारी मारून मातीशी इमान राखणारे, कार्याची जिद्द आणि कर्तव्यदक्षता परायण असणारे भाऊ समाजाला, त्यांच्या कुटुंबाला आणि आमच्या यशवंत परिवाराला अभिमान वाटावा असेच व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा जन्म २० मे १९४९ रोजी सेवाग्राम येथे झाल्यामुळे ओघानेच महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर पडला. वडील बापुरावजी आणि आई रमाबाई यांच्या संस्काराचे संपूर्ण धडे त्यांना घरातूनच मिळाले. भाऊंची पत्नी धार्मिक स्वभावाच्या सात्त्विक स्त्री आहेत. त्यांनी कुटुंबात जिव्हाळा निर्माण करून संसाराची फुलबाग फुलविली. स्वातीवहिनींमुळे भाऊंमध्ये धार्मिक सहिष्णुतेची भावना निर्माण झाल्यामुळे ते आजही सर्व धर्माचा आणि त्यांच्या देवतांचा आदर करतात. स्वातीवहिनींच्या सहवासातून त्यांच्या चारित्र्याला बळ मिळाले. प्रेम, निष्ठा, निष्कलंक चारित्र्य, स्त्रियांना मानसन्मान देणारे पराक्रमी, सर्वांचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजाप्रमाणे भाऊसुद्धा प्रजादक्ष, मानवता आणि मानवी मूल्यांना सर्वाधिक प्राधान्य देणारे आमचे रक्षक आहेत.

सुरेशभाऊ सुरूवातीला महाविद्यालयीन शिक्षक म्हणून कार्यरत होते. पुढे ते यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदावर विराजमान झाले. त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना समीर व संदीप यांचेसह आमच्यासारख्या बहुजनांच्या मुलांना विद्याविभूषित व सुसंस्कारी करण्याचा यथोचित प्रयत्न केला. म्हणूनच माझ्यासारखा सामान्य मुलगा दाआजींच्या आशीवार्दाने आणि भाऊंच्या प्रेरणेमुळे दोनदा प्राचार्यपदावर विराजमान होऊ शकला. यावरून कोणत्याही जातीधर्माचा मुलगा उच्च विद्याविभूषित होऊन उच्च शिखरावर पोहचला पाहिजे, ही तळमळ भाऊंच्या हृदयात आजही आहे. त्यांच्या दोन्ही मुलांनी शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली असूनसुद्धा त्यांची भक्ती मात्र उंबरठ्याशीच आहे, म्हणून दोन्ही मुलं संस्काराच्या पवित्र बंधनात दिसून येतात. यावरून भाऊ उत्तम रत्नपारखी दिसून येतात.

दाआजींनी माणूस घडविला, तर सुरेशभाऊंनी कार्यकर्ता घडविला आणि निष्ठेने दाआजींच्या कार्याला वाहून

घेतले. शैक्षणिक क्षेत्रात पावित्र्य राखून त्यांनी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेची मान उंचावत ठेवली. त्याच यशवंत शिक्षण संस्थेत मला व माझ्यासारख्या हजारो मुलांना वर्ग पाचपासून अत्युच्च शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले. त्यातील बहुजनांच्या अनेक मुलांना या शैक्षणिक संस्थेत काम करण्याची संधी देऊन अनेकांचे कौटुंबिक जीवन सुखी व समृद्ध केले. यावरून हे स्पष्ट होते की, एका महावृक्षाच्या छायेखाली वाढलेल्या या वृक्षानेही समाजाच्या हिताची कास धरली म्हणूनच भाऊ वर्धा जिल्हयासाठीच नव्हे, तर महाराष्ट्रासाठी आदर्श आहेत. आपली जबाबदारी समजून समाजासाठी आणि संस्थेसाठी कार्य ते करीत आहेत, म्हणूनच आमच्यासाठी आदर्श शासनकर्ता आणि सहिष्णू कुटुंबप्रमुख आहेत.

सुरेशभाऊ हे मनाने हळवे आहेत. ते संवेदनशील आहेत. एखाद्याच्या घरी आनंदाची किंवा दुःखाची माहिती कळली, तर भाऊ स्वतः त्यांच्या घरी जाऊन संवदेना व्यक्त करतात. यावरून इतिहासावर लक्ष केंद्रित केल्यास असे म्हणावे लागते की, गौतम बुद्धाला ज्याप्रमाणे प्रजेचे दुःख पाहून वेदना व्हायच्या, तशीच कोमलता भाऊंमध्ये भरलेली आहे. ते स्वभावाने अगदी शांत आहेत. त्यांना मी चिडलेले कधी बघितले नाही. म्हणजे त्यांचे हृदय करूणेने ओतप्रोत भरलेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक सहजता आहे. ते कुणाच्याहीबद्दल वाईट बोलणार नाही, मात्र एखादी गोष्ट त्यांना सांगायची असेल तर समोरच्याला न दुखावता ते त्या गोष्टीला सहजपणे बगल देऊन मोकळे होतात. मला तरी असे वाटते की, भाऊंना चेहऱ्यावरून माणसे क्षणात ओळखता येतात. हा त्यांचा स्वभावगुण असावा, कारण एखादा विरोधक समोर आला, तर त्याला लगेच मवाळ करण्याचे त्यांच्यात सामर्थ्य आहे.

सुरेशभाऊंचा स्वभाव अराजकारणी आहे असे मला दिसून येते, कारण राजकारणी लोक बिनधास्तपणे राजकारण खेळतात. राजकारणात धूर्तपणा ठेवावा लागतो, खोटे बोलावे लागते, संधीचा फायदा घ्यावा लागतो, हीच राजकीय खेळी भाऊंना जमली नाही. आपली प्रदूषित प्रतिमा तयार होऊ दिली नाही. भाऊंनी पक्षीय विचार न करता मित्रांसाठी पुढाकार घेतलेला आढळतो. भाऊंना अनेक पक्षांकडून अनेकदा राजकीय संधी प्राप्त झाल्या; परंतु भाऊंनी सत्ता हे कधीच आपले अंतिम साध्य मानले नाही. म्हणूनच भाऊंना काही वेळा असफलता मिळालेली आढळते, तरीही खचून न जाता अपयश पचवून राजकारणातील आपले पावित्र्य राखण्यात ते यशस्वी ठरले. सत्तेशिवाय ते समाजसेवेचे व्रत पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पूर्वी राजकारण आणि समाजकारण एकत्रच नांदत होते. आज मात्र त्यांच्यात फारकत झाली आहे. भाऊंचा विचार केल्यास त्यांचा पिंड समाजकार्याचा दिसतो. त्यांच्यासारखे समाजकारणी लोक दूषित राजकीय क्षेत्राला नको आहेत.

दाआजींप्रमाणे सुरेशभाऊंना आपल्या सहकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची नावे मुखपाठ आहेत. सर्वांना घेऊन चालणे (विरोधक असतील तरी) हा त्यांचा स्वभाव आहे. अनेकांना जवळ करणे ही त्यांची संस्कृती आहे. म्हणूनच त्यांनी आजपावेतो कुणालाही दुखावले नाही. आम्हा कर्मचाऱ्यांचे काही चुकले, तर ते आम्हाला चारचौघात किंवा मैदानात कुणासमोर रागवत नाही, तर त्यांना कार्यालयात बोलावून समजावून सांगतात, कारण त्यांना रागावता येत नाही. हे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य आहे. म्हणून असे म्हणता येईल की, वृद्धाश्रमाची संस्कृती प्रबळ होत असलेल्या अशा भरकटलेल्या समाजात सुरेशभाऊसारखा सुपुत्र प्रत्येक घराघरात जन्मास यावा असे उदास झालेल्या अनेकांच्या मनाला वाटत असावे.

माझे गाव सेवाग्राम असल्यामुळे देशमुख परिवाराच्या आपलेपणामुळे आणि सेवाभावी वृतीमुळे माझे देशमुख कुटुंबियांशी लहानपणापासून नाते जुळले ते कायमचे, मी लहानाचा मोठा झालो हे त्यांच्याच सेवाग्रामच्या घरी असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. त्यामुळे भाऊंच्या यश–अपयशाचा, सुख–दुःखांचा मी पहारेकरी आहे. गांधीजीचा अभ्यास करताना लक्षात आले की, जमनालाल बजाज यांनी महात्मा गांधीना कायमच्या वास्तव्यासाठी १९३४ ला वर्धा येथे आणले, त्यानंतर म. गांधी सेवाग्रामच्या आश्रमात कायमचे वास्तव्यात १० वर्ष राहिले, त्याचे काही प्रमाणात श्रेय बापुरावजी देशमुख यांना द्यावे लागते. परिणामी मी देशमुखांच्या परिवाराचा एक घटक बनत गेलो.

सुरेशभाऊच्या निकट असल्यामुळे भाऊच आमचा राजकीय पक्ष होते. त्यांच्या सुचनेवरून प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी दिल्लीला किसान मेळावा आयोजित केला, त्यावेळी मी पहिल्यांदा दिल्लीला गेलो. दाआजी त्या वेळी राज्यसभेचे खासदार होते, भाऊ युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्या वेळी नागपुरात राजीव गांधीच्या स्वागताच्या प्रसंगी सहभागी झालो. भाऊंनी सेवाग्रामच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात जेष्ठ समाजसेवकांचा भव्य सत्कार आयोजित केला होता. तो अभूतपूर्व असा कार्यक्रम पार पडला होता. त्या वेळी मला सिंधुताई सपकाळ यांची मुलाखत घेण्याची संधी भाऊंनी दिली होती. एका महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारीच्या बाबतीत माझ्यावर विश्वास टाकून भाऊंनी माझी एकल चौकशी समिती गठीत करून मला न्यायिक ज्ञान प्राप्त करण्याची संधी दिली.

आजही भाऊ मला घरातील माझ्या 'बाबा' या टोपण नावाने आवाज देतात, तेव्हा मला परिवारात असल्यासारखे वाटते. त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून पुढे जाणारे त्यांचे आम्ही शिष्यच होतो. मी प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा येथे प्राचार्य असताना माझा आधारस्तंभ म्हणून नेहमीच ते प्रत्येक सभेला येत होते. नॅक समिती आली, त्या वेळेसही माझा उत्साह वाढविण्यासाठी ते जातीने हजर होते. यशवंत महाविद्यालय, वायगावला प्राचार्य असताना तेथे आलेली समितीही आपल्याला अनुकूल नाही. ती कमेटी जो निर्णय देतील तो आपण स्वीकारू, खचून जाऊ नका हे सांगण्यासाठी भाऊ वर्धेवरून वायगावच्या कॉलेजला आले. यावरून कुटुंबप्रमुखाची जबाबदारी पाळणारे भाऊ आहेत हे स्पष्ट होते. दाआजीच्या निधनानंतर माझ्या नोकरीवर आघात बसणार होता. त्या वेळी भाऊ परिस्थितीची जाणीव ठेवून माझ्या पाठीशी उभे ठाकले, त्यामुळे मी आनंदाने जीवन जगतो आहे. नंतर देवळीच्या महाविद्यालयातून यशवंत महाविद्यालयात माझी नियुक्ती झाली, ती फक्त भाऊंच्या आशीर्वादामुळेच. मी पुढे संशोधन कार्य आणि पुस्तक लिखाणाचे कार्य करू शकलो. १९९६-९७ मध्ये नागपूर विद्यापीठातील पीएच. डी. विभागाने दोन्ही बहिस्थ परीक्षकांचा अहवाल आला आहे, आता मला पीएच. डी. ची उपाधी मिळणार ही आनंदाची बातमी त्या वेळेचे समाजविज्ञानाचे अधिष्ठाता व महाविद्यालयाचे प्राचार्य वसंतराव घोरपडे सरांनी सुरेशभाऊंना सांगितली. त्या वेळी घरोघरी फोन नव्हता. दुसरे दिवशी सकाळी ८ वाजता भाऊ नागपूरला जाताना महाविद्यालयाजवळ थांबून मला त्यांनी बोलावून अभिनंदन केले, म्हणून मी दाआजी व भाऊंना माझ्या हृदयाच्या मंदिरात देवत्वाच्या जागेवर ठेवले आहे.

भाऊ हे मनाने निर्मळ, हळवे आणि संवेदनशील आहेत. त्यांच्या मनामध्ये मत्सर, द्वेष, अहम् मला कधीच आढळला नाही. दुसऱ्यांकडून पार्टी खाणे हा प्रकार त्यांच्या डिक्शनरीत आणि त्यांच्या सुसंस्कारात नाही. शिक्षण, बुद्धिमत्ता, श्रीमंती इत्यादी कोणत्याच गोष्टीचा त्यांना अहंकार किंवा गर्व नाही, कारण त्यांचे पाय आजही जमिनीवर आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर आजही स्मितहास्यच असते. ते अत्यंत शिस्त, सत्यवचनी, प्रामाणिक आहेत. त्यांना माणसे जोडणे आवडतात आणि निर्मळ मनाने जोडूनही ठेवतात. ते मैत्रीमध्ये सतत संवाद, स्नेह आणि प्रेमाचे सिंचन करतात, म्हणून त्यांच्याबाबत अरुण गुजराथी, माजी सभापती, महाराष्ट्र राज्य म्हणतात, 'जे आयुष्यभर इतरांना अमृत वाटतात, त्यांचाच अमृत महोत्सव साजरा होतो, सुरेशरावांनी आयुष्यभर समाजाला अमृत वाटले.' 'व्यासंगातून माणूस मोठा तर होतोच, पण सत्संगातून तो अधिक मोठा होतो. असा संत्सगाचा वारसा भाऊंना त्यांच्या आई-वडील व गांधी ते विनोबा भावेंकडून मिळाला' असे आमदार उल्हास पवार यांनी भाऊंविषयी म्हटले आहे.

२० मे २०२४ रोजी भाऊंनी ७५ वर्ष पूर्ण केली. या ७५ व्या वर्षीसुद्धा त्यांचे व्यक्तिमत्त्व हे नेहमीच हसतमुख आणि प्रफुल्लित असते. आजही ते महाराष्ट्राच्या सहकार चळवळीशी आपले नाते ते सांभाळीत आहेत. ज्याप्रमाणे दाआजींनी शिक्षणाची गंगा खेडोपाडी पोहचविली, तसेच भाऊंनी सहकाराची गंगा तळागाळातल्या जनसामान्यापर्यंत पोहोचविली आणि त्यांना सन्मानाचे स्थान मिळवून दिलेले आहे. शैक्षणिक क्षेत्रातही ते अग्रेसर आहेत, म्हणून याची दखल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने घेऊन त्यांना जीवन साधना हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवान्वित केले आहे.

प्रत्येक वेळी भाऊंनी दाखविलेली सयंमता, सत्यता, धैर्य, कुशाग्रबुद्धी व शांत स्वभावाचा परिचय करून देत आहे. मला भाऊंसोबत अनेकदा जवळ बसण्याची व संवाद साधण्याची संधी मिळाली. मला भरपूर काही शिकण्याची संधी मिळाली. ते शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी दरवर्षी पोळ्याला सेवाग्रामच्या घरी येतात. मी त्या वेळी आवर्जून हजर राहतो. त्यांना दररोज भेटण्याऱ्यांची संख्या भरपूर असते. काही विरोधात्मकही बोलतात; परंतु त्यांना मी कुणावरही चिडलेले कधीही बघितले नाही. त्यांचे हृदय करूणेने ओतप्रोत भरलेले आहे. दुसऱ्यांवर टीका करणे किंवा वाईट बोलताना ते कधीही आढळले नाही. भाऊंच्या अशा स्वभावामुळे मोठ्या अभिमानाने म्हणू शकतो 'सुपुत्राचा सुपुत्र' सुरेशभाऊंसारखा असावा.

आनंद या जीवनाचा सुगंधा परी दरवळावा।
झिजुनी स्वतः चंदनासम दुसऱ्यास मधुमंध द्यावा।

या ओळींचा प्रत्यय आपल्याला सुरेशभाऊंच्या जीवनात पाहायला मिळतो. सुरेशभाऊंच्या कार्यास आणि पुढील आयुष्यास भरघोस यश देवो हीच त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांचे आरोग्य निरोगी राहो हीच सदिच्छा.




# कुटुंबवत्सल प्रा. सुरेशभाऊ देशमुख

**डॉ. अनिता विलास देशमुख**
मराठी विभागप्रमुख
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा



वर्धेच्या सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात ज्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविलेला आहे, ते स्व. बापुरावजी देशमुख यांचे जेष्ठ चिरंजीव प्रा. श्री. सुरेशभाऊ देशमुख यांनी २० मे २०२३ ला वयाची ७४ वर्षे पूर्ण करून ७५ व्या वर्षात पदार्पण केले. त्यामुळे २० मे २०२३ ते २० मे २०२४ हे वर्ष 'कृतज्ञता वर्ष' म्हणून साजरे करावे असे वर्धेतील सामाजिक संघटना, सर्व राजकीय पक्ष व विविध क्षेत्रातील लोकांनी ठरविले. २० मे २०२३ ला या अमृत महोत्सवी कृतज्ञता वर्षाची सुरूवात झाली. प्रा. सुरेशभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडणारे लेख अनेक मान्यवरांकडून मागवून गौरवग्रंथ प्रकाशित करावा असेही ठरविण्यात आले. त्यानिमित्ताने प्रा. सुरेशभाऊंच्या कौटुंबिक जीवनाचा परिचय करून देण्याची जबाबदारी माझ्याकडे देण्यात आली.

शिक्षणमहर्षी बापुरावजी देशमुख यांचे १९९० ला निधन झाले. त्यानंतर खऱ्या अर्थाने राजकीय, सहकार व शैक्षणिक क्षेत्रात सुरेशभाऊंच्या कार्याची सुरूवात झाली. दाआजींनी निर्माण केलेल्या अनेक संस्थाचा सांभाळ करण्याची जबाबदारी भाऊंकडे आली. भाऊ पहिल्यांदा १९८५ मध्ये वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष झाले. या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांचा त्यांच्याशी संबंध आला. शेतकऱ्यांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या आणि त्या सोडविण्याचा प्रयत्न केला.

समाजात राहत असताना आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून भाऊंनी समाजकार्य केले. समाजकार्य करण्याचे बाळकडू त्यांना दाआजींकडून मिळाले आणि ते भाऊंनी सार्थ करून दाखविले. समाजकारण आणि राजकारण ह्या दोन गोष्टी हातात हात घालून चालत असतात. समाजकारण करताना भाऊंनी राजकारण मध्ये आणले नाही. सहकार क्षेत्रात व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करताना नि:स्वार्थ भावनेतून त्यांनी कार्य केले. वंदनीय तुकडोजी महाराजांनी म्हटल्याप्रमाणे –

> 'जे जे शोभे सेवेच्या कार्या। ते ते करी सर्व ही
>
> नेत्री तयाच्या सात्त्विक तेज। बोलण्यात भरले असे ओज'

सात्त्विक भावनेतूनच भाऊ कार्य करीत आहेत. त्यांच्या बोलण्यात मृदुता आहे. भाऊ कधीच चढ्या आवाजात कोणाशी बोलत नाहीत. काही लोकांना सत्तेची व पदाची धुंदी चढलेली असते व ते लोक परिसरात आल्याबरोबर आरडा–ओरडा करून दहशत पसरवण्याचा प्रयत्न करतात; परंतु अशा लोकांची परिस्थिती नंतर 'रोज रोज मरे त्याला कोण रडे' अशी होते; पण भाऊंचे तसे नाही. त्यांची आदरयुक्त भीती समाजात व कुटुंबात सर्वांना असते, म्हणूनच भाऊ लोकप्रिय नेते, कुटुंबवत्सल परिवारप्रमुख, उत्तम प्रशासक, कुशल संघटक व जाणकार म्हणून संपूर्ण वर्धा जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत. भाऊंचा स्वभाव मितभाषी व सोज्ज्वळ आहे. त्यांना माणसांची पारख आहे. दाआजींच्या काळातील ज्येष्ठ लोकांसोबत भाऊंचे ऋणानुबंध आहेत.

भाऊंनी बापुरावजी देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयात अनेक गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले. दाआजींनी ज्या उद्देशाने सेवाग्रामला अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. तो उद्देश भाऊंनी अनेक अभियंते घडवून सार्थ केला. यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेतील अनेक कर्मचाऱ्यांच्या मुलांची फी कधीच घेतली नाही. आपल्या कर्मचाऱ्यांची मुले अभियंते होत आहेत यातच भाऊंना आनंद होता. घरच्या ड्रायव्हरची मुलेसुद्धा अभियंते झालेली आहेत. संस्थेतल्या प्राध्यापकांनी आचार्य पदवी मिळविली असेल, कुठला पुरस्कार मिळविला असेल, त्यांचा सत्कार भाऊ स्वत: करतात. प्राध्यापकांना नवीन नवीन उपक्रम राबविण्यासाठी भाऊ नेहमीच प्रोत्साहन देत असतात. भाऊंच्या कार्यकाळात त्यांनी महाविद्यालयातील प्राचार्यांना काम करण्याची संपूर्ण मुभा दिली होती. त्यांनी कधीच अध्यक्ष या नात्याने हस्तक्षेप केला नाही. संपूर्ण नागपूर विद्यापीठात यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचा नावलौकिक आहे आणि उत्कृष्ट शिक्षण संस्था म्हणून यशंवत ग्रामीण शिक्षण संस्थेला राज्यशासनाचा पुरस्कार सुद्धा मिळालेला आहे.

दाआजींची राजकीय पार्श्वभूमी लाभलेली असूनसुद्धा भाऊंना खूप संघर्ष करावा लागला. कोणतीही गोष्ट भाऊंना सहजा–सहजी मिळाली नाही.

> ''कभी चाँद चमका गलत वक्तपर,
>
> कभी घर में सूरज उगा देर से,

रहे साथ कुछ ऐसे हालात भी,

जो होना था जल्दी, हुआ देर से''

या ओळींप्रमाणे हे व्यक्तिमत्त्व जगत आहे. अपयशाने ते कधी खचून गेले नाहीत. निवडणुकीत पराभवानंतर थोडं वाईट वाटायचं; पण सत्ता म्हणजे समाजसेवेसाठी मिळालेली एक संधी असते. सत्ता ही अस्थिर असते; पण लोककल्याणाची कामे व लोकांचे प्रेम हे जास्त महत्त्वाचे असते. असे ते मानतात.

भाऊंच्या सोज्वळ व संयमी स्वभावामुळे विरोधी पक्षातल्या लोकांनासुद्धा भाऊ आपलेसे वाटतात. भाऊंच्या घरी सर्व पक्षातले अनेक नेते, मुख्यमंत्री, मंत्री येऊन गेलेले आहेत. याचा प्रत्यय भाऊंचे कनिष्ठ सुपुत्र यांच्या विवाहाप्रसंगी आला. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनासाठी आलेले मुख्यमंत्री, अनेक मंत्री, आमदार, खासदार त्या विवाहाला आवर्जून उपस्थित होते. समाजकारणात व राजकारणात मित्र असणे व त्यांच्याशी मैत्री टिकून राहणे विरळाच; पण भाऊंनी मित्र आणि मैत्री सांभाळली आहे.

मानवी जीवन जगत असताना कोणाचेच आयुष्य पूर्णपणे यशस्वी नसते. यश-अपयश पचवूनच पुढे जावे लागते. अशावेळी कवी मर्ढेकर म्हणतात त्याप्रमाणे,

''धैर्य दे अन् नम्रता दे, पाहण्या जे जे पाहणे

वाकूदे बुद्धीस माझ्या, तप्त पोलादाप्रमाणे''

राजकारणातले यश आणि अपयश सारख्याच भावनेने भाऊंनी स्वीकारले. जेव्हा ते आमदार झाले, तेव्हाही त्यांचे पाय जमिनीवरच होते. यशाचा कैफ त्यांनी कधी चढू दिला नाही आणि निराशाही त्यांनी सहज पचविली. त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंब त्यांच्यामागे भक्कमपणे उभे राहिले व त्यांना धीर दिला. सहसा सार्वजनिक कार्यात व राजकारणात रमलेल्या लोकांचे स्वत:च्या घराकडे दुर्लक्ष होत असते; परंतु भाऊंनी वैयक्तिक, सार्वजनिक व राजकीय या बाबींना योग्य न्याय दिला. राजकारणाच्या धकाधकीच्या जीवनात त्यांना भक्कमपणे साथ देणाऱ्या त्यांच्या अर्धांगिनी सौ. स्वातीताई. स्वातीताई मुळातच धार्मिक वृत्तीच्या. त्यांच्या या धार्मिकतेला भाऊंनी कधीही विरोध केला नाही. देवा-धर्माची आवड असणाऱ्या स्वातीताईंनी अनेकदा भागवत सप्ताहांचे आयोजन केले. विविध धार्मिक स्थळांना भेटीसुद्धा दिल्या. हे सर्व करत असताना त्या कधीच एकट्या गेल्या नाहीत. आम्हा कुटुंबातल्या लोकांना, घरच्या नोकर-चाकरांनाही त्या सोबत घेऊन जातात. त्यांचा हाच उद्देश असतो की, आपल्याबरोबर सर्वांचेच तीर्थ घडले पाहिजे. तसे आमचे कुटुंब खूप मोठे आहे. सुरेशभाऊंची व स्वातीताईंची कुटुंबाशी अजूनही नाळ जुळलेली आहे. दरवर्षी पोळ्याला भाऊ व स्वातीताई आवर्जून सेवाग्रामला घरी जातात. दरवर्षी कोजागरी पोर्णिमेला अजूनही आम्ही त्यांच्या घरी एकत्र जमतो. कित्येकदा त्यांच्या घरी जेवणावळी उठतात. काही निमित्त नसले, तरी भाऊ स्वातीताईंना म्हणतात, 'सगळ्यांना जेवायला बोलाव.' त्या माऊलीनेही कधी भाऊंना नाही म्हटले नाही, आनंदाने त्या सर्वांचे आदरातिथ्य करतात. सतत त्यांच्या घरी येणाऱ्या जाणाऱ्यांचा राबता असतो. स्वातीताई फक्त त्यांच्याच घरातल्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतात असे नाही, तर चुलत दीर, जावा, त्यांची मुलं या सर्वांचे वाढदिवस लक्षात ठेवून त्या फोन करून शुभेच्छा देतात. हे सर्व करताना त्यांना अतिशय आनंद होतो. स्वातीताईंनी त्यांच्या दोन्ही मुलांना समीर आणि संदीपला उत्तम संस्कार दिले आहेत. सुना नातवंडांनी भरलेले त्यांचे घर गोकुळच आहे.

कुटुंबातील प्रत्येक लग्नात भाऊंची उपस्थिती खूप उत्साह वाढविणारी असते. कुटुंबातल्या सुख-दु:खाच्या प्रसंगी सर्वांना त्यांचा मोठा आधार वाटतो. नातेवाईकांच्या अडचणी सोडविण्यासाठी, त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी

भाऊ सदैव तत्पर असतात. आमच्या कुटुंबाचे सुरेशभाऊ आधारवड आहेत.'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' या न्यायाने भाऊ आमच्या सोबत असतात.

सुरेशभाऊंना पर्यटनाचीही आवड आहे. अनेक परदेश दौरेही भाऊंनी केले आहेत. परदेश दौरा हा केवळ मौजमजा मारण्यासाठी नसून त्या देशाची संस्कृती, तिथले वातावरण, तिथली आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय परिस्थिती यांच्या अभ्यासासाठी सुद्धा असतो. असे त्यांचे प्रामाणिक मत आहे.

भाऊंसोबत भारतातील आणि महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळ बघण्याचा योग अनेकदा आला. या दरम्यान भाऊंना ओळखणारे व त्यांना मानणारे अनेक लोक आम्हाला भेटले. यावरून केवळ वर्धा जिल्ह्यातच नव्हे, तर बाहेरही त्यांना लोक मानतात हे आम्हाला प्रत्यक्ष अनुभवता आले. मी १९८८ मध्ये देशमुख कुटुंबात सून म्हणून आले. १९८८ नंतरच्या भाऊंच्या राजकीय, शैक्षणिक, सहकार व सामाजिक जीवनाच्या वाटचालीची मी साक्षीदार आहे.

शिक्षणमहर्षी दाआजींनी स्थापन केलेली यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा जिल्ह्यात डौलाने उभी आहे. आजची शैक्षणिक परिस्थिती बघता अनेक शैक्षणिक संस्था नव्याने निघाल्या आहेत; पण यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेची सर कोणत्याच संस्थेला नाही. कवी श्रीपाद प्रभाकर जोशी या कवीची क्षमा मागून त्यांच्या कवितेत थोडा बदल करून ओळी मी उद्धृत करत आहे.

''उदंड झाल्या शिक्षण संस्था
अन् स्वार्थाचे झुलते पीक
भाऊ तुमच्या सौजन्याचा
इथेच उजळत आहे दीप''

दाआजींनी लावलेला शैक्षणिक दीप अजूनही तेवत आहे व तो असाच उत्तरोत्तर तेवत राहील.

आज समृद्ध जीवनाच्या टप्प्यावर असताना वयाची पंचाहत्तरी आपण गाठली. यापुढेही असेच निरामय, आनंदी जीवन आपल्या वाट्याला येवो हीच सदिच्छा. पुन्हा एकदा कवी श्रीपाद जोशींच्या ओळी –

''फुले वेचावी तशीच अलगद
तुम्ही वेचले इथले क्षण
आपुलकीच्या जुळवित तारा
इथे फुलविले नंदनवन''

ह्या ओळी भाऊ तुमच्या कार्याला, कर्तृत्वाला शोभतात.

# प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्यासोबत मुक्तसंवाद




**संवादक – डॉ. प्रमोद नारायणे**
वर्धा



वर्धा जिल्ह्याला वैभवसंपन्न अशी एक ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. या इतिहासाच्या समृद्ध नोंदींमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे आणि गांधीजींचे मानसपुत्र जमनालाल बजाज यांचे नाव अग्रस्थानी आहे. हा वर्धा जिल्हा सर्वच दृष्टीने सर्वांगसुंदर जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यातील निसर्गाला, भौगालिक वातावरणाला, समाजकारणाला, संस्कृतिकारणाला आणि राजकारणाला वैशिष्ट्यपूर्णता लाभलेली आहे. या वेगळेपणात आणि वैशिष्ट्यपूर्णतेत शिक्षणमहर्षी व सहकारमहर्षी बापुरावजी देशमुख उपाख्य दाआजी यांच्या कार्यकर्तृत्वाची भर पडली आहे. दाआजींचा वारसा समर्थपणे पुढे चालवणारे प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांचेही सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व या जिल्ह्याच्या समृद्धपटलावर उजळून निघाले आहे. लोकनेते प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाचा धांडोळा त्यांच्याच शब्दांतून जाणून घेण्यासाठी त्यांच्यासोबत आज मुक्तसंवाद साधण्यात येत आहे.

**प्रश्न : नमस्कार भाऊ, वर्धा जिल्ह्याचे राजकीय भूषण, सामाजिक राजकारणाला तत्त्व मानणारा लोकनेता, निगर्वी व्यक्तिमत्त्वाचे धनी, जनसेवा हाच राजधर्म मानणारा जनसेवक, शिक्षणातून माणसे घडविणारा संस्थापक, स्वच्छ प्रतिमेचा दिशादर्शक राजकारणी, संयमी, कृतिशील, प्रामाणिक आणि निष्ठावान लोकसेवक, राजकारणातील निर्मळ प्रवाह, सामान्यांचे आधारवड, एक सच्चा माणूस, उदार मनाचा नेता अशी कितीतरी बिरूदे आपल्या व्यक्तिमत्त्वाला लावता येतील. भाऊ, आपले वडील बापुरावजी देशमुख यांच्या एकूणच कार्यकर्तृत्वाचा अमिट ठसा वर्धा जिल्ह्यातील सर्वच क्षेत्रांवर उमटलेला आहे. एक सामान्य कार्यकर्ता ते वर्धा जिल्ह्याचे कार्यकुशल नेतृत्व अशी मोठी राजकीय वाटचाल त्यांनी केली आहे. त्यांच्या कार्याचा आणि कर्तृत्वाचा प्रभाव आपल्यावर आहेच. एक वडील म्हणून आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाचे नेते म्हणून आपण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल काय सांगाल?**

– श्रद्धेय बापुरावजी देशमुख उपाख्य दाआजी यांच्याबद्दल बोलावं तेवढं कमीच आहे. सेवाग्रामसारख्या एका लहानशा खेड्यात बापुरावजी देशमुख यांचा जन्म झाला. महात्मा गांधी सेवाग्रामला असताना माझे आजोबा मारोतराव देशमुख गांधीजींच्या संपर्कात आले. गांधीजींच्या विचारांनी त्यांना अगदी झपाटूनच टाकले. आपल्या मुलांनेही गांधीजींच्या विचारांवर चालावे असे त्यांना मनोमन वाटत होते. दाआजीसुद्धा तरुणपणी गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वांनी भारावून गेले होते, त्यांच्या मनात देशसेवेविषयी अतीव भावना निर्माण झाली. आपल्याला जमेल तेवढे समाजसेवेचे काम आपण केले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. त्यांनतर त्यांनी समाजकार्यासाठी स्वत:ला झोकूनच घेतले असे म्हणा ना! बापुरावजी देशमुख हे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. माझे वडील म्हणून मी हे सांगत नाही, तर कोणत्याही कार्यकर्त्याच्या मनातील त्यांच्याविषयीची मते मी याठिकाणी सांगतो आहे. एखादा व्यक्ती शून्यातून स्वतंत्र विश्‍व निर्माण करतो म्हणजे काय? बापुरावजी देशमुख यांच्यामध्ये यशस्वी होण्याचे अनेक गुण होते, ज्यामुळे त्यांनी एवढा अफाट असा डोलारा निर्माण केला. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. जर एखादी गोष्ट करायची असेल, तर तिचा भविष्यातील परिणाम काय होणार आहे? याचा ते गांभिर्याने विचार करीत. त्यांच्या मनात अनेक योजना येत असत. त्या योजना समाजाच्या किती फायद्याच्या आहेत? यातून सर्वसामान्य लोकांना काय मिळणार आहे? याचा ते पहिल्यांदा विचार करीत आणि त्यानुसार त्या योजना पूर्णत्वाकडे गेल्या पाहिजे यासाठी प्रयत्न करीत. ते फार जिद्दी स्वभावाचे होते. मनात ठरविलेले काम झालेच पाहिजे असा त्यांचा मानस असे. स्वत:चा स्वार्थ त्यांनी कधी पाहिला नाही. आपण जे करीत आहोत, ते लोककल्याणासाठी असले पाहिजे असे त्यांना वाटे. त्यामुळे नि:स्वार्थ भावनेने केलेल्या कामाला यश आल्याशिवाय राहणार नाही याची त्यांना खात्री होती. त्यांना आपल्या कामाविषयी आत्मविश्‍वास वाटे. आपण करतो आहोत ती प्रत्येक गोष्ट समाजहिताची असावी अशी त्यांची अपेक्षा असे. त्यामुळे त्यांना प्रत्येक कामात यश येत गेले.

**प्रश्न – दाआजींच्या प्रत्येक कार्यात यशवंतराव चव्हाण यांचे मार्गदर्शन आणि त्यांचे पाठबळ होते हे सर्वज्ञातच आहे. यशवंतरावांनी दाआजींना दिलेले प्रोत्साहन त्यांच्या कार्याला पुढे नेण्यास कारणीभूत ठरले होते. दाआजी आणि यशवंतराव चव्हाण यांच्या स्नेहसंबंधाबद्दल आपण काय सांगू शकाल?**

– खरं म्हणजे दाआजींना राजकीयदृष्ट्या स्थिरस्थावर करण्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचा मोठा सहभाग राहिला आहे. त्यांनी दाआजींच्या प्रत्येक कार्यात मदत केली. ते वेळोवेळी त्यांच्यासाठी धावून आले. त्यांनीच दाआजींची महाराष्ट्राच्या राजकारणात खऱ्या अर्थाने ओळख करून दिली. यशवंतराव चव्हाण हे मोठे धुरंधर व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी दाआजींच्या एकूणच कार्यात सहकार्य केलेच; पण खेड्यात राहणाऱ्या तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी शाळा –महाविद्यालये सुरू झाली पाहिजे ही दाआजींची इच्छा होती. ही दाआजींची योजना पूर्णत्वाला नेण्यासाठी यशवंतरावांनी सर्वतोपरी मदत केली. त्यांना चांगल्या माणसांची ओळख होती. राजकारणातील मौल्यवान हिरे त्यांना चांगल्या पद्धतीने ओळखता येत होते. त्यांनी दाआजींमधील क्षमता ओळखली. दाआजी वर्धा जिल्ह्यासाठी नवं काही घडवू शकतात. याची त्यांना खात्री पटली. म्हणूनच ते

दाआजींच्या प्रत्येक कामासाठी वेळोवेळी वर्धेत आले. त्यांच्या प्रेरणेनेच आमच्या शिक्षण संस्थेचं एवढं मोठं वैभव उभं राहिलं. दाआजींनी १९५९ साली संस्थेची मुहूर्तमेढ रोवली, तेव्हा यशवंत शिक्षण संस्था असे यशवंतरावांचेच नाव संस्थेला दिले. दाआजींच्या जीवनात त्यांचे किती अग्रगण्य स्थान होते हे तुमच्या लक्षात आले असेलच. महत्त्वाचे म्हणजे यशवंतराव जेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, तेव्हा दाआजी आमदार होते. त्यामुळे त्यांच्या सतत भेटीगाठी होत असत.

**प्रश्न – यशवंतरावांना तुम्ही जवळून पाहिलेले आहे. तुम्ही त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाविषयी काय सांगाल?**

– मी तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून गेलो होतो. एकदा दाआजींच्या ६१ वीच्या कार्यक्रमासाठी ते आले होते. मी त्यांना घेण्यासाठी नागपूरला गेलो होतो. वर्धा ते नागपूर असा दीड तास मी त्यांच्यासोबत प्रवास केला. त्यांच्यासोबत राहण्याचा तो एक प्रसंग माझ्यासाठी फार महत्त्वाचा होता. त्यांच्या प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाने मी तर अक्षरश: भारावूनच गेलो होतो. त्यांचा राजकारणाविषयीचा अभ्यास, साहित्याबद्दलचा व्यासंग आणि महाराष्ट्राच्या एकूणच भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीची सूक्ष्म जाण पाहून त्यांच्याविषयी माझ्या मनात कायमचा आदर निर्माण झाला.

**प्रश्न – राजकारणात सहभागी व्हावे असे आपल्याला केव्हापासून वाटायला लागले?**

– त्यावेळी माझे वडील स्व. बापुरावजी देशमुख हे राजकारणात सक्रिय होते. वर्धा जिल्ह्याच्या राजकारणात त्यांनी स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले होते, त्यामुळे आमच्या घरी आधीपासूनच राजकीय वातावरण तयार झाले होते. राजकीय क्षेत्रातील अनेक लोक आमच्या घरी येत असत. त्यांच्या राजकीय विषयावरच्या चर्चा होत असत. माझ्या मनावर तेव्हापासूनच या विचारांचा प्रभाव पडत गेला. वडिलांनी लोकसेवेचा चालविलेला वारसा आपणही पुढे न्यावा असे मला वाटायला लागले. राजकारणाचा उपयोग आपण समाजकार्य आणि शिक्षणकार्यासाठी केला पाहिजे, असा विचार माझ्या मनात तेव्हापासूनच येऊ लागला होता. माझ्या राजकारणाची बिजे अशाप्रकारे रूजत जाऊ लागली.

**प्रश्न – आपण प्रत्यक्ष राजकारणात केव्हा सहभाग घेतला? म्हणजे आपण पहिली निवडणूक कधी लढविली. याविषयीचे काही अनुभव सांगाल?**

– तो १९८५ चा काळ होता. माझा राजकारणातील तो प्रत्यक्षात पहिला सहभाग म्हणता येईल. मी आमच्या कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर हिंगणघाट इथून विधानसभेसाठी अर्ज सादर केला. माझ्या विरोधात शेतकरी संघटनेचे डॉ. वसंत बोंडे होते. त्यावेळी माझा थोड्या मताने पराभव झाला; पण या निवडणुकीने माझा राजकारणात सक्रिय प्रवेश झाला. राजकारण हा शब्द जरी प्रत्येकांसाठी नवा नसला, तरी प्रत्यक्ष निवडणूक लढविणे किती कठीण असते हे तेव्हा माझ्या लक्षात आले. या निवडणुकीतून माझा जनसंपर्क वाढला. लोकांच्या समस्या जाणून घेता आल्या. या निवडणुकीच्या निमित्ताने हिंगणघाट तालुका मला पालथा घालता आला. लोकांशी संवाद साधून त्यांच्यापर्यंत जाता आले. माझ्यासोबत अनेक कार्यकर्ते जुळले, अनेक जिव्हाळ्याचे लोक जुळले. ही निवडणूक हक्काची आणि जिव्हाळ्याची माणसे जोडण्यासाठी मला कामी आली.

**प्रश्न – शरद पवार हे महाराष्ट्राचे बिनीचे नेते आहेत. सध्याच्या काळात त्यांच्याशिवाय महाराष्ट्राचे आणि देशाचे राजकारण पूर्ण होत नाही. शरद पवार आणि आपला स्नेहसंबंध सर्वश्रुत आहे. आपल्या आणि शरद पवारांच्या एकूणच स्नेहसंबंधांबद्दल व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल काय सांगाल?**

– माझे आणि पवारसाहेबांचे स्नेहसंबंध माझ्या विद्यार्थीदशेपासूनचे आहेत. मी विद्यार्थी असताना युथ काँग्रेसचा सक्रिय कार्यकर्ता होतो. त्या वेळी मी विद्यार्थ्यांच्या अनेक आदोलनांमध्ये सहभागी झालो. विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न सोडविण्यात मी सहभाग घेतला. मी युथ काँग्रेसचे जिल्ह्याचे नेतृत्वही त्या काळी केले. या काळात माझी पवार साहेबांसोबत भेट झाली. तेसुद्धा युथ काँग्रेसचे नेते होते. मला तेव्हापासून त्यांच्या एकूणच कुशल संघटनकौशल्याने भारवून टाकले. त्यामुळे त्यांच्या मी अधिक संपर्कात आलो.

**प्रश्न – त्यांच्याशी आपले एवढे जिव्हाळ्याचे नाते केव्हापासून तयार झाले ?**

– माझे वडील १९९० साली गेले. त्यांच्या निधनाने आमची छत्रछाया हरवली. आम्ही एकप्रकारे सर्वच दृष्टीने पोरके झालो असेच म्हणा ना! कारण दाआजी आमच्यासाठी फक्त वडीलच नव्हते, तर ते एक चांगले मार्गदर्शक आणि आमच्या प्रगतीचे केंद्रबिंदू होते. दाआजी गेल्यानंतर आमच्या दु:खात पवार साहेब सामील झाले. त्या काळात सर्वच दृष्टीने आम्हाला पवार साहेबांनी आधार दिला. आम्हाला पुन्हा नव्या जोमाने त्यांनी उभे केले. त्यानंतरही ते आमच्या प्रत्येक कार्यक्रमात आले. मग तो इंजिनिअरिंग कॉलेजच्या नामकरणाचा कार्यक्रम असो, दाआजींच्या पुतळ्याचे उद्घाटन असो, किंवा यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचा सुवर्ण महोत्सव असो त्यांनी प्रत्येक वेळी आवर्जून उपस्थिती दर्शविली. त्यांचा तो स्नेह आणि जिव्हाळा आजतागायत सुरू आहे. त्यांच्या प्रेमाची छत्रछाया आजही आमच्यावर कायम आहे.

**प्रश्न – पवार साहेब आपल्याला नेते म्हणून कसे वाटतात ?**

– प्रत्येकाच्या सुखदु:खात धावून जाणारा नेता आणि तळागाळातील कार्यकर्त्यांपासून सगळ्यांची काळजी घेणारा आणि सर्वांना आपला वाटणारा आधारस्तंभ म्हणून पवारसाहेब मला खूप मोठे वाटतात. आपण दिल्ली किंवा मुंबईला भेटायला गेलो, तर ते कितीही कामात व्यस्त असले, तरी सर्वांची भेट घेतल्याशिवाय राहत नाहीत. त्यांना अनेक कार्यकर्त्यांची नावे पाठ आहेत. सर्वांची आस्थेने आणि तळमळीने विचारपूस करणारा पवार साहेबांसारखा नेता मी तरी आजतागायत पाहिला नाही. त्यांच्याकडे इतरांपेक्षा वेगळे व्हिजन आहे. सध्या भारताला भेडसावणारे प्रश्न सोडवून प्रगती साधता येईल याविषयीचे प्लॅनिंग त्यांच्याकडे आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते शेतकरी कुटुंबातून आले आहेत. गावखेड्यांची मानसिकता त्यांना उत्तमप्रकारे माहिती आहे. जनतेच्या मनात काय चालले आहे? हे त्यांना कळते. लोकभावनेचा आदर करणारे ते जाणकार नेते आहेत. शेतकऱ्यांचे मूळ प्रश्न काय आहेत? याची त्यांना उत्तम जाण आहे. त्यांच्या समस्या सोडविण्याचे काय उपाय आहेत? हे त्यांना चांगले ज्ञात आहे. त्यामुळे आज तरी पवारसाहेबांएवढा दुसरा नेता मला दिसत नाही.

**प्रश्न – पहिल्या निवडणुकांनंतरही आपण चार वेळा निवडणुका लढविल्या, त्यातही आपल्याला पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवाविषयी आपल्याला काय सांगता येईल ?**

– हे बघा, निवडणूक म्हटली की, कुणाचा तरी पराभव होणार आणि कुणाचा तरी विजय होणार हे ठरलेले आहे. मी जवळपास चार वेळा पराभूत झालो, तरी मी निराश झालो नाही; किंवा खचून गेलो नाही. लोकांची कामे करीत राहायचे हेच मी ठरवले. आपण निवडणूक जिंकण्यासाठी राजकारण करीत नाही, तर आापल्याला या राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण करायचे आहे, म्हणून आपण राजकारणात सहभागी झालो आहोत, हे माझ्या मनाने आधीपासूनच ठरवून टाकले होते. त्यामुळे मी पराभवाची चिंता करीत नव्हतो. आपण स्वच्छपणे राजकारण करायचे हे मात्र मी मनाशी ठरवून टाकले होते. राजकीय कुरघोडी किंवा विरोधकांवर चिखलफेक करणे माझ्या स्वभावातच नाही. त्यामुळे लोकांच्या हिताचे जे असेल, ते करीत राहायचे असेच मला नेहमी वाटत आले आहे. लोकप्रतिनिधी नसलो, तरी ही कामे आपण केली पाहिजे असे मला वाटायचे, त्यामुळे पराभव हा माझ्यासाठी नवीन काहीतरी शिकायची संधी म्हणून मी त्याच्याकडे पाहतो. प्रत्येक पराभवातून मी अनेक गोष्टी शिकत गेलो आणि पुन्हा नव्या दमाने राजकारणात सक्रिय होत गेलो. पराभवाने मी कधी खचलो मात्र नाही. उलट नव्या जोमाने उभा राहिलो हे मात्र नक्की !

**प्रश्न – आपण २००९ साली वर्धा विधानसभेमधून निवडणूक लढविली आणि आपण ती जिंकलीसुद्धा याबद्दल काय सांगाल ?**

– होय, बरोबर आहे. मी २००९ ला कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर वर्धा मतदार संघातून पुन्हा एकदा निवडणूक लढविली आणि ती निवडणूक आम्ही जिंकलीसुद्धा. हा विजय माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांचा विजय होता. माझा विजय पाहू इच्छिणाऱ्या सर्वांचा तो विजय होता. मला लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभेत

पाठवू इच्छिणाऱ्या सर्व जनभावनांचा तो विजय होता. माझ्या मतदार संघात असलेल्या सर्व जनतेचा तो विजय होता. या माझ्या विजयात सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि आनंद साजरा केला.

**प्रश्न – या निवडणुकीत आपण कशाप्रकारची यंत्रणा राबविली होती. या निवडणुकीतील यशाचे गमक काय होते?**

– मी आपल्याला सांगितले त्याप्रमाणे मी निवडणुकींमधील पराभवाने कधीही खचलो नाही; उलट चांगल्या प्रकारे लोकांचे कामे करीत गेलो. याचाच फायदा मला २००९ च्या निवडणुकीत मिळाला. या निवडणुकीत माझा विजय झाला पाहिजे यासाठी सर्वच लोक कामाला लागले होते. प्रचारादरम्यान गावागावातून उत्तम प्रतिसाद मिळत होता. या निवडणुकीचा मुख्य सूत्रधार हा समीर होता. त्यांनी आणि त्याच्या तरुण कार्यकर्त्यांनी या काळात खूप परिश्रम घेतले. वेगवेगळ्या प्रकारची निवडणूक यंत्रणा राबविली. दिवसरात्र या लोकांनी मेहनत घेतली. माझ्या सोबतसुद्धा माझ्या संपर्कातील माझे जुने कार्यकर्ते होते. वर्धा शहरात कार्य करणाऱ्या सामाजिक क्षेत्रातील, सांस्कृतिक क्षेत्रातील आणि साहित्यक्षेत्रातील अनेक लोकांनी त्या काळात प्रचाराची धुरा सांभाळली. विविध ठिकाणी सभा आयोजित करण्यात आल्या. लोकांशी प्रत्यक्ष संपर्क साधून प्रचार करण्यावर आम्ही जास्त भर दिला. असं म्हणा ना की, त्या वेळी लोकांनीच ती निवडणूक आपल्या हाती घेतली. त्याचा परिणाम आमच्या विजयात झाला असे म्हणता येईल.

**प्रश्न – लोकप्रतिनिधी म्हणून आपण कशाप्रकारे लोकाभिमुख कामे केली?**

– मी २००९ साली लोकांचा आमदार म्हणून निवडून आलो. त्या वेळी मी अपक्ष म्हणून उभा होतो आणि मला लोकांनी निवडून दिले. निवडून आल्यानंतर मी ठरविले की, मला मिळालेली पाच वर्षे मी माझ्या मतदार संघाच्या कल्याणासाठी खर्ची घातली पाहिजे. सुरूवातीला मी माझा मतदार संघ पुन्हा पिंजून काढायचे ठरविले. त्या दृष्टीने मी आधी सर्व जनतेचे आभार मानण्यासाठी त्यांच्यापर्यंत गेलो. या निमित्ताने त्यांच्या समस्या आणि त्यांचे प्रश्न मी समजून घेतले. अनेक बाबतीत लोकांच्या प्रश्नात विविधता होती. त्या समस्यांवर कशाप्रकारे उपाययोजना करता येतील याचा मी विचार केला. लोककल्याण हा माझ्या राजकारणाचा नेहमीच हेतू राहिलेला आहे. जनतेनी मला त्यांची कामे करण्यासाठी निवडून दिले. वैयक्तिक प्रश्नांबरोबरच जनतेचे सामूहिक स्वरूपाचे प्रश्न असतात. मतदार संघात फिरून पाणी, वीज, निवास, रस्ते, नाल्या यासंदर्भात समस्या सोडविण्यासाठी मी प्रयत्न केले. लोकप्रतिनिधी म्हणून जास्तीत जास्त प्रमाणात कामे करण्याचा प्रयत्न मी माझ्या कारकीर्दीत केला.

**प्रश्न – आपण प्रत्यक्ष राजकारणात सहभागी झालात, तेव्हापासूनच सारखे इकडे तिकडे भटकंती आणि जनसंपर्काच्या दृष्टीने बाहेर राहावे लागत होते. अशावेळी तुमच्या कुटुंबाची घडी कशाप्रकारे नीट बसविता आली?**

– तुम्ही म्हणता ते खरे आहे. राजकारण म्हटलं की आपल्या स्वत:च्या घराकडे दुर्लक्ष करूनच जनसेवेसाठी स्वत:ला वाहून घ्यावे लागते. लोकांचा सतत संपर्क, त्यांची कामे आणि लोकांच्या संपर्कासाठी सततची चाललेली भटकंती, यामुळे आपल्या कुटुंबाकडे बरेच दुर्लक्ष होते. माझ्या बाबतीत माझी सहचारिणी स्वाती हिने मला प्रत्येक वेळी समजून घेतले. आमच्या कुटुंबाचा संपूर्ण भार तिने उचलून धरला. मुलांच्या पालनपोषणापासून तर त्यांच्यावर योग्य संस्कार झाले पाहिजे याची तिने सतत काळजी घेतली. घरी भेटायला येणाऱ्यांचे स्वागत तिने अगदी हसत मुखाने केले. त्यांना आदरपूर्वक आणि सन्मानपूर्वक वागणूक दिली. त्यामुळे आमच्या घरी आलेले कुणीही कार्यकर्ते कधीही नाराज झाले नाहीत. एवढा सगळा राजकीय व्याप सांभाळून

आमच्याकडे असलेल्या पारंपरिक शेतीकडेही तिने जीव ओतून लक्ष दिले. माझ्या प्रत्येक यशापयशात ती वेळोवेळी सामील झाली.

**प्रश्न – या प्रश्नाला संलग्नितच मी दुसरा प्रश्न आपणाला विचारतो. आपल्या प्रत्येक निवडणुकांमध्ये स्वातीवहिनींचा सहभाग कशाप्रकारचा राहिला आहे ?**

– प्रत्येक निवडणुकांमध्ये स्वातींनी प्रचारांची मोठी जबाबदारी स्वीकारली आहे. महिलांना घेऊन रॅली काढणे, घरोघरी भेटायला जाणे, आमच्या मनातील संकल्प लोकांना समजावून सांगणे. महिला गटांच्या सभा घेणे, त्यांच्या समस्या समजून घेणे इत्यादी कामात तिने हिरिरीने सहभाग घेतला. निवडणुकांच्या काळात तर घरी येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या स्वागतापासून, तर बाहेर प्रचाराला निघण्यापर्यंत सर्वच पातळ्यांवर ती कार्य करीत राहिली. तिची मला लाभलेली सोबत ही माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. घरी सहचारिणी म्हणून जबाबदारी सांभाळतानाच ती राजकारणातही मला सहकार्य करते. माझ्या एकूणच सामाजिक व राजकीय कारकीर्दीत तिची अत्यंत महत्त्वाची भूमिका राहिली आहे हे मी निर्विवादपणे कबूल केले पाहिजे एवढे तिचे योगदान मोठे आहे.

**प्रश्न – सर्वच पक्षातील नेत्यांशी आपले सलोख्याचे सबंध आहेत. याचे नेमके गमक काय सांगाल ?**

– हे बघा, राजकारण काही शत्रुत्वाचा खेळ नाही, लोकांनी राजकारणाला वेगळ्या भूमिकेतून पाहिले पाहिजे असे माझे मत आहे. राजकारणाचा हेतूच मुळात जनसेवा व लोककल्याण असा आहे. जो जो राजकारणी जनतेचे हित हे आपले सर्वस्व मानतो, त्यांचे एकमेकांशी संबंध राहणारच आहेत. मी दाआजींचा जनसेवेचा वारसा पुढे नेण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. जनतेच्या कामापुढे मी राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त महत्त्व दिले. त्यामुळे माझे प्रत्येक पक्षातील लोकांशी चांगले संबंध राहिले. पक्षनिष्ठा सांभाळणे हे माझे मुख्य काम राहिलेलेच आहे; पण यासोबत लोकनिष्ठेलाही मी जास्त महत्त्व दिले. त्यामुळे जे जे लोक लोकनिष्ठेशी जुळले आहे, ते ते मला आपले वाटले. त्यामुळेच माझे सर्वांशी मैत्रीचे नाते राहिले. लोकहिताच्या पुढे मी पक्षीय दृष्टिकोन ठेवला नाही.

**प्रश्न – तुमच्या घरी राजकारणाची आणि समाजकारणाची नवी पिढी तयार झालेली आहे. सक्षम युवा नेता म्हणून वर्धा जिल्ह्याच्या राजकारणात समीरने आपले पाय रोवायला सुरुवात केले आहेत. त्याचप्रमाणे संदीपलाही राजकारणाची नवी दृष्टी आहे. या नव्या नेतृत्वांकडे आपण कशा पद्धतीने पाहता. ?**

– माझा मोठा मुलगा समीर याने अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेले आहे. तो सध्या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळतो आहे. माझा दुसरा मुलगा संदीप, त्याने एम. बी. ए आणि पीएच. डी. केलेली असून त्यांनी शिक्षणक्षेत्रातील मोठी जबाबदारी स्वीकारली आहे. दोन्ही मुलं अत्यंत मेहनती आणि कष्टाळू आहेत. आमच्या संस्था सांभाळण्याची क्षमता त्यांच्यात आहे. माझ्या मुलांवर आमच्या पिढीचे संस्कार झालेले आहेत. समीरने राजकीय क्षेत्रात आपले स्वत:चे अस्तित्व निर्माण केले आहे. २००९ च्या माझ्या विजयाचे श्रेय माझ्या कार्यकर्त्यांबरोबरच त्याला आणि त्यांच्यासोबत काम करणाऱ्या त्याच्या सर्व तरुण कार्यकर्त्यांना जाते. त्यांनी त्या काळात अत्यंत सुनियोजित अशी प्रचारयंत्रणा राबविली. त्यांनी कार्यकर्त्यांची एक चांगली फळी तयार केली. त्याच्याकडे कुशल संघटनकौशल्य आहे. कार्यकर्त्यांना समजून घेण्याची त्याच्यामध्ये चांगली क्षमता आहे. त्यामुळे त्याला भविष्यात चांगला वाव आहे. राजकारणात सध्या मोठ्या प्रमाणात स्पर्धा आहे. त्याच्या सततच्या जनसंपर्कातून नव्या दमाचे कार्यकर्ते तयार होत आहेत. सध्याच्या परिस्थितीत खूप महत्त्वाकांक्षा मनात बाळगून राजकारणात प्रवेश करणारेही आपल्याला पाहायला मिळतात. अशावेळी तरुण नेतृत्वांसमोर मोठे आव्हान उभे राहिलेले आहे. समीर हा नव्या दमाचा युवा नेता म्हणून त्याच्यासमोरही खूप आव्हाने आहेत; पण अशाही परिस्थितीवर मात करीत समाजकारणातून राजकारण

करण्याची क्षमता असल्याने तो भविष्यात जनकल्याणाचे काम करीत नक्कीच यशस्वी होईल अशी मला आशा आहे. माझा दुसरा मुलगा संदीपही समीरच्या खांद्याला खांदा लावून शिक्षणक्षेत्रात आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करीत आहे. त्याने जरी पूर्णपणे सक्रिय राजकारणात सहभाग घेतलेला नसला, तरी समीरसोबत तो नेहमीच आपल्याला पाहायला मिळेल. त्याच्याकडेही राजकारणाची नवी दृष्टी आहे.

**प्रश्न – सध्याच्या बदललेल्या राजकारणाबद्दल आपण काय सांगाल ?**

– आजच्या राजकारणाबद्दल मी काय भाष्य करावे ? मी गेल्या पन्नास साठ वर्षांपासून महाराष्ट्राचं राजकारण पाहत आलो आहे. प्रत्यक्ष राजकारणामध्ये सहभागी झालो आहे; पण सध्याच्या राजकारणासारखी संक्रमणावस्था माझ्या तरी पाहण्यात आली नाही. राजकारणामध्ये वैयक्तिक शत्रुत्वभाव नसावा या विचाराचा मी आहे; पण आजच्या राजकारणाची पातळी घसरलेली आहे असे माझे स्पष्ट मत आहे. राजकारणात नैतिक मूल्ये जोपासली गेली पाहिजे. कुणाहीविषयी वैयक्तिक आकस ठेवून राजकारण करू नये. एखाद्याचं राजकीय अस्तित्व संपुष्टात येईल अशा प्रकारची कृती घडू नये; पण सध्याच्या राजकारणाची एकूण स्थिती बघता राजकारणाला नवी दिशा देण्याची गरज आहे असे मी म्हणेन.

**प्रश्न – भारतीय सविधानांविषयीची आपली काय मते आहेत ?**

– भारतातील प्रत्येक नागरिकांना अभिमान वाटावा असे आपले संविधान आहे. हे संविधान सर्वहितकारी आणि सर्वसमावेशक अशा स्वरूपाचे आहे. आपले संविधान म्हणजे काही फक्त एक संहिताच नाही, तर ती एक मौल्यवान अशी संस्कृती सुद्धा आहे. आपल्या देशात विविध धर्म, पंथ, भाषा, वंश आणि जाती आहेत; पण भारतीय संविधानाने या सर्वांना एका नव्या समतामूलक संस्कृतीत एकत्र बांधले आहे. भारतीय संविधानामुळेच आपला देश एकसंध आहे. आपल्या देशाची अखंडता आणि एकात्मता टिकून आहे. मानवी नीतिमूल्ये अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. संविधानाच्या रूपाने आपल्या देशाला मौलिक असा राष्ट्रीय ग्रंथ दिल्याबद्दल भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सहभागी सर्वांनाच भारतीय जनतेने धन्यवाद द्यावे तेवढे कमीच आहेत असे मी म्हणेन.

**प्रश्न – आता आपण या मुक्तसंवादाच्या शेवटच्या प्रश्नाकडे येऊ या. हा प्रश्न विचारून आपली ही चर्चा थांबवू. भाऊ, आपण आज वयाचे अमृत महोत्सवी वर्ष गाठलले आहे. गतकाळात आपल्या हातून समाजोपयोगी अशा स्वरूपाची खूप कामे झालीत. आपण सतत कामात व्यस्त होतात. यानंतर आपले भविष्यातील कोणते संकल्प आहेत ?**

– खरं म्हणजे मी गेल्या पन्नास पंचावन्न वर्षांपासून सातत्याने राजकीय क्षेत्रात वावरतो आहे. वयाची पंचाहत्तरी ही काही राजकीय जीवनाच्या निवृत्तीची वेळ नाही. मी अजूनही राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. आज प्रत्यक्षपणे मी राजकारणाच्या आखाड्यात सहभाग नोंदवत नसलो तरी, एका मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहणे मी पसंत करायला लागलो आहे. मला असे वाटते की नव्या पिढीने आता राजकारणात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले पाहिजे. राजकारणाची धुरा त्यांच्या अंगाखाद्यांवर देणे मी जास्त मोलाचे समजतो. भविष्यात राजकारणाची एक समृद्ध पिढी घडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचा माझा मानस आहे. राजकारणाला समाजकारणाची जोड देण्याच्या दृष्टीने जे विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबविता येतील ते पुढील काळात मोठ्या प्रमाणात राबविण्याचा माझा विचार आहे. या दृष्टीने मी तयारी सुरू केली आहे.

**भाऊ, आपण आमच्याशी दिलखुलास संवाद साधला. त्याबद्दल आपले खूप खूप धन्यवाद! आपणांस अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने हार्दिक हार्दिक सदिच्छा!**





# तुम्ही आयुष्यभर अमृत वाढलं!

**अरुण गुजराथी**
माजी अध्यक्ष, विधानसभा
महाराष्ट्र राज्य

**दि. २० मे २०२३ रोजी आयोजित लोकनेते प्रा. सुरेशभाऊ देशमुख अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभारंभ समारोहाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दिलेल्या भाषणातून साभार.**

आजचे सन्मानमूर्ती, सत्कारमूर्ती, गौरवमूर्ती आणि वात्सल्यमूर्ती आदरणीय प्रा. सुरेशजी देशमुख साहेब, स्वातीवहिनी, समारंभाचे अध्यक्ष माझे स्नेही आदरणीय उल्हासजी पवार साहेब, आदरणीय खासदार रामदासजी तडस या ठिकाणी मेघे साहेब, आमचे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. चौधरी साहेब, माजी आमदार माझे मित्र आदरणीय राजू तिमांडे, सुनीलजी राऊत, सुधीरभाऊ कोठारी, राजेंद्रजी डागा, शेखरजी शेंडे, उपस्थित सर्व मान्यवर.

चाळीस–पंचेचाळीस वर्षांच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात अनेक उत्सव मी पाहिले आणि अमृत महोत्सवसुद्धा मी पाहिले; पण हा अमृत महोत्सव फार आगळावेगळा आहे. 'लागो न दृष्ट माझी, माझ्याच वैभवाला' या ठिकाणी उपस्थित असलेले सर्व तुमच्या कुटुंबातले आहेत. तुमचं कुटुंब केवळ तुमची मुलं किंवा तुमचे भाऊ असं नाही. फार व्यापक असं हे कुटुंब आहे. अमृत महोत्सव ज्यांचे साजरे होतात, ते इतरांना अमृत वाढतात, तुम्ही आयुष्यभर अमृत वाढलं, म्हणून हा अमृत महोत्सव या ठिकाणी साजरा होतो आहे. जर तुमच्या जीवनाचा सबंध पट पाहिला, तर १५–२० मिनिटात काय सांगता येईल तुमच्याबद्दल? पण तुम्ही केलेल्या कार्याची पावती या कार्यक्रमाच्या माध्यमातून येत आहे. तुम्ही प्राध्यापक होता मीसुद्धा प्राध्यापक होतो. प्राध्यापकाचं जीवन चांगलं असतं. प्राध्यापक भोळे आणि विसरभोळे असतात. एकदा एक प्राध्यापक मुंबईवरून निघाले. कल्याणला टी. सी. आला. तुमचे तिकीट दाखवा. तिकीट सापडत नव्हते. अर्ध्या तासानंतर सहप्रवासी 'ते प्राध्यापक आहेत' म्हणाले, टी. सी. म्हणाले, ''ठीक



आहे, बैठ जाव, तुमचा प्रश्न सुटला,'' पण माझा प्रश्न सुटला नाही, ''म्हणे कसा?'' कोणत्या स्टेशनावर उतरायचं मला आठवत नाही. असं होतं प्राध्यापकांच्या संदर्भात; पण तुम्ही प्राध्यापक म्हणून केलेलं काम महत्त्वाचं आहे. देत रहा, व्यापकपणे देत रहा, आपल्या अंतकरणातील भावनेने देत राहा. हे कार्य यांच्या माध्यमातून झालं आहे. तुम्ही सहकार क्षेत्रात, तुम्ही राजकारणात, तुम्ही उद्योगक्षेत्रात, तुम्ही शिक्षणक्षेत्रात आणि हे सबंध असताना कुठेही अहंकार नाही. अहंकार नाही नाही हा त्यांच्या जीवनाचा अलंकार आहे. आपण हा घेतला पाहिजे. इथली चेतना, प्रेरणा घेतली पाहिजे, मी देखील घेऊन जाणारा माणूस आहे. यांचा जन्‍ अशा ठिकाणी झाला ज्याठिकाणी गांधीजीचं दहा वर्षाचं वास्तव्य होत, सेवाग्रामला. सेवा या शब्दाच्या पुढे अल्पविराम नाही, स्वल्पविराम नाही, मध्यविराम नाही, पूर्णविराम नाही. सेवा ही सेवाच असते. सर्व्हीस इज ए पोएट, सर्व्हीस इज ए पोएट्री, सर्व्हीस इज ए लिटरेचर, सर्व्हीस इज ए लाईफ, सेवा हे जीवन आहे आणि सेवा हे जीवन जगण्याच्या संदर्भातलं कार्य आहे हे मोठे आणि महान असं कार्य आहे. बुद्धिमत्ता महत्त्वाची, गुणवत्ता महत्त्वाची; पण त्यापेक्षा नितिमत्ता महत्त्वाची; पण त्यापेक्षा मानवता महत्त्वाची, एक दाखला परवा कोणी तरी वाचला. मे महिना होता, बारा वाजताची वेळ होती, ऊन फार कडक होतं, एक छोकरा आला, एक दुकान असेल, कुठेतरी पाण्याची सोय असेल, ''प्यास लगी, पाणी दो,'' तो म्हणाला ''अरे रूक आदमी आ रहा है।'' अजून पाच मिनिटांनी त्यानी सांगितले ''बहुत प्यास लगी है।'' ''रुक, आदमी आ रहा है।'' त्या मुलानी सांगितलं ''तू आदमी बन जा और पाणी पिला दे।'' मानवता सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. बुद्धिमत्ता ही महत्त्वाची नाही असे मी म्हणत नाही, पण बुद्धिमत्तेपेक्षा मानवतेला महत्त्व आहे. मानवतेची जपणूक याच्या माध्यमातून झाली आहे. सेवेच्या माध्यमातून झाली आहे. मगा एक दाखला सांगत होते, मला कोणीतरी सांगितलं एक चांगला असा तरुण छोकरा त्याला निसर्ग फार आवडत होता, तो फिरत फिरत रानावनात गेला, त्याला तहान लागली, त्याला भूक लागली, काही दिसत नव्हतं. तिथल्या एक झोपडीत, एक छोकरी बसली होती. तो म्हणाला, ''मला जेवण पाहिजे,'' ती म्हणाली, ''जेवण नाही माझ्याजवळ'' ''मग काय आहे '' म्हणाला, म्हणाली, ''गरम दूध आहे,'' मग तो म्हणाला, ''गरम दूध द्या, एक कप'' एक कप गरम दूध दिलं, दहा पंधरा वर्षानंतर ती व्यक्ती डॉक्टर झालेली होती आणि ती मुलगी पेशन्ट होती, ज्या दिवशी डिस्चार्ज होता. त्या दिवशी त्या स्त्रीला वाटलं पैसे कुठून देऊ, डॉक्टरांना म्हणाली, ''फिस किती,'' तो म्हणाला, ''एक कप गरम दूध ही माझी फी आहे'' सेवा कधीही वाया जात नाही, म्हणून सेवा याचा संकल्प करून आपण अशा व्यक्तींकडून प्रेरणा घेतली पाहिजे. तुम्ही कुठे राहता? तुमचं यशवंत वगैरे हे सर्व ठीक आहे; पण महाराष्ट्रामध्ये, देशामध्ये मगा सांगितल्याप्रमाणे नीतिमत्तेची जी माणसे आहेत. या नीतिमत्ता असलेल्या माणसाच्या संदर्भात एक चांगल्या प्रकारे आपल्या ह्दयात एक कुठेतरी साठवणूक केली पाहिजे. सर्वात मोठे न्यायालय या हदयात आहे. दिल्लीला सर्वोच्च न्यायालयापेक्षाही मोठं न्यायालय कुठे असेल तर, ते आपल्या ह्दयात आहे. रात्री झोपताना एक मिनिटं किंवा दोन मिनिटं विचार करा. मी आज दिवसभरात काय केलं? पाप केलं की पुण्य केलं? मदत केली की, सहकार्य केलं स्वार्थ केला की, परमार्थ केला? आणि त्या दृष्टिकोनातून जीवन जगण्याचा प्रयत्न केला. जीवन का जगावं? हे समजलं, तर जीवन कसं जगावं हे समजतं. सेवा का करावी? हे समजलं तर, सेवा कशी करावी हे आपल्याला समजते. या दृष्टिकोनातून या कार्यक्रमाचं मला महत्त्व वाटतं. मला फार आनंद झाला, तुम्ही मला बोलावलं आणि इतका चांगला कार्यक्रम मी पाहिला. कदाचित मी आलो नसतो, तर मला पश्चाताप झाला असता. असा हा कार्यक्रम आणि गांधीजींच्या संदर्भात काही फार आता मी बोलणार नाही; पण एकदा पारतंत्र्यात असताना गांधींच्या उशीखाली पिस्तुल सापडलं. अहिंसेचा संबंध विश्वामध्ये प्रचार करणारी व्यक्ती, नेता आणि बेडवर उशीच्या खाली पलंगावर पिस्तुल सापडली, ब्रिटिशांचं राज्य, इन्क्वायरी कशी सुरू झाली? हे कोणी ठेवलं असेल? महात्मा गांधींना त्यांनी बोलावलं नाही की, एफआयआर तुमच्यावर लावतो. ही जी विश्वासार्हता आहे. जीवनात ही फार महत्त्वाची आहे. श्वास, विश्वास, आत्मविश्वास आणि विश्वासार्हता याचं ज्यांना ज्ञान आहे, तो जीवनात यशस्वी होतो. अशा पद्धतीचं प्रसन्न असं व्यक्तिमत्त्व पवित्र असं व्यासपीठ, सर्व पक्षाचे लोक या ठिकाणी बसलेले आहेत. आपण हजारोंच्या संख्येने या ठिकाणी उपस्थित आहात, या समारंभामध्ये अत्यंत आनंददायी अशा वातावरणाची निर्मिती आपण

केलेली आहे. त्यांच्या जीवनातील विवेक आपण घेतला पाहिजे. विचार महत्त्वाचा, तसा विवेक महत्त्वाचा, तसा विनोद महत्त्वाचा, तशी विधायकतादेखील महत्त्वाची आहे. 'अविवेकाची काजळी, विवेकदीप उजळी, मग योगियांची दिवाळी.' विवेक ज्यांच्या जीवनात नाही, तो यशस्वी होत नाही. आम्ही या ठिकाणी आलो. तुमच्या जीवनातील विवेक घेण्यासाठी आलो आहोत. काय विवेकी व्यक्तिमत्त्व आहे? इतक्या चाळीस-पन्नास वर्षांच्या कालावधीमध्ये तुम्ही कोणालाही दुखवलं नाही. तुमच्या स्वभावात ती आक्रमकता आम्हाला दिसली नाही. आजच्या राजकारणाची परिस्थिती कशी आहे, 'हर चिज बिघडती है। और सुधरती भी है।' याच्यातून देखील काही चांगलं होऊ शकते, अशाप्रकारचा आशावाद आपण या ठिकाणी निर्माण केला पाहिजे; पण सुरेशजी आपल्याबद्दल एक अत्यंत चांगली भावना आमच्या मनात, अंतःकरणात आहे की, मी मगाच तुम्हाला सांगत होतो की, माणूसपण निर्माण करण्याच्या संदर्भात प्रेरणा देणारा असा हा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमामध्ये सर्वांतर्फे शुभेच्छा मी तुम्हाला देतो. तुम्ही देशमुख आहात म्हणून तुम्ही मला आशीर्वाद द्या. तुमच्यापेक्षा मी वयाने वडील आहे, म्हणून मी तुम्हाला शुभेच्छा देतो, आशीर्वाद शब्द वापरत नाही, कारण देशमुखांना ते आवडेल की, नाही मला माहीत नाही. कार्यक्रमाची सांगता माझ्या भाषणातून करीत असताना. 'हर सूरज जो रोशनी दे, आपको हर उगता हुआ फूल खुशबू दे, आपको हम तो कुछ देने के काबिल नही है, पर उपरवाला, सौ साल की आयु दे आपको,' शंभर वर्ष तुम्ही जगा, तुमच्या कार्याची गरज आहे लोकांना आणि ते देखील म्हणत असतील की 'ये जिंदगी तू आहिस्ते चल, मुझे जिंदगी में कुछ कर देना बाकी है। कुछ फर्ज निभाना बाकी है। कुछ दर्द मिटाना बाकी है। रोनेवालो को हसाना बाकी है। रूठे को मनाना बाकी है।' तर अशा पद्धतीने मी जगणार, शंभर वर्ष जगणार आणि जगून एक शंभर वर्षांची आयुष्याची रूढी आहे ती मी पूर्ण करणार आणि आयुष्यभर मी देत राहणार, आयुष्यभर ज्यांचा हात आकाशाकडे राहिला. कधी हात पालथा झाला नाही. अशा पद्धतीचं एक हे व्यक्तिमत्त्व आणि ज्याच्यामुळे एक आनंददायी असा हा कार्यक्रम होत असताना आपल्या सर्वांतर्फे पुनश्च एकदा सुरेशभाऊ तुम्ही आणि स्वातीताई तुम्हालादेखील आणि आता नव्या पिढीलादेखील त्यांची जी नवी पिढी फार हुशार आहे. एक सांगतो, मी ठाण्याला गेलो होतो, ठाण्याला गेल्यानंतर एक चार्टर्ड अकाऊन्टंट मित्र होता, त्याचा सात-आठ वर्षांचा मुलगा आहे. कॉन्व्हेंट स्कूल, ''हू आर यू'', मी नाव सांगितलं अरुण गुजराथी, ''काय शिक्षण?'' म्हटलं चार्टर्ड अकाऊंन्टंट, ''माझ्या प्रश्नाला उत्तर द्याल कां?'' मी घाबरलो, मंत्री असताना विधानसभेत कधी उत्तर द्यायला घाबरलो नाही Put any question मुलानी प्रश्न विचारल्यावर घाबरायला आलं ''तुम्हाला आयटी येतं का?'' म्हणे, आता हो म्हटलं तरी प्रॉब्लेम नो म्हटलं तरी प्रॉब्लेम ''उत्तर द्या'' मी म्हटलं, 'थोडा वेळ द्या.' ''टी.व्ही. टाईम इज ओव्हर'' मला त्याच्या प्रश्नाचं उत्तर देता आलं नाही. एकाने मला पत्र पाठवलं पहिल्या दोन ओळीच लिहिलेल्या होत्या. ''सर, हजारो की किस्मत तेरे पास है, हमे पास कर दो तो क्या बात है।'' आम्ही त्याला खाली लिहिलं ''अरे किताबोकी पुंजी तेरे पास थी, जरा पढ लेता, तो क्या बात थी।'' आता तो जमाना गेला, नव्या पिढीला शुभेच्छा द्या, माझा मुलगा असा वागतो, माझा मुलगा तसा वागतो, याला काही अर्थ नाही, मुलाचा मुलगा म्हणतो, तुम्हाला कळत नाही, ते आपण समजून घेतलं पाहिजे, समज समज को समजसे समजो, समज समजना ही समज है। म्हणून नव्या पिढीला आपण चेतना दिली पाहिजे, नव्या पिढीला आशादायी वातावरण तयार केलं पाहिजे, मला माफ करा, पण मुलगा कुठेतरी जातो, मुलगा असं करतो, तसं करतो हे जे वागणं आहे, नवी पिढी जे सांगेल त्या पद्धतीने वागण्याचा आपण आयुष्यात प्रयत्न करू या! इथचं थांबतो, तुमचं जीवन असं आहे, थांबला तो संपला, धावत्याला गती येते, ते कधी थकलेही नाहीत, ते कधी थांबलेही नाही. सातत्याने कार्य हा त्यांचा जीवनप्रवास आहे म्हणून पुनश्च सुरेशरावांना शुभेच्छा देतो.





# विचाराला विवेकाची जोड असावी

**उल्हासदादा पवार**
माजी आमदार
पुणे

**दि. २० मे २०२३ रोजी आयोजित लोकनेते प्रा. सुरेशभाऊ देशमुख अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभारंभ समारोहाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दिलेल्या भाषणातून साभार.**

आजचे सत्कारमूर्ती आणि माझे युवक काँग्रेसच्या चळवळीतील जुने सहकारी प्रा. सुरेश देशमुख आणि सौ. स्वातीवहिनी, या अमृत महोत्सवी वर्षाच्या वर्षभर होणाऱ्या विविध उपक्रमांचं उद्घाटन ज्यांच्या हस्ते झालंय ते महाराष्ट्राच्या विधानसभेचे माजी अध्यक्ष, माजी अर्थमंत्री आणि एक अर्थशास्त्रज्ञ प्रा. अरुणभाई गुजराथी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू सुभाष चौधरीजी, श्रीधर ठाकरेजी, सुधीर कोठारीजी, आता आपल्यासमोर बोललेले खासदार रामदासजी तडस, आम्ही दोघेही विधानपरिषदेमध्ये एकत्र होतो आणि माजी मंत्री मा. अशोक शिंदे, माजी आमदार राजू तिमांडे, खूप मान्यवर आहेत, मी सर्वांचे नाव घेत नाही, कारण नाव घेण्यात बराच वेळ जातो. फक्त अध्यक्षीय समारोप करतो ७० ते ८० जे दशक होतं, महाराष्ट्राच्या राजकारणाचं, युवक काँग्रेसच्या चळवळीने भारावरलेला तो काळ होता. मी जवळजवळ ८ वर्षे महाराष्ट्राच्या युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो. मला ती चांगली संधी मिळाली आणि त्या काळातील माझे समकालीन माझ्याबरोबर काम करणारे कार्यकर्ते आहेत, नेते आहेत ते पंचाहत्तरी आणि त्यापुढे वाटचाल करताहेत. त्यामुळे बऱ्याच जिल्ह्यात माझ्या सहकाऱ्यांच्या अमृत महोत्सवाला मला जावं लागतं आहे.

आजच्या समारंभाला मी उपस्थित झालो याचा मला आनंद होत आहे. अगदी त्या काळात पाहिलेल्या लोकांचा अमृत महोत्सव होतो ही आनंदाची गोष्ट आहे. संसदीय राजकारणामध्ये मंत्रीपदापेक्षाही अध्यक्षपदाला फार महत्त्व आहे आणि अतिशय नम्रपणे मी सांगतोय कुणाला शिकवायचा प्रश्न नाही; पण महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये विधानसभेच्या स्पीकरला अध्यक्ष म्हणतात आणि विधान परिषदेच्या अध्याक्षाना सभापती म्हणतात, आपण यांनाही सभापती म्हणतो, बरीच माणसं चुका करतात, लोकसभेच्या स्पीकरलासुद्धा अध्यक्ष म्हणतात, सभापती म्हणत नाहीत. सगळ्या वर्तमानपत्रांमध्ये आणि सगळ्या राजकीय क्षेत्रांमध्ये सगळे शब्द इकडच्या तिकडे होऊन गेलेत आणि कुणी काही सांगायच्या भानगडीत पडत नाही, मी शिकायच्या भानगडीत पडत नाही; पण अतिशय प्रामाणिकपणे सांगतो. कारण आम्हाला सहवास लाभला वैकुंठवासी देशभक्त बाळासाहेब भारदे, वि. स. पागे, यशवंतराव चव्हाण आणि त्यांचे समकालीन असलेले अनेक नामवंत व विचारवंत नेते, त्यागी नेते, कार्यप्रवण असणारे अत्यंत बुद्धिवान असे नेते होते आणि त्यांचा सहवास मला खूप लाभला. नेहमी व्यासंगापेक्षा सत्संगातून माणूस अधिक मोठा होतो. तर सत्संग आपल्याला खूप चांगला लाभलेला आहे आणि तोच सत्संग माननीय सुरेश देशमुख यांच्याही वाटयाला आला आहे. त्यांचे आईवडील, मी त्यांना खूप जवळून पाहिलेले आहे. बापुरावजी देशमुख अतिशय उत्तम व्यक्तिमत्त्व आणि वडिलांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्याकडे सोपवलं. अत्यंत गोरेपान, सरळ नाक, गांधी टोपी, सगळं पाहत असताना मला त्या सगळ्या गोष्टींची आठवण झाली. युवक काँग्रेसच्या चळवळीमध्ये शिबिर, चिंतनशिबिर, वैचारिक शिबिरं आम्ही घेत होतो आणि त्या

वातावरणामध्ये आम्ही घडत होतो. कधी कधी विचारांच्या अंतर्गत गटबाजी असतील, प्रत्येक पक्षामध्ये त्या वेळी होती आणि आजही आहे. १९१७ लाही होते आणि आजही आहे. मला आठवतं की, अंबिका सोनी युवक काँग्रेसच्या अध्यक्ष त्या वर्धेमध्ये आल्या. वर्ध्याला दोन गट होते, मी अंबिका सोनी यांना दोन्हीकडे घेऊन गेलो, मी या गोष्टीची आठवण देतो की, संघटना मात्र अत्यंत प्रभावी आणि उत्तम प्रकारे चालविण्याचा प्रयत्न केला, आजच्या सामाजिक, राजकीय घडामोडींच्या मध्ये ज्या गोष्टींची चिंता वाटते, म्हणजे अनेक गोष्टी आहेत, हे काही वेगळ्या पक्षाचे व्यासपीठ नाही किंवा महाविकास आघाडीचा मंच नाही पक्षाचा अभिनिवेश बाजूला पाहिजे असे मानणाऱ्यापैकी मी एक आहे. मला एक प्रसंग आठवतो उत्तराखंडमध्ये आमदारांनी पक्षांतर केलं आणि स्पीकरनी काय निर्णय दिला की, महाराष्ट्राचे प्रभारी त्यावेळी मोहन प्रकाश होते आणि खूप खल चाललेला होता कायदेशीर पातळीवर. तेव्हा अरुणभाईनी महाराष्ट्राच्या विधानसभेत एक निर्णय अशाच बाबतीत दिला होता त्याची मला आठवण झाली. सुप्रिम कोर्टापर्यंत ती केस गेली. शेवटी अरुणभाई गुजराथी त्या वेळच्या विधानसभेचे अध्यक्ष होते. त्यांनी जो निर्णय दिला तो सुप्रिम कोर्टाला सुद्धा बदलता आला नाही. हे अरुणभाईंच वैशिष्ट्य. संसदीय लोकशाहीत हा जो निर्णय झाला होता. तो महत्त्वाचा होता, तोच मी मोहनभाईना पाठवला. उत्तराखंडला त्या वेळी हरीश रावत होते. त्या वेळी त्यांना पाठवल्यानंतर त्याच मुद्द्यावर केस अंतिम टप्प्यात गेली. जसा अरुणभाईचा त्या ठिकाणी निर्णय हा ग्राह्य मानला गेला. तसाच त्या उत्तराखंडच्या स्पीकरचाही दिला, पण त्याचा पाया हा अरुणभाईनी घातलेला आहे. म्हणून आजच्या राजकारणात महाराष्ट्राच्या विधानसभेच्या अध्यक्षांकडे सर्वांचं लक्ष आहे. मला वाटतं त्यांनी अरुणभाईचा आदर्श ठेवला तर, मला वाटतं खूप बरं होईल किंवा लोकसभेचे अलीकडे प्रा. सोमनाथ चटर्जी. आज आपल्यात नाही ते, सीपीएम या डाव्या पक्षाचे नेते होते. अतिशय उत्तम संसदपटू, बेस्ट पार्लमेन्ट्रीयन होते. त्यांनी आपल्या पक्षाचंही न ऐकता संसदीय लोकशाहीला जो योग्य निर्णय आहे तो त्या ठिकाणी दिला. मला असं वाटतंय की, जसा मी, अरुणभाईंचा उल्लेख केला, तसा सद्सद्विवेकबुद्धीला चालना देऊन आजचे जे कोणी अध्यक्ष असतील, पक्षाअभिन्वेष बाजूला ठेवून आणि प्रा सोमनाथ चटर्जी आणि अरुणभाई गुजराथी यांना डोळ्यासमोर ठेवलं ना तर मला वाटतं, अरुणभाई, तुम्ही जो मगाशी सांगितलेला विवेक आहे, जो सुरेश देशमुखांनी आयुष्यभर पाळला तसं सर्वांचं होईल. विचाराला विवेकाची जोड नसेल, तर मग काहीच फायदा नाही. बाळासाहेब भारदेंनी एकदा सांगितलं होत की, वारकरी संप्रदाय म्हणजे काय? विवेक, विचार आणि वैराग्य तीन गोष्टी एकत्र नांदतात तो वारकरी संप्रदाय, त्याला काही माळच घातली पाहिजे, त्याला काही वारीवरच गेलं पाहिजे अशी काही गरज नाही, जगणं महत्त्वाचं आहे आणि ते जगणं प्रा. सुरेश देशमुख हे गेल्या अनेक दिवसांपासून जगताहेत आणि केवळ एकदाच आयुष्यामध्ये आमदारकी मिळाली, सर्वांनाच आमदारकी मिळते अशातला भाग नाही. आणि माफ करा मी असं विधान करतो की, सर्व पात्र लोकांना संधी मिळतेच असंही नाही, हे माझं विधान आहे, कदाचित तुम्हाला मान्य होईल की, नाही मला माहिती नाही; पण काळाच्या ओघामध्ये लोकशाही आपली निकोप झाली, प्रगल्भ झाली, सुदृढ झाली का झाली नाही? या संभ्रमात लोकं आहेत, अशा वातावरणामध्ये शेखर शेंडेंनी सांगितलं किंवा मा. तडस यांनी सांगितलं की, ज्यांना मदत केली तेही सोडून गेले, आणि ज्यांना केली नाही ते जवळ आले. पण आपल्याबरोबर कोण राहिलं? किंवा आपलं कुणी ऐकलं? किंवा सहकार्य केलं? याचा कुठेही गोंधळ किंवा संभ्रम न ठेवता खऱ्या अर्थानं प्रा. सुरेश देशमुख यांचं सामाजिक, सहकार, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक कार्य सुरू आहे. आता मी पाहिलं, ह.भ.प. बाबा महाराज सातारकर आपण या ठिकाणी ठाकऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे एक उत्तम प्रवचनाचा कार्यक्रम झाला. बाबा महाराज सातारकरांचा आणि माझा उत्तम परिचय आहे. कारण मी स्वतःच वारकरी संप्रदायात आहे. या ठिकाणी येत असताना मी अरुणभाईचं भाषण आणि सर्वांचीच भाषणं जेव्हा मी ऐकत होतो, तेव्हा मी ऐकत असताना एखादा माणूस आपल्या राजकीय जीवनात आणि सामाजिक जीवनामध्ये मग ते राजकारण असेल, अर्थकारण असेल, शिक्षणकारण असेल, धर्मकारण असेल, क्रीडाकारण असेल किंवा कुठलंही असेल, या सगळ्यांमध्ये अगदी निरपेक्ष पद्धतीने काम करतो, आता बरेच लोक शिक्षणकारण, धर्मकारण, समाजकारण यामध्ये विनाकारण आहेत; पण या पार्श्वभूमीवर सुरेश देशमुख यांची प्रतिमा का उजळून दिसते, याचा शोध घेतला पाहिजे आणि म्हणून हा अमृत महोत्सव साजरा होत असताना, ठाकरे आपण सांगितल्याप्रमाणे हा कृतज्ञता सोहळा आहे आणि कृतज्ञता शब्द आपल्या सामाजिक दैनंदिन जीवनातून लुप्त होतो की काय? अशा अवस्थेमध्ये आपण आलेलो असताना अशा एका समारंभामध्ये मला येता आलं याचा मला मनस्वी आनंद आहे. मी अनेक ठिकाणी जातो, अरूणभाई काय, तडस काय, इथे राजकीय मंडळी एवढी या ठिकाणी बसली आहेत. अनेकांचा अमृत महोत्सव, अनेकांचा सुवर्ण महोत्सव, अनेकांची

एकसष्टी, अनेकांचे सहस्रचंद्रदर्शन असतं, तिथे आम्हाला जावं लागतं, कधी कधी मनापासून जावं लागत किंवा कधी कधी अनिच्छेने जावं लागतं, आणि त्या त्या ठिकाणी गेल्यानंतर आम्ही भाषण देतो, ती खरी किती आणि खोटी किती? हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. बऱ्याच ठिकाणी गौरव करावा लागतो. पण या ठिकाणी मी जो आलो आहे, ते मी मनापासून आलो. सुरेश देशमुख इथे बसले आहेत म्हणून मी हे सांगत नाही. ते माझे युवक काँग्रेसचे सहकारी आहेत हा वेगळा भाग. एकच वेळा आमदारकीची संधी मिळाली असेल; पण सहकारक्षेत्रा मध्ये बापुरावजी देशमुख यांनी जो मूलभूत असा त्यांना मार्ग दिलेला आहे, त्याबाबतीमध्ये ते कुठेही मागे नाहीत. महाराष्ट्राच्या सगळ्या ठिकाणी ते आहेत. प्रत्येक क्षेत्रात ते मागे नाहीत आणि अत्यंत यशस्वीपणे, अभ्यासपूर्ण त्यांनी काम केलं आहे. विदर्भातील जलसिंचन महामंडळ याचंही त्यांनी उत्तम प्रकारे काम केलं आहे आणि ही जी ऐतिहासिक शैक्षणिक संस्था आहे. यशवंत शिक्षण संस्था, त्यामध्ये अत्यंत तडफडीने ते काम करत आहेत आणि या सगळ्या कामांमध्ये सौ. स्वातीवहिनी आणि त्यांचा सगळा परिवार साथ देत आहे.

मला खूप आनंद वाटला, तो त्यांचा छोटा नातू या ठिकाणी येऊन बसला होता आणि सारखा तो माझ्याकडे बघत होता. त्याला कदाचित वाटलं असेल की, हा जरा वेगळाच माणूस दिसतो. एकटक बघत होता; पण प्रसन्नता होती आणि जशी त्या लहान मुलाच्या मनामध्ये प्रसन्नता असते ना, ती जर मोठ्या माणसाच्या मनावर आली ना, तर शंभर वर्षे तुम्ही पार कराल, आनंदी असलं पाहिजे. हा सगळा परिवार हसरा आणि छान पाहायला मिळाला. आम्ही एक भावगीत ऐकत होतो ना, 'घरात हसरे तारे, मग मी पाहू कशाला आकाशाकडे,' अशी सुरेशची अवस्था आहे. त्यांना मी या ठिकाणी शुभेच्छा देत असता, आजच्या संपूर्ण वातावरणामध्ये मला प्रसन्नता वाटत आहे. वाद-विवाद, संवाद, परिसंवाद या सगळ्या गोष्टी संपल्या आहे. वितंडवाद दिसतो आहे कधी कधी दोन चॅनलवर दोन महान प्रवक्त्यांची मारामारी झाली. शेवटी चॅनल बंद केला. अशी पद्धती आहे आणि म्हणून अशा संसदीय लोकशाहीच्या वातावरणामध्ये आपण वावरतो आहे. ही भूमी तर गांधीजीची – विनोबांची आहे. मी अगोदर तिथे गेलो. गौतमभाईंना भेटलो. विनोबांची ज्यांनी शंभर रेखाचित्र काढली त्यांनाही भेटलो. त्यांचं एक चित्र लंडनमध्ये प्रकाशित झालं. या दोघांनाही सेवाग्राम आणि पवनार येथे भेटून त्यांचं दर्शन घेतलं. विनोबांच्या समाधीचं दर्शन घेतलं, कारण हे मला फार आवश्यक का वाटलं. मी नेहमीच तिथं जात होतो, म्हणून गांधींनी जो उदारमतवाद, मतस्वातंत्र्य, लोकशाही, मानवतावाद या सगळ्या मूल्यांची जपणूक केली आहे. ती मूल्य आजच्या वातावरणामध्ये संपताना दिसत आहेत आणि म्हणून ती जिवंत ठेवण्यासाठी, त्याला बलवान करण्यासाठी, त्याला ताकद देण्यासाठी त्याच्या पाठीशी उभं राहून आपल्या जीवनाची वाटचाल करण्यासाठी जी काही मंडळी समाजामध्ये काम करताहेत, त्यामध्ये माझे मित्र प्रा. सुरेश देशमुख आहेत. म्हणून त्यांना त्यासाठी मी शुभेच्छा देण्यासाठी या ठिकाणी आलो.



लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख
अमृत महोत्सव
कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

# कृतज्ञता वर्ष - 2023-2024
# आयोजित विविध कार्यक्रम

| कार्यक्रम | दिनांक व स्थळ | प्रमुख पाहुणे |
|---|---|---|
| अमृत महोत्सवी वर्षाचा शुभारंभ समारोह | दि. २० मे २०२३<br>यशवंत महाविद्यालय, वर्धा | **समारोहाचे उद्घाटक**<br>मा. अरुण गुजराथी, माजी अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य<br>**समारोहाचे अध्यक्ष**<br>मा. उल्हासदादा पवार, माजी आमदार, पुणे<br>**प्रमुख पाहुणे**<br>मा. आमदार अनिल देशमुख, माजी मंत्री महाराष्ट्र राज्य<br>**प्रमुख अतिथी**<br>मा. रामदास तडस, माजी खासदार वर्धा |
| पर्यावरण जागृती कार्यक्रम | ५ जून २०२३<br>यशवंत महाविद्यालय, वर्धा | **कार्यक्रमाचे अध्यक्ष**<br>समीर देशमुख, अध्यक्ष, यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा<br>**प्रमुख वक्ते**<br>मा. मुरलीधर बेलखोडे, निसर्ग सेवा समिती, वर्धा<br>**प्रमुख उपस्थिती**<br>मा. डॉ. विलासराव देशमुख, माजी प्राचार्य, यशवंत महाविद्यालय, वर्धा<br>मा. डॉ. विजय बोबडे, माजी प्राचार्य, यशवंत महाविद्यालय, वर्धा<br>मा. डॉ. रवींद्र बेले, प्रभारी प्राचार्य, यशवंत महाविद्यालय, वर्धा |
| वृक्षारोपण | ५ जून २०२३<br>बापुरावजी देशमुख पुतळा ते प्रशासकीय इमारत | **उद्घाटक**<br>मा. राकेश सेपट (भा. व. से.)<br>उप वनसंरक्षक अधिकारी, वन विभाग, वर्धा<br>**प्रमुख पाहुणे**<br>मा. प्रदीप दाते, अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर<br>**प्रमुख अतिथी**<br>मा. डॉ. संदीप देशमुख, अध्यक्ष, बापुरावजी देशमुख सूतगिरणी, वर्धा |
| वृक्षारोपण व रक्तदान शिबिर<br><br>रक्तदान शिबिर | दि. ९ जुलै २०२३<br>व्हीआयपी रोड, नालवाडी<br><br>महात्मा लॉन, वर्धा | **उद्घाटक**<br>मा. राहुल कर्डिले (भा. प्र. से.), जिल्हाधिकारी, वर्धा<br>**प्रमुख पाहुणे**<br>मा. दीपक कारंडे , उपविभागीय अधिकारी, वर्धा<br>**प्रमुख अतिथी**<br>मा. शेखर शेंडे, महाराष्ट्र प्रदेश सचिव, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस<br>मा. मुरलीधर बेलखोडे, अध्यक्ष, निसर्ग सेवा समिती, वर्धा<br>मा. सौ. प्रतिभा माऊस्कर, लोकनियुक्त सरपंच, नालवाडी<br>मा. अविनाश काकडे, ज्येष्ठ समाजसेवक, वर्धा<br>**प्रमुख उपस्थिती**<br>मा. डॉ. विलासराव देशमुख, माजी प्राचार्य, यशवंत महाविद्यालय, वर्धा |
| वृक्षारोपण | दि. १२ ऑगस्ट २०२३<br>सेवाग्राम रोड, मातोश्री रमाबाई देशमुख पब्लिक स्कूलसमोर, वर्धा | **उद्घाटक**<br>मा. शेखर शेंडे, महाराष्ट्र प्रदेश सचिव, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस<br>**अध्यक्ष**<br>मा. सुनिल राऊत, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, वर्धा |

| | | |
|---|---|---|
| वृक्षारोपण | दि. १२ ऑगस्ट २०२३ सेवाग्राम रोड, मातोश्री रमाबाई देशमुख पब्लिक स्कूलसमोर, वर्धा | **प्रमुख पाहुणे**<br>मा. राजाभाऊ मॅडमवार, समाजसेवक, हिंगणघाट<br>मा. रमेशजी भोयर, समाजसेवक, समुद्रपूर<br>मा. लक्ष्मीनारायण सोनवणे, माजी जिल्हाधिकारी, वर्धा<br>मा. विजयराव मुळे, समाजसेवक, वर्धा<br>मा. सौ. स्मिता बोस, प्राचार्या, रमाबाई देशमुख पब्लिक स्कूल, वर्धा<br>मा. मुरलीधर बेलखोडे, अध्यक्ष, निसर्ग सेवा समिती, वर्धा |
| वृक्षारोपण | दि. ११ ऑक्टोबर २०२३ सेवाग्राम रोड, महिला आश्रम, वर्धा | **उद्‌घाटक**<br>मा. सौ. स्वातीताई देशमुख, वर्धा<br>**अध्यक्ष**<br>मा. शरयूताई वांदिले, माजी सभापती, पंचायत समिती, वर्धा<br>**प्रमुख पाहुणे**<br>मा. दुर्गाताई धुरत, यशवंत अध्यापक विद्यालय, वर्धा<br>मा. शैलजाताई साळुंखे, अध्यक्ष कुणबी महासंघ, वर्धा<br>मा. मीनाताई इंगळे, उपाध्यक्ष, कुणबी महासंघ, वर्धा<br>मा. सिंधुताई साबळे, उपाध्यक्ष, राष्ट्रवादी महिला काँग्रेस, वर्धा |
| रक्तदान शिबिर | दि. १३ ऑक्टोबर २०२३ यशवंत महाविद्यालय, वर्धा | **उद्‌घाटक**<br>मा. इंद्रकुमार सराफ, माजी नगराध्यक्ष, वर्धा<br>**अध्यक्ष**<br>मा. प्रवीण हिवरे,<br>अध्यक्ष, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, वर्धा<br>**प्रमुख पाहुणे**<br>मा. सचिन तडस, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा<br>मा. मकरंद पाठक, सुप्रसिद्ध वास्तुविशारद, वर्धा |
| व्याख्यान 'शिक्षणाची समस्या व वर्ध्याचा उपाय' | दि. ४ डिसेंबर २०२३ स. ब. सार्वजनिक वाचनालय, वर्धा | **कार्यक्रमाचे अध्यक्ष**<br>मा. डॉ. राजेंद्र शिंगणे, आमदार तथा माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य<br>**प्रमुख वक्ते**<br>पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, ज्येष्ठ समाजसेवक तथा संचालक, सर्च, शोधग्राम |
| गज़ल संध्या शब्द सुरांची भावयात्रा | दि. १९ डिसेंबर २०२३ स. ब. सार्वजनिक जिल्हा ग्रंथालयाचे सभागृह, वर्धा | **सादरकर्ते**<br>गज़लनवाज भीमराव पांचाळे व डॉ. भाग्यश्री पांचाळे, मुंबई |
| यशवंत सांस्कृतिक व क्रीडा महोत्सव | दि. ९, १० व ११ जानेवारी २०२४ यशवंत महाविद्यालय, वर्धा | यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित २२ शाळा, ११ कनिष्ठ महाविद्यालये, ५ वरिष्ठ महाविद्यालये यांच्या विविध स्पर्धांचे आयोजन |

**आयोजन समिती सदस्य**

दत्ताजी मेघे (माजी मंत्री तथा माजी खासदार, नागपूर), हर्षवर्धन देशमुख (अध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती), गिरीश गांधी (माजी आमदार, नागपूर), राजेंद्र शिंगणे (आमदार तथा माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य), मा. सुभाष धोटे (आमदार, राजुरा), मा. डॉ. संतोषराव कोरपे, (अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला), अरविंद पोरेड्डीवार, (माजी अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली), मा. राजेंद्र जैन (माजी आमदार, गोंदिया), मा. प्रवीण देशमुख (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, राळेगाव),


लोकनेता
माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख गौरवांक